
१३५ इतिहास



श्री.

# सद्गुरु चरणारविंदीं.

नमन करून

ही

ग्रंथरूपी

यथाशक्ति व यथामति केलेली

अत्यल्प

# देशसेवा.

## नारायण भवानराव पावगी

यानें

आपल्या दयितआर्यभूमीच्या ठिकाणीं

असलेल्या अत्युत्कट

## प्रीत्यर्थ

सकळ

## आर्य भगिनींस व आर्य बांधवांस.

प्रीतिपूर्वक

अत्यादरानें समर्पिली असे.

# भारतीय साम्राज्य.

## प्रस्तावना.

नष्टोमोहः स्मृतिर्लब्धात्वत्प्रसादान्मयाच्युत ।

या सेवकानें पूर्वार्धाच्या पहिल्या पुस्तकांत, एकंदर नऊ भागांत, भरतखंडाचा देशवृत्तांत दिला. आणि त्यांत १ देशस्थिति, २।३ उद्भिज्जसंपत्ति, ४।५ कृपिकर्मपद्धति, ६ प्राणिजातिसंपत्ति, ७ खनिजसंपत्ति, ८ वातावरणमीमांसा, व ९ भरतखंड भूरचना, यांजविषयीं कसेंबसें यथामति वर्णन केलें.

आतां, पूर्वार्धाच्या प्रथम पुस्तकाच्या प्रस्तावनेंत सूचित केल्याप्रमाणें, ह्या द्वितीय पुस्तकांत आर्यलोक व त्यांचें बुद्धिवैभव, याविषयीं थोडासा वृत्तान्त देण्याचें काम हातीं धरलें असून, तें कसें तडीस जाईल याविषयीं माझें मन अगदीं साशंक होतें. परंतु श्रीच्या कृपेनें, पूर्व संकेतानुरूप, तें सर्व शेवटास गेलें, ह्मणून मी त्या श्रीसद्गुरूचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत पुस्तकांत १० पासून १४ पर्यंत, एकंदर पांच भाग आहेत. १० **आर्यांचें मुलनिवासस्थान,** ११ **आर्यांची सामाजिक रचना** आणि **धर्मसंस्था,** १२ **आर्यभाषा,** १३ **वेद व वेदांगें,** आणि १४ **महाभाष्यें व गद्यपद्यादि भाषाशास्त्र.**

ह्या पुस्तकांत **ऋग्वेदाचा** काल अगदीं नूतन शोधावरून, मोठमोठ्या **पौरस्त्य** आणि **पाश्चात्य** पंडितांस जो मान्य झाल्यासारखा वाटला, तोच दिला आहे.

तारीख ५ सप्टेंबर १८९२ रोजीं, **लंदन्** राजधानींत **प्राच्यभाषाकोविदांची** एक प्रचंड **परिषद्** भरली असून, तींत अध्यक्षस्थान पंडित **मोक्षमुलर** यांनींच स्वीकारलें होतें. त्यावेळीं त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, भाषेच्या इतिहासावरून पाहतां, **आर्य** लोकांच्या अतिप्राचीन अस्तित्वाचा काल, **ख्रिस्ती** शकापूर्वी दहा हजार वर्षेपर्यंत पोहोंचविण्यास हरकत दिसत नाहीं.

तसेंच, **पुण्यपत्तनां**तील प्रसिद्ध सामाजिक पुढारी, व ऐटदार देशाभिमानी, आणि अगदीं निर्भिड व निस्पृह विद्वान राजमान्य राजश्री **बाळ गंगाधर टिळक,** बी. ए; एल. एल. बी, यांच्या **मृगशीर्ष** नामक[1] अत्युपयुक्त व दीर्घ परिश्रमानें केलेल्या पुस्तकावरून सुद्धां, **ऋग्वेदाचा**

---

1 The Orion, or researches into the antiquity of the Vedàs.

काल इ० स० पूर्वी चार हजार वर्षें, व त्याही पलीकडे जात असल्याचें सिद्ध होत आहे. इतकेंच नव्हे तर, त्यांतील प्रमेयें देखील **पाश्चात्य** पंडितांस संमत आहेत. सबब सदरीं निर्दिष्ट केलेल्या प्रमाणांवर, आणि इतर आभ्यंतरीय पुराव्याच्या साधनांवर नजर देऊन, एकंदर वेदकालाचा निर्देश केला आहे.

"**भारतीय साम्राज्य**" ग्रंथांत ज्या ज्या पुस्तकांचा मी उपयोग केला आहे, त्या त्या ग्रंथकारांचे मी बहुत आभार मानतों.

असो. विद्वान, बहुश्रुत, आणि रसिक वाचकांपुढें मजसारख्या **अल्पधीनें** तें जास्त काय सांगावयाचें! तथापि, "**पुरुषमतिवैचित्र्या**" वर नजर देऊन, या ग्रंथांत असलेल्या अनेक दोषांबद्दल वाचकांनीं उदारबुद्धीनें क्षमा करून मजवर केवळ अनुग्रहच करावा, अशी मी आदरपूर्वक सविनय प्रार्थना करितों.

मुक्काम पुणें. मंगळवार. मार्गशीर्ष शु॥ ११ शके १८१५. विजयनाम-संवत्सरे.

**नारायण भवानराव पावगी.**

---

1 "I confess that the author ( of the Orion ) has convinced me in all essential points."

( Address delivered on commemoration Day, 22 nd Feb. 1894,

By Maurice Bloom Field. P. H. D. Professor of Sanskrit and Philology, Johns Hopkin's University. Baltimore. United States.)

# अनुक्रमणिका.

प्रारंभ.

# पुस्तक दुसरें.

## भाग १० वा.

### आर्यांचें मूलनिवासस्थान.

हिंदुस्थान हेंच आर्य लोकांचें मूळचें निवासस्थान असावें–त्या आदिस्थानाची व्याप्ति–त्याविषयीं वेद व पुराणांतील प्रमाण–तत्संबंधीं दुसरें शास्त्रीय प्रमाण–आर्य कुटुंबांतील शाखेचें पश्चिम दिशेकडे गमन–त्यांचा युरोपखंडांत सर्वत्र विस्तार–मध्य आशियांतील पठार हेंच आर्यांचें मूलनिवासस्थान असल्याविषयीं कांहींचें मत–आर्यांचा सर्वत्र विस्तार–आदिभाषा संस्कृत–संस्कृताचीं रूपांतरें व अपभ्रंश–हिंदु आर्य लोक–दुसरें तुराणी कुटुंब–तिसरें शमी नामक कुटुंब–आर्य लोकांची मूल गृहस्थिति–सुखोपभोगाविषयीं त्यांच्यांत असलेलीं नाना तऱ्हेचीं साधनें, व त्यांच्या तत्कालीन उन्नतीचें दिग्दर्शन–वेद हेच आर्यांच्या अतिप्राचीन उन्नतीचें प्रमाण–वेदांचे उत्पादक–त्यांची मानसिक उत्क्रांति–त्यांचा आनुमानिक काल–आर्य लोकांचें क्रमाक्रमानें झालेलें स्थलांतर–त्यांच्या वसतिप्रदेशाची मर्यादा–त्यांस ईशप्रतिबिंब भासमान होण्याचीं कारणें–त्यांची धर्मरचना व अद्वैत मत–अनेक देवतांचा आभास–भूदेवता–आकाश देवता–स्वर्देवता–सर्वांचें आदिकारण हिरण्यगर्भ–अग्नि वगैरे भूदेवता–इंद्र व मरुत् वगैरे स्वर्देवता–

अग्नि-इंद्र-सूर्य-वरुण वगैरे स्वर्देवता-अनेक प्रकारचे मेध-मेध्य प्राण्याचीं लक्षणें व परीक्षण-शुनःशेणाची आख्यायिका व पुरुष-मेध-इष्टि-स्तोम आणि सोम-मधुपर्क-पश्चात्तापशुद्धता-मृतक्रिया-देहदहनप्रसार-आत्म्याचें स्वस्तिक्षेम.

---

# भाग ११ वा.

## आर्यांची सामाजिक रचना आणि धर्मसंस्था.

आर्यसमाजरचना-पुरोहित वर्ग रचना-त्यांचे मंत्र-व त्यांचीं पृथक् पृथक् कर्में-कर्मविधीचें एकीकरण-ब्राम्हण वर्ण-क्षत्रिय वर्ण-वैश्य वर्ण, व शूद्रवर्ण-त्या सर्वांचा परस्पर रोटीव्यवहार व बेटीव्यवहार-व्रात्यस्तोम व उच्च वर्गांत प्रवेश-वर्णाश्रमधर्म आणि ब्राह्मणांची इतिकर्तव्यता-ब्राम्हणांचा मनोनिग्रह, व त्यांचें नृपत्वाविषयीं पूर्ण वैराग्य-आर्यावर्त्तांतील शांतता, व तिचा परिणाम-ब्राह्मण साम्राज्य सत्तेचा सुविनियोग-वेदकालीन साम्राज्य-रामायण कालांतील साम्राज्य-युधिष्टिरकालांतील साम्राज्य-बौद्ध कालांतील साम्राज्य-विक्रम साम्राज्य-इतर चक्रवर्ती राजे-मुसलमानांचा पगडा, व हिंदुसाम्राज्याची पुनश्च प्रतिष्ठापना-पश्चिम, दक्षिण, आणि प्राचीं दिशेकडील प्रांत, व हिंदुसाम्राज्याचा विस्तार-त्यांतील भाषा, व धर्मसंस्था-हिंदुस्वातंत्र्य, व हिंदु साम्राज्य.

---

# भाग १२ वा.

## आर्यभाषा.

संस्कृत भाषा व तिचें श्रेष्ठत्व-त्याविषयीं पाश्चात्य भाषाकोविदांचे अभिप्राय-संस्कृत आर्यविद्येचें पौराणत्व-संस्कृत विद्येचें श्रेय-त्यांतील नाना तऱ्हेचे विषय-वेदांतविषय-धर्म व त्याची मूळ उत्पत्ति, आणि संस्कृतांतील धर्मविषयक ग्रंथ-व्यवहार-

आचार-व नीतिशास्त्रविषयक संस्कृत ग्रंथ-भाषाशास्त्र-इतिहास व कल्पित कथा, टंकसंग्रह, नृवंश विद्या, प्राणिविद्या उद्भिद्विद्या, आणि भूगर्भशास्त्र, यांचें हिंदुस्थान हें माहेर घर.

---

# भाग १३ वा.

## वेद व वेदांगें.

वेदांचें पौराणत्व व त्याविषयींचीं प्रमाणें-नाक्षत्रिकप्रमाण-हिंदूंचें चांद्रमान, व बाबिलन् सौरमान-चंद्राचें परिवर्त्तन-आर्य ज्योतिर्विद्या व तत्संबंधीं ऋणखंडन-संस्कृतांविषयीं अविचारी पाश्चिमात्याचें मत-अविचारी पाश्चात्यांचा धृष्टपणा-हिंदु लेण्यांविषयीं मिल्लचें बालिश मत-तत्संबंधीं इतर पाश्चात्यांची टीका-ड्युगल्ड स्टयुवर्ट यांचें संस्कृतग्रंथसंपत्ति संबंधीं जिव्हाचापल्य-भट्ट मोक्षमूलर यांनीं ड्युगल्ड स्टुवर्ट याच्या मताचें केलेलें खंडण-पाश्चिमात्यांचें सत्यमतावलंबन व दुराग्रही लोकांची फटफजिती-वृथादर्पाचें कारण-प्रसिद्ध इतिहासकार ऑकले यांचा श्वेतबंधूविषयीं अभिप्राय-गोपवारा-नाक्षत्रिक प्रमाणानें वेदाच्या कालाची सिद्धता-मार्टिनूहौंचें वेदकालाविषयीं मत-बाह्य व भूगोलविषयक प्रमाण-रामचंद्राचें साम्राज्य-युधिष्टिराचें साम्राज्य-ब्राम्हणी धर्माचा सर्वत्र प्रसार-त्या वेळच्या व हल्लींच्या स्थितींतल्या महदन्तराचें दिग्दर्शन. आभ्यंतरप्रमाणावरून वेदपौराणत्वाची सिद्धि-वेदकालीन मनाची बाल्यावस्था-वेदकालीन मनाची युवावस्था, किंवा पूर्वार्ध-वेदकालीन मनाची वृद्धावस्था, किंवा उत्तरार्ध-सर्व वस्तूंच्या अनादिसिद्ध अशा एक कारणाविषयीं आर्यांची अचल श्रद्धा-अध्यात्म विद्येंत हिंदूचा पुरातन शोध-त्या वेळीं इतर राष्ट्रांचीं गाढ निद्रा, व-हिंदुस्थानचें ऐश्वर्य, आणि मानसिक उन्नति-संस्कृत विद्येचा उपयोग-हिंदु लोकांविषयीं थार्नूटन इतिहासकाराचें मत-तात्पर्यार्थ-वेदांचा ऐति-

सिक दृष्टीनें अमूल्य उपयोग–चार वेद–प्रत्येक वेदाची संहिता–वेदांचीं ब्राह्मणें–वेदांचीं आरण्यकें–वेदांचीं सूत्रें–वेदांतील विषय–ऋग्वेद संहिता, व मंडलें–मंडलांचे प्रवर्तक–अग्निदेवता–इंद्र देवता–सूर्य व इतर देवता–ऋग्वेदाचे ब्राह्मण–ऐतरेय ब्राह्मणाचीं आरण्यकें, व त्यांतील विषय–ऐतरेय आरण्यकाचे पांच भाग–त्यांतील ऐतिहासिक बीज, व भूगोल विद्येचें मूलतत्व–ऋग्वेदांचीं सूत्रें–त्यांतील विषय–वेदानुक्रमणी–वेदांगें–शिक्षा–छंद व ज्योतिषशास्त्र–ऋग्वेदाच्या आलोकनानें जगाचें कल्याण,–आणि हिंदुधर्मांचें संरक्षण–यजुर्वेदाचे दोन भाग, कृष्ण यजुर्वेद व शुक्ल यजुर्वेद–कृष्ण यजुर्वेदाची संहिता–त्याचे ब्राह्मण–त्याचीं उपनिषदें, व सूत्रें–शुक्ल यजुर्वेद–त्याची संहिता–त्याचे ब्राह्मण–त्याचीं आरण्यकें, आणि सूत्रें–सामवेद संहिता–सामवेदाचे ब्राह्मण–त्यावरून तत्कालीन स्थितीचें दिग्दर्शन–सामवेदांचीं उपनिषदें–सामवेदाचीं सूत्रें–अथर्व वेदाची संहिता–त्याचे ब्राह्मण, व सूत्रें–त्याचीं उपनिषदें, व त्यांतील विषय–ब्राह्मण शब्दाची व्युत्पत्ति–सांप्रदायिक उपनिषदें व धर्मपंथ–ईश्वरप्रणीत–वेद श्रुति, व स्मृति–त्यांची व्याख्या–वेदांवरील मूळ टीकाग्रंथ–त्यांचा काल–इतर टीकाकार, व त्यांचा काल–सायणाचें भाष्य, व त्याचा काल–सायण भाष्याची उपयुक्तता.

---

## भाग २४ वा.

### महाकाव्यें व गद्यपद्यादि भाषाशास्त्र.

रामायण–हिंदूंचीं महाकाव्यें व त्यांचें प्राचीनत्व–रामायणाचा कालनिर्देश–त्याचा महाभारतांतील उल्लेख–पाणिनींतील उल्लेख–राजा दामोदरच्या वेळीं त्याची पवित्र कीर्ति–महाभाष्यांतील त्याचा उल्लेख—कालिदास कवीची त्याविषयीं आदरोक्ति—त्यासंबंधीं प्रोफेसर वेबरचें मत, व त्याचें खंडन–होमरकाव्य, आणि त्यांतील प्राच्य सांप्रदायांचें अनुकरण—त्यां

प्राच्य विषयक ग्रंथ—भरतखंडाचा ग्रीस देश ऋणी—दक्षिण हिंदुस्थानांतील, या दोन्ही महाकाव्याच्या वेळची स्थिति, व रामायणाचा काल—रामायणांतील भाषापद्धति—तत्कालीन लोकनीति—महाभारताचा काल—ऐतरेय ब्राह्मण व सूत्रांचा काल—महाभारत, रामायण, वेद, धर्म, आणि कला, ह्या सर्वांत कांहींना कांहीं तरी न्यून दाखविण्याविषयीं पाश्चात्यांचा प्रयत्न—सदरहू मतांचें यथार्थ खंडन—भगवद्गीतेचें पौराणत्व—पाश्चात्यांच्या आक्षेपांचें बालिशत्व—त्यांचा दुराग्रह—त्या दुराग्रहाचें खंडन—भक्ति व श्रद्धेचें पौराणत्व—भारतीयांचें पाश्चात्यांच्या शिरावरील ऋण—पाश्चात्यांच्या कुटिल वर्तनाचें फल—पाश्चात्यांच्या विपक्षवृत्तीचा मासला—मिल्ल, मोक्षमुलर, वेबर, रॉथ, बोटलिंग—अपवाद—पाणिनि—तत्कृत अष्टाध्यायी—तिचें खरें महत्व व उपयुक्तता—पाणिनीचाकाल—अष्टाध्यायीचे भाष्यकार—भट्टोजी दीक्षितकृत्त कौमुदी—पाणिनीकालासंबंधीं उद्भवलेल्या शंकेचें निवारण—पाणिनीच्या अष्टाध्यायीविषयीं इतर राष्ट्रांचे अभिप्राय—कविरत्नविपाकाचे फल—संस्कृत ग्रंथावलीच्या अनंतत्वाविषयीं सर जोन्स् याचा अभिप्राय—कविश्रेणी—कालिदास—त्याचा काल—त्याचे ग्रंथ—ऋतुसंहार—रघुवंश—मेघदूत—सेतुकाव्य—शाकुंतल—त्याचें भाषांतर—त्याविषयींची युरोपखंडांतील कीर्ति, व पाश्चिमात्यांचा अभिप्राय—कवीन्द्रांत कालिदासाची गणना—नवरत्नें—भवभूति, व त्याचे ग्रंथ—मालतीमाधव—महावीरचरित—उत्तररामचरित—त्याचे कविगुण—त्याचा काल, व कुल—इतर नाटकें, व महाकाव्यें—गद्यग्रंथ गद्यात्मक कवित्रय—दंडी—त्याचे—ग्रंथ—सुबंधु व त्याचा काल—बाण व त्याचा काल—त्याचे प्रसिद्ध ग्रंथ—कादंबरीचा पूर्वार्ध व उत्तरार्ध बृहत्कथा व कथासरित्सागर—गीतगोविंद व भामिनीविलास—कल्पितकथा व उपाख्यानें—भाषाकोष व त्याचा कर्ता—अमरसिंहाचा काल—इतर कोषकार—छंदशास्त्र—त्याचें पौराणत्व—त्याचे शास्त्रें, व त्यावरील प्रमाण ग्रंथ—भाषारीति.

# भारतीय साम्राज्य.

## पूर्वार्ध.

## पुस्तक दुसरें.

### आर्यलोक व त्यांचें बुद्धिवैभव.

### भाग १० वा.

#### आर्यांचें मूलनिवासस्थान.

हिंदुस्थान हेंच आर्य लोकांचें मूळचें निवासस्थान असावें.

आशियाखंडांत आर्यलोकांचें मूळचें निवासस्थान कोणतें, त्यांनीं कसकसें, कोणत्या दिशेकडे, केव्हां पर्यटन केलें, आणि ते कोठकोठें, कशा वसाहती करून राहिले, यांविषयीं समग्र, विश्वसनीय, व इत्थंभूत, अशी माहिती कोठेंही उपलब्ध नाहीं.

त्या आदिस्थानाची व्याप्ति.

तथापि, या जगत्तलावरील अति पुराण लेख वेदच असल्यामुळें, अन्यत्र कोठेंही न मिळणारी अशी प्राचीन काळची अमूल्य माहिती पुरविण्याच्या कामीं, ते केवळ भरपूर भांडार व आधारस्तंभच आहेत, असें

ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. ह्या वेदावलोकनावरून असें कळून येतें कीं, आमच्या **आर्यांच्या** मूलवस्तीचें लक्षांत ठेवण्यासारखें फार प्राचीन स्थान म्हटलें ह्मणजे **उत्तर हिंदुस्थान,** त्याच्या **वायव्यदिशेकडील** प्रांत, **आफगाणिस्थान,** आणि त्याच्या आसमंतांतील प्रदेश, हे होत. किंबहुना, आमच्या **आर्यांचें** आणि अखिल मानवी जातीचें आद्य निवासस्थान **हिंदुस्थानच**[1] असावें. इतकेंच नाहीं तर, ह्या **भरतभूमी**शिवाय त्यांची प्रथमची वस्ती इतर ठिकाणीं कोठेंही नसावी, असें ह्मणण्यास अंतःप्रमाणांवरून विशेष बाध येईल असें वाटत

त्याविषयीं वेद व पुराणांतील प्रमाण.

नाहीं. कारण, आमचे **वेद,** आमचीं **पुराणें,** आणि आमचीं ऐतिहासिक

---

१ एक प्रसिद्ध फ्रेंच पंडित क्रूझर हा असें लिहितो कीं, हिंदुस्थान हेंच अखिल मानवी कुटुंबांची जन्मभूमि होय. निदान एकंदर मानवी जातीची आद्योन्नति तरी येथेंच उदयास येऊन, ती येथेंच विकासाप्रत पावली. येथूनच ती जगांतील इतर भागांत ह्मणजे प्राचीन व अर्वाचीन खंडांत पसरली. आणि मनुष्याचें जीवन जें ज्ञान त्याचा प्रसार देखील येथूनच होऊन, ते सर्वत्र फैलावलें:—

"If there is a country on earth, which can justly claim the honour of having been the cradle of the human race, or at least the scene of a primitive civilization, the successive developments of which carried into all parts of the ancient world, and even beyond the blessings of knowledge which is the second life of man, that country assuredly is India.'

**कथानकें**, ह्या सर्वांच्या अवलोकनावरून असें खचित अनुमान होतें कीं, केवळ आमच्या **भारतीयांचींच** ऐतिहासिक स्थलविशेषें, या **आर्यभूमींत** आहेत अशी गोष्ट नसून, आमच्या अतिपूज्य **देवादिकांचीं** देखील निवासस्थानें, त्यांचीं विहारोद्यानें, आणि त्यांच्या संचारवीथिका, हीं यच्यावत् सर्व अत्युच्च, उदार, आणि **श्रीमान्** असा जो पूर्वपाश्चिम **समुद्रगामी हिमालय** पर्वत, त्याच्या गगनचुंबी शिखरांवर, व निम्न प्रांतभागीं, आणि विशाल मेखला प्रदेशांवरच असल्याचें स्पष्टपणें दिसून येतें.

**हिंदुस्थान,** व त्याच्या आसमंतांतील प्रदेश, यांशिवाय दुसरेंच एखादें निवासस्थान आमच्या **भारतीयांचें** असल्याविषयीं, जर यत्किंचित्‌ही उल्लेख आमच्या अतिपुराण **वेद** ग्रंथांत, तसेंच इतर सर्वमान्य प्राचीन **पुराणांत**, मिळत नाहीं, तर अनंत कालापासून **भरतखंडच** आमची **दयितआर्यभूमी** असावी, व आम्ही परदेशांतून येऊन येथें नवीनच अधिनिवासस्थान केलें नाहीं, असें ह्मणण्यास यत्किंचित्‌ही प्रत्यवाय दिसत नाहीं.

---

१ "It is opposed to their foreign origin, that neither in the code, nor, I believe, in the Vedas nor in any book that is certainly older than the code, is there any allusion to a prior residence or to a knowledge of more than the name of any country

पुढें चालू.

तत्संबंधी दुसरें शास्त्रीय प्रमाण.

आतां, याबरोबर दुसरीही एक कल्पना साहजीकच उत्पन्न होत असून, ती खरोखर विचार करण्यासारखीच आहे. अलीकडे शब्दव्युत्पत्ति शास्त्राच्या योगानें असें कळून येत आहे कीं, **संस्कृत** ही मूळ भाषा असून, त्यांतील शब्द, किंवा त्या शब्दांचीं मूळरूपें, अथवा त्यांचे अपभ्रंश, हीं इतर सर्व भाषांत दृग्गोचर होतात. त्यावरून अनेकभाषा-कोविद, आणि भाषातत्त्वज्ञ, यांनीं असें एक तत्त्व शोधून काढिलें आहे कीं, ह्या सर्व भाषा बोलणारे भिन्न भिन्न राष्ट्रांतील लोक, हजारों वर्षांमागें, केव्हां तरी एकदां, **मध्यआशियांतील** उच्च पठारावर एकत्र राहिले असून, त्यांची सांज्ञिक, व परस्परांचे विचार प्रदर्शित करण्याची, एकच **संस्कृत** भाषा होती. परंतु कालगतीनें तेच लोक पुढें पृथक् पृथक् होऊन, निरनिराळ्या देशांत गेल्यामुळें, त्यांची भाषा साहजीकच भिन्न भिन्न झाली. तथापि, **आर्य** लोक **आर्यावर्ता**बाहेरून आले, असें मानण्यास येवढ्या-

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

out of India. Even mythology goes no further than the Himâlaya chain in which is fixed the habitation of the gods." ( Elphinstn's History of India. )

" My lords, these Gentoo people are the original people of Hindustan."

( Burke Vol. VII P. 46. )

रूनच विशेष बलवत्तर असें कांहींच प्रमाण दिसत नाहीं.

आर्य कुटुंबांतील शाखेचें पश्चिम दिशेकडे गमन.

याप्रमाणें सर्वांचेंच मूळ जें **आर्यकुटुंब** व **आर्य भाषा**, यांची उत्पत्ति व विस्तार हीं, त्यांची **जन्मभूमी** जें **भरतखंड** यांतच होत गेलीं. तदनंतर या **भरतभूमीच्या** वायव्य सरहद्दीच्या पलीकडे **आर्य**शाखेचा जो फैलाव झाला, त्यानें आपली वाट पश्चिम दिशेकडे धरली असावी, हें केवळ संभवनीय दिसतें. आणि सादृश्य प्रमाणांवरून देखील सुधारणेचा फैलाव, आणि उन्नतीचा उदय, हीं **पूर्व** दिशेकडूनच **पश्चिम** दिशेकडे होत गेल्याचें सिद्धवत ठरतें. ही **आर्य**शाखा पश्चिम दिशेनें आपल्या मार्गाचें आक्रमण करीत करीत, **मध्य आशियांतील** उच्च पठारांतून **इराण, ग्रीस, इताली, स्पेन, इंग्लंड, जर्मनी, रशिया,** वगैरे

त्यांचा युरोपखंडांत सर्वत्र विस्तार.

देशांत उतरली. व त्या ठिकाणीं त्यांनीं आपल्या वसाहती वसवून, राज्येंही स्थापन केलीं; सबब त्याची सविस्तर हकीकत यापुढें दिली आहे.

आतां, कांहीं **भाषातत्त्वज्ञांनीं** मानवी जातीचीं मोठमोठीं तीन कुटुंबें कल्पिलीं आहेत. तीं १ **आर्य**, २ **तुराणी**, आणि ३ **शमी**, अशीं होत.

ह्यांच्या मतें या मानवी जातींच्या वस्तीचें लक्षांत

मध्य आशियांतील पठार हेंच

आर्यांचें मूलनिवासस्थान असल्याविषयीं कांहींचें मत.

ठेवण्यासारखें प्रथमचें ठिकाण ह्मटलें म्हणजे **मध्यआशियांतील** उच्च **प्रदेश** होय. **पारसीकांच्या वन्दिदाद** नामक धर्म पुस्तकाच्या पहिल्या अध्यायावरून असें समजतें कीं, **सिहून** ( सिरडेरिआ ) व **जिहून** ( अमुडरिआ, अथवा ऑक्सस् ) ह्या नद्यांच्या उगमानजीकच्या प्रदेशांत **आर्य** लोकांची वस्ती होती. आतां, ह्या दोन्ही नद्या **पूर्व तुर्कस्थानां**तील डोंगरांत उगम पावून वायव्यगामी होऊन **अर्लच्या** समुद्रास मिळतात, ही गोष्ट लक्षांत ठेविली ह्मणजे **आर्यलोकांचें** मूलनिवासस्थान कोणतें असावें, याविषयीं सहज कल्पना करतां येईल. या ठिकाणापासून पुढें कालगत्या स्थलांतर होऊन, हे **आर्यलोक** सरकत सरकत पूर्व दिशेकडे जात जात, कांहीं **हिंदुस्थानांत** उतरले, व कांहींनीं पश्चिम मार्ग आक्रमून **यूरोपखडांत** ठिकठिकाणीं वस्ती केली. पश्चिमेकडे जात असतां कांहीं **आर्यांनीं इराणचें** राज्य स्थापिलें, कांहींनीं सुप्रसिद्ध असें **आथेन्स** नामक शहर वसविलें, व कांहींनीं **रोम शहरांत** साम्राज्य केलें. याच **आर्यकुटुंबांतील** एक

आर्यांचा सर्वत्र विस्तार.

शाखा **स्पेन** देशांत गेली असून, त्यांनीं तेथें खाणी खणून रौप्यशोधन क्रिया चालविली असल्याचें इतिहासप्रसिद्ध आहे.

कांहींनीं इंग्लंडांत जाऊन कथिलाची शोधनक्रिया चालविली. कांहीं घराणीं **खोरासान, रूसदेश** व **काळा-समुद्र** वलांडून **थ्रेस** देशापर्यंत गेलीं. आणि कांहीं **आर्मिनिया** देशांतून निघून **कॉकेसस पर्वता**वरून **जर्मनींत** उतरलीं. हा सर्व शोध भाषाव्युत्पत्तिसाधनांनीं लागला असल्यामुळें विद्वज्जनांची अशी खात्री होत चालली आहे कीं, पूर्वीं केव्हां तरी एकदां **हिंदु, पारसीक, ग्रीक, रोमन, जर्मन** व **इंग्रज** ह्या लोकांचे पूर्वज ( **तुराणी** आणि **शमी** या दोन्हीं कुटुंबांपासून निराळे असे ) एकाच ठिकाणीं राहत होते. तथापि, **भरतखंडां**तूनच ह्या शाखा अशा प्रकारें चोहोंकडे पसरण्यास बिलकुल प्रत्यवाय दिसत नाहीं.

आदिभाषा संस्कृत.

असो. आतां, ह्या विस्तीर्ण **आर्यकुटुंबां**चें मूळचें वसतिस्थान एकच असल्यामुळें त्यांची व्यवहार भाषाही एकच होती असें दिसतें. आणि ही गोष्ट **आर्य** विस्तृत अनेक शाखांत जे मूळशब्द किंवा त्यांचे अपभ्रंश दृष्टीस पडतात, त्यावरून सिद्ध होतें. **संस्कृत** भाषेंतील अनेक शब्द, अपभ्रंश होऊन रूपांतर झालेल्या भिन्न भिन्न अवस्थेंत, निरनिराळ्या राष्ट्रांत, आज मितीसही आढळतात; आणि त्यावरून **पुराण संस्कृत** हीच आदिभाषा असावी असें निश्चयात्मक ठरतें.

**संस्कृतां**तील मूळ शब्द ' अग्नि ' याचें **लयाटीन** भाषेंत

' इग्निस ' ' Ignis ' असें रूपांतर दृष्टीस पडतें. ' द्यौः ' शब्दाचा अपभ्रंश ग्रीस देशांत ' झिअस ' zeus, इटालींत ' ज्यूपिटर ' Jupiter, आणि ट्युटॉनिक जातींत ' त्यू ' Tiu, असा आढळतो. ' उषस् ' चें ग्रीक भाषेंत ' इऑस ' Eos, ' नक्ता ' चें ' निक्स ' Nyx, ' सूर्या ' चें ' हिलिऑस ' Helios, असें रूपांतर झालें आहे. ' भग ' शब्द पुराण इराणी भाषेंत ' वग ' आणि पुराणस्ल्यॉव्हानिक भाषेंत ' बोगू ' Bogu, असा झालेला आहे. ' वरुणा ' चा ग्रीक भाषेंत ' युरेनस ' Uranus, ' वाता ' चा ' वोटन् ' Wotan, ' वाक् ' चा ' व्हॉक्स ' Vox, ' मरुत् ' चा ' मार्स; ' ' अयस् ' चा ल्याटीन भाषेंत ' एस ' Aes, ' एरीस Aeris; गॉथिक भाषेंत ' एस ' पुराण जर्मन भाषेंत ' एर ' Er, अर्वाचिन जर्मन भाषेंत ' एझन् ' Eisen, इंग्रजींत ' आयर्न ' Iron, असा अपभ्रंश झाल्याचें नजरेस येतें. ' पर्जन्य ' शब्द ' लेटिश ' भाषेंत ' पर्कुनास ' Perkunas, पुराण प्रशियन भाषेंत ' पर्क्युनास ' Percunos, पुराणस्ल्याव्हानिक भाषेंत ' पेरून ' Perun, पोलिश भाषेंत ' पायोरन ' Piorun, आणि बोहीमिअन भाषेंत ' पिरॉन ' Peraun, या रूपांतरानें आढळतो. सदहु भाषेंत या पर्जन्य शब्दाचा अर्थ

संस्कृताचीं रूपांतरें व अपभ्रंश.

' **मेघ गर्जित** ' अथवा ' **मेघदेवता** ' असाच आहे.

ह्या **पर्जन्य** शब्दाचें स्थित्यंतर, स्थलांतर वा अपभ्रंशानें झालेलें रूपांतर, हीं मनांत आणिलीं ह्मणजे असें भासमान होतें कीं, जो वृष्टिवाचक शब्द सात आठ हजार वर्षांपूर्वी आमच्या **आर्यांनीं भरतखंडांत सिंधुनदी** तीरावर मेघप्रसादार्थ वापरला, तोच शब्द कांहीं अपभ्रंशानें, तद्धेतुपूरणार्थच, **युरोपां**तील कांहीं राष्ट्रांत गेल्या सत-राव्या शतकांतही प्रचारांत होता; व ही गोष्ट प्रथम दर्शनीं जरी महत्वाची वाटत नाहीं तरी, त्याबद्दल सूक्ष्म विचार केला ह्मणजे गेलेला पुराणकाल हल्लीं अर्वाचीन काळीं देखील प्रत्यक्ष दृष्टीगोचर झाला असें खचित भासतें; तत्कालीन प्राचीन शब्द अर्वाचीन शब्दाप्रमाणेंच अजूनही प्रचारांत आहेत असें अनुमान होतें; आणि ते शब्द **आर्यकुलोत्पन्न** शाखांतच वापरते असल्यामुळें, ते प्रसिद्ध **पुराण लोक** पूर्व निवासस्थानांतच जणूकाय पुनश्च अवतरले, असें वाटतें. **पितृ, मातृ, भ्रातृ, स्वसृ ( सौदर्या, ) दुहितृ,** वगैरे अनेक **संस्कृत** शब्द इतर भाषांत कांहीं रूपांतरानें पुष्कळ आढळतात. त्याविषयीं आणखी येथें जास्त विस्तारानें लिहिण्याची अवश्यकता नाहीं.

हिंदु आर्य लोक.

**हिंदुस्थनां**त जे **आर्य लोक** अनादिकालापासून राहत असत, त्यांचेच आम्हीं **ब्राह्मण**, व **क्षत्रिय**, आणि

वैश्य, असे वंशज आहेत. आणि त्यांचेंच बुद्धिसामर्थ्य, बाहुप्रताप, व पराक्रमनैपुण्य, यांविषयीं पुढें सविस्तर विवेचन योग्य वेळीं व यथावकाश करण्यांत येईल.

दुसरें तुराणी कुटुंब

वर जीं मानव जातीचीं तीन कुटुंबें निर्दिष्ट केलीं त्यांपैकीं **तुराणी** नामक कुटुंब दुसरें होय. हे लोक पृथिवीवर जिकडे तिकडे पसरलेले होते. तथापि त्यांनीं आपल्या बाहुबलानें एखादा देश जिंकून स्वतंत्र राज्याची स्थापना केल्याचें कोठेंही ऐकिवांत नसून इतिहासप्रसिद्धही नाहीं. ह्या लोकांचा इतिहास असल्याचें कळून येत नाहीं; व तो कदाचित् असला तरी कोठेंच उपलब्ध नाहीं. हे लोक इतस्ततः परिभ्रमण करीत असतां, अधिक बलाढ्य व पराक्रमी राष्ट्रांशीं त्यांचा साम्ना होऊन ते पराभूत झाल्यामुळें, त्या विजयी लोकांनीं व्याप्त केलेलीं ठिकाणें ह्या **तुराणी** लोकांनीं सोडून देऊन ते **भरतखंडां**तील अरण्यमय पर्वत, त्याच्या दक्षिणेकडील अति दूरचा वस्तिरहित प्रांत, **मलाया** द्वीकल्प, आणि **पालिनीशिया** बेटें, येथें येऊन राहिले असल्याविषयीं अनुमान होतें. व तेव्हांपासूनच त्यांजविषयीं थोडीबहुत माहिती आपणास लागते. **तुराणी** लोकांचें मूळ राहण्याचें ठिकाण **भरतखंडा**च्या आसपास, किंवा **मध्यआशियां**तील **उच्च पठार** प्रदेशांत असावें. तथापि, आपलीं मूळस्थानें सोडून, **तुराणी** लोकांनीं अनेक वेळां चखेडे

व हल्ले केल्याचीं उदाहरणें इतिहासांत सांपडतात.

आतां जें राहिलें तें **शमी** नामक तिसरें कुटुंब होय. ह्याचें निवासस्थान **युफ्रेतीस** व **तैग्रीस** या नद्यांजवळ असल्याचें कळतें. या कुटुंबांतले लोक देशभिन्नतेप्रमाणें तीन प्रकारच्या निरनिराळ्या भाषा बोलत. **बॉबिलन** आणि **निनव्ही** येथील लोक **आरामी** भाषा बोलत. **पालिस्तैन, फिनिशिया,** व **कार्थेज,** येथील लोक **हीब्रु** भाषा बोलत. आणि **अरबस्थानचे** लोक **अरबी** भाषा बोलत. सदरहू तिन्ही भाषा बोलणाऱ्या लोकांचा समावेश **शमी कुटुंबांतच** होतो. **मिसर** देशांत प्राचीन सांकेतिक चिन्हात्मक अक्षरांची जी **कापती** नामक भाषा सुरू होती, ती याच कुळांतील असल्याविषयीं कल्पना आहे. ही सांकेतिक भाषा १७ व्या शतकानंतर बोलण्याची बंद झाली. आतां, सुधारलेल्या जगाच्या इतिहासांत **आर्य** व **शमी** ह्या दोन कुळांचाच समावेश होत असून, **तुराणी** लोक कधीं कधीं हल्ले करून त्यांस अडथळे मात्र करीत असत, असें भाषातत्वज्ञांचें मत आहे.

तिसरें शमी नामक कुटुंब.

**आर्य लोक** आपल्या मूळच्या निवासस्थानांत बायका-मुलें, व गुरेंढोरें, यांसहित राहिले असावे असें अनेकभाषा-कोविदांचें अनुमान आहे. ते आपला सर्व प्रपंच बरोबरच घेऊन हिंडत

आर्य लोकांची मूल गृहस्थिति.

असत; आणि निर्वाहाच्या सोयीसाठीं ते ठिकाठिकाणीं लांब लांबचे मुक्कामही करीत. मध्यआशियांत माळरानें विपुल असल्यामुळें, त्यांच्या गुरांची चरण्याची सोय यथास्थित होत असे, आणि स्वतःचा निर्वाह ते धान्यें पिकवून करीत. त्यांनीं बहुतेक ग्राम्य जनावरें पाळलेलीं असल्याचें दिसतें. त्यांच्या मूळस्थितीविषयीं जी कांहीं माहिती आपणास उपलब्ध आहे त्यावरून ते रानटी अवस्थेंत विलकुल नसून, ते बरेच सुधारलेल्या स्थितीप्रत पोहोंचले होते असें वाटतें. त्यांस बहुतेक धातूंविषयीं शोध लागला होता; व लोखंड, तांबें, रुपें, सोनें, वगैरे धातूंचा आणि मोत्यांचा उपयोग करण्याचेंही त्यांस माहीत होतें. त्यांस पैंटनिर्माणक्रिया व शिवणकाम चांगलें अवगत असून, ते उत्तम कपडेही वापरीत. त्यांच्यांत तितक्याही पुरातनकाळीं नानातऱ्हेचे शिल्पकार, कुशल सुवर्णकार, आणि नित्यनैमित्तिक वगैरे हरेक प्रकारचीं कामें करण्यासाठीं, तांबट, लोहार, सुतार,

---

१ वेदार्थ यत्न. पान १०४–११२–११८–१६८–३२२–३९४.
श्लोक ४–२–५–५–५–२.
ऋचा १५–५–३५–२ –३१–३०. ( पहा )

२ वे. य पान ४१६. श्लोक ४. ऋचा ३५. ,,

३ वे. य. पान ४६. श्लोक १५. ऋचा २३. ,,

४ वे. य. पान ८४. श्लोक ४. ऋचा ५८. ,,

सुखोपभोगाविषयीं त्यांच्यांत असलेलीं नानातऱ्हेचीं साधनें, व त्यांच्या तत्कालीन उन्नतीचें दिग्दर्शन.

व नापीतही होतें. नाण्याचाही उल्लेख तितक्या पुरातन काळीं केल्याचें आढळतें; त्यावरून त्यावेळीं नाणें प्रचारांत असून तें पाडण्याची कला देखील **आर्यांस** माहीत होती, यांत संशय नाहीं. त्यांच्याजवळ वाहनाचीं अनेक साधनें असत; आणि युद्धप्रसंगीं रथ[१] व अश्व, यांचा ते पुष्कळ उपयोग करीत. नौकानिर्माणक्रियेंत सुद्धां त्यांचें पाऊल बरेंच पुढें सरसावल्यासारखें दिसत असून, घरें[२] आणि वाडे, शहरें[३] व किल्ले, आयुधें[४] व वाद्यें, इत्यादि बहुतेक लागणाऱ्या गोष्टींविषयीं, त्यांनीं आपल्या अडचणी अगदीं काळजीपूर्वक शोध करून, आणि आपली बुद्धिमता, कल्पना, व चातुर्य, हीं खर्चून, दूर केल्या होत्या, असें वाटतें. ऐषआरामाकरतां व देवांस हविर्भाग देण्यासाठीं, ते **सोम**नामक लतेची दारू देखील तयार करीत असत; आणि त्यावेळीं मांस खाण्याविषयीं ते विधिनिषेध बाळगीत नसत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वेदार्थ यत्न. | पान | ३०६ | श्लोक | १६ | ऋचा | ३० | पद्य |
| | | २८ | ,, | ९ | ,, | २८ | ,, |
| २ वे. य. पा. | | ८९६ | ,, | १३ | ,, | ६१ | ,, |
| ३. वे. य. पा, | | ५२८ | ,, | ७ | ,, | ४७ | ,, |
| ४. वे. य. पा. | | ३३ | | १५ | | ३१ | ,, |
| | | ८५० | | ९ | | ५८ | ,, |
| | | ३४६ | | १ | | ३२ | ,, |
| | | ७२६ | | ६ | | ६२ | ,, |

एकंदरींत, त्या काळाच्या आमच्या आर्यलोकांविषयीं आज· मित्तीमही सूक्ष्म विचार केला असतां असें दिसून येतें कीं, सुधारलेल्या काळांत हरएक मनुष्यास, हरएक बाबतींत, हर-तऱ्हेचें सुख व्हावें, ह्मणून जे जे उपाय व शोध केले जातात, ते ते सर्व अथवा कांहीं अंशानें तरी, त्या पुराणकालीं, ह्मणजे आज सुमारें सात आठ हजार वर्षांमागें त्यांनीं केले होते. त्यावरून त्यांची विशालबुद्धि, त्यांचें दाक्षिण्य, व विशारदत्व, हीं सहजींच पूर्णपणें लक्षांत येतात.

वेद हेच आर्यांच्या अति प्राचीन उन्नतीचें प्रमाण.

ह्या गोष्टीला मूळप्रमाण आमचे वेदच होत. या वेद-चतुष्टयांत ऋग्वेद हा जगांतील सर्व ग्रंथांत अत्यंत पुराणग्रंथ आहे, असें आह्मा हिंदूंसचसें काय, पण तें अन्य कोणालाही प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. आशिया, यूरोप, आणि अमेरिका खंडांतील जीं राष्ट्रें सुधारणेच्या उच्च कोटीप्रत पोहोंचलीं आहेत, त्यांतील अत्यंत शोधक अशा प्रत्येक विद्वानाचें असेंच मत आहे.

वेदांचे उत्पादक

वेद ह्मणजे सुधारणेच्या बाल्यावस्थेंतील आमच्या पूर्व-जांचे अव्याज उद्गार होत. हें विस्तीर्ण नभोमंडल व त्यांत चमकणारे चंद्र-सूर्यादि प्रचंड गोल, मेघवृष्टि व त्यामुळें उद्भवलेला अमित जलसंचय, पवनकल्लोल व विद्युल्लतेचें तीक्ष्ण तेज, ही अवाढव्य पृथ्वी व तिजवरील विलक्षण सृष्टिसौन्दर्य,

इत्यादि पाहून त्यांस अत्यंत कुतूहल व आश्चर्य वाटलें. तदनंतर हीं प्रचंड पंचमहाभूतें, त्यांची अनुपम शक्ति व रौद्ररूपें, इत्यादींचें, तसेंच तीं ज्यानें निर्माण केलीं त्या ईशाचें स्तवन करण्याची आमच्या आर्यांच्या मनांत स्फूर्ति होऊन, त्यांनीं आपले प्रेमोद्गार छान्दसवृत्तांत प्रथम गाइले. आणि हेच ऋग्वेदांत जसेच्या तसेच, व अगदीं हुबेहुब दृष्टिगोचर होतात.

त्यांची मानसिक उत्क्रांति.

हीं स्तवनस्फूर्ति होण्यापूर्वीं, किंवा अशा प्रकारचे उदात्त विचार मनांत येण्याच्या अगोदर, नानाविध गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव येऊन अनेक वस्तूंचे गुणधर्म त्यांस अवश्य समजले असले पाहिजेत; समाज व संस्थांची रचना देखील त्यांच्या ध्यानांत पूर्णपणें आली असली पाहिजे; आणि बुद्धिमत्ता, शक्तिमत्ता, व कल्पनासामर्थ्य, इत्यादिकांचाही पूर्ण विकास झाला असला पाहिजे.

आतां, इतकी उन्नतावस्था एकदम कधींही प्राप्त होत नाहीं. ती प्राप्त होण्याला हजारों वर्षें लोटतात. प्रथम वन्यावस्थेंतून पार पडावें लागतें, आणि त्या स्थितींतच अनेक शतकें घालवावीं लागतात. तदनंतर कालगतीनें, अवलोकन करण्याची क्वचित् क्वचित् स्फूर्ति होण्यास प्रारंभ होतो, व पुढें ओघानेंच विचारतरंग आपोआप उठतात. याप्रमाणें मनुष्याची कल्पनाशक्ति हळूं हळूं वाढत जाऊन, तिचें

सामर्थ्य भासमान होऊं लागतें. आणि एकादें भांडें कांठो-कांठ भरून अतिरिक्त झाल्यावर जसें वाहूं लागतें, किंवा

जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट,

त्याप्रमाणें, मानवीबुद्धि प्रगल्भतेप्रत पावल्यावर, तिचा परिणाम कोणत्या तरी मार्गानें बाहेर पडून, तो आपलें स्वरूप प्रकट केल्याशिवाय कधींही राहत नाहीं.

त्यांचा आनुमानिक काल.

ही मानवी स्थितिपरंपरा, व अशा प्रकारचा आनुक्रमिक बुद्धिविकास, या विषयींचा सविस्तर इतिहास मनांत आणिला ह्मणजे, मूळ आर्यांच्या जन्मकालाचें साधारण अनुमान करितां येतें, आणि तें आज सुमारें बारा हजार वर्षांपलीकडील कालांत उदयास आले असावे, असें वाटतें.

अनेक भाषाकोविदांच्या मतें जे आर्यलोक हिंदुस्थानांत

---

१ तारीख ५ सप्टेंबर सन १८९२ रोजीं, लंडन शहरांत प्राच्य भाषाकोविदांची एक मोठी परिषद भरली असून, तींत अध्यक्ष मोक्षमुल्लरनीं असें बोलून दाखविलें कीं, भाषेच्या इतिहासावरून पाहतां, आर्य लोकांच्या अति प्राचीन अस्तित्वाचा काल खिस्ति शकापूर्वी दहा हजार १०,००० वर्षेपर्यंत पोहोंचविण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

आनिविझांट असें ह्मणते कीं, आर्यांच्या उत्पत्तीला सुमारें दहा लाख वर्षें होऊन गेलीं.

"The Aryan race on the earth is about a million years old." (Mrs. Besant on Theosophy and Religion) 14/3/94.

आर्य लोकांचें क्रमाक्रमानें झालेलें स्थलांतर.

आले त्यांनी या देशांत, आफगाणिस्थानांतून हिंदुकूश पर्वताच्या बाजूनें खैबर नामक खिंडींतून, आगमन केलें. आतां, आमचे आर्य मूळचे भरत खंडांतील असोत, किंवा ते मध्य एशियांतून येवोत, इतकें मात्र सिद्ध आहे कीं, त्यांनीं आफगाणिस्थानांतील प्राचीन कुभा (ह्मणजे सांप्रतच्या काबूल) नदीवर बराच काळपर्यंत निवास करून, त्या ठिकाणींच प्रथमतः वेदमंत्र गाण्याची सुरुवात केली. कारण, ऋग्वेदांतील कांहीं ऋचांत सदरहू कुभा नदी, व क्रुमु, आणि गोमती, ( सांप्रतच्या कुरम व गोमल ) याविषयीं उल्लेख केल्याचें आढळतें त्यानंतर क्रमाक्रमानें प्रचंड सिंधुनदी, शुतुद्री किंवा शतद्रु, जिला हल्लीं सतलज ह्मणतात ती, विपाशा अथवा सांप्रतची व्यास नदी, ( म्हणजे सतलज नदीचा वायव्येकडील फांटा ), परूष्णी ( किंवा इरावती, जिला हल्लीं रावी असें ह्मणतात ती ), असिक्नी किंवा चंद्रभागा ( हल्लींची चीनाब ), आणि वितस्ता ( सांप्रतची जेलम ),या नद्यांविषयींचे उद्गार वेदांतील ऋचांत ठिकठिकाणीं सांपडतात, त्यावरून ते आफगाणिस्थान सोडून सिंधुनदी वलांडून पंजाबांत आल्याचें दिसतें. पुढें कांहीं कालानें त्यांची वस्ती उत्तरोत्तर पूर्व दिशेकडे पसरत गेल्यानें, ते थेट मध्यदेशांत यमुना व गंगा नदीपर्यंत येऊन ठेपले.

आणि क्रमाक्रमानें दक्षिणापथांतही प्रवेश करून त्यांनीं सर्व भरतखंड व्यापिलें.

त्यांच्या वसतिप्रदेशाची मर्यादा.

या काळचें आर्यलोकांचें स्थानांतर, आणि त्यांचें वसतिस्थळ, हीं मनांत आणिलीं ह्मणजे त्यांच्या मनावर विराट् स्वरूपाचे जे जे म्हणून संस्कार झाले, त्याविषयींच्या कारणांचें दिग्दर्शन होतें. ते ज्या प्रदेशांत आनंदानें निवास करीत होते त्याच्या उत्तरेस हेमाच्छादित असा प्रचंड, विस्तीर्ण, व अत्युच्च, हिमालय पर्वत असून, पूर्व बाजूला अति विशाळ आणि पवित्र यमुना व गंगा या महानद्या होत्या. पश्चिम सीमेला सिंधूपमाच सिंधुनदी इतस्ततः दक्षिणोत्तर तीव्र वेगानें वाहत असून, दक्षिण बाजूला दक्षिणसमुद्र जो हिंदी महासागर तो दृग्गोचर होत असे.

आतां, आमचे आर्य लोक आपला यशोध्वज फडकावीत क्रमशः भरतखंडांत कसकसे पूर्व, उत्तर, व दक्षिण, या दिशांकडे सर्वत्र पसरत गेले, ह्याविषयीं निश्चयात्मक रीतीनें ठरविण्यास, ऋग्वेदांतील खालीं दाखल केलेल्या आमच्या अतिपुराण ऋषींच्याच ज्या विश्वसनीय उक्ति, त्या उत्तम साधन होत:—

तृष्टामया प्रथमंयातवे सजूःसुसर्त्वा रसयाश्वे त्या

न्या । त्वं सिन्धो कुभया गोमतींक्रुमुं मेहत्न्वा सरथं या भिरीयसे ॥

( ऋ. अ. ३ व ७. मं. १० अ. ६. सू. ७९ ).

अश्व्योवारो अभवस्तदिन्द्र सृकेयत्त्वा मत्यहन्देव एकः । अजयोगा अजयः शूरसोम मवासृजः सर्त वे सप्त सिन्धून ॥

(ऋग्वेद. मं. १. अ. ७. सू. ३२. अ. १. अ. २ व ३८.)

मपर्वतानामुशती उपस्थादश्वे इव विषिते हासमाने । गावेवशुभ्रे मातरा रिहाणे विपाट् छुतुद्री पयसा जवेते ॥

(ऋ. अ. ३ अ. २ व १२ मं. ३ अ. ३ सू ३३.)

इन्द्रे षिते प्रसवं भिक्षमाणे अच्छा समुद्रं रथ्येव याथः । समाराणे ऊर्मिभिः पिन्वमाने अन्यावामन्यामप्येतिशुभ्रे ॥

अच्छा सिन्धुं मातृ तमामयासं विपाशमुर्वीं सुभगामगन्म । वत्समिव मातरा संरिहाणे समानं योनिमनु संचरंती ॥

एनावयं पयसा पिन्वमाना अनुयोनिं देवकृतंच-

रन्तीः । न वर्तवे प्रसवः सर्गतक्तः किंयुर्विप्रो नद्योजोहवीति ॥

रमध्वं मे वचसे सोम्याय ऋतावरीरुप मुहूर्तमेवैः। प्रसिंधुमच्छा बृहती मनीषावस्युरह्वे कुशिकस्य सूनुः॥

(ऋ. अ. ३ अ. २ व १२ मं. ३ अ. ३ सू. ३३.)

उत सिन्धुं विबाल्यं वितस्थानामधि क्षमि । परिष्ठा इन्द्र मायया ॥

(ऋ. अ. ३ अ. ६ व २१ मं. ४ अ. ३ सू ३०.)

इमंमे गंगे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या । असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्यासुषोमया ॥

( ऋ. अ. ३ व ७. मं. १० अ. ६ सू. ७५. )

यस्ये मे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सहाहुः । यस्येमाः प्रदिशोयस्य बाहूकस्मै देवाय हविषा विधेम ॥

( ऋ. अ. ७ व ४ मं. १०. अ. १० सू. १२१. )

त्यांस ईशप्रतिबिंब भासमान होण्याचीं कारणें.

कोणतीही विशेष तऱ्हेची सामान्य वस्तु जरी दृष्टिगोचर झाली, तरी देखील आपल्या मनावर त्याविषयीं वस्तुगत्याच अनेक संस्कार होतात. मग निसर्गतःच

ज्या गोष्टी स्थूल परिमाणानें दृष्टीस पडतात, त्या पाहून अदृश्य ईशशक्ति, तिचें सर्वसाक्षित्व, सर्वव्यापकता, अनंतत्व, नियंतृत्व, आणि व्यवस्था, नैयमिकत्व, हीं प्रत्यक्षच भासमान झाल्या कारणानें, त्यापासून अद्भुत चमत्कार वाटल्याशिवाय तो कसा राहणार? उत्तरेच्या बाजूला नजर फेंकली असतां, हिमाचलाचीं गगनचुंबित शिखरें दृग्गोचर होतात; व त्याच्या इतस्ततः पसरलेल्या शाखा ईशान्य आणि वायव्य दिशेनें दक्षिणगामी होऊन, प्रशांत व उदार अशा **हिंदी महासागराच्या** पवित्र उदकाचा स्पर्श होतांच, जणूकाय त्या **पूर्व पश्चिम समुद्रांत**च अंतर्धान पावल्या असें वाटतें. पूर्वेकडे पाहिलें तर, त्याच अत्युच्च पर्वतापासून निघालेली **हैमवती** व **यमुना**, ह्या आपल्या पवित्र जलानें आसमंतांतील सर्व लोकांस जणूकाय एकदम पूनीत करण्याकरतांच वेगानें धांवत आहेत कीं काय असें भासतें. दक्षिणेस पहावें तर **हिंदीमहासागरा**चा सखोल व प्रचंड असा वारिसमूह नजरेस पडतो. त्याच्या भरती ओहोटीचा नियमित काल, त्याची गंभीर वीचिगर्जना, आणि त्याचें अनुपम ऐश्वर्य, ह्यांचा एकसमयावच्छेदेंकरून मनावर परिणाम घडल्याशिवाय राहतच नाहीं. आतां, क्षणभर पश्चिमेकडे वळलें तरी, भीति व विस्मय यांचा पूर्ण ठसा मनावर उमटण्याची सर्व साधनें मूर्तिमंत उभींच आहेत, असा भास होतो. कारण,

त्या वेळची पश्चिम सरहद्द जी विशाळ **सिंधु नदी**, हिचा प्रत्यक्ष प्रभाव ठायींठायीं दृग्गोचर होतो.

याप्रमाणें जिकडे पाहवें तिकडे **ईशप्रभावचमत्कृति**.

त्यांची धर्मरचना व अद्वैत मत.

शिवाय तत्कालीन **आर्य लोकांस** दुसरें प्रत्यक्ष कांहींच भासमान झालें नसल्यामुळें, या दृश्यमान सर्व वस्तूंचें कांहीं तरी अदृश्य व अतर्क्य असें **आदिकरण** असून, तेंच आदिकारण सर्व विश्वाचें चालक आणि नियामक असावें, अशाविषयीं त्यांची बलवत्तर खात्री होत चालली. याबद्दल **वेद ऋचा** व **संहिता** प्रमाण आहेत. **वेदकालीन आर्य लोक** त्या **आदिकारणास हिरण्यगर्भ** ह्मणत, आणि यच्चयावत् भासमान होणारें **विराट** स्वरूप त्या आदिकारणाचीच विभूति आहे, असें ते यथार्थ मानीत.

---

१ हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत सदाधार पृथिवींद्यामुतेमाकस्मै देवाय हविषा विधेम ॥ १ ॥

य आत्मदा बलदा यस्य विश्वं उपासते प्रशिषं यस्य देवाः । यस्य छायामृतं यस्य मृत्युः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ २ ॥

यः प्राणतो निमिषतो महित्वैक इद्राजा जगतो

पुढें चालू.

अनेकदेवतांचा आभास.

याप्रमाणें, अखिल विश्वाचा नियंता व आदिकारण एकत्र असल्याविषयीं अनेक वेदकवींचीं वाक्यें सांपडतात. त्यावरून त्यावेळीं अद्वैतमत प्रचारांत असावें असें वाटतें. व तसेंच असल्याविषयीं सदरीं दाखल केलेल्या कांहीं वेदऋचांवरूनही खात्री होते. तथापि, ज्या बाह्य तेजांच्या योगानें, अथवा अतर्क्य शक्तीनें, किंवा नैसर्गिक प्रभावानें, ह्या जगाचे कारभार सुरळीत रीतीनें व नियमितपणानें चालत असल्याचें त्या वेळच्या आर्य लोकांस भासलें, त्या त्या तेजांचें, शक्तींचें व देवतांचें, त्यानीं पृथक् पृथक् आवाहन करून, मोठ्या प्रेमानें आणि

---

मागील पृष्ठावरून पुढे चालू.

बभूव । यईशे अस्य द्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ३ ॥

यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सहाहुः । यस्येमाः प्रदिशोयस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ४ ॥

येनद्यौरुग्रा पृथिवीच दृह्वायेनस्वः स्तभितं येन नाकः । योअन्तरिक्षेरजसो विमानः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ५ ॥

( ऋ. अ. ७ व ३ मं. १० अ. १० सू. १२१ )

आदरपूर्वक त्यांचें त्यांनीं स्तवन केल्याचीं ठिकठिकाणीं असंख्य उदाहरणें सांपडतात. ह्मणजे **आग्नि** हा सीतनिवारण करून सर्व प्रकारें सुख देतो, सबब त्याला आणि त्याच्यासारख्या प्रभाव दाखविणाऱ्या इतर शक्तींस **भूदेवता** कल्पून, त्यांचा स्तुतिपाठ त्यानीं गाइल्याचें आढळतें. **मरुत्** व **इंद्रादि** देवता पर्जन्यवृष्टि करून असंख्य प्राण्यांच्या जिवनास व सुखोत्पत्तीस कारणीभूत होतात, ह्मणून त्यास **अंतरिक्षांतील देवता** समजून, त्यांचाही त्यांनीं अनन्यभावें धांवा केल्याचें दिसून येतें. तसेंच, **सूर्य** आणि इतर तेजोमय गोल हे पृथ्वीवर सर्वत्र दीप्ति करून प्रकाश पाडतात, व मनास आल्हाद देतात सबब त्यांजला **स्वर्देवता** मानून, त्यांजविषयींही त्यांनीं जागोजाग प्रेमोद्गार काढल्याचें दृग्गोचर होतें. यावरून, सूक्ष्म व पूर्ण विचारानें मथितार्थ काढला तर, अशी खात्रीपूर्वक कल्पना होते कीं, **द्यावा**, **पृथिवी** व **आकाश**, या स्थलत्रयांतील शक्तिप्रभावानीं जे मनावर संस्कार होऊन त्यापासून अलौकिक चमत्कार वाटले, त्या शक्तिसमुदायासच समयानुसार पृथक् पृथक् देवता कल्पून, **आर्यांनीं** आपल्या मनाचें कसें तरी प्रथमतः सांत्वन केलें असावें. त्यानंतर कालवशात्, बाह्य शक्ति-

भूदेवता.

आकाशदेवता.

स्वर्देवता.

पासून होणारी कुतूहलस्फूर्ति जसजशी कमी पडत चालली, तसतशी त्यांची विचारसरणी जास्त प्रगल्भ होऊन, भासमान सर्व प्रभावांचें **आदिकारण** एकच आहे, व अखेर अखिल विश्व ज्यापासून उद्भवलें आहे त्यांतच तें विलीन होणार, असें त्यांस वाटूं लागलें. त्या **आदिकारणास** त्यावेळचे ऋषी निरानिराळ्या नांवांनीं उच्चारीत. कोणी त्यास **हिरण्यगर्भ** म्हणत, कोणी **यम**, कोणी **मातरश्विन्**, व कोणी **अग्नि**ही म्हणत.

सर्वांचें आदिकारण हिरण्यगर्भ.

द्यावा, पृथ्वी, आणि आकाश, मिळून एकंदर तेहेतीस देव, आमचे **आर्य हिंदु**, वैदिककालांत मानीत असत.

**येदेवासो दिव्येकादश स्थ पृथिव्यामध्येकादश स्थ। अप्सुक्षितो महिनैकादश स्थ तेदेवासोयज्ञमिमं जुषध्वम् ॥**

ह्मणजे द्यु लोकांच्या अकरा देवता, पृथ्वीच्या अकरा देवता, आणि अंतरिक्षाच्या अकरा देवता, याप्रमाणें कल्पून, मनोभावानें ते त्यांचें आवाहन करीत. आतां स्वर्देवतांत सूर्य, उषस्, इत्यादिकांचा समावेश होई; भूदेवतांत अग्नि, नद्या, पर्वत, व सागर, यांचा समावेश होत असे; आणि आकाश देवतांत वायु, मरुत् इत्यादिकांची परिगणना होई.

ज्या ठिकाणीं परिपूर्ण तेज निरंतर उपलब्ध आहे; जेथें जन्ममरण नाहीं; जेथें आनंद, मोद, मुद, आणि प्रमुद, यांचें सदैव वास्तव्य आहे; व जेथें आपले सर्व इच्छित मनोरथ परिपूर्ण होतात; असें उत्तम स्थान प्राप्त होण्याविषयीं, आर्य हिंदूंची अत्युत्कट लालसा त्या काळीं देखील असल्याचें त्यांच्या उक्तींवरून[1] दृग्गोचर होतें.

अग्नि वगैरे भूदेवता.

ऋग्वेदांत अग्नि देवतेचें आवाहन फार पुरातन कालींही प्रथम केल्याचें दृष्टीस पडतें. यावरून आर्य लोकांस अग्नि हा प्रथमपासूनच माहीत असावा असें वाटतें. परंतु जर ही गोष्ट प्रमाणादाखल मानली तर, पुरूरवस् याला अग्नीचा लाभ गंधर्वांपासून झाला ह्मणून

---

१ यत्रज्योतिरजस्रं यस्मिँ ल्लोके स्वर्हितम् । तस्मिन्मांधे हिपवमानामृते लोके अक्षित इंद्रायेन्दो परिस्रव ॥

यत्रानुकामं चरणं त्रिनाके त्रिदिवे दिवः । लोकायत्र ज्योतिष्मन्तस्तत्र माममृतं कृधीन्द्रायेन्दो परीस्रव ॥

यत्रानन्दाश्च मोदाश्च मुदः प्रमुद आसते । कामस्य यत्राप्ताः कामास्तत्रमाममृतं कृधीन्द्रायेन्दो परीस्रव ॥

( ऋ. अ ९. व २८. मं ९. अ ७. सू ११२. )

जी आख्यायिका याज्ञिकांत आहे, तिचें काय इंगीत असेल तें स्पष्टपणें लक्षांत येत नाहीं. अग्नीप्रमाणेंच इंद्र ही पर्जन्यदेवता पूज्य मानली होती. सबब अग्नीनंतर इंद्राचें आवाहन केल्याचें आढळतें. इंद्राला **वृत्रहन्** असें नांव **वृत्र** नामक दैत्याला मारल्यावरून पडल्याचें दिसतें. परंतु वृत्र हा मेघवाचक शब्द असून, इंद्र हा विद्युल्लतेच्या योगानें तीव्र गर्जना करून मेघसमुदायांचें छेदन करतो, आणि त्यांत सांचून राहिलेल्या जलाचें सिंचन करून वृष्टिप्रसाद देतो, त्यावरून हें अर्थव्यंजक नांव त्यास पडलें असावें. तदंगभूतच **वायुदेवता** असल्यानें ते प्रचंड व भयानक **मरुत्** हेही त्यावेळीं वंद्य होते.

इंद्र व मरुत् वगैरे स्वर्देवता.

**सजायत प्रथमःपस्त्यासु महोबुध्ने रजसो अस्य योनौ। अपादशीर्षा गुहमानो अन्तायोयुवानो वृषभस्य नीळे ॥**

अग्नि.

(ऋ. अ. ३. अ. ४. व १४ मं. ४. अ. १ सू. १).

**महाँ असि महिष वृष्ण्येभिर्धनस्पृदुग्र सहमानोअन्यान्। एको विश्वस्य भुवनस्य राजा सयोधयाच क्षययाचजनान् ॥**

इंद्र.

(ऋ. अ. ३. अ. ३. व १०. मं. ३. अ. ४. सू. ४६)

**महाँ आदित्यो नमसोपसद्यो यातयज्जनो गृणते सु-**

शेवः । तस्मा एतत्पन्यंतमायजुष्टमग्नौ मि-
सूर्य. त्राय हविराजुहोत ॥
( ऋ. अ. ३. अ. ४. व ६. मं. ३. अ. ५. सू ५९ ).

**यजुर्वेदा**चा जन्म वायूपासून झाला अशी कल्पना आहे. **वरुण** ही स्वर्देवता असून असुर लोक तिचें पूजन करीत, म्हणून ती असुर देवता कल्पिली आहे. श्रुतींत देखील **वरुणास** असुर शब्द लाविल्याचें आढळतें. भृगु नांवाच्या ऋषीस प्रत्यक्ष **वरुणाचा** मुलगाच समजतात. याच **भृगूचा** मुलगा **शुक्र** असून तो साक्षात् **असुरांचा गुरूच** होता. यावरून **वरुणा**चा व असुरांचा मूळचाच संबंध असल्याचें दिसतें.

वरुण वगैरे स्वर्देवता.

**वरुणा**च्या सूक्तांत, आपणांमधील सांप्रत चालू असलेल्या देवताप्रतिमेचा चांगला आभास होतो. " मी वरुणाजवळ गेलों, व त्याला विचारिलें कीं, मी तुझी नीट सेवा करीत असतां, तुझा माझ्यावर राग कां ? " वगैरे प्रकारचा मजकूर अनेक ठिकाणीं सूक्तांतून आढळतो. यावरून त्यावेळीं **वरुणा**ची प्रतिमा कल्पिली असावी असें वाटतें.

यज्ञाचा वाचक मूळ शब्द '**मेध**' होय. **मेध** हा शब्द '**मेध्**' धातूपासून झाला असून, त्याचा अर्थ मारणें किंवा ठार करणें, असा होतो. हवन करण्यासाठीं जो प्राणी कापून बळी द्यावयाचा, त्याच्या जातीवरून त्या यज्ञास अर्थव्यंजक असें नांव

अनेक प्रकारचे मेध.

देत. ज्या यज्ञांत पुरुष कापून बळी देत, त्यास ' **पुरुषमेध** ' म्हणत. या पुरुष मेधाचे अनेक प्रकार **यजुर्वेदांतील तैत्तिरीय** शाखेंत, अथवा **शुक्ल यजुर्वेदांत** दृष्टीस पडतात. ज्या यज्ञांत अश्व म्हणजे घोडा बळी देत, त्यास ' **अश्वमेध** ' म्हणत. आणि ज्यांत गाय किंवा बैल देत, त्यास " **गोमेध** " म्हणत.

मेध्य प्राण्याचीं लक्षणें व परीक्षण.

सदरहू यज्ञाला हवा तो पुरुष, अश्व, गाय, अथवा बैल चालत असे, असें नाहीं. जो प्राणी " मेध्य " म्हणजे मेध करावयास योग्य, त्यामध्यें नियमित व ठरलेलीं लक्षणें असलीं, तरच त्याचा उपयोग यज्ञांत व्हावयाचा. सबब तीं लक्षणें आहेत किंवा नाहींत हें पाहण्यासाठीं, त्या पशूची अगोदर परीक्षा करावी लागे. आणि त्यांत तीं लक्षणें दिसून आलीं तरच त्याचें हवन करीत; नाहींपेक्षां तो पशु " अमेध्य " समजून त्यास सोडून देत. **ऐतरेय ब्राह्मणांत** एके ठिकाणीं यज्ञाचा पशु भूमींत शिरल्यामुळें त्याच्या निरनिराळ्या अवयवांपासून भाताचे पृथक् पृथक् अवयव निर्माण झाले, अशी आख्यायिका आहे.

शुनःशेणाची आख्यायिका व पुरुषमेध.

वर सांगितलेल्या पुरुषमेधाच्या संबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, **हरिश्चंद्र** नामक **राजा** राज्य करीत असतां त्याला पुत्रसंतान नसल्यामुळें, आप-

त्या पोटीं एखादें तरी पुत्ररत्न असावें असें त्यास वाटूं लागलें. पुढें, आपले इच्छित मनोरथ परिपूर्ण झाले तर "पुरुष मेध" करीन असा **हरिश्चंद्रानें** नवस केला. त्या नंतर ईशकृपेनें त्याला पुत्ररत्न प्राप्त झाल्यावर, केलेला नवस फेडण्यासाठीं बलिप्रदानार्थ त्यास एका पुरुषाची गरज लागली. तेव्हां तो मिळण्यास प्रथमतः फारच अडचण पडली. सवत्र द्रव्यादि नानाविध आकर्पणांनीं तो मिळे अशी तजवीज होण्यासाठीं, **राजानें** हरएक प्रयत्न चालविले. त्यांत **आंगिरस** गोत्रांतील **अजीगर्त** नांवाच्या मनुष्यानें, सदरहू कामासाठीं, आपला **शुनःशेप** नामक मुलगा विकण्याचें कबुल केलें. इतकेंच नाहीं तर, जास्त द्रव्याच्या आशेनें आपल्या पोटच्या पुत्राची आपणच मान कापावयाची, हें जें दुर्घट, दुःखदायक, व अति साहसीकृत्य, तेंही त्यानें पतकरलें. वध्यस्थळीं पुत्राची मान कापण्यास प्रत्यक्ष पिता तयार झाल्यावर, त्या कोमल अर्भकानें आपल्या म्लान वदनांतून हृदयद्रावक असा सुस्कारा टाकून, मोठ्यानें "हंबरडा" फोडला. त्यासरशीं, त्या स्थळीं विराजमान असलेल्या ऋषिमंडलांपैकीं, **विश्वामित्र** महामुनीस त्या बालकाची दया येऊन, त्यानें त्या **शुनःशेपास** सोडविलें; व पुढें त्यास आपला वारस करून त्याचें सर्व प्रकारें कल्याणही केलें. त्यानंतर कांहीं वर्षांनीं हा "**पुरुषमेध**" अजींच बंद पडला.

इष्टि.

“ ई.ट ” हा शब्द यज् धातूपासून निघाला असल्याचें दिसतें. कृषिकर्म करणारे सर्व लोक, देवतांना संतृप्त करण्यासाठीं, प्रायः अहिंसामय पदार्थांचाच नैवेद्य दाखवीत. या लोकांत इष्टींचें मोठें प्राधान्य असे, असें वाटतें. सूत्रांत जितक्या ह्मणून इष्टि येतात, तितक्या सर्व अहिंसक असाव्या अशी कल्पना आहे.

स्तोम आणि

**स्तोम** शब्द याज्ञिक भाषेंत वारंवार आढळतो. त्याचा मूळचा अर्थ स्तुतिवाचक असावा असें वाटतें. इष्टीनें देवतांस नैवेद्य दाखवीत, व स्तोमानें त्यांची स्तुति करीत.

सोम.

**सोम** हें एक लता विशेषाचें नांव असून, त्याचा यज्ञाच्या कामीं उपयोग करीत. त्यापासून जो रस निघे तो अमरत्व देतो, अशी त्या वेळची समजूत असून, तो मादक असल्यामुळें वेदकालीन ऋषी त्याचा मदिरेप्रमाणें उपयोग करीत. हा सोम पूर्वीं गंधर्वांमध्यें होता, व त्यांजकडून तो **शुनःशेणाला** प्राप्त झाला, अशी आख्यायिका श्रुतींत आढळते.

याप्रमाणें **मेध**, **इष्टि**, **स्तोम**, आणि **सोम**, असे यागाचे चार प्रकार प्राचीन काळीं प्रचारांत असून, त्यांनींच

अनेक देवता, व लोकपाल, यांचें संतर्पण होत असल्याचें दिसतें.

मधुपर्क.

पूर्वी मांस खाणें, किंवा मद्य पिणें, याविषयीं कोणीही निषेध बाळगीत नसत. मांसभोजन घालणें, किंवा मद्यपान सेवा करणें, यांतच विशेष आदर, व आतिथ्य, आहे असें त्या वेळचे लोक मानीत. कोणी वेदज्ञ किंवा सन्माननीय अतिथि घरीं आला तर, त्याच्यासाठीं मुद्दाम गाय कापण्याची, किंवा "मधुपर्क" करण्याची चाल, त्यावेळीं **ब्रम्हावर्त्तां**त असे. **मधु** शब्दाचा अर्थ मद्य होय. हें मद्य प्रथम अतिथीस पिण्यास देऊन, नंतर त्याच्या नांवानें गाय कापून, तिचें मांस शिजवून, तें जमलेल्या मंडळींनीं भक्षावयाचें, अशी, त्यावेळीं चाल होती. यामुळें अतिथीस "गोघ्न" ही ह्मणत. 'ज्याच्यासाठीं गाय कापिली जाते तो गोघ्न,' अशी व्युत्पत्ति **पाणिनीनें** दिली आहे. परंतु कालवशात् **शूरसेन** देशांत जेव्हां **ब्रह्मवर्त्तां**तील लोक पसरले, तेव्हां **हरि** नामक लोकांबरोबर त्यांचा निकटसंबंध पडल्यामुळें, गाई व बैल यांजविषयीं त्यांची पूज्यबुद्धि होत चालली. आणि त्यामुळेंच आतिथ्यादर निमित्य, गोहत्या करण्याची चाल अखेरीस बंद पडली असावी. 'ही गाय ११ अकरा रुद्रांची माता, आठ ८ वसूंची मुलगी, १२ बारा आदित्यांची बहीण, व अमृताची खाण आहे;

सत्वत्र या निरपराधी अदितीसारख्या पूज्य गाईस तूं मारूं नकोस;' अशा अभिप्रायाचा मंत्र ह्मणून, मधुपर्का-साठीं आणिलेली [illegible]डून दिल्याचा जो संप्रदाय वाचण्यांत येतो, तो हरि[illegible] सारख्या गोपांच्या संततीचा फार वर्षें सत्संग झाल्यामुळें पडलेला दिसतो. **इराणां**त सुद्धां गाय म्हणून पूज्यच असे. व त्यांचे वंशज हल्लींचे **पारसी** हे तिला आजमित्तीसही पूज्य मानतात. **मिश्र** देशांतील लोक देखील गाईस पूज्य मानीत. इतकेंच नाहीं तर, यवन ( **ग्रीक** ) लोक हे गोमांस भक्षण करीत म्हणून, त्यांच्या भांड्यांस ते स्पर्श देखील करीत नसत. **नार्वे** आणि **स्वीडन** येथें, पूर्वीं ज्या लोकांची वस्ति होती, त्यांस **स्कांद** ह्मणत. हे लोकही गाईला अतिपूज्य मानीत.

पश्चात्तापशुद्धता.

आपणावर **भूदेवता, आकाशदेवता,** व **स्वर्देवता,** इत्यादिकांची कृपा असावी म्हणून नानाविध साधनांनीं त्यांस संतुष्ट राखण्याकारितां, जरी आमचे तत्कालीन ऋषि निमग्न असत, तरी काया, वाचा, आणि मन, यांजकडून जाणून-बुजून अथवा गैरसमजुतीनें जें कांहीं दुराचरण घडलें असेल, त्याचें क्षालन अवश्य झालें पाहिजे, किंवा त्या-बद्दल निदान क्षमा तरी जरूर मिळाली पाहिजे, हें त्यांस चांगलें अवगत असे. आणि ही गोष्ट **ऋग्वेदां**तील ऋचां-वरून चांगली प्रत्ययास येते.

हे अदिती, मित्रा, आणि वरुणा, आमच्याकडून झालेल्या अपराधाची तुम्ही क्षमा करावी. व हे इन्द्रा, तूं अह्मास विपुल प्रकाश आणि अभय दे.

यज्ञांचे नायक आणि राजे वरुण, मित्र, व अर्यमा, तसेंच अप्रतिहत देवी अदिती, हीं आम्हास निष्पाप करून दुःखाच्या पार पाडोत.

हे अग्नि, आम्ही जें कांहीं पाप केलें असेल, त्याची तूं आम्हास मनापासून क्षमा कर. तसेंच अर्यमा व अदितीही आम्हास क्षमा करोत.

---

१ अदितेमित्रवरुणउतमृळयत्वःवयं चकृमकतंचित् आगः । उरुअश्याम्अभयं ज्योतिरिन्द्र ॥

( ऋ. २. २७. १४. )

२ अयंहिनेतावरुणऋतस्यमित्रो राजानोअर्यमा-पोधूः । सुहवादेव्यदितिरनर्वातेनो अंहोअतिपर्ष-न्नरिष्टान् ॥

( ऋ. ७. ४०. ४. )

३ सोअग्नएनानमसासमिद्धोच्छामित्रं वरुणं मिन्द्रं वोचेः । यत्सीमागश्चकृमातत्सुमृळतदर्यमादितिः शिश्रयन्तु ॥

( ऋ. अ. ६ व १७. मं. ७ अ. ६ सू. ९४. )

पापाच्या पाशापासून वरुण[1] आम्हास मुक्त करो. आणि अदितीच्या आश्रयानें आमचें संरक्षण होवो. हे देव हो, तुम्ही आमचें संरक्षण व कल्याण करा.

मृतक्रिया.

**आर्य लोकांत** वैदिककालांत, देहावसान झाल्यावर, त्याची शेवटची व्यवस्था निखनक्रियेनें ह्मणजे पुरून, किंवा दहनक्रियेनें ह्मणजे जाळून, होत असे. **आर्यांची** जी **पारसीक** नामक शाखा **इराणांत** होती, त्यांत अग्नि फारच पवित्र मानला असल्या कारणानें, अग्नीला गतजीवित देहाचा विटाळ होऊं नये एतदर्थ, ते नियमित अशा उघड्या प्रदेशावर प्रेतें ठेवून, ती गृध्रादिपक्षांकडून खाववीत. आणि ही **पारसीकांची** फार पुरातन काळची चाल आज मितीसही प्रचारांत असल्याचें दृष्टीस पडतें. सांप्रत काळीं **पारशी** लोक मोठमोठे कुवे खणून त्यांतच प्रेतें ठेवितात. ह्या कुव्यांस "**भस्ते**" असें ह्मणतात. हे चुन्यानें शास्त्रोक्त रीत्या बांधून काढून, त्यांतच प्रेतें ठेवण्याकरतां, निरनिराळ्या, व मोठमोठ्या कोनाड्यासारख्या, जागा करतात. त्यांत प्रेतें आणून ठेविल्यावर; त्यांचा हं हं ह्मणतां गृध्रराज फडशा उडवून टाकतात.

---

१ विअस्मत्पाशंवरुणो मुमोचत् । अपोवन्वाना अदितेरुपस्थाद्यूयं पातस्वस्तिभिः सदानः ॥ ( ऋ. ७. ८८. ७. )

देहदहनप्रसार.

गतजीवित देहाचा शेवटला संस्कार, दहनक्रियेइतका उत्तम, दुसरा कोणताही नाहीं. आणि आमच्या आर्यावर्त्तांतील ही प्रेतदहनक्रियेची चाल अगदींच साधी असून सर्व प्रकारेंच सोयीची असल्यामुळें, फार प्रशस्त आहे, याविषयीं बिलकुल शंका नाहीं. हा दहनक्रियेचा प्रकार तत्त्व विचारानें, व शास्त्रीय दृष्टीनें, पाश्चिमात्य राष्ट्रांस देखील इतका सुखकर वाटत चालला आहे कीं, त्याचा प्रचार तिकडील देशांतही दिवसानुदिवस वृद्धिंगत होत चालला आहे.

प्रस्तुतकाळीं सुधारणेच्या कामांत जर्मनी अग्रेसर असल्यामुळें, तिकडे दहनक्रियेचा संप्रदाय फारच जारीनें सुरू आहे. या कामासाठीं, त्या देशांत गोथा येथें स्वतंत्र स्मशानभूमि इ. स. १८७७ सालीं तयार झाली असून, हल्लीं तेथें दरसाल सुमारें पांच सहाशें प्रेतें दहन होतात. ओलसडॉर्फ येथें दुसरी स्मशानभूमि गेल्या आगष्ट सन १८९१ महिन्याच्या २२ व्या तारिखेस स्थापन झाली. आणि तिसरी स्मशानभूमि इ. स. १८९१ च्या आक्टोबरांत कर्लश्रुहे येथें बांधली.

इंग्लंडांत प्रेतदहन क्रियेसंबंधीं चर्चा इ. स. १८७४ सालीं सुरू झाली असून, त्या कामांत सर हेन्री टॉमसन्

१ The Contemporary Review 1894. January Number. "Our Treatment of the dead."

हा अग्रणी होय. त्यावेळीं त्याजवर तद्देशस्थ लोकांच्या गालिप्रदानाचा इतका भडिमार झाला कीं, तो सांगतां पुरवत नाहीं. या शोधक पंडितानें ज्या गोष्टीचें प्रतिपादन केलें, त्याबद्दल सत्यासत्यतेचा बिलकुल विचार न करितां, तिकडील लोकांनीं त्याजवर सुमारें वीस वर्षें यथेच्छ तोंड सोडिलें होतें. ह्यावरून इतकें सिद्ध होतें कीं, हल्लींच्या मोठमोठ्या सुधारलेल्या राष्ट्रांत देखील नूतनमताविषयीं, मग तें कितीही खरें आणि यथार्थ असलें तथापि, द्वेषबुद्धि उत्पन्न होते. इतकेंच नाहीं तर, तदन्तर्गत सत्यान्वेषणाविषयीं सुद्धां, लोकसमुदाय अगदींच पराङ्मुख असल्या कारणानें, नवीन शोध अथवा एखादी नवीन कल्पना, हीं निदान प्रथमारंभीं तरी विशेष रीतीनें उपहासास पात्र होऊन, तिची अत्यंत विटंबना होते. परंतु कालेंकरून **सत्य**सूर्याचा प्रकाश हळू हळू चोहोंकडे पसरत जाऊन, '**सत्यमेवजयते**' या ह्मणीप्रमाणें सत्याचा सर्वत्र पगडा बसतो, आणि असत्याचा लोप होतो.

प्रेतदहनाविषयींची चर्चा ज्यावेळीं **इंग्लंडांत** प्रथमतःच सुरू झाली, त्यावेळीं धर्मगुरूंचे तद्विरुद्ध अभिप्राय, अधिकाऱ्यांचा तत्संबंधीं पूर्ण कटाक्ष, तद्विषयक राजदंडाची विशेष भीति, आणि **लोकमता**चा तद्विरुद्ध गिल्ला, हीं सर्व इतिहासदृष्ट्या फारच महत्वाचीं आहेत. असो. ह्या झंझावाताच्या संक्षोभाची शनैः शनैः शांति होऊन,

प्रेतदहनश्रेष्ठत्वाविषयीं लोकमत कालेंकरून जागृत झालें, आणि इ. स. १८८४ सालीं प्रेतदहनासाठीं लोकांस स्मशानभूमि अभिगम्य होऊन, इ.स. १८८५ सालीं **वोकिंग** येथें तीन प्रेतांस दहनाक्रियेचा संस्कार घडला. तदनंतर इ.स. १८८६ सालीं दहा, १८८७ सालीं तेरा, १८८८ सालीं अठ्ठावीस, १८८९ सालीं शेचाळीस, १८९० सालीं चोपन, आणि १८९१ सालीं जून अखेरपर्यंत साठ, याप्रमाणें प्रेतें दग्ध झालीं असून, ह्या दहनाक्रियेची **पाश्चात्य** देशांत हल्लीं उत्तरोत्तर चढती कलाच दिसत आहे.

इ. स. १८९१ सालीं, **ब्रिटिश मेडिकल असोशिएशन** नामक सभा **बोर्नमौथ** येथें भरली होती. तींत वैद्यशास्त्रविशारद असेच सर्व सभासद असून, त्यांनीं सर्वानुमतें असा ठराव केला कीं, सांप्रतची प्रेतें पुरण्याची चाल अगदीं नापसंत असून, त्याऐवजीं मृतकायेचे सर्व भाग जेणें-करून पंचतत्वांप्रत सत्वर जाऊन मिळतील अशा युक्तीची अवश्य योजना केली पाहिजे. आतां, ही युक्ति म्हटली म्हणजे दहनाक्रियाच असून, ती कोणास देखील बीभत्स, दोषार्ह, किंवा असुखद वाटणार नाहीं.

---

१ "That this meeting disapproves the present custom of burying the dead, and desires to substitute some mode which shall rapidly dissolve the body into its component elements, by a process which cannot

पुढें चालू.

गतजीवित कायेंत जें रोगाचें बीज किंवा नानाविध दोष असतात, ते प्रेतखननक्रियेनें भूमींतल्या भूमींतच सूक्ष्म प्रमाणानें वृद्धिंगत होतात, अथवा अतर्क्य चलनानें स्थलांतर पावतात, किंवा जागच्या जागींच अदृश्य स्थितींत असतात. त्यामुळें रोगाचा फैलाव अकल्पित कारणांनीं तात्काल, किंवा कधीं कधीं कालांतरानें होऊन, शरीराच्या आरोग्यतेस धक्का पोहोंचतो. सबब प्रेतखननक्रिया ही सर्व तऱ्हेनें दोषार्ह आहे, यांत बिलकुल शंका नाहीं. आतां, दहनक्रियेची जेवढी म्हणून तारीफ करावी तेवढी थोडीच. त्याचें कारण असें कीं, प्रेताचें दहन झाल्यावर त्याचा राखेशिवाय यत्किंचित्‌ही भाग अवशिष्ट राहत नाहीं. इतकेंच नाहीं तर, ह्या दहनक्रियेनें कायान्तर्गत जे दोष किंवा रोगविकार असतात ते देखील समूल दग्ध होऊन, वातावरण निर्मल राहतें. व या कारणामुळेंच आमच्या पूर्वज हिंदूंनीं अतीव दूर दृष्टीनें ही प्रेतदहनक्रिया सुमारें पांच दहा हजार वर्षांमागें आर्यावर्तांत सुरू केली, आणि ती आज मित्तीसही

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

offend the living and shall render the remains absolutely innocuous. Until some better method is devised, the meeting approves that, usually known as cremation, and would encourage public bodies in obtaining power to erect crematoria out of public funds,"

आमच्यांत अगदीं जारीनें सुरू आहे, व अबाधित राहिली आहे. इतकेंच नाहीं तर, तिचे सुखद व हितकारक परिणाम पाहून, तिचें स्तुत्य अनुकरण पाश्चात्य देखील आदरपूर्वक करूं लागले आहेत.

प्रेतदहनक्रियेसंबंधीं लिहित असतां एक शोधक गृहस्थ असें म्हणतो कीं:-

"In view of the occurrence of some two cremations a week, and this in a rising ratio, it is impossible not to see that this old world method of buring the dead, in the centre of which we live, is steadily wearing down the barrier of sentimental antagonism which confronted its first approach in England."

"It is a puzzling anomaly to see people ready to pile loads of quick lime over a body when laid in the grave for its speedy dissolution, but who shudder at the prospect of crematory processes."

उच्छ्वंचस्वपृथिविमा निबाधथाःसूपायनास्मैभव-
सूप वञ्चना । माता पुत्रंयथासिचाभ्येनंभूमऊर्णुहि ॥

( ऋ. अ. ६ व २८. मं. १० अ. २ सू. १८. )

वरील ऋचेंत, त्यक्तजीवित कायेला पृथ्वीनें मुलासारखें संभाळून घ्यावें, म्हणून तिची फार नम्रपूर्वक प्रार्थना केली आहे. जो आत्मा हें कलेवर सोडून जातो,

आत्म्याचें स्वास्तिक्षेम.

त्याच्या स्वस्तिक्षेमार्थ प्राचीन आर्यऋषिकवींनीं फारच उत्तम प्रकारच्या ऋचा रचल्यासारखें दिसतें. सबब त्यांचा भावार्थ खालीं देतों:-

"हे आत्मन्, ज्या मार्गानें आपले पूर्वज गेले, त्याचेंच तूं अवलंबन कर. तेथें आपल्या **पूर्वजांस** आणि **यमधर्मराजास** जाऊन भेट. आपलें वैकल्य सोडून **पर-धामाप्रत** प्राप्त हो. त्या ठिकाणीं ज्योतींत ज्योत मिळून तेजोमय कैवल्यरूप धारण कर. ज्या ठिकाणीं अमृताच्या नद्या वाहतात, अशा ठिकाणीं तूं संचार कर. ज्यांनीं एकसमयावच्छेदेंकरून निरंतर ध्यानस्थ राहून, षड्शत्रूंचा पुरा पाडाव केला, व त्यांजवर जय मिळविला, आणि तेणें-करून जें असाध्य त्याचें साधन केलें; तसेंच ज्यांनीं केवळ परोपकारासाठीं, व लोककल्याणार्थच आपलीं हाडें झिजवून आपण पंचतत्वाप्रत गेले; अशा पुण्यशील महा-त्म्यांचा तुला सत्समागम होऊं दे."

# भाग ११ वा.

## आर्यांची सामाजिक रचना
## आणि
## धर्मसंस्था.

आर्यसमाजरचना.

आमचे पूर्वज मूळचे भरतखंडांतले असोत, किंवा त्याच्या आसमंतांतील पठार प्रदेशांतून वायव्य दिशेनें येथें आले असोत, इतकी गोष्ट मात्र उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक प्रमाणांवरून, आणि विशेषतः वेदरूप दर्पणावरून, उत्कृष्ट रीतीनें प्रतिबिंबित होते कीं, आर्यांच्या मनावर सृष्टिवैभवाचे पूर्ण संस्कार होऊन, जेव्हां त्यांचे उद्गार छान्दस वृत्तांत प्रथमच बाहेर पडले, तेव्हां त्यांचा समुदाय बराच मोठा होता. त्यामुळें, आपापसांत व्यवस्था राहण्यासाठीं पृथक् पृथक् मेळ्यानें, किंवा निरनिराळे कळप करून, ते राहिले असावे असें दिसतें. प्रत्येक कळपांत कोणी तरी एक नियामक असून, प्रत्यक्ष त्याच्याच देखरेखीखालीं सोंपलेल्या समुदायवर्गाचें योग्य रीतीनें संगोपन करण्याविषयीं, तो फार दक्ष असे. या नियामक

समूहांत बुद्धिमत्तेनें किंवा विद्वत्तेनें, तपोबलानें अथवा पराक्रमानें, जो सर्वांत श्रेष्ठतम असे तोच सर्वांचा चालक होई, आणि त्या कारणानें त्याच्याकडेसच सर्व समाजाचें नियंतृत्व येई. कालेंकरून, हा समुदाय व अशा प्रकारचा लोकसमाज ज्या मानानें वृद्धिंगत होत गेला, त्याचप्रमाणानें या लोकनिर्मित प्रभूकडे प्रजापालनाचा अधिकार आला, व त्यामुळें त्यास साहजीकच राज्यधूरीणत्व प्राप्त झालें.

पुरोहित वर्ग रचना.

त्या पुरातन **वेद**काळीं, होम हवनक्रियेचें मोठेंच महत्व असे. त्यामुळें, तत्संबंधीं **वेद**विहितकर्म करण्यांत जे **ऋषि** प्रवीण, कुशल, आणि विद्वान् असत, त्यांजवरच सर्वांची मदार असून, याज्ञिक चालविण्यासाठीं त्यांसच निरंतर पाचारण होई. ह्या कारणानें **पुरोहितवर्ग, ऋत्विजगर्व,** आणि **श्रोत्रियवर्ग,** यांची निरंतर जरूर पडे; व ह्मणूनच ह्या वर्गाची महत्वी व संख्या, दिवसानुदिवस अधिकाधिक वाढत चालली. होमादि क्रियांनीं, व होम समयीं उच्चारलेल्या मंत्रांनीं, आपणास खचित यशप्राप्ति होते, अशी त्यावेळीं **हिंदूं**ची समज असे, व त्याप्रमाणें त्यांस फलप्राप्तीही होई. त्यायोगानें त्यांच्या श्रद्धेस चांगलेंच पुष्टीकरण मिळत गेलें, आणि ती पुढें तशीच वृद्धीप्रत पावली.

त्यांचे मंत्र,

ह्या होमक्रियांतील सामर्थ्यप्रद मंत्रांस 'ब्रह्म' अशी संज्ञा आहे. ब्रह्म शब्द

वृह् किंवा ब्रृह् (ब्रुहिविस्तारे) या धातूपासून झाला असून, तो **ब्रम्हमंत्र** ह्मणणारे ते **ब्राम्हण** होत. परंतु ब्राम्हण शब्दाची दुसरीही खालीं लिहिल्याप्रमाणें व्युत्पत्ति आढळते:—

**जन्मनाजायतेशूद्रः संस्कारैर्द्विजउच्यते ।**
**कर्मणायातिविप्रत्वम् ब्रम्हजानातिब्राम्हणः ॥**

( मनुस्मृति. )

या स्मृत्युक्तीप्रमाणें ब्रम्ह जाणतो तोच **ब्राम्हण** होय. **ब्रम्ह** मंत्रांतील **ऋचां**पैकीं एकींतील असा अभिप्राय आहे कीं, ‘ आम्ही केलेल्या स्तवनाचा जो कोणी उपहास करील, त्याजवर अत्युग्र अनर्थ गुजरून येवोत; आणि त्या ब्रम्हद्वेष्ट्याचें चंडांशु तापानें दहन होवो. ’ **ब्राम्हण क्षत्रिय** शब्दांचें आदिकथन **ऋग्वेदां**त खालीं लिहिलेल्या ऋचेंत आढळून येतें.

**यदिन्द्राग्नी मदथः स्वे दुरोणे यद्ब्रह्मणि राजनि वायजत्रा । अतः परिवृषणावा हि यातमया सोमस्य पिबतं सुतस्य ॥**

(ऋ. अ. १ अ. ७ व २७ मं. १ अ. १६ सू. १०८.)

जे मंत्र मेधांत ह्मणतात, त्यांस **यजुस्** ही संज्ञा आहे; जे इष्टींत ह्मणतात त्यांस **छंदस्**; आणि जे **स्तोमां**त ह्मणतात त्यांस **सामन्** अशी संज्ञा आहे. छंदें

व त्यांचीं पृथक् पृथक् कर्में.

ह्मणून, देवतांस बोलाविण्याचें काम जो ऋत्विज करी, त्यास **होता** ह्मणत. क्रतूमध्यें होम करण्याचें काम जो करी, त्यास **अध्वर्यू** ह्मणत; उदगीथ गाई त्यास **उद्गाता;** प्रस्ताव गाई त्यास **प्रस्तोता;** प्रतिहार गाई त्यास **प्रतिहर्ता;** आणि क्रतूमध्यें दुसरी उठण्याबसण्याची जो खटपट करी, त्यास **प्रतिप्रस्थाता** असें ह्मणत. **सामाचे** तीन भाग केल्याचें दिसतें. पहिल्या भागास **प्रस्ताव** ( किंवा आरंभ ) ह्मणत; दुसऱ्यास **उदगीथ;** आणि तिसऱ्यास **प्रतिहार** ( म्हणजे शेवट ) ह्मणत.

कर्मविधींचें एकीकरण.

ऋग्वेद ब्राम्हणांतील **होतार**, यजुर्वेद ब्राह्मणांतील **अध्वर्यु**, सामवेद ब्रम्हणांतील **उद्गातार,** आणि अथर्ववेद ब्राम्हणातील **पुरोहित,** त्या प्रत्येकांचीं कर्मे, त्यांचे भिन्न भिन्न अधिकार, व त्याविषयीं पृथक् पृथक् नियम, यांबद्दल सविस्तर विवेचन ज्या त्या **वेदांत** केलेलें आहे. तथापि, ह्या ठिकाणीं इतकें सांगणें अगदीं जरूर आहे कीं, हा वेदकालीन कर्मविधि, त्याचें संपूर्ण निरूपण, ततूसंबधीं संप्रदाय, त्याविषयींचे विचार, त्या कामीं भिन्न भिन्न मतप्रकाशन, आणि तन्निरूपणार्थ अर्थविन्यास, हीं दिवसानुदिवस इतकीं वाढत चाललीं, व त्यांचे परिमाण इतके स्थूल झाले कीं, त्यांचें स्मरण राहण्याचें अगदींच कठिण पडूं लागलें. त्यामुळें त्या सर्वांचेंच संक्षेपतः एकीकरण कर-

ण्याची मोठी अवश्यकता होती. पण ह्या महत्वाच्या कामाचा हिंदूंनीं वेळींच योग्य विचार केला; आणि लागलेंच तें काम हातीं धरून नेहेमींप्रमाणें, आपल्या बुद्धिप्रभावानें, पटुवैदग्ध्यानें, व अति परिश्रमानें तें त्यांनीं सिद्धीसही नेलें. याबद्दल आम्ही आपल्या पूर्वजांचा जितका आभार मानावा तितका थोडाच. कारण, ह्या त्यांच्या दीर्घोद्योगानें श्रुतिस्मृतिसारखा अमूल्य ग्रंथसमूह सर्वभक्षी काळाच्या जबड्यांतून वांचला जाऊन, तो आपल्या ज्ञानदीपानें अखिल जगाचे डोळे दिपवून टाकण्यासही कारणीभूत झाला.

ब्राम्हण वर्ण.

असो. वर सांगितल्याप्रमाणें **वेदांत** सांगितलेला कर्मविधि करण्यास पुरोहित, ऋत्विज, आणि श्रोत्रिय, यांची फार जरूर होती. त्यामुळें कालवशात् हा वर्गत्रय इतका प्रचंड बनला कीं, तो फक्त परंपरेनेंच तत्तत्स्थानापन्न झाला. इतकेंच नाहीं तर, तो वेदकालीन मंत्राचें केवळ पवित्र भाजनच होऊन राहिला. यामुळें **ब्राह्मणां**शिवाय इतर वर्गास तत्संबंधीं ज्ञान, किंवा ऊहापोह करण्याचें सामर्थ्य अथवा, विवेचनशक्ति, बिलकुल राहिली नव्हती. आणि त्या कारणानेंच **ब्राम्हणांचें** श्रेष्ठत्व व वर्चस्व, निसर्गतःच वाढलें; आणि तें पुढें पुढें इतक्या गुरुत्वास जाऊन पोहोंचलें कीं, त्यांच्यासारखें **धर्माध्यापकप्रभुत्व**, आणि **आचा-**

धिपत्य, हीं ह्या जगाच्या इतिहासांत दुसरीकडे कोठें ही आढळून येत नाहींत.[१]

क्षत्रिय वर्ण.

याप्रमाणें चिरकाल राहील अशा मजबूत पायावर ब्राम्हण वर्णाची संस्थापना व एकीकरण झाल्यानंतर, क्षत्रिय वर्गही हळू हळू पुढें सरसाऊं लागला. कारण, एकामागून एक असे देश जिंकण्याचें काम सतत चालूच होतें; त्यामुळें लढाऊ व पराक्रमी लोकांची त्यावेळीं मोठीच अवश्यकता असे. या

१ These same families remained in the possession of the traditions connected with them, and which were necessary to their explaination. * * and thus it came about that these families of singers became families of preists, whose influence was more and more consolidated in proportion as the distance between the people and their former home increased, and the more their ancient institutions were banished from their minds by external struggles. The guardians of ancestral customs, of the primitive forms of worship, took an increasingly prominent position, because the representatives of these, and finally, the representatives of the Divine itself. For so ably had they used their opportunities that they succeeded in founding a hierarchy the like of which the world has never seen.

{ History of Indian literature P. 18 By Pro. Weber }

योगानें, पृथक् पृथक् जनसमूहावर जे अधिपति आपलें प्रभुत्व चालवीत असत, त्यांची सत्ता आपोआपच वाढत गेली, आणि त्यांच्या ताब्यांत अधिकाधिक लोकसंख्या व देशमर्यादा येत चालली. तेव्हां अर्थात्च प्रजेचें पालन करण्याचा बोजा ज्यांच्या शिरावर प्रथमतःच होता, त्यांस सहजींच नृपत्व प्राप्त झालें. तदनंतर हें राज्यशकट चालविण्यास उचित श्रमविभाग करून, आपल्या कुटुंबांतील आप्तवर्गास, किंवा स्वकीयांस, अथवा अनुयायिजनांस, योग्यपदारूढ करणें अगदीं अगत्याचें आहे असें या नरपतींस वाटल्यावरून, त्यांनीं क्रमशः त्या सर्वांसच लहानमोठा अधिकार देऊन, त्या सर्वांमिळून एक लहानशी **शिबंदी** बनविली. आणि यांपासूनच पुढें बलवत्तर असा **क्षत्रिय** वर्ग निर्माण झाला.

वैश्यवर्ण, व

तदनंतर राहिलेल्या **विशांचा**, अथवा अधिवासिजनांचा, त्यांच्या उपजीविकासाधनाप्रमाणें, निराळा तिसरा **वैश्यवर्ग** झाला; हा वर्ग पशुरक्षा, वाणिज्य, व्याजबट्टा, वैश्यकर्म, आणि कृषिकर्म, असे करी. शेवटीं, बाकी जे लोक राहिले

शूद्रवर्ण.

त्यासर्वांमिळून **शूद्र** नांवाचा चौथा वर्ग झाला; व इतर वर्गांची सेवा करणें, हेंच ह्या वर्गाचें कर्तव्यकर्म राहिलें.

आतां, वर जे चार वर्ण सांगितले त्यांपैकीं, पहिल्या तीन

त्या सर्वांचा परस्पर रोटीव्यवहार व बेटीव्यवहार.

वर्णांतले लोक आपापल्या स्थित्यनुसार व पराक्रमाप्रमाणें, वरच्या प्रतीच्या वर्णांत जाऊं शकत. ह्मणजे **क्षत्रिय** वर्णांपैकीं ज्यानें अत्युग्र तपश्चर्या केली असेल, अथवा ज्याचें अनुपम तपोबल व विद्याबल असेल, किंवा ज्याचें कुलगोत्र प्रसिद्ध असेल, तो **ब्राह्मण वर्णांत** शिरून त्यांतच मोडला जाई. **विश्वामित्र** हा मुळचा **क्षत्रिय** असून तो केवळ आपल्या तपोबलानें पुढें **ब्राह्मण** झाला असल्याविषयीं, सर्वांस महशूर आहेच. साक्षात् **वसिष्ठ** हा वेश्येचा पुत्र होता असें ह्मणतात. पण तोही पुण्याचरणानें **ब्राह्मर्षि** झाला. **पराशराच्या** गोत्राला **वसिष्ठ** गोत्राचा पोटभेद समजतात. परंतु ह्या **पराशराची** बायको जी **सत्यवती**, ती एका मच्छीमारूची मुलगी होती. **जमदग्नीची** बायको **रेणुका**, आणि **अगस्तीची** स्त्री **लोपामुद्रा**, ह्या दोन्ही राजकन्या असून, ब्राह्मण कुळांत पडल्या होत्या. त्यावरून त्यावेळीं **ब्राह्मण** आणि **क्षत्रिय**, तसेंच **क्षत्रिय** आणि **वैश्य**, या तीन वर्णांत परस्पर लग्नव्यवहार होत असे, असें दिसतें. **ययाति** हा **क्षत्रिय** होता; तरी त्याची पहिली बायको **ब्राह्मणाचीच** मुलगी होती. **पारस्करगृह्यसूत्रांत, ब्राह्मणांस** तिन्ही वर्णांतील मुलांबरोबर लग्न करण्याची सूट दिली आहे. तसेंच **क्षत्रियांस** दोन वर्णांतील मुलांब-

रोबर, व **वैश्यांस** त्यांच्याच एका वर्णांतील मुलाबरोबर लग्न करण्याची सूट दिल्याचें आढळतें. तथापि, ' **शूद्राम-न्येकेमंत्रवर्जम्** ' असें जें वचन लागलेंच घातलेलें आहे त्यावरून, **चाऱ्ही वर्णांत** पूर्वीच्या काळीं लग्नव्यवहार निःसंशय सुरू होता असें दिसतें. मात्र इतकेंच कीं, शूद्र-विवाहांत वैदिक मंत्राचा प्रयोग बिलकुल करूं नये, ह्मणून आज्ञा असे. भिन्नभिन्न वर्णांच्या मुलींबरोबर शरीर-संबंध होऊन जी संतति होई, ती ज्या वर्णांतला पिता असेल त्या वर्णांत मोडली जाई. ह्मणजे आई कोळीण किंवा क्षत्रिय असून बाप ब्राह्मण असेल तर, त्या दंपत्ती-पासून झालेली संतति ब्राह्मणच होय. जसें **पराशराची** बायको कोळीण होती तरी तो स्वतः ब्राह्मण असल्यामुळें त्याचा मुलगा ब्राह्मण. **परशुरामाची** आई क्षत्रिय होती तरी त्याचा बाप ब्राह्मण असल्यामुळें तो स्वतः ब्राह्मणांतच मोडे. आई ब्राह्मण पण बाप क्षत्रिय, म्हणून **ययातीचा** वडील मुलगा क्षत्रिय; तसेंच **यया-तीची** दुसरी बायको असूर जातीची होती, तरी तो स्वतः क्षत्रिय असल्यामुळें तिच्यापासून झालेला मुलगा क्षत्रियच समजावयाचा. **द्रोण, कृप,** व **अश्वत्थामा** हे ब्राह्मणक्षत्रिय होते. आणि **भीष्म** व **जनक** हे क्षत्रियब्राह्मण होते. ह्या एकंदर हकीकतीवरून सदरहू चाऱ्ही वर्णांत

व्रात्यस्तोम व उच्च वर्गात प्रवेश.

परस्पर रोटीव्यवहार व बेटीव्यवहार पूर्वीच्याकाळीं होत असे. इतकेंच नाहीं तर, **अनार्य** लोकांसही **व्रात्यस्तोम** करून **आर्य** वर्गांत शिरतां येई. आणि एकदां कां त्यांनीं **व्रात्यस्तोम** केला, म्हणजे ते त्रैवर्णिकांबरोबर सर्व प्रकारचा व्यवहार चालवीत, व **ब्राह्मण**ही त्यांजपासून जाहीरपणें दक्षिणा घेत.

यांप्रमाणें त्या वेळची सामाजिक रचना होती. ह्या समाजाची, व तदन्तर्गत प्रजापालनाची, योग्य आणि विचारपूर्वक व्यवस्था लावून, त्यांतील प्रत्येक वर्गाचा **वर्णाश्रमधर्म**, त्या प्रत्येकाचे अधिकार, आणि त्यांचीं भिन्न भिन्न कर्मे, यांविषयीं संपूर्ण मीमांसा करण्याचें अति प्रयासाचें काम, **ब्राह्मणांनीं** आपण होऊनच तदनंतर सवडीप्रमाणें हातीं घेतलें. कारण, प्रजेचें कल्याण, तिचें पालन, आणि तिची समृद्धि, हेंच स्तुत्य, व अति महत्वाचे हेतु, त्यांच्या हृदयांत रात्रंदिवस घोळत असल्यामुळें, मार्गदर्शनाकरितां व तदनुसार वर्तन होण्यासाठीं, मार्गोपदेशक असा **ग्रंथसमूह** रचणें केवळ अत्यवश्य आहे, असें त्यांस पूर्णपणें वाटूं लागलें. आणि त्यासाठींच त्यांनीं तें काम सत्वर हातीं घेऊन, आपल्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें व अनुपम उत्साहशक्तीनें तडीस नेलें.

वर्णाश्रमधर्म आणि ब्राह्मणांची इतिकर्तव्यता.

ह्या वेळीं ही एक गोष्ट विशेष रीतीनें लक्षांत ठेव-

ब्राम्हणांचा मनोनिग्रह, व त्यांचें नृपत्वाविषयीं पूर्ण वैराग्य.

ण्यासारखी आहे कीं, ब्राम्हणांच्या हातीं हरएक प्रकारची सत्ता असतां, व राज्यशकट चालविण्याचें संपूर्ण शहाणपण त्यांच्या अंगांत बाणत असतां, तसेंच यच्चयावत् प्रजाजनसमूहावर त्यांची पूर्ण छाप व अमित अम्मल असतांही, ते स्वतः **राज्यपद** न बळकावितां, त्यापासून दूर व अलिप्तच राहिले. आणि या क्षणभंगुर जगांतील सर्व ऐश्वर्य नश्वर मानून, " **परोपकारायसतांविभूतयः** " ह्या वाक्याची, जणूकाय सार्थकता करण्यासाठींच, त्यांनीं त्या **सार्वभौमपदावर** लाथ[१]

---

१ " In arrogating the preistly function, they gave up all claim to the royal office. They were divinely appointed to be the guides of nations and the counsellors of kings, but they could not be kings themselves. * *

"The Brahmans, therefore, were a body of men who in an early stage of this world's history, bound themselves by a rule of life, the essential precepts of which were self culture and self restraint."

" The Brahman * * the man of self centered refinement. He is an example of a class becoming the ruling power in a country, not by force of arms, but by the vigour of hereditary culture and temperance."

" But since the dawn of history the Brahman has calmly ruled swaying the minds, and receiving the homages of the people and accepted by foreign nations as the highest type of Indian mankind."

मारून, आपलें सर्व आयुष्य जगाच्या कल्याणार्थ[1] खर्च केलें. आपलीं हाडें प्रजेच्या हितासाठीं झिजविलीं; आपलें ज्ञान राजकार्यांत अर्पण केलें; आणि शेवटीं आत्मोन्नति होण्यासाठीं स्वतः वानप्रस्थाश्रम पतकरला. खरोखर हा त्यांचा मनोनिग्रह, ही त्यांची देशसेवा, व हें त्यांचें प्रजाजनवात्सल्य, इत्यादि पाहून आपणासच काय पण जगांतील प्रत्येक विचारी मनुष्यास आश्चर्य व कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्यांनीं आपल्या देशबांधवांस ज्ञानोदधि दिला. त्यांच्यासाठीं नानाविध ग्रंथरूपें[2] रत्न भांडार राखून ठेविलें. प्रजेचें सर्वतोपरी कल्याण केलें. राजास योग्य त्या काळीं उत्तम प्रकारची सल्ला दिली. प्रसंगीं त्याचे मंत्रीही झाले. वखत गुजरला तेव्हां स्वतः शत्रूंवर[3]

---

१ "The paramount position which the Brahmans won, resulted, in no small measure, from the benefits which they bestowed."

( Dr. Hunter's Indian Empire P. P. 94-96 )

२ " For their own Aryan Countrymen, they developed a noble language and literature. The Brahmans were not only the priests and philosophers. They were also the lawgivers, the statesmen, the administators, the men of science, and the poets of their race." ( Dr. Hunter's Indian Empire P. 97. )

३ * * " We know that they ( the ancient people of India ) too, could fight like heroes, and

[ पुढें चालू ]

चाल देखील केली. आणि परचक्राच्या वेळीं व आणीबाणीच्या संधींत तर, राजास भरपूर धीर देऊन आपणच प्रत्यक्ष संग्रामांत घुसले, व आपल्या यशोदुंदुभीची प्रखर गर्जना सर्वत्र प्रसृत केली.

आर्यावर्त्तांतील शांतता, व तिचा परिणाम.

अस्तु. ह्यावेळीं **आर्यावर्तांत** बहुतकरून चोहोंकडे शांतता असावी असें वाटतें. कारण, राजाश्रय मिळाल्यावांचून, अथवा शांततेचा चंद्रमा पूर्ण विकास पावल्यांखेरीज, ज्ञानोदधीस भरतीचा लोट येण्याचा संभवच नसतो. जिकडे तिकडे स्वस्थता, सर्वत्र विद्यावृद्धि, प्रजाजनांत समृद्धि, आणि लोककल्याणेच्छा, इतकीं सर्व जागृदवस्थेंत असलीं, ह्मणजे देशाच्या भाग्योदयास विचारावयासच नको. असा काल ईशकृपेनें आह्मी **स्वतंत्रदेवतेचे** निःसीम भक्त असतां कांहीं शतकें, किंबहुना बरींच शतकें, आह्माला निर्वेध लाभला होता, असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. कारण, **हिंदुस्थानांत सुलतान महमदची** पहिली स्वारी इ. स. १००१ या वर्षी झाली असून, तेव्हांपासूनच स्थूल मानानें **मुसलमान**

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

that, without machinery, they could by patient toil raise even the meanest handiwork into a work of art, a real joy to the maker and to the buyer."

( What can India teach us ? P. 102. )

लोकांचा, व तदनंतर **पाश्चात्यांचा** जास्त शिरकाव या **भरतखंडांत** होऊं लागला. सबब **मुसलमान** लोकांचा किंवा इतर **म्लेंच्छांचा** इकडे शिरकाव होण्यापूर्वी, आह्माला आमच्या देशांत चांगली स्वस्थता प्राप्त झाली होती यांत यत्किंचित्ही शंका नाहीं. यापूर्वी ही **तक्षक, पारसीक, ग्रीक,** आणि **आरब** लोकांच्या स्वाऱ्या **हिंदुस्थानावर** झाल्या होत्या; तरी त्यांचें वास्तव्य या देशांत फार दिवस बिलकुल टिकलें नव्हतें. आतां **वेदकालाला**[१] सुमारें पांच हजारांपासून साडेचार हजारपर्यंत वर्षें होऊन गेलीं असें घेतलें, अथवा स्थूल मानानें कमींतकमी चार हजार वर्षें लोटलीं असावीं असें जरी मानलें, तरी आमच्याच **प्रभुत्वाखालीं**, आमच्या मनाचा पूर्ण विकास व इच्छित उत्क्रांति होण्यास आह्माला अजमासें तीस शतकें, ह्मणजे तीन हजार वर्षें, सांपडलीं यांत बिलकुल शंका नाहीं. आणि इतका निर्वेध अवधि मिळाल्याशिवाय, हिंदूंच्या मनाचा असा अलौलिक विकास, व ही निःसीम स्फूर्ति झालीच नसावी, असें. आभ्यंतरीय प्रमाणावरून निर्विवाद सिद्ध होतें. आतां, देशांतल्या देशांत राजक्रांति होऊन जनप्रकोप किंवा प्रकृतिक्षोभ झाल्याचीं अनेक उदाहरणें आढळतात. तथापि, त्यापा-

१ ह्मणजे वेद कालाच्या उत्तरार्धाला चार पांच हजार वर्षें होऊन गेलीं आहेत असें समजण्याचें.

सून देशाची उलथापालथ, नीतिभ्रष्टता, किंवा अपकृष्टदशा झाल्याचें दिसत नाहीं. सारांश, या वेळचीं आमची स्थिति अगदीं अभिनंदनीय होती. आह्माला सर्व तऱ्हेची पूर्ण स्वतंत्रता असल्यामुळें आह्मी आमचेच प्रभु, किंबहुना प्रभूंचेही प्रभू, आणि **नराधीपांचेही अधिपति** होतों. अशा वेळीं आम्ही आपल्या अधिकाराचा यत्किंचितही दुरुपयोग न करतां, आम्ही आपलें सर्व ऐश्वर्य आणि बुद्धिमत्ता हीं लोककल्याणार्थ व आत्मोन्नति होण्याकडेसच खर्च केलीं, ही किती आनंदाची गोष्ट आहे ! ! ! आणि ह्याबद्दल प्रत्येकास आश्चर्य व कुतूहल वाटल्याशिवाय कसें राहील ? **ब्राह्मणांनीं** आपल्या बुद्धिबलानें व पराक्रमेतजानें, केवळ स्वोन्नत्यर्थ निरिच्छ राहून जें साम्राज्य स्थापित केलें, त्याविषयीं त्यांची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच.

ब्राह्मण साम्राज्य सत्तेचा सुविनियोग.

आपला पगडा अखिल **भरतंखडभर** सर्वत्र बसवावा एतदर्थ, **आर्य हिंदूनीं वेदकालांत** देखील शनैः शनैः, परंतु मोठ्या नेटानें आणि धैर्यानें, सतत प्रयत्न

वेदकालीन साम्राज्य.

---

१ 'The Brahman Caste, having established its power made a wise use of it. From the ancient Vedic times its leaders recognised that if they were to exercise spiritual supremacy they must renounce earthly pomp.' ( Dr. Hunter's Indian Empire P. 94. )

चालविला होता. त्याप्रमाणें त्या कालांतही त्यांचा चोहोंकडे लौकरच दरारा बसून, त्यांच्या शत्रूचा वारंवार पाडाव होत चालला, असें वेद ऋचांवरून स्पष्ट दिसतें. कारण, आज अमक्याला जिंकिलें, उद्या तमक्याला पळवून लाविलें, आतां ह्या शत्रूंचे किल्ले घेतले, नंतर त्या शत्रूंची दाणादाण केली, अमुक राजांची कत्तल उडविली, तमुक फौज ठार मारली, इत्यादि उद्गार ऋग्वेदांत वारंवार आढळून येतात. त्यावरून आमच्या पूर्वजांनीं प्रत्येक डोईजड

१ " त्वायुजानि इत्यादि. " 'महान् शत्रूचें सर्व बळ नाहींसें केलें.' (अ. ३ अ. ६ व १७. मं. ४ अ. ३ सू. २८) (२).

२ " अहन्निन्द्रो इत्यादि. " 'दस्यु ह्मणजे अनार्य लोक (कोळी, खोंड, भिल, कातवडी, निषाद, वगैरे) यांजला रानांत पळवून लाविलें. (अ. ३ अ. ६ व १७. मं ४ अ. ३ सू. २८) (३).

३ त्वमेतांजन राज्ञो द्विर्दशा बंधुना सुश्रवसो पजग्मुषः षष्टिं सहस्रा नवतिं नवश्रुतो निचक्रेण रथ्या दुष्पदावृणक् ॥ ९ ॥

(अ. १ अ. ४ व १६. मं १ अ. १० सू. ५३).

ह्याचा तात्पर्यार्थ असा आहे कीं:—

सुश्रवस् नांवाचा कोणी एक उपासक फार बलाढ्य अशा वीस शत्रूं बरोबर लढत होता. त्यावेळीं, त्याचें साहाय्य करण्यास कोणी देखील नसतां, इंद्रानें त्यास साहाय्य करून, त्या वीस शत्रूंस व त्यांच्या [ साठ हजार नव्याण्णव ह्मणजे ] असंख्य सैन्यास मारून टाकिलें.

मनुष्याला हळूं हळूं आपल्या शहांत ठेवून, कालांतरानें त्या सर्वांस अगदीं पादाक्रांत केलें, आणि त्यांचे प्रदेश लागलींच आपल्या अमलाखालीं आणिले. त्या कारणानें, **वेद साम्राज्याचें** एकछत्र सर्वत्र भासमान होऊं लागलें; त्याच्या **दिग्विजयपताका** चोहोंकडे फडकल्या; त्याचा तीव्र **दुंदुभि** दिगंतरीं दुमदुमून गेला; त्याचा **यशः-परिमल** इतस्ततः पसरला; आणि **वेदधर्म** सनातन होऊन राहिला.

रामायण कालांतील साम्राज्य

तदनंतर **हिंदु साम्राज्याचा** दुसरा ऐतिहासिक काल म्हटला ह्मणजे **श्रीरामचंद्राचें** राज्य होय. [1]**रामा**प्रमाणेंच त्याचा पिता **दश-रथ**[2] हा देखील **हिंदुस्थानचा सार्वभौम**

---

१ "A potentate who lead the chief dominion of India."

२ "Whose father, Dasaratha drove his victorious Car ( ratha ) over every region ( desa ), and whose intercourse with the countries beyond the Brahmaputrà is distinctly to be traced in the Ramayana"

( Tod's Rajasthan. P. 503 note ‡ )

३ रामायणांत दशरथाला " पार्थिवेंद्र " म्हटलें आहे, त्यावरून तो राजाधिराज होता, असें उघड दिसतें.

" या पुत्रं पार्थिवेन्द्रस्य प्रवासयति निर्घृणा ।

( अयोध्याकांड २. सर्ग ४८. श्लोक ३४. पोथी पृष्ठ ८७ )

राजा होता, आणि **रामपुत्रांनीही** सर्वत्र दिग्विजय करून तें सार्वभौमत्व राखिलें होतें.

युधिष्ठिरकालांतील साम्राज्य.

अशा प्रकारें कित्येक **सूर्यवंशी** राजे झाल्यानंतर **हिंदुस्थानचें** साम्राज्य **चंद्रवंशी** राजांकडे आलें. त्यांत **युधिष्ठिरादि** महातेजस्वी सार्वभौम राजे होऊन गेल्यावर, कालांतरानें एक नवीनच प्रचंड सत्ता **मगध** देशांत उदयाप्रत पावली. आणि **चंद्रगुप्त** राजानें आपली

१ रामपराक्रमाला साडेतीन हजार वर्षें होऊन गेलीं आहेत, असें राजस्थानचे प्रसिद्ध इतिहासकार करनल टॉड् यांचें मत आहे. परंतु त्या गोष्टीला निदान पांच हजारांवर वर्षें होऊन गेलीं असावींत असें वाटतें.

[ Tod's Rajasthan P. 704 ]. Vol. I.

२ 'Hari, Krishna, familiarly Kaniya, was of the celebrated tribe of Yadu, the founder of the fifty six tribes who obtained the universal sovereignty of India, and descended from Yayat, the third son of Swayambhuva Manu or 'the man, Lord of the Earth', whose daughter Ella (Tarra) was espoused by Buddha (mercury) Son of Chandra (the moon) whence the Yadus are styled Chandravansi, or children of the moon.' ( Tod's Rajasthan P. 460. )

३ युधिष्ठिर म्हणजे धर्मराजा, याच्या कारकीर्दीला सुमारें चार हजार वर्षें झालीं असावींत. " He was crowned Emperor of Hastinapur and reigned justly and wisely for many years. " ( Tod. )

४ ह्याला हल्लीं बहार म्हणतात.

गादी पाटली[1] पुत्र नगरी एकदम स्थापन करून, उत्तर हिंदुस्थानांतील सर्वराजेरजवाड्यांस करभार द्यावयास लाविलें[2]. तदनंतर त्याचा नातु अशोक यानें तर सर्व भरतखंड भर आपलें सार्वभौमत्व गाजविलें. ( इ. स. पूर्वी ३२० ते २२९ वर्षें. )

बौध्द कालांतील साम्राज्य.

मौर्यकुलावतंसांनीं मगध देशाची गादी सुमारें दहा पिढ्यपांर्यंत राखल्यावर, उज्जनी येथील विक्रमादित्यानें[3] आपल्या पराक्रमतेजेंकरून सार्वभौमत्व स्थापिलें, आणि त्याच्या वंशजांनीं तें ऐश्वर्य कांहीं कालपर्यंत राखिलें.

विक्रम साम्राज्य.

१ पाटना.

२ 'Compelled the Punjab principalities, Greek and Native alike, to acknowledge his ( Chandra Gupta's) sovereignty.'

" Chandragupta was building up an Empire in Northern India." ( Dr. Hunter's Indian Empire, P. 167. )

३ इ० स० पूर्वी ५६ वर्षें.

' Vikramaditya was a powerful monarch, ruled a civilised and prosperous country, and was a distinguished patron of letters.'

" The princes of Malwa certainly extended their authority over a large portion of the Centre and West of India ; and it is of Vikramaditya that the traditions of universal empire are most common in India."

( Elphinstone's India P. 406. )

इतर चक्रवर्ती राजे.

तदनंतर **मुसलमान** लोकांच्या स्वाऱ्या **भरतखंडा**वर होईपर्यंत, **वंग**[1], **कान्यकुब्ज**[2], **हस्तिनापूर**[3], इत्यादि प्रांतांतील राजांनीं आपलें सार्वभौमत्व व **हिंदुपादशाही पद** कायम राखिलें, आणि **हिंदुधर्माचें** व **संस्थांचें** चांगल्या प्रकारें व यथेष्ट संगोपन केलें. **हिंदुसाम्राज्याची** ही परंपरा एकसारखी चालत आली नसती तर, आमचें **हिंदुत्व** लौकरच नाहींसें झालें असतें.

---

१ बंगालच्या राजांचा अंमल हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत, व ब्रह्मपुत्रानदीपासून तों तहत पश्चिमसमुद्र व सिंधु नदीपर्यंत, आणि तिच्याही पलीकडे कंबोज देशापर्यंत होता, असें अनेक ताम्रपत्रांवरून सिद्ध होतें. [ एल्फिन्स्टन्‌चा इतिहास पान ४०४ पहा. ] हे राजे पाल नांवाचे असून, त्यांनीं इसवीसनाच्या नवव्या शतकापासून तों अकराव्या शतकापर्यंत राज्य केलें.

२ कनोजचा राजा सार्वभौम होता असें दिसतें. ह्या शहरची भिंत सभोंवार पंधरा कोस होती, आणि त्यांत तीस हजार तांबोळ्यांचीं दुकानें असत.

" Some Mahomedan writers pay the Raja the usual complement of supposing him Emperor of all India ; and Ebn Haukal, a century before Mahmud, mentions Conouj as the chief city of India.

( Elphinstone's India P 554. )

३ दिल्ली. पृथिवीराज हा दिल्लीचा शेवटला सार्वभौम राजा होय.

" The last Hindu Emperor of Delhi, the chivalrous Prithiraj of the chohan race.—

( Tod's Rajasthan P. 528 Vol. I)

आतां मध्यंतरीं कित्येक हिंदु सार्वभौम राजे बौद्ध धर्माचे[१] होऊन गेले. तथापि, वेदधर्माचा पाया मजबूत असल्या-कारणानें, ह्या सनातन धर्मापुढें त्याचा टिकाव बिलकुल लागला नाहीं. शिवाय बौद्ध धर्म वेदधर्मापासूनच उद्भ-वलो असल्यामुळें, त्याचीं मूलतत्वें बहुतेक हिंदुधर्मासा-रखींच होतीं. त्यायोगानें हिंदु धर्म किंवा हिंदु संस्था भ्रष्ट झाल्या नाहींत.

मुसलमानांचा पगडा, व हिंदुसाम्राज्याची पुनश्च प्रतिष्ठापना.

पुढें कांहीं वर्षें, इस्लामशाहीनें अगदीं गर्दी करून सोडली. परंतु पुनश्च, हिंदूंनीं आपलें सार्वभौमत्व स्थापनें[२] केलें. आणि एकंदर राज्याचीं सर्व सूत्रें ब्राह्मणांकडेसच आल्यामुळें सनातन वेदधर्म सांवरला, हिंदुराष्ट्र उदयास आलें, व आमचें हिंदुत्व कायम राहिलें.

---

१ " Oldenburg had proved, out of the Buddist scriptures, that Buddhism was a true product of Brahman doctrine and descipline. "

( Dr. Hunter's Indian Empire P. 161 s. Edn. )

जेकबीचें देखील असेंच मत आहे.

२ " And the power of the state fell into the hands of a dynasty of Brahman ministers under whom the civil administration became organised, and the military system was raised to much pomp and splendour. The robes of Empire now hung not ungracefully on the limbs of a Hindu. "

( Rulers of India series. Madhow Raw Sindia. P. 15 ).

याप्रमाणें, हिंदु साम्राज्याची हकीकत थेट एकोणीसाव्या शतकापर्यंत आपणास कळून आली. आतां हें हिंदूंचें प्रभुत्व संकुचित होतें किंवा विस्तृत होतें, ह्मणजे तें फक्त हिंदुस्थानावरच असे, अथवा अन्य प्रदेशीं आणि द्वीपांतरीं देखील तें होतें, याविषयीं कांहीं प्रमाण सांपडलें तर, तत्संबंधीं यथावकाश विचार करूं.

पश्चिम, दक्षिण, आणि प्राची दिशेकडील प्रांत, व हिंदुसाम्राज्याचा विस्तार.

अगदीं नूतन शोधांवरून असें कळून येतें कीं, आह्मा हिंदूंचें प्राचीन साम्राज्य केवळ भरतखंडांत, किंवा त्याच्याजवळ आसपासच्या प्रदेशांत, अथवा द्वीपांतच होतें असें नाहीं. तर त्यांच्या वसाहती आशियाखंडांत ठिकठिकाणीं, आणि फार दूर दूर प्रदेशांत, व यूरोप आणि आफ्रिकाखंडांत, व द्वीपांतरीं असून, त्यांजवर हिंदूंच्या स्वामित्वाचा[१] झेंडा अप्रतिहत फडकत असे.

---

१ "The spread of Indian settlements in the far east can now be traced by the recent discoveries of scholars, in the Indian Archipelago and even as far as the Phillippines, Sumatra, Java, Borneo, Cambodia, as well as Siam, were colonised by Brahmin warriors from India, long prior to the great Buddhistic movement which in later times sent missionaries through all these regions, and diffused an Indian faith throughout the whole of the further

(पुढें चालू.)

त्यांतील भाषा, व धर्मसंस्था.

यूरोपखंडांत, रूसच्या राज्यांत बाकू येथें पुराण काळीं हिंदूंची वसाहत असून, तेथें प्राचीन शिवालय असल्याचें कळून येतें. आशियांतील रूसचें राज्य, रक्त समुद्र, इराणचें आखात, झांझिबार, आणि आफ्रिकाखंड, येथेंही हिंदूंच्या प्राचीन वसाहती होत्या, व त्यांजबरोबर ते व्यापार करीत असत. तसेंच, अगदीं पूर्व बाजूला, ह्मणजे हिंदीमहासागरांतील द्वीपसमूहापैकीं सुमात्रा, जाव्हा, बोर्नियो, वगैरे बेटें, सायाम, कंबोज, कोचीनचीन, इत्यादि प्रांत, आणि अतिप्राच्यतर द्वीपसमुदाय, (ज्याला

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

east, where it survives to this day. The Indian nobles who led their followers to the conquest and settlement of remote lands, apparently first subdued Sumatra and Java, and ultimately Cambodia, with the southern parts of Cochin-china where the French in our time are endeavouring to create another India. From the inscriptions found in Cambodia and Champa it is ascertained that Sanskrit was the official language in these territories; and that it was also the language of official poets. Shiva and Vishnu were worshipped, and the Mahabharata and other sacred writings piously recited as in the mother-country. The ruins of temples in the Indian style of architecture are still extent, and excite the admiration of the traveller."

[ पुढें चालू. ]

हल्लीं फिलिपाईन बेटें ह्मणतात तो ), सर्व जिंकून, एकंदर प्रांत हिंदूंनीं आपल्या साम्राज्यास जोडले होते. त्या ठिकाणीं त्यांचा अम्मल जारीनें चालू होता, व त्या प्रांतांतील राजदरबारची भाषा संस्कृत असे. एकंदर ग्रंथसंपत्ति, व काव्यरचना, हीं देखील त्याच पवित्र भाषेंत होतीं, आणि वेद, रामायण, महाभारत, व इतर पवित्र पुराणें, यांचेंही पठण आणि अध्ययन मोठ्या जारीनें सुरू असे. तसेंच त्या सर्वांचा व्याख्यान विधि, मुळच्या दयितजन्मभूमिकेंत, ह्मणजे भरतखंडांत, चा-

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

"The historical Indies were three in number—Hind, Sind, and Zang—the latter name surviving in Zanzibar, and the two former in Hindustan and Sind. The Indian colonies are traceable as far north as the Persian Gulf, and the shores of the Red Sea, and in the West and South along the African coast to Zanzibar. There is reason to believe that in Buddhist times, if not in preceding ages, there was considerable intercourse between the South-east coast of Africa and Western India. Sir George Birdwood found in the woods on the Ghauts, which are the surviving remnants of the sacred grove, of which the Karli caves are the centre, trees and shrubs of a kind unknown in other parts of India but which are similar to trees and shrubs still to be found on the Zanzibar Coast of Africa.

( The Bombay Gazette 3rd October 1892. )

लत असल्या प्रमाणेंच होई. ठिकठिकाणीं शिव आणि विष्णु हीं दैवतेंच पूजनीय असून, त्यांचीं अप्रतीम व सुरेख मंदिरें देखील त्या वसाहतींत बांधलेलीं होतीं. परंतु हल्लीं तीं सर्व उध्वस्त झालेलीं दिसतात. तथापि, त्यांची भारतीय रचना आणि कलासौंदर्य, हीं आज मितीस देखील दृष्टिगोचर असल्यामुळें, तीं आपल्या वैभवानें प्रेक्षकांस अगदीं चकित करून सोडतात.

१ "It has long been known that there are more or less distinct traces of Indian immigrations, and of Indian influence, in the islands of the Indian Archipalego, and even in the distant Phillippines. But working on materials collected by the enlightened energy of the French Government, Kern, Barth, the lamented Bergaigue, and Senort have gone far to call out of darkness the whole of that forgotten past. 'It now appears' said Dr. Buhler 'that this portion of the Far East did not receive its civilization like China and Japan, through the barefooted friars of the Buddhist persuasion, but after being conquered with the sword by Brahminical warriors of Eastern, and possibly also of western India. These warriors carried with them their civilization and their religions, mindful of Manu's advice to settle in newly acquired kingdoms learned Brahmans and artizans skilled in various handicrafts. The Sáma and the Rigvedas were sung, the Mahabharata and the Ramayana recited, Siva and Vishnu were worshipped in the Far East as in Aryavarta itself ! The ruins of their temples still

नवीन प्रांत जिंकून, ज्या ज्या ठिकाणीं ह्मणून हिंदूंनीं आपलीं ठाणीं बसविलीं, त्या त्या ठिकाणीं त्यांनीं सुधारणा केली, आपला धर्म स्थापिला, पराजितांस विद्यादान दिलें, त्यांस शास्त्र शिकविलें, सर्व कला उदयास आणिल्या, आणि आपल्या कडकडीत आचरणानें नीतितत्वाचें सोज्वळ प्रतिबिंब त्यांच्या हृत्पट्टिकेवर उठविलें. केवळ तरवारीच्या जोरावर ते उन्मत्त झाले नव्हते. इतकेंच नाहीं तर, त्यांनीं आपल्या शौर्याच्या मानानें, व पराक्रम सूर्याच्या तेजाच्या प्रमाणानें, सत्ववृत्तीचें पूर्ण अवलंबन करून, अनेक देश काबीज करण्याचें काम केलें, आणि त्याबरोबरच सुधारणेचें व शांततेचें बीज सर्वत्र पेरलें. **मुसलमान** लोकांप्रमाणें त्यांची केवळ समशेर बहादुरीवरच नजर नव्हती. तर, आमच्या सांप्रतच्या **आंग्ल** प्रभूंप्रमाणें, ते **भारतीय आर्य** ( ह्मणजे हिंदू ), हे विजय व विद्या, शौर्य व शांतता, पराक्रम व प्राविण्य, स्वातंत्र्य व संतोष आणि राजा व प्रजा यांची नैसर्गिकच, सांगड आहे असें समजून, ते सर्वांस समदृष्टीनें पहात, व ते सर्व गुण विशेषतः चांगल्या कार्यासाठींच एकमेकांवर

---

( मागीलपृष्ठावरून पुढें चालू. )

speak of an Indian origin and even now strike the beholder with admiration."

( Times of India, 1st October 1892. )

अवलंबून आहेत, असें ते पूर्णपणें समजून असत. यामुळें त्यांच्या साम्राज्याची अफाट वृद्धि झाली, आणि किंबहुना ती प्राचीन रोमक राज्य, आणि अर्वाचीन आंग्ल राज्य, ह्यांच्या विस्ताराच्या बरोबर होती असें दिवसानुदिवस नूतन शोधाअन्वयें कळून येत चाललें आहे.

ह्यावरून इतकें कोणाच्याही लक्षांत सहज येईल कीं,

हिंदुस्वातंत्र्य व हिंदु साम्राज्य.

आमचें हिंदू राष्ट्र[१] आज बारा हजार वर्षांचें अति पुराण व जुनाट असून, तें आज मितीसही आपलें हिंदुत्व मोठ्या बाणेदारीनें राखून, कालाच्या अनंत घडामोडींत देखील आपलें डोकें वरच करून राहिलें आहे. या भरतखंडांत भिन्न भिन्न कलपरंपरा उदयास येऊन लयास देखील गेल्या. अनेक राज्यक्रांत्याही वारंवार झाल्या. नानाविध धर्मपंथ भिन्न भिन्न काळीं उद्भवले. नानाप्रकारचे राजे सिंहासनारूढ झाले. त्यांत अविंधांनीं तर

---

१ "Perhaps no spot exists on this earth so calculated to stir the hearts of stay-at-home Americans as India—a people older than the pyramids, the wonderland of myth and fable—an art perfected before the dawn of history, and preserved intact by a millennial sleep—a philosophy dim with age and time-scarred, which like the eternal hills has bidden defiance to the efforts of both sectarian bigots and the science-imbued Oxford graduate."

हिंदुधर्म केवळ रसातलासच पोहोंचविण्याचें मनांत आणिलें. परंतु ईशकृपेनें त्यांचे दुष्ट व क्रूर हेतु जेथल्या तेथेंच थिजले जाऊन, अखेर हिंदूंच्या भगव्या झेंड्यासच भर समशेरशाहींत देखील चांगलीं जयश्री प्राप्त होऊन, तो सुमारें दीडशें वर्षेंपर्यंत या आमच्या दयित आर्यभूमीवर एकसारखा फडकत राहिला. आणि तित-क्या मुदतींत हिंदूंनीं आपल्या यशोदुंदुभीचें अति तीक्ष्ण ताडण हिमालयापासून तों तहत् सिंहलद्वीपापर्यंत करून, द्वीपांतरीं, व जिकडे तिकडे, " ब्राह्मण " आणि " मराठे " यांचें नांव " भयप्रद " करून सोडिलें. इतकेंच नाहीं तर, अखिल हिंदुस्थानचीं राज्यसूत्रेंही कांहीं वर्षें आपल्या हातांत ठेवून, त्यांतील सर्व राजे रजवाड्यांवर, मांडलीक प्रभूंवर, आणि खुद्द दिल्लीच्या पादशावर देखील त्यांनीं आपली उत्तम छाप बसविली व सर्वांस करभार द्यावयास लाविलें. त्यामुळें, " हिंदुस्था-

---

१ "Bâlaji Baji Row was now sovereign in reality, though he continued to reign under the old name of Peshwa. During the reign of Balaji Baji Row, the Maratha power attained its greatest limits and received its most crushing blow. "* * *

"The Muhammadan power in the Dakhan was thus reduced to the narrowest limits, and over the

[ पुढें चालू. ]

तंत्र्य " आणि " हिंदुसाम्राज्य " हीं आज मितीसही सर्वांच्या हृत्पट्टिकेवर अगदीं मूर्तिमंत उभीं आहेत.

हिंदूंचें एकछत्री राज्य असतांना, आम्हास सर्व प्रकारें सौख्य होतें. देशांत समृद्धि होती, पीकपाणी उत्तम येत असे, व सर्व लोक स्वातंत्र्याचा यथेच्छ उपभोग घेत. चोहोंकडे शांतता असल्यामुळें देशांत सर्वत्र चांगली अन्नादानी होती, व लोकही श्रीमान् आणि संपन्न असत. अशा प्रकारची स्पृहणीय स्थिति असल्याकारणानें, विद्येचें अनुपम सौन्दर्य, रमणीय विलास, आणि अद्भुत प्रभाव, हीं अखिल भरतखंडांत ठायीं ठायीं दृष्टीगोचर होत होतीं.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू.

whole of the imperial territory chouth had been promised by Muhammad Shah."

(History of India, by David Sinclair.)

P. P. 101-102.

"It was the Peshwa (Balaji Vishwanath) that entered into a treaty with the Emperor, whereby the latter is supposed to have paid tribute to the Marathas in order to preserve his territories around Dehli from being plundered." (Do. Do. P. 98.)

१ "When under the native Rájás, India seems to have excelled in wealth, magnificence, and literature." (India and the Hindus by Ward. P. 72.)

परंतु **इस्लाम**शाहीच्या टोळधाडींत, तें सर्व कांहीं लयास जाऊन, **हिंदुस्थानां**त चोंहोंकडे हाहाःकार[१] झाला. विद्येचा ऱ्हास होऊन लोकांस दौर्बल्य येत चाललें. आणि धर्मभ्रष्टतेमुळें सर्वत्र संक्षोभ व अप्रीति उत्पन्न झाली. जिकडे तिकडे जुलुम मातला, व त्याचें फळही तावडतोब मिळालें.

अशा स्थितींत, **हिंदूं**नीं आपल्या पराक्रमानें व सामर्थ्यानें अखिल **भरत**खंडाचें साम्राज्य आणखी एकदां मिळविलें, आणि त्यामुळें आमची **हिंदुपद्पादशाही** पुनश्च स्वस्थानापन्न[२] झाली. व ही गोष्ट कोणाही इतिहासज्ञाला कबूल करणें भाग आहे.

---

१ "Under the Mahomedan conquerors, the land was cursed with oppression and cruelty, the only road to preferment being conversion to Islamism."

( Ward's India. P. P. 72/73)

२ "The celebrity of the Marattas was reserved for recent times, when they were destined to act a greater part than all other Hindu nations, and to make a nearer approach to universal sovereignty than any of those to whom modern writers have ascribed the enjoyment of the empire of India."

( Elphinstone's India P. 433. Vol. I )

"The British won India, not from the Mughals, but from the Hindus.'

(Dr. Hunter's India Empire. 2nd Edn. P. 316.)

परंतु हिंदूंचें हें पूर्ववैभव हल्लीं केवळ नामशेषच असून, तें गत गोष्टीचा केवळ कथाभाग मात्र होऊन राहिलें आहे. त्यांचें तें स्वातंत्र्य व तें शौर्य, ती कार्यक्षमता व ती आत्मपरायणता, तो परार्थ व तो स्वात्मविनियोग, हीं बहुतेक संपुष्टांत आल्यामुळें अगदींच लयास जाऊं पाहत आहेत. आणि कालचक्राच्या प्रचंड फेऱ्यांत सांपडल्या कारणानें आम्ही केवळ परतंत्र व हतवीर्य झालों आहों ! ! ! तथापि, दुःखांत सुख येवढेंच कीं, अशा प्रकारच्या विकल दशेंत, आम्ही ज्या परद्वीपीय प्रभूंच्या अमलाखालीं आहोंत, ते पुष्कळ अंशीं दयाळू असून त्यांच्या समजुतीप्रमाणें योग्य ते राजकीय हक्क आह्मास देण्यास ते मनापासून झटतात.

---

१ अखिल भरतखंडांचीं राज्यसूत्रें मराठ्यांपासूनच इंग्रजांस प्राप्त झालीं, असें ग्रांट्डफनें देखील आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत लिहिलें आहे. ते असें लिहितात कीं:—

* " The object of this work is to endeavour to afford some information respecting the condition of the Marathas under the Mahomedan dynasties, and to trace more clearly than has yet been done, the rise, progress, decline, and fall of our predecessors in Conquest in India, whose power, it will be perceived, was gradually gaining strength before it found a head in the far-famed adventurer, Sivaji Bhonslay. " (Grant Duff's History of the Marathas 3rd Edn. P. 19)

# भाग १२.

## आर्यभाषा.

संस्कृत भाषा व तिचें श्रेष्ठत्व.

ह्या भूमंडलावर जितक्या ह्मणून मानवी भाषा आपणास माहीत आहेत, त्या सर्वांत संस्कृत ही आदिभाषा असून, गुणोत्कर्ष व श्रेष्ठता यासंबंधानें तिला पहिल्या पंक्तीलाच बसविलें पाहिजे. तिची रचना विलक्षण आणि अलौकिक आहे, असें कोणालाही कबूल करणें भाग आहे. इतकेंच नाहीं तर, उदात्तता, प्रसाद, पदलालित्य, इत्यादि गुणांत तिची बरोबरी कोणतीही भाषा करूं शकणार नाहीं. तिच्यांत गांभीर्य असून माधुर्य आहे, अर्थव्यंजकता असून प्रौढता आहे, व मार्दव असून चारुता आहे. इतर भाषांशीं तिची तुलना करून पाहतां पूर्णत्व आणि अर्थगौरव, यासंबंधानें ती **ग्रीक** भाषेपेक्षांही विशेष श्रेष्ठतर पदवीस पोहोंचली आहे. इतकेंच नाहीं तर, अर्थबाहुल्याविषयीं विचार करतांना, **लाटिन्** भाषेपेक्षां देखील तिचें महत्व जास्त

ठरतें, व एकंदर सर्व भाषांत **संस्कृत भाषा** ही विशेष सुसंस्कृत आहे, हें कबूल करणें भाग पडतें. आणि ह्मणूनच आजकाल ती सुधारणेच्या अत्युच्च शिखरास जाऊन पोहोंचली आहे, असें कोणाच्यानेंही नाहीं ह्मणवणार नाहीं.

त्याविषयीं पाश्चात्य भाषाकोविदांचे अभिप्राय.

याविषयीं **पाश्चात्य भाषाकोविदांचें** काय अभिप्राय आहेत, व तत्संबंधीं त्यांचें कशा प्रकारचें मत आहे, याबद्दल या ठिकाणीं थोडाबहुत उल्लेख केला तर बिलकुल अप्रासंगिक होणार नाहीं. कारण, ज्या गोष्टीचें समर्थन आपण करितों आहों, त्याचें पुष्टीकरण तिऱ्हाइत अशा विद्वान गृहस्थांकडूनच झालें तर त्यास जास्त बळकटी येऊन, आपल्या भोंवतीं आपणच दिवा ओंवाळून घेतल्याचा दोष व प्रमाद टळतो.

प्रसिद्ध **सर वुइल्यम् जोन्स** हे **संस्कृत** भाषेविषयीं[१] असें लिहितात कीं "तिची रचना विलक्षण असून **ग्रीक** भाषेपेक्षां देखील ती जास्त पूर्णदशेस आली आहे; व **लाटिन्** भाषेपेक्षांही तिच्यांत शब्दप्रकाशन आणि ओजस् हे गुण अधिक असून, त्या सर्वांत ती अत्युत्तम व उत्कृष्ट आहे."

---

१ "It is of a wonderful structure; more perfect than the Greek, more copious than the Latin, and more exquisitely refined than either."

Sir William Jones (Asiatic Researches, Vol. 1 P. 422)

खरोखर[1] समासप्राचुर्यानें **संस्कृत** कवनास मोठें साहाय्य होऊन, कठिण किंवा तीव्र शब्दांच्या योगानें गद्यास जें कटुत्व यावयाचें, तें संधि व समास, यांचा उपयोग केल्यानें नाहींसें होतें, व त्यांस माधुर्य येतें. **काव्यादर्शांत,** "ओजः समास भूयस्त्वमेतद् गद्यस्य जीवितम्," ह्मणून जें ह्मटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे.

या **भूगोलावरील** जेवढ्या ह्मणून भाषांची माहिती आपणास आजमितीस मिळाली आहे, तेवढ्या सर्वांविषयीं शोध करतां, असें खात्रीपूर्वक कळून येतें कीं, **संस्कृत**

संस्कृत आर्यविद्येचें पौराणत्व.

**आर्यविद्या** ही सर्वांत अति पुराण आहे. प्रसिद्ध **जर्मन्** प्रोफेसर

---

१ "Among many marks of high polish, (of Sanskrit) is one which must have particularly promoted the melody of its versification. This consists in what Mr. Colebrooke calls its euphonical orthography by which letters are changed not only so as to avoid harsh combinations in particular words but so as to preserve similar harmony' throughout the whole length of each of their almost interminable compounds, and even to contribute to the music of whole periods, which are generally subjected to those modifications, for the sake of euphony, which in other languages are confined to single words."

(Elhphinstone's India. Vol.-1, P. 282/283)

वेबर असें ह्मणतात कीं, " ज्यांची ह्मणून लेखी माहिती आपणास उपलब्ध आहे, त्या सर्वांत ही जुनाट आहे, व तीं यथान्यायच आहे."

संस्कृत भाषा, संस्कृत विद्या, आणि ज्यांपासून तीं उद्भवली ते आर्य लोक, यांविषयीं कांहीं कांहीं पाश्चात्य फारच गौरवानें व अभिमानपूर्वक लिहितात. ज्यांचे आदिविचार वेदरूप दर्पणांत दृष्टीस पडतात, ज्यांनीं तत्वविवेचनांत आपलें सर्व आयुष्य खर्च केलें, जे धर्माच्या

---

१ " The literature of India passes generally for the most ancient literatures of which we possess written records, and justly so. " ( History of Indian Literature P. 2 by Pro. A. Weber. )

२ " The Aryans of India, the framers of the most wonderful language the Sanskrit, the fellow—workers in the construction of our fundamental concepts, the fathers of the most natural of natural religions, the makers of the most transparent of mythologies, the inventors of the most subtle philosophy, and the givers of the most elaborate laws." ( What can India teach us. P. 15 By Max Muller. )

" And a study of Sanskrit literature has its own purpose ; but what I feel convinced of, and hope to convince you of, is that Sanskrit literature, if studied only in the right spirit, is full of human interests, full of lessons which even Greek could never teach us, a subject worthy to occupy the leisure, and more than the leisure, of every Indian Civil Servant;"

नैसर्गिक स्थितीचे केवळ भाजनच होत, ज्यांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें मानवी धर्मशास्त्र रचलें, आणि ज्यांनीं आपली कल्पनाशक्ति पौराणिक-कथानकें रचण्यांत खर्च केली, त्यांच्या अचाट मानसिक वैभवाचें आणि त्यांनीं बनविलेल्या **संस्कृत** भाषेचें **परद्वीपीयांस** कौतुक वाटावें, यांत नवल तें काय!

संस्कृत विद्येचें श्रेय.

मानवी सुखाच्या संबंधानें विचार केला तर **संस्कृत** विद्येचा अभ्यास फारच श्रेयस्कर आहे. **ग्रीक** व **लाटिन** या भाषा जरी ज्ञानदीपांनीं परिप्लुत आहेत तरी, कांहीं कांहीं महत्वाच्या विषयांची त्यांत खचित उणीवच असून, ती **संस्कृतां**तील ज्ञानभांडाराशिवाय बिलकुल पुरी होणारी नाहीं. या मौल्यवान् **गीर्वाण** भाषेंत प्रत्येक शास्त्राचें, आणि हरएक विषयाचें, शोधकबुद्धीनें व विचारपूर्वक विवेचन केलेलें असल्यामुळें, पारमार्थिक व ऐहिक साधनांच्या संबंधानें ती एक विशाल तरणी व बुद्धिदर्पणच होऊन राहिली आहे. बुद्धिमत्ता, वीरश्री, नैसर्गिक संपत्ति, आणि लावण्य, यासर्वांचें माहेरघर कोणतें आहे अशाविषयीं सूक्ष्म विचार केला तर, या पृथिवीच्या पाठीवर भरतखंडाशिवाय दुसरा कोणताही देश[१], इतक्या पुरातन

---

१ "There will be abundance of useful and most

पुढें चालू.

काळीं, अशा भरभराटीस पोहोंचल्याचें दिसत नाहीं. आत्मविवेचन व तत्संबंधीं मानसिक उन्नति यांत तर, ह्या देशाचा हातखंडाच असून, ग्रीक व रोमनसारख्या विकास पावलेल्या बुद्धिमान् राष्ट्रांनीं देखील त्यापुढें हातच टेंकले. जीव आणि शिव यांचें ऐक्य, त्यापासून होणारें पूर्ण समाधान, तत्संबंधीं आकलनशक्ति, शांतिसुख, व

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

interesting work for him to do, work such as he would look for in vain, whether in Italy or in Greece, or even among the pyramids of Egypt or the palaces of Babylon."

"If I were to look over the whole world to find out the country most richly endowed with all the wealth, power, and beauty that nature can bestow—in some parts a very paradise on earth— I should point to India."

१ "If I were asked under what sky the human mind has most fully developed some of its choicest gifts, has most deeply pondered on the greatest problems of life, and has found solutions of some of them which well observe the attention of those who have studied Plato and Kant—I should point to India. And if I were to ask myself from what literature we, here in Europe, we who have been nurtured almost exclusively on the thoughts of Greeks and Romans, and ot one Semitic race, the Jewish, may draw that corrective which is most wanted in order to make

पुढें चालू.

अपरोक्षानुभूतीचें खरें ज्ञान, याविषयीं आमच्या आर्य लोकांचा इतर सर्व राष्ट्रांनीं कित्ता गिरवून त्यांत त्यांचें गुरुत्व घेण्याविषयीं निरभिमानानें तत्पर व्हावें. आणि आमच्या पुराण व पुण्य पूर्वजांनीं आमच्या करितां सांठवून ठेविलेलें ज्ञानभांडार केवळ संस्कृत भाषेतच असल्यामुळें, त्या भाषेचें परिज्ञान सर्वांनीं अवश्य करून घ्यावें. इतकेंच

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

our inner life more perfect, more comprehensive, more universal, in fact more truly human, a life, not for this life only, but a transfigured and eternal life– again I should point to India."

( What can India teach us. P. P. 5/6. )

१ "If you care for geology, there is work for you from the Himalayas to Ceylon."

"If you are fond of botany, there is a flora rich enough for many Hookers."

"If you are a Zoologist, think of Haeckel, who is just now rushing through Indian forests and dredging in Indian Seas, and to whom his stay in India is like the realisation of the brightest dream of his life."

"If you are interested in Ethnology why India is like a living ethnological museum." * * *

"If you are fond of Archaeology, read only 'General Cunninghams' Annual Reports of the Archaeological Survey of India, and you will be impatient for the time when you can take your spade

पुढें चालू.

नाहीं तर, त्या भाषेची यथामति व यथाशक्ति सेवा, पवित्र बुद्धीनें, प्रत्येक इसमानें, व त्यांतही विशेषतः प्रत्येक आर्यपुत्रानें झटून केली, तरच या आपल्या उदार आर्यावर्त्त मातेच्या ऋणांतून तो मुक्त झाल्यासारखें होईल.

त्यांतील नाना तऱ्हेचे विषय.

आतां, ही गोष्ट खरी आहे कीं 'भिन्न रुचिर्हि लोकः' या प्रसिद्ध कवीच्या उक्तीप्रमाणें, प्रत्येक प्राणिमात्राला निरनिराळ्या विषयाची अभिरुचि असणारच. तेव्हां ही अनेक विषयजिज्ञासा संस्कृतभाषेनेंच ह्या भरतखंडांत तीं कशी पुरी होणार, असा प्रश्न साहजीकच उत्पन्न होतो. पण अनुभवानें आपल्याला आतां खात्रीपूर्वक असें

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

and bring to light the ancient Viharas or Colleges built by the Buddhist monarchs of India. If ever you amused yourselves with collecting coins, why the soil of India teems with coins, Persian, Corian, Thracian, Parthian, Greek, Macedonion, Scythian, Roman, and Mahomedan." * * *

"The study of mythology has assumed an entirely new character, chiefly owing to the light that has been thrown on it by the ancient Vedic Mythology of India. * * *

"Even the study of fables owes its new life to India, from whence the various migrations of fables have been traced at various times and through various

पुढें चालू.

समजतें कीं, कोणत्याही विषयांचें ज्ञानकुतूहल परिपूर्ण होण्याला, इकडे कोणतीच उणीव नाहीं. ज्याला आत्म-ज्ञानाचा शोक असेल त्याला संस्कृतांत तर अक्षय्य भांडारच आहे, असें ह्मटलें तरी चालेल. का-

वेदांतविषय.

रण, वेदांतविषयावर या भाषेंत असंख्य ग्रंथ असून असा भरणा दुसऱ्या कोणत्याही भाषेंत नाहीं. ज्ञानवृक्षाच्या तत्वविचार शाखेंत तर, आम-

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

channels from East to West. Buddhism is now known to have been the principal source of our legends and parables." * * *

"The fable of the donkey in the lion's skin which occurs in Plato's Cratylus. Was that borrowed from the East? Or take the fable of the weasel changed by Aphrodite into a woman, who when she saw a mouse, could not refrain from making a spring at it. This, too, is very like a Sanskrit fable, but how then could it have been brought into Greece early enough to appear in one of the Comedies of Strattis, about 400 B. C."

"We may go back even further into antiquity, and still find strange coincidences between the legends of India and the legends of the West, without as yet being able to say how they travelled, whether from East to West, or from West to East. That at the time of Solomon, there was a channel of communication open between India and Syria and

पुढें चालू.

च्या पूर्वजांचे अतिच परिश्रम आहेत. इतकेंच नाहीं तर ते त्यांचे श्रम सार्थकीं लागून त्यांची चीजही झाली आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

धर्म व त्याची मूळ उत्पत्ति, आणि संस्कृतांतील धर्मविषयक ग्रंथ.

धर्माची[१] मूळ उत्पत्ति कशी झाली, तो शनैः शनैः परंपरेनें कसा विकास पावत गेला, आणि शेंवट त्याची वाढ उपनिषदांत कशा विस्मयकारक रीतीनें पूर्णोदयास आली, याबद्दल मीमांसा करण्याविषयीं ज्याच्या मनानें धांव घेतली असेल, त्याला वेद हे केवळ दर्पणच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. पृथिवी, आप, तेज, वायु, आणि आकाश,

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

Palestine is established beyond doubt, I believe, by certain Sanskrit words which occur in the Bible as names of articles of export from Ophir, articles such as ivory, apes, peacocks, and sandalwood, which taken together, could not have been exported from any country but India."

१ * "Take religion, and where can you study its true origin, its natural growth, and its inevitable decay better than in India, the home of Brahmanism, the brith-place of Buddhism, and the refuge of Zoroastrianism, even now the mother of new superstitions—and why not, in the future, the regenerate child of the purest faith, if only purified from the dust of nineteen centuries"?

या पंच तत्वांचा, व स्थावर जंगमात्मक नैसर्गिक बाह्य शक्तींचा, प्रथमतः आर्य लोकांच्या मनावर कसा संस्कार झाला, व त्यामुळें त्या तत्वांकडेसच त्यांनीं प्रथमारंभीं कसें ईशत्व दिलें; त्यानंतर कांहीं कालानें त्यांची विचार-शक्ति जास्त वाढल्यावर त्या पंचतत्वांचाही कोणी तरी आदिकर्ता असावा, असें क्रमाक्रमानें त्यांच्या मनांत कसें भासत गेलें; व पुढें, कालवशात् तें आदिकारण व ती चिच्छक्ति, नियमित स्थलांत किंवा वस्तूंतच नसून तिची आब्रह्मस्तंभपर्यंत व्याप्ती आहे, अशाविषयीं त्यांचें तर्कज्ञान कसें उदयाप्रत पावलें; आणि चराचर सर्व वस्तूंत तें निर्विकार परब्रह्म ओतप्रोत भरलेलें असून भासमान होणारें विलक्षण विराट् स्वरूप त्याचीच विभूति आहे, असें निश्चयात्मक त्यांच्या मनांत शेंवट कसें पूर्णपणें बिंबलें; अशाविषयीं साद्यंत हकीकतीचें[१] वेद हे अमूल्य व गुप्त भांडारच आहेत, असें भासल्यावांचून राहवत नाहीं.

---

१ "* And in that study of the history of the human mind, in that study of ourselves, of our true selves, India occupies a place second to no other country. Whatever sphere of the human mind you may select for your special study, whether it be language, or religion, or mythology, or philosophy, whether it be laws or customs, primitive art or primitive science, everywhere, you have to go to In-

पुढें चालू.

व्यवहार-आचार-व नीतिशास्त्रविषयक संस्कृत ग्रंथ.

ज्याला व्यवहार शास्त्राची गोडी असेल त्याला मनुधर्म शास्त्रासारखे अनेक संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहेत. हे वाचले असतां हिंदु लोकांच्या पूर्वकालीन उन्नतावस्थेचें दिग्दर्शन होतें; त्यांची सामाजिक स्थिति आणि

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

dia, whether you like it or not, because some of the most valuable and most instructive materials in the history of man are treasured up in India, and in India only."

( What can India teach us? P. P. 8/10-13/15 )

* * *

"—Older ancestors and benefactors, who thousands of years ago were toiling for us in the sweat of their face, and without whom we should never be what we are,—the ancestors of the whole Aryan race, the first framers of our words, the first poets of our thoughts, the first givers of our laws, the first prophets of our gods, and of Him who is God above all Gods."

( What can India teach us? P. 117 )

"I wished to point out that there was another sphere of intellectual activity in which the Hindus excelled—the meditative and transcendent—and that here we might learn from them some lessons of life which we ourselves are but too apt to ignore or to despise."

( What can India teach us? P. 117/118 )

ग्रामरचना याविषयीं बरीच कल्पना करतां येते; तसेंच **स्थानिक स्वराज्याचें** जणु प्रथमचें बीजारोपणच त्यांत असल्याविषयीं निश्चयात्मक रीतीनें भासतें; व त्यांचा सरल आचार, शुद्ध नीति, आणि उदार बुद्धि, यांचें आश्चर्य व कौतुक वाटतें.

भाषाशास्त्र, इतिहास, व कल्पित कथा, टंकसंग्रह, नृवंश विद्या, प्राणिविद्या, उद्भिद्विद्या, आणि भूगर्भशास्त्र, यांचें हिंदुस्थान हें माहेर घर.

**भाषाशास्त्र, पुराण, इतिहास, कल्पित कथा**, आणि **आख्यायिका**, यांविषयीं ज्याला अभिरुची असेल त्याला **संस्कृत** भाषा तर ज्ञानोदधिच आहे. नानाप्रकारचीं मन्वंतरांतलीं **नाणीं**, फार पुराण अशीं **कोरींव लेणीं**, जुनाट **बौद्ध देवालयें, हेमाडपंती इमारती** व **तलाव**, अशीं इतस्ततः पडलेलीं, ठिकठिकाणीं मोडलेलीं, आणि चोंहोंकडे पसरलेलीं सांपडतात. हीं सर्व ज्या त्या विषयांतील शास्त्रवेत्त्याला फारच उपयोगीं आहेत.

**नृवंशविद्या, प्राणिविद्या, उद्भिद्विद्या**, आणि **भूगर्भशास्त्र**, याविषयांवर व्यासंग करावयाचा असून ज्याला खरी माहिती संपादन करावयाची आहे, त्याला तर **भरतखंड** हें माहेरघरच आहे यांत संशय नाहीं. कारण **संस्कृत** ग्रंथांत तद्विषयक वर्णन निदान थोडेंबहुत तरी सांपडतेंच.

---

१ आन्वीक्षिकीविद्या, किंवा पंचाध्यायीन्यायदर्शन, तसेंच शारीरकमीमांसा भाष्य पहा.

# भाग १३.

## वेद व वेदांगें.

वेदांचें पौराणत्व, व त्याविषयींचीं प्रमाणें.

संस्कृतविद्या, संस्कृतकाव्य, आणि गद्यपद्यात्मक अमूल्य व नानाविध शास्त्रकलाप, ह्या सर्वांत वेद हे निःसंशय शिरोभागीं असून, ते हिंदूंचे, किंबहुना अखिल जगाचे, अति पुराण विद्यालंकार होत. आमचे वेद अतिशय प्राचीन असल्याविषयीं १ नाक्षत्रिक प्रमाण, २ बाह्य प्रमाण, ३ भूगोल शास्त्रविषयक प्रमाण, आणि ४ आभ्यंतर प्रमाण, अशीं चार प्रामाण्यें आहेत.

१. नाक्षत्रिक प्रमाणांवरून वेदोत्पादन कालाला[१]

---

१ "True, the circumstance that the oldest records begin the series of Nakshatra's with the sign Krittika, carries us back to a considerable earlier period even than these dates, derived from the so-called Vedic calender, viz to a period between 2780–1820 B. C. since the verual equinox coinceded with Indian (Krittik'a), in round numbers about the year 2300 B. C. ( H. I. L. By Pro. Weber )."

पुढें चालू.

नाक्षत्रिकप्रमाण. सुमारें चार पांच हजार वर्षे होऊन गेलीं असावीं, असें अनुमान होतें. तथापि, कांहीं पाश्चात्यांचा असा मिथ्यावाद आहे कीं, हें नाक्षत्रिकप्रमाण खात्रीपूर्वक नाहीं. व ते असेंही प्रतिपादन करतात कीं, हें खगोलज्ञान **आर्यांस** परकीयांकडून प्राप्त झालें आहे. परंतु ज्योतिःशास्त्रांचीं मूलतत्त्वें **हिंदू** लोकांस **बाबिलनपुरींतून** प्राप्त झालीं, म्हणून जें कांहीं पाश्चिमात्य पंडितांचें म्हणणें आहे, तें केवळ भ्रांतिमूलक आहे. इतकेंच नाहीं तर, ती क्लिष्ट कल्पना अगदीं निराधार असून, त्याविषयीं सत्यासत्यतेच्या कारणांचा अधिक विचारपूर्वक शोध केला, ह्मणजे ती निःसंशयं

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

तारीख ५ सप्टेंबर सन १८९३ रोजीं, लंडन येथें प्राच्यभाषाकोविदांची एक सभा भरली होती. तींत पंडित मोक्षमुलरनीं अशा अर्थाचें भाषण केलें कीं, भाषेच्या इतिहासावरून पाहतां, आर्यांच्या अतिप्राचीन अस्तित्वाचा काल, इसवी सनापूर्वी दहा हजार वर्षेपर्यंत पोहोंचविण्यास हरकत नाहीं.

१. उलट, बाबिलोनियन आणि आसीरियन राज्यांतच हिंदुत्वाचें प्रतिबिंब दृष्टीस पडतें, असें एका प्रसिद्ध इतिहासकाराचें ह्मणणें आहे.

"That a system of Hinduism pervaded the whole of Babylonian and Assyrian empires, scripture furnishes abundant proofs, in the mention of the various types of the Sun God Bàlnàth, whose pillar

पुढें चालू.

खोटीही ठरते. कारण, एक तर **बाबिलन्** लोकांचें राशिचक्र सौरमानावर अवलंबून असे व आमच्या **आर्य** लोकांचें चांद्रमानावर अवलंबून होतें. आणि दुसरें हें कीं, **बाबिलन्** लेखांत अति सूक्ष्म रीतीनें वारंवार तपास केला, किंवा पुनः पुनः डोळ्यांत तेल घालून दीर्घ दृष्टीनें पाहिलें तरी, **बाबिलन्** देशांत चान्द्रमान सुरूं असल्याचें कोठेंही आढळून येत नाहीं. तिसरें कारण हें कीं, वेदांतील रोजच्या यज्ञयागादि क्रिया चंद्रगतीवरच विशेष रीतीनें अवलंबून असल्यामुळें, त्या उपग्रहाविषयीं जास्त शोध करणें त्याकाळीं आमच्या **आर्य** लोकांस अगदीं अगत्याचें होतें. व मास, पक्ष, तिथि, पौर्णिमा, आणि अमावास्या, ह्यांचें साहजिक रीतीनें ज्ञान होण्यास चंद्राशिवाय स्वल्प असें दुसरें साधनच नव्हतें. त्या कालीं, यज्ञयागादि क्रियेचा चंद्राशीं इतका निकट संबंध असे कीं, **ऋत्विज** ( ह्मणजे ऋतुमानाप्रमाणें यज्ञ करणारा ) असें साधारण नांवच हवन करणारास असे. एका ऋचेंत

हिंदूंचें चांद्रमान, व बाबिलन् सौरमान.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

around 'every mount' and 'every grove' and to whose other representative, the brazen calf ( nandi), the 15th of each month ( amavus ) was especially sacred." ( Tod's Rajasthan. Vol. I P. 519/520. )

असें म्हटलें आहे कीं, " ऋतूंसाठीं चंद्र निर्माण केला, " व " ऋतूंचें नियमन होण्यासाठींच चंद्र हा पुनः पुनः उगवतो. "

प्रात्यहिक पंचमहायज्ञ, सायंप्रातरग्निहोत्र, दर्शपूर्णमासयज्ञ, चातुर्मासयज्ञ, व अयनयज्ञ, असे नानाप्रकारचे यज्ञ योग्यकाळीं त्यांस करावे लागत. मिळून एतावता, चंद्राशीं त्यांच्या धर्मव्यवहाराचा निकट संबंध असल्यामुळें, चंद्राचें परिवर्तन कसकसें होतें, व तो कोणतें नक्षत्र किती दिवस भोगतो; ह्याचें तत्व शोधकबुद्धीनें हुडकून काढण्याची त्यांस मोठीच अवश्यकता होती. व त्या वेळच्या सामाजिक स्थितीच्या नूतनावस्थेंत, यांपेक्षां जास्त सूक्ष्मावलोकन करून विशेष रीतीनें अन्वेक्षण करण्याला त्यांस दुसरें कांहींच साधन नव्हतें. यामुळें, चान्द्रमानावरून ज्या आमच्या हिंदु लोकांनीं आज सुमारें आठ हजार वर्षांमागें[1] ज्योतिःशास्त्राचीं मूलतत्वें कोणा-

---

१. ऋग्वेदांत चंद्रादि ग्रहगतींचा वारंवार उल्लेख येत असून, ह्या आमच्या आदिवेदालाच आठ दहा हजार वर्षें होऊन गलीं आहेत.

" Thus the Rigveda, the most ancient work that exists in any language known at persent, must have been composed between 6000 B. C. and 4000 B. C.

कांहीं यूरोपस्थ पंडित देखील आर्य ज्योतिःशास्त्राचें प्राचिनत्व कबूल करतात, आणि इ. स. पूर्वी तीन हजार वर्षांपलीकडील काळांतही हिंदूंची त्यांत पुष्कळच प्रगति होती, असें ते लिहितात.

पुढें चालू.

च्याही साहाय्याशिवाय केवळ स्वपराक्रमानेंच शोधून काढून या अमूल्य विद्येचें बीज पेरलें, त्यांचे आम्हीचसें काय, पण अखिल जगानें साश्चर्य व प्रेमपूर्वक आभार मानणें जरूर आहे.

चंद्राचें परिवर्तन.

अहर्निशीं अवलोकनानें त्या वेदकालीन हिंदू लोकांची अशी खात्री होऊन गेली होती कीं, चंद्राचें परिवर्तन होतांना त्याला आकाशांतील क्रांतिवृत्ताच्या सप्तविंशतिस्थानमालिकेंतून जावें लागतें. सबब त्या त्या स्थानांतील नक्षत्रांस किंवा तारासमूहास त्यांनीं पृथक् पृथक् नांवें देऊन, आपला कार्यभाग करून घेतला होता.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

" Cassini, Bailly, and Playfair maintain that observations taken upwards of 3000 years before Christ, are still extant, and prove a considerable degree of progress already made at that period."

( Elphinstone's India P. 245 Vol. I )

१ "The Hindus had undoubtedly made some progress at an early period in the astronomy cultivated by them for the regulation of time. Their calender, both civil and religious, was governed chiefly, not exclusively, by the Moon and the Sun; and the motions of these luminaries were carefully observed by them, and with such success, that their

पुढें चालू.

आर्य ज्योतिर्विद्या व तत्संबंधीं ऋणखंडन.

आतां, जें ज्ञान नेहमींच्या साहजिक अवलोकनानें कोणत्याही साधारण बुद्धीच्या मनुष्यास होण्यासारखें आहे, तें ज्ञान संपादन करण्याकरितां आमचे असाधारण बुद्धीचे **हिंदु लोक सिंधु** नदीवरील विशाल आणि रमणीय प्रदेश सोडून **बाबिलन्**, किंवा **अरबस्थान**, अथवा **चीन**, या देशांत गेले, आणि त्या ठिकाणीं त्या परकी भाषा प्रथम शिकून, तेथील ज्योतिःशास्त्राचें ज्ञान उपलब्ध झाल्यावर तेथून ते **हिंदुस्थानांत** पुनः परत आले; व त्यानंतर त्या नक्षत्रांची व्यवस्था लावून वेद-ऋचा रचल्या; आणि पुढें यज्ञयागादि क्रिया होण्यास सुरुवात झाली; असें म्हणणें म्हणजे केवल बालिश, व अज्ञानमूलक असून, सर्व जगाचा इतिहासच खोटा ठरविण्यासारखें आहे. जर हिंदु लोकांनीं नक्कल घेतली होती, तर ती समग्र घेण्यास त्यांस कोणताही प्रत्यवाय नव्हता. शिवाय, ज्या अस्सलावरून त्यांनीं नक्कल घे-तील तें अस्सल तरी, मूळ ठिकाणीं सांपडलें पाहिजे होतें.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

determination of the moon's synodical revolution which was what they were principally concerned with, is a much more correct one than the Greeks ever achieved ( Colebrooke ).

परंतु तसेंही बिलकुल नाहीं. बाबिलनमध्यें सौरमान असे, आणि आमचें तर चांद्रमान होतें. तेव्हां त्या देशांतून ह्या ज्योतिर्विद्येचें आह्मी ऋण संपादन केलें, ही कल्पनाच ठरत नाहीं. आतां, अरबस्थानापासून आह्मांस हें ऋण प्राप्त झालें असें म्हणावें तर, आरबांचे अठ्ठावीस मंझील, किंवा नक्षत्र, अथवा तारासमूह होते. इतकेंच नाहीं तर, उलट आरबच[१] आमचे सर्वतोपरि ऋणीअसून, ज्योतिर्विद्या, औषधिविद्या, वगैरे नानाविध शास्त्रांत त्यांस आमचेंच गुरुत्व असल्याविषयीं त्यांस कबूल करणें भाग पडेल; व तें अनेक प्रमाणांवरूनही निःसंशय सिद्ध होतें. आतां, चिनी लोकांचे आम्ही कितपत ऋणी आहों, याचाच फक्त विचार करावयाचा राहिला. प्रथमतः एवढेंच ज्ञान संपादन करण्याकरतां आमचे लोक चीन देशांत गेले असल्याचें संभवत नाहीं. तशांतही ते गेले होते, म्हणून जरी क्षणभर कल्पना केली तरी, त्या गोष्टीला आधारभूत प्रमाण कोणतेंच मिळत नाहीं. कारण, जर ..हिंदुलोक तिकडे गेले असते तर, त्या

---

१ They had a division of the ecliptic into twenty seven and twenty eight parts, suggested evidently by the moons period in days, and seemingly their own ; it was certainly borrowed by the Arabians. "

( Cole brooke. )

गोष्टीचा उल्लेख चिनी ग्रंथांत कोठें तरी त्या लोकांनीं अवश्य केला असता. परंतु हिंदुस्थानाविषयीं यत्किंचित्ही दिग्दर्शन इतक्या पुरातन काळचें कोठेंही नसून, फक्त इसवी शकाच्या पूर्वी शेंदोनशें वर्षें मात्र या देशाचा उल्लेख केल्याचें त्यांच्या ग्रंथांतरीं आढळतें. शिवाय आमचीं नक्षत्रें सत्तावीस असून चिनी लोकांत तीं प्रथम फक्त चोवीसच होतीं. यावरून त्यांचेही आह्मी बिलकुल ऋणी नाहीं असें सिद्ध होतें.

---

१ "But here again there is no necessity whatever for admitting with Biot, Lassen and others, that the Hindus went to China to gain their simplest elementary notions of lunar chrononomy. First of all Chinese began with twenty four, and raised them to twenty-eight ; the Hindus began with twenty-seven, and raised them to twenty-eight." * *

"Now if a scientific system is borrowed, it is borrowed complete. But in our case, I see really no possible channel through which Chinese astronomical knowledge could have been conducted to India so early as 1000 before our era. In Chinese literature India, is never mentioned before the middle of the second century before Christ; and if the Chinàs in the later Sanskrit literature are meant for Chinese, which is doubtful, it is important to observe that name never occurs in Vedic literature,

पुढें चालू.

एकंदरींत साधकबाधक कारणांचा पूर्ण व निःपक्षपातानें विचार करून, पुढें आलेल्या सर्व कल्पनांचें यथामति खंडण करतां अशी खात्री होते कीं, आमच्या पूर्वजांनीं वेळांचें नियमन करण्यासाठीं फार पुराणकालीं ज्योतिःशास्त्राचा बराच अभ्यास केला होता. तसेंच, सूर्य आणि चंद्र यांच्या गतींचाही त्यांनीं लक्ष्यपूर्वक वेध घेतला होता. शिवाय, यज्ञयागादि क्रियांच्या संबंधानें चंद्राविषयीं त्यांनीं जास्त शोध केला असून, त्याच्या क्रांति-मंडलाचे प्रथमतः सत्तावीस,

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

When therefore the impossibility of so early a communication between China and India had at last been recognised, a new theory was formed, namely that the knowledge of Chinese astronomy was not imported straight from China to India, but was carried together with the Chinese system of division of the heavens into twenty-eight mansions, into Western Asia, at a period not much later than 1100 B. C. and was then adopted by some Western people, either Semitic or Iranian. In their hands it was supposed to have received a new form such as adapted it to a ruder and less scientific method of observation, the limiting stars of the mansions being converted into Zodiacal groups or constellations, and in some instances altered in Position, so as to be brought nearer to the general planetary path of

पुढें चालू.

व तद्नंतर अठ्ठावीस विभाग कल्पून, त्या नक्षत्रसमूहास त्यांनीं भिन्न भिन्न नांवें देखील दिलीं होतीं. आणि या ज्योतिःशास्त्रशोधांत ते ग्रीक लोकांपेक्षांही बरेच पुढें सरसावलेले होते. इतकेंच नाहीं, तर या कामांत त्यांची विचारसरणी यथार्थ व अश्रांत असून, त्यांची अन्वेक्षणपद्धतिही निर्दोष व तथ्य होती. व ही गोष्ट कांहीं पाश्चिमात्य पंडितही निराभिमानानें आणि प्रांजलबुद्धीनें कबूल करतात.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

the ecliptic. In this changed form having become a means of roughly determining and describing the places and movements of the planets, it was believed to have passed into the keeping of the Hindus, very probably along the first knowledge of the planets themselves, and entered upon an independent career of history in India. It still maintained itself in its old seat, having its traces later in the Bundabash; and made its way so far westward as finally to become known and adopted by the Arabs.' With due respect for the astronomical knowledge of those who hold this view, all I can say is that this is a novel, and nothing but a novel, without any facts to support it." * * *

(What can India teach us? P. P. 130/132.)

काहीं **पाश्चात्य** पंडितांचें असें ह्मणणें आहे कीं, **बाबिलोनियांतील** आचारविचारांची झांक **वेदांत** दिसून येते. परंतु तसेंही मानण्यास कांहींच आधार कळून येत नाहीं. त्यांतील विचारसरणी केवळ स्वतंत्र आहे. इतकेंच नाहीं तर, ती स्वाभावीक असून अन्यप्रभाव पोषित नाहीं, किंवा परप्रकाशानेंही बिलकुल सुसंस्कृत झालेली नाहीं. यामुळें, **आर्यांचें** सर्व ज्ञान-भांडार केवळ त्यांच्याच प्रभावाचें फल आहे, असें मानणें प्राप्त येतें.

आतां, **मणा**[2], आणि राशिचक्र, हीं आम्हीं **बाबिलोनियांतून** उचललीं, असा जो कित्येकांचा आक्षेप आहे, तो अगदीं निरर्थक असून, त्याबद्दलचें देखील समर्पक उत्तर **मोक्षमुलरनीं**[3] आपल्या सुंदर पुस्तकांत दिलें आहे.

---

१ "In India alone, and more particularly in Vedic India, we see a plant entirely grown on a native soil, and entirely nurtured by native air. For this reason, because the religion of the Vedic was so completely guarded from all strange infections, it is full of lessons which the student of religion could learn nowhere else."

( W. I. Teach ? P. 125. )

२. आनो भरव्यांजनं गामश्वमभ्यांजनं साका मणा हिरण्याया ।

( ऋग्वेद. ८. ७८. २. )

३. "This translation therefore is impossible, and although the passage is difficult, because Manâ does

पुढें चालू.

ह्यावरून कांहीं पाश्चात्यांचा मिथ्यावाद आणि दुराग्रह, हा त्यांच्या कल्पनाकोटींत किती दृढतर खिळून राहिला असतो, हें सहजींच लक्षांत येतें; व त्याबरोबर असेंही अनुमान होतें कीं, जरी पाश्चात्य देशांतील कांहीं विद्वन्मणि सत्यासत्यतेचा पुष्कळ विचार करतात, आणि केवळ शोधकबुद्धीनें व निरभिमानानें प्रत्येक वादग्रस्त विषयाची संगति लावितात, ( व हें त्यांस खरोखर अत्यंत भूषणही आहे, ) तरी तिकडील कांहीं गाळीव रत्नें अगदींच दुराग्रही, सत्यान्वेषणपराङ्मुख, आणि केवळ विचारशून्य असतात. अमुक रीतीनें, अमुक प्रमाणांनीं, अमुक एक गोष्ट सिद्ध करावयाची, असें एकदां

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

not occur again in the Rig-Veda, I should think we might take Maná hiranyayá, for a dual, and translate, 'give us also two golden armlets.' To suppose that the Vedic poets should have borrowed this one word and this one measure from the Babylonions, would be against all the rules of historical criticism" * *

"But this is not the only loan that India has been supposed to have negotiated in Babylon." * * *

"No one acquainted with Vedic literature and with the ancient Vedic ceremonial would easily allow himself to be persuaded that the Hindus had borrowed that simple division of the sky from the Babylonions."

( What can India Teach us ? ) P. 126/127.

कां त्यांच्या माथ्यांत वेड भरलें, ह्मणजे पुष्टिकरणाचीं कारणें, व प्रतिपादन करण्याचीं साधनें, कितीही बालिश, पोरकट, नीरस, आणि निराधार असोत, ते कांहीं तरी एखादी गप्प ठोकण्याला, किंवा हवें तसें सैरावैरा भकण्याला, अथवा पांचटपणानें भलताच बादरायणसंबंध लावण्याला, कधींही मागें सरत नाहींत. अशा प्रकारचें निरांधार प्रतिपादन, शोधकबुद्धीच्या पाश्चिमात्य पंडितानीं करणें ह्मणजे, त्यासारखी खेददायक गोष्ट, दुसरी कोणतीच नाहीं. अशा दुराग्रही लोकांचा मिथ्यावाद केवळ निर्माल्यतुल्यच असल्यामुळें, त्यापासून आपल्या हृदयावर यत्किंचितही संस्कार होऊं देऊं नयेत; किंवा आपलें मन कोणत्याही प्रकारें दूषित विचारांत निमग्न राहूं नये; आणि एतदर्थच प्रत्येक मनुष्यानें चांगली खबरदारी ठेविली पाहिजे.

संस्कृतांविषयीं अविचारी पाश्चिमात्यांचें मत.

आतां, हा दुराग्रह व ही सत्यपराङ्मुखता, प्रसंगविशेषीं किती उच्च कोटीप्रत जाते, हें या ठिकाणीं मासल्याकरतां दाखविणें जरूर आहे. युरोपांतील चांगल्या पुस्तकालयाच्या एका कपाटांतीलही पुस्तकांच्या पासंगास, **हिंदुस्थानांतील संस्कृत** काव्यकलाप आणि शास्त्रसमूह, अथवा **आरबी** विद्याभांडार, लागणार नाहीं. किंवा **युरोपियन** राष्ट्रांच्या एकंदर

काव्याशीं **संस्कृत** व **आरबी** भाषांची तुलना करण्यास त्या बिलकुल पात्र नाहींत. अथवा **साक्सन** व **नार्मन्** पूर्वजांच्या भाषेपेक्षां **संस्कृत** विद्येची बिलकुल अधिक किंमत नाहीं. असा महासिद्धांत **मेकालेसारख्या** आंग्लभौम पंडितांनीं एकदम अविचारानें ठोकून देऊन आपला मूर्खपणा, समवृत्तिशून्यता, आणि अज्ञान मात्र, जगास दाखवावें, यासारखें दुसरें नवल तें काय ? ज्यांस **संस्कृत** किंवा **आरबी** भाषेचा यत्किंचित् गंधही नाहीं, त्यांनीं तरी निदान असल्या गर्वोक्तीची वृथा वडबड करूं नये. तसेंच, आपल्या नांवाला चिरकाल कालिमा जोडेल, किंवा आपल्या राष्ट्रास निरंतर कलंक लागेल, अशा धृष्टपणाच्या कृत्यांत कांहीं लाजेकाजेस्तव तरी, पडूं नये हें बरें !!! जी भाषा अत्युत्तम व उत्कृष्ठ आहे; जिची रचना विलक्षण आहे; जी **ग्रीक** भाषेपेक्षांही जास्त पूर्णतेस आली आहे; व जिच्यांत शब्दप्रकाशन आणि ओजस् हे गुण **लाटिन्** भाषेपेक्षांही अधिकतर आहेत, ह्मणून अनेक भाषाकोविद प्रसिद्ध **सर वुइल्यम् जोन्स** यांचा अभिप्राय आहे, ( तसाच दुसऱ्या अनेक विद्वानांचाही आहे ), ती भाषा कुच्कामाची नाहीं असें **मेकालेनीं** ह्मटल्यावर, त्यांच्या शहाणपणाची व विद्वत्तेची अगदीं कमालच झाली, असें म्हणावयाचें. आतां, हे दोन्ही अभिप्राय दोन पासंगांत घालून, त्यांची यथातथ्य

मराठी ग्रंथ संग्रहालय



तुलना केली तर सर जोन्स यांचें पारडें सत्यन्यायप्रकाशनाच्या गुरुत्वामुळें अगदीं खालीं राहून, मेकालेचें पारडें कचऱ्याच्या मोलाचें असल्या कारणानें, तें तृणासारखें आकाशांत इतस्ततः परिभ्रमण करील, यांत बालाग्रही संशय नाहीं. सदरहू विद्वानांच्या विद्वत्तेचें खरें स्वरूप, आणि विचारनिरूपणशक्ती, हीं योग्य रीतीनें कळण्यासाठीं, त्यांच्याच उक्तींचें समग्र अवतरण या खालीं देतों.[१]

अविचारी पाश्चात्यांचा धृष्टपणा.

बरें, संस्कृत आणि आरबी भाषेची जी इतकी निर्भर्त्सना मेकॉलेनीं केली, ती त्या भाषांचें थोडेंबहुत ज्ञान स्वतःला असून त्यांनीं केली असती, तर तें

---

१ "I have never found one among the Orientalists themselves who could deny that a single shelf of a good European library was worth the whole native literature of India and Arabia !

"I certainly never met with any Orientalists who ventured to maintain that the Arabic and Sanskrit Poetry could be compared to that of the great European nation ! !

" I doubt whether the Sanskrit literature be as valuable as that of our Saxon and Norman progenitors.

सर वुइल्यम् जोन्स हे संस्कृत भाषेविषयीं असें लिहितात कीं:—

"It is of a wonderful structure more perfect than the Greek, more copious than the Latin, and more exquisitely refined than either."

( Asiatic Researches Vol. I P, 422. )

करणें त्यांस कांहीं तरी शोभलें असतें. परंतु तसा कांहींच प्रकार नाहीं. ह्या भाषांच्या संबंधानें, या राजश्रीचें ज्ञान पाहिलें तर अकटोपासून विकटोपर्यंत. तसेंच त्यांचा ह्यांस गंध देखील नसल्यामुळें, समजण्याच्या नांवानेंही आंवळ्या येवढें पूज्य. तेव्हां उघडच आहे कीं, सदरहू प्राच्य भाषांच्या निरुपयुक्ततेविषयीं जी कांहीं थोडी-बहुत माहिती आमच्या ह्या आंग्ल विद्वानास मिळाली ती स्वानुभव–सिद्ध नसून, दुसऱ्यांच्या-ओंजळीनें पाणी पिऊन प्राप्त झाली असल्यामुळें, त्यांनीं खरोखर मौनावलंबनच करणें अगदीं इष्ट होतें. परंतु मोठ्या खेदाची व परम आश्चर्याची गोष्ट ही कीं, हे पण्डित त्या भाषांचें स्वतःचें अज्ञान[१] सर्वथैव कबूल करीत असून देखील, ते तत्संबंधीं आपलें मत प्रसिद्ध करण्यास बिलकुल मागें पुढें सरत नाहींत. असें धाडस, असा विचार, आणि अशी धृष्ठता केवळ त्यांची त्यांसच शोभते.

१ "I have no knowledge of either Sanskrit or Arabic. But I have done what I could do from a correct estimate of their value. I have read translations of the most celebrated Arabic and Sanskrit works. I have conversed both here and at home with men distinguished by their proficiency in the eastern tongues. I am quite ready to take the Oriental learning at the valuation of the Orientalists themselves. ( Mînute on Education ).

किंबहुना, अशा एकमार्गी व धाडसी पाश्चात्यांचें हें ब्रीदच आहे असें म्हटलें तरी चालेल. **प्राच्यपण्डितांस** असलें कांहीं साधणें खरोखर कठिण, व तें त्यांस शोभलेंही नसतें.

हिंदु लेण्यांविषयीं, मिलचें बालिश मत.

मला असें वाटतें कीं, आम्हां **हिंदूंची** प्राचीन उन्नतावस्था, तसेंच **हिंदूराष्ट्राचें** पौराणत्व, आणि त्यांचें विद्याविशारदत्व, हीं कांहीं कांहीं **पाश्चिमात्यांस** बिलकुल सहन न होऊन, ते आपल्या मनाच्या विप्लुतावस्थेंत, कांहीं तरी अति निंद्य व दुराग्रहाची बडबड करून, जगांतील यच्चयावत् प्रजाजनसमूहास आपलें खरें स्वरूप दाखवितात. **मिलनीं** आपल्या **हिंदुस्थानच्या** इतिहासांत अशाच प्रकारची कांहीं विलक्षण कुतर्कशक्ति दाखविली आहे. आम्हां **हिंदूंचीं** प्राचीन **कोरींव-लेणीं** इतकीं प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय आहेत कीं, तीं पाहून जगांतील सर्व लोक तोंडांत बोटें घालतात. परंतु आमच्या

१ In his zeal to undervalue the cavern temples of the Hindus, he (Mr Mill) even insinuates that they are not artificial."

(Mill's British India. Wilson's notes.)

"A contempt for all that is Asiatic too often marks our countrymen in the east."

(Tod's Ràjasthàn Vol. I P. P.117/118)

ह्या गौरकाय गृहस्थांस सदरहू हिंदूंच्या कोरींव लेण्याची चमत्कृति असह्य होऊन, त्यांनीं बेलाशक असा सिद्धांत ठोकून दिला कीं, **हिंदूस्थानां**तील पुष्कळ लेणीं पाटवनिर्मित नसून स्वभावजन्यच आहेत. म्हणजे कांहीं लेणीं कदाचित् भूमींतून आपोआपच वर निघालीं असावीं.

तत्संबंधीं इतर पाश्चात्यांची टीका.

किंवा कांहीं अन्तरिक्षस्थ मेघजालांतून अकस्मात् खालीं कोसळून पडलेलीं असावीं. वा ! ! ! आहेत कनी जाडी विद्वान् !!! शाबासरे **मिल्ल** ! ! ! ह्याचें नांव काम. व हीच खरी **आं**ग्ल विद्वत्ता. यांच्या समजुतीप्रमाणें **मिसर** देशांतील भव्य व गगनचुंबी मनोरे देखील आकाशांतूनच खालीं पडले असावे, यांत संशय नाहीं. खरोखर, असलें विचारशून्य प्रतिपादन, विवेकी **पाश्चिमात्यांस** देखील, अगदीं नापसंत आहे.

---

१ "This laborious description of the architecture of the Hindu affords some curious specimens of the inveteracy of the author's prejudices. In his zeal to undervalue the cavern—temples of the Hindus, he even insinuates that they are not artificial. 'It is difficult to say how much of the wonderful in these excavations, may be the work of nature.' He seemed inclined, with Bryant, to think that it was not impossible that the pyramids had dropped from the clouds, or sprung out of the soil." ( Mill's British India. Wilson's notes ).

डयुगल्ड स्टयुवर्ट यांचें संस्कृतग्रंथसंपत्ति संबंधीं जिव्हाचापल्य.

**डयुगल्ड स्टयुवर्ट** नामक दुसरे एक पाश्चिमात्य शिरोमणी आहेत त्यांनीं तर आपल्या विद्वत्तेची, आणि गहनज्ञानाची, अगदीं कमालच करून सोडली. त्यांची तार्किकशक्ती, व विवादकुशलता, हीं पाहिलीं ह्मणजे तर कोणालाही हसूं आल्याशिवाय राहणारच नाहीं. हे गृहस्थ असें ह्मणतात कीं, सर्व **संस्कृत** भाषा, आणि त्यांतील अखिल **काव्य**भांडार, व गद्यपद्यात्मक नानाविध **शास्त्रोदधि**, हीं यच्चावत् **हिंदु** कवि, ग्रंथकार, व शास्त्रवेत्ते, यांच्या बुद्धिप्रभावानें मूळची किंवा यादृच्छिक झालेलीं नसून, तीं सर्व आह्मां **ब्राम्हणांची** पश्चात्‌ची कूट-रचना आहे. वाहवा ! ! ! काय नामी आणि सयुक्तिक कल्पना ही ! ! ! हिला मान डोलविल्याशिवाय कोणाच्यानेंही कसें राहवेल? कल्पना करा कीं, जो **वेद** अति पुराण असल्याविषयीं सर्व जगाची कबुली व संमती आहे; जी **संस्कृत** भाषा सर्वोत्तम असल्याविषयीं सर्व देशाचे नामांकित विद्वान् मोठ्या प्रेमानें मान डोलवितात, व सकौतुकाश्चर्य करतात; ज्या भाषेंतील नानाविध **शास्त्रोदधि** अपरंपार भरलेला असल्यामुळें, त्यांतच बुडून राहण्याविषयीं पाश्चिमात्य पंडित उत्कट लालसा दाखवितात; **ती संस्कृत विद्या** केवळ मिथ्यालेख असल्याबद्दल, अकटोपासून विकटो-

पर्यंत ज्यांचें अध्ययन, अशा डयुगल्ड स्टुवर्टनें[१] निमि-षार्धांत पीस फिरवून, तिच्या कुटिल रचनेविषयीं एका क्षणांत अजिबात ठराव करून टाकला. शाबास ! ! ! ह्याचें नांव तर्कशक्ति ! ! ! आणि यालाच ह्मणावें अनेक शास्त्र पारंगमत्व ! ! ! ही शैली, हा धृष्टपणा, व हें वाक्-पांडित्य आह्मां पौरस्त्यांस खचितच साधणार नाहीं.

भट्ट मोक्षमूलर यांनीं डयुगल्ड स्टुवर्ट याच्या मताचें केलेलें खंडण.

वरें, ही संस्कृत ग्रंथ संपत्ति[१] बनावटच असती तर, तिची वेदकालीन स्थिति व ऐतिहासिक परंपरा, तसेंच

---

१. "Dugald Steward, rather than admit a relationship between Hindus and Scots, would rather believe that the whole Sanskrit language and the whole of Sanskrit literature—mind, a literature extending over three thousand years and larger than the ancient literature of either Greece or Rome,—was a forgery of those wily priests, the Brahmans."

"I could identify still more of these Vedic rivers, such as, for instance, the Kubhâ, the Greek Cophen, the modern Kàbul river; but the names which I have traced from the Veda to Alexander, and in many cases from Alexander again to our own time seem to me sufficient to impress upon us the real and historical character of the Veda. Suppose the Veda were a forgery—suppose at least that it had been put together after the time of Alexander—how could we explain these names?"

(What can India teach us?)

नद्या, पर्वत, इत्यादि भूगोलविषयक स्थलें, आणि त्यांचीं नांवें, कालांतरानें पारदेशिकांनीं[1] तत्संबंधीं जे लेख लिहिले त्यांच्याशीं, बिलकुल मिळतीना. किंवा, परकीयांनीं समक्ष पाहिल्याची अथवा ऐकिल्याची, जी आमच्या देशाची व आमच्या लोकांची प्राचीन ऐतिहासिक माहिती दिली आहे, तिच्याशीं वेदग्रंथांतील हकीकतीचा मुकाबिला कोणत्याही प्रकारें पडतांना.

आणि उपलब्ध असलेल्या सामग्रींत जर सर्व प्रकारें साद्यंत मेळ मिळत आहे तर, **वेद, रामायण, महाभारत,** इत्यादि ऐतिहासिक लेख आहेत, असें मानल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. इतकेंच नाहीं तर, या **संस्कृत** महोदधीला कूटरचना[2] म्हणणें म्हणजे जाणून बुजून वेड्याचें सोंग घेणें होय.

---

१. शिकंदरची स्वारी भरतखंडावर झाल्यावेळीं, ग्रीक लोकांनीं लिहिलेली हकीकत.

२. They are names that have mostly a meaning in Sanskrit, they are names corresponding very closely to their Greek corruptions, as pronounced and written down by people who did not know Sanskrit. How is a forgery possible here?

* * * *

"Other conjectures have been made with even less foundation than that which would place the ancient poets of India under the influence of Babylon

पुढें चालू.

**हिंदुस्थानावर शिकंदर** बादशाची स्वारी इ. स. पूर्वी ३२७ व्या वर्षी झाली असून, ततूकालीन माहिती आणि त्या वेळची पाहिलेली हकीकत **ग्रीक** इतिहासकारांनीं आपापल्या लेखांत दिली आहे. हे **ग्रीक** लेख लिहिल्याला आज सुमारें दोन हजार दोनशें वर्षांवर होऊन गेलीं आहेत. आणि इतक्या विशाल मुदतीच्या पलीकडील कालांत, ज्यावेळीं दळणवळणाचें कोणतेंही साधन नव्हतें अशा वेळीं, कालक्रम व स्थाननिर्णय, यांजकडे विशेष लक्ष्य पुरवून, एकादें गोष्टीजाल रचण्याचें कोणी तरी साहस केलें असेल, किंवा कांहीं तरी निराधार कल्पना सामर्थ्य लढविलें असेल, असें बिलकुल संभवतच नाहीं. आणि ह्मणूनच आमचे **संस्कृत ग्रंथ मुळींच परप्रकाश पोषित नाहींत.**

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

China has been appealed to, nay even Persia, Parthia, and Bactria, countries beyond the reach of India at that early time of which we are here speaking, and probably not even then consolidated into independent nations or kingdoms. I only wonder that traces of the lost Jewish tribes have not been discovered in the Vedas, considering that Afghanistan has so often been pointed out as one of their favourite retreats."

१. "After having thus carefully examined all the traces of foreign influences that have been brought forward by various scholars, I think I may say that

पुढें चालू.

इ० स० पूर्वी ३२७ वर्षी, किंवा त्या सुमारास, इकडील माहितीविषयीं तिकडील लोकांनीं जे ग्रंथ लिहिले ते **ग्रीक** भाषेंत होते. यामुळें, भूगोल विषयक वगैरे जीं जीं नांवें **संस्कृतांत** प्रचारांत असलेलीं त्यांनीं टिपून ठेविलीं, त्यांचें अन्य भाषेंत **रूपांतर** होऊन, तीं तशा अपभ्रष्ट स्थितींतच दृष्टिगोचर होतात. उदाहरणार्थ, **कुभा** नदीचा **ग्रीक** भाषेंत **कोफेन** असा अपभ्रंश झाला, आणि त्याच नदीला हल्लीं **काबूल** असें म्हणतात.

आतां, अशा प्रकाच्या सत्यान्वेषणपराङ्मुख आणि

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

there really is no trace whatever of any foreign influence in the language, the religion, or the ceremonial of the ancient Vedic literature of India. As it stands before us now, so it has grown up, protected by the mountain ramparts in the North, the Indus and the Desert in the West, the Indus or what was called the Sea in the South, and the Ganges in the East. It presents us with a home-grown poetry and a home-grown religion ; and history has preserved to us at least this one relic, in order to teach us what the human mind can achieve if left to itself, surrounded by a scenery and by conditions of life that might have made man's life on earth a paradise, if man did not possess the strange art of turning even a paradise into a place of misery.

( What can India teach us ?
P. P. 28-173-174-139-140. )

पाश्चिमात्यांचें सत्य-मतावलंबन व दुराग्रही लोकांची फटफजिती.

दुराग्रही लोकांचें, पाश्चिमात्य राष्ट्रांत, जरी प्राचुर्य आहे तरी, त्यांतही मधून मधून **सत्यसूर्याचा** चकचकाट भासमान होतच असतो. यामुळें, त्याच्या तडाक्यांत जेव्हां अशा लोकांचें असत्य तमसानें ओतप्रोत भरलेले ग्रंथ सांपडतात, तेव्हां मात्र त्यांची त्रेधा होऊन चिंधड्यान् चिंधड्या उडतात. सबब सत्याचा **जय** होण्याच्या संबंधानें, ही एक मोठीच अभिनंदनीय गोष्ट मानली पाहिजे. ह्या मिथ्यावादी लोकांची पोकळ बडबड, वृथाजल्पना, आणि कटुतर जिव्हाचापल्य, हीं पाहून त्यांचेच बंधू गौरकाय सुद्धां, सोद्वेगान्तःकरण होत्साते, त्यांचा तिरस्कार व कंटाळा करतात. आणि कधीं कधीं तर निष्प्रांजल बुद्धीनें, व निःशंकपणें ते असेही उद्गार टाकतात कीं, **पौरस्त्य** राष्ट्रांवर इश्वरीकृपा असल्यामुळेंच तीं बुद्धीनें सतेज आहेत. आणि हें त्यांचें बुद्धिसामर्थ्य जरी पाश्चिमात्य राष्ट्रांत नाहीं तरी, ती उणीव, पाश्चिमात्य राष्ट्रांतील वृथाभिमान व मिथ्यादर्प, [1]यांच्या योगानें परिपूर्ण व चांगल्या रीतीनें भरून आली आहे. इतकेंच नाहीं तर, अखिल जगापेक्षां आपण ( पाश्चिमात्य लोक ) च कायते हुषार व शहाणे आहों, म्हणून जी कांहीं पाश्चिमात्यांस घमेंडी आहे, तिच्या निरंतर वासानें आणि

---

१ A contempt for all that is Asiatic too often

 पुढें चालू.

चिरकाल साहाय्यानें, त्यांचें (पाश्चिमात्यांचें) सर्व कांहीं न्यूनाधिक्य पुरें होत आहे. ह्याच दर्पोन्मादनिद्रावस्थेंत पाश्चिमात्य हे नेहेमीं चूर असून, ते मोठ्या आनंदांत दिवस घालवितात. तथापि, ही अवस्था जाऊन, तिकडील मिथ्यावादी व दुराग्रही लोकांस जेव्हां जागृदवस्था प्राप्त होते, तेव्हां मात्र त्यांस असें वाटतें कीं, आपली गर्वोक्ति व दर्प हीं वृथा असून, प्राच्य राष्ट्रेंच आपल्यापेक्षां यथान्याय श्रेष्ठतर आहेत. परंतु इतकें मात्र खचित समजावें कीं, अशा लोकांस हें खरें ज्ञान झाल्यावर ते दुःखगर्तातच पडल्यासारखे होऊन आपलें शांतिसौख्य सर्वस्वी नष्ट झालें, असें त्यांस निःसंशय वाटूं लागतें कारण, सर्वांत आपणच काय ते मोठे, व आपणांस स्वर्ग काय तो दोन बोटेंच उरला आहे, अशी नेहमींचीच त्यांची अज्ञानमूलक कल्पना असल्यामुळें, दुसऱ्यापेक्षां आपण कमी दर्जाला पोहोंचलों, ही कल्पना साहजिकच त्यांस अति दुःखद होते यांत नवल तें काय? अशा लोकांविषयीं सत्यप्रिय अशा श्वेतवर्ण बंधूंचा संताप केवळ यथान्याय आहे, असें कोणास वाटणार नाहीं? संपत्ति, ऐश्वर्य,

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

marks our Countrymen in the East; though at one period on record the taunt might have been reversed."

(Tod's Rajasthan p. p. 117-118 Vol. I.)

व सत्ता, यांच्या उन्मादानें कांहीं गौरकाय ( त्यांच्या स्वतःच्या ज्ञानाच्या संबंधानें आवळ्यायेवढें पूज्य असतांही ) दुसऱ्यास किंपदार्थ, व केवळ पशु आणि रानटी समजतात, ही गोष्ट किती आश्चर्याची व खेदकारक आहे बरें ? प्राच्य राष्ट्रांस केवळ मूर्ख समजून, ज्ञानाचें व सभ्यतेचें आपणच कायते भांडार, ह्मणून आपल्या भोंवतीं आपणच दिवा ओंवाळून घेणें, किंवा ज्या गोष्टीचा आज चार पांच हजार वर्षामागें हिंदूंस शोध लागला असून ज्याविषयीं त्या वेळेसच त्यांनीं भवतिनभवति केली होती अशी एखादी गोष्ट प्राच्य ग्रंथावलोकनामुळें, किंवा प्रसंगानुसार अकस्मात् अथवा दैवगत्या, पाश्चिमात्यांच्या सहज लक्षांत आल्या कारणानें त्यांनीं वृथाभिमान धरून, त्याबद्दलची आपली शेखी आपणच मिरवावी, हें किती असभ्यतेचें व दुष्टपणाचें आहे बरें ! आणि त्याबद्दल कोणा समंजस मनुष्यास खेद वाटणार नाहीं ?

वृथादर्पाचें कारण.

आतां, असा अयोग्य दर्प कां व्हावा, अशाबद्दल कार्यकारण हेतूंचा विचार केला तर असें खचित् दिसून येईल कीं, पृथ्वीवरील सर्व देशांतील पुरी माहिती, व चोहोंकडील यथार्थ ज्ञान नसल्यानें, असा अनर्थ होतो. उंबरांतल्या कीटकांप्रमाणें या अर्धवट विद्वानांस, किंवा ट, फ, करणारांस जो ज्ञानलव प्राप्त होतो, तो एकंदर त्रिभुवनांतील सर्वच ज्ञानोदधी आहे

अशी कल्पना करून त्या मदांतच ते उड्या मारतात, व मनःपूत मार्गानें संचार करतात. प्रसिद्ध कवि भर्तृहरीनें ह्मटलें आहे कीं:—

**यदाकिंचिज्ज्ञोऽहं द्विपइव मदान्धः समभवम्**
**तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।**
**यदाकिंचित्किंचिद्बुधजन सकाशादवगतम्**
**तदा मूर्खोस्मीति ज्वर इव मदोमेव्यपगतः ॥**

( नीतिशतक. )

वास्तविक पाहतां ज्ञानाचा मूळ झरा प्राची दिशेकडूनच निघून, प्राच्य देशांतून मार्गक्रमणा करीत करीत पुढें तो पश्चिम दिशेकडे वळला. त्यामुळें प्राच्य देशाची **आर्य**-भूमिका ज्ञानजलानें आतीषिक्त झाल्यावर, तिकडूनच थोडा थोडा प्रसाद **यहुदी, पारसीक, मिश्र,** आणि **ग्रीक** लोकांस, व त्यांजकडून क्रमाक्रमानें **रोमन्** लोकांस प्राप्त झाला. तदनंतर **रोमचें** साम्राज्य रसातळास गेल्यावर **युरोपखंडांत** जिकडे तिकडे अज्ञानांधकारच पसरला. त्या वेळीं **अरबी** लोकांनीं त्या खंडांत चोहोंकडे विजय-ध्वज लाविला, आणि सर्वत्र ज्ञानाचा पुनश्च प्रसार केला. आतां, **अरबी** लोकांस देखील **आर्य** लोकांकडूनच ज्ञान-भांडार मिळालें होतें. व ही गोष्ट इतिहासावलोकनानें खरीही ठरते. त्यामुळें आम्हां **आर्यां**पासूनच इतर सर्व राष्ट्रांस ज्ञानामृत प्राप्त झालें, असें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

प्रसिद्ध इतिहासकार आँकले यांचा श्वेतबंधू-विषयीं अभिप्राय.

याबद्दल आँकले नामक इतिहासकारानें थोडक्यांत चांगलें वर्णन दिलें आहे. मुसलमान् लोकांचा इतिहास लिहीत असतां ते असें ह्मणतात कीं:—

"If providence hath removed us to a greater distance from the influence of those genial rays which ripen the wits of the eastern nations, it hath made us abundant amends, by indulging us in this conceit, that we are wiser than all the rest of the world besides.

"There are some sorts of pleasing madness of which it would be cruelty to cure a man. By bringing him to his senses you make him miserable.

"You will ask me, perhaps, what is the meaning of all this? why, in good truth, the meaning of it is, a just indignation against the impertinence of those who imagine that they know everything, when in reality they know nothing.

"And, to be more particular, the folly of the Westerns in despising the wisdom of the eastern nations and looking upon them as brutes and barbarians whilst we arrogate to ourselves everything that is wise and polite; and if we chance to light upon a just thought we applaud ourselves upon the discovery though it was better understood three thousand years ago.!

"This happens to us through want of good reading and a true way of thinking; for the Case is this, that little smothering of knowledge what we have is entirely derived from the east. They first

communicated it to the Greeks ( a vain, concieted people, who never penetrated the depths of oriental wisdom ) ; from whom the Romans had theirs. And after barbarity had spread itself over the western world, the Arabians, by their conquests, restored it again in Europe. And it is the wildest conciet that can be imagined, for us to suppose that we have greater geniuses, or greater application, than is to be found in those Countries. "

( Ockleys' History of the Saracens. )

गोषवारा.

असो. दुराग्रही लोकांच्या वेड्या समजुतींचा व क्लिष्ट कल्पनांचा भयंकर आणि दुष्ट परिणाम वाचकांच्या हृत्पटिकेवर यत्किंचित्ही होऊं नये एतदर्थ, जरा खोल पाण्यांत शिरून खंडनमंडनादि क्रियेचा यथावकाश अंगिकार करणें केवळ भागच पडलें. तथापि, यथाशक्ति, ही जी कांहीं थोडीबहुत देशसेवा केली आहे तितक्यानें थोडेंबहुत तरी खऱ्या मार्गाचें दिग्दर्शन झालें असेल अशा समजुतीनें, प्रस्तुत विषय, ह्मणजे **वेदाच्या** पौराणत्वाबद्दल नाक्षत्रिक प्रमाण, याचें विवेचन करण्याकडे वळतों.

नाक्षत्रिक प्रमाणानें वेदाच्या कालाची सिद्धता.

आतां, **वेदकाला**चा नाक्षत्रिक प्रमाणानें अगदीं निश्चयात्मक रीतीनें निर्णय होणें जरी अशक्य आहे, तरी त्याविषयीं कांहीं अटकळ करण्याचें यथार्थ साधन आपणास उपलब्ध आहे; त्यावरून गणित करून तो

पुराणकाळ काढतां येतो. हें साधन म्हटलें म्हणजे संपात बिंदूंचें चलन होय. ह्या चलनाचें दिग्दर्शन ज्योतिष म्हणून जें एक वेदांग आहे त्यांत केलेलें आढळतें, व त्या काळीं सूर्य कोणत्या अयनांशावर होता हेंही सांपडतें. हा ज्योतिषग्रंथ **लगध** नामक ऋषीनें केलेला असून त्यांत त्यानें आपल्या वेळेचीं अयनवृत्तांचीं संपातस्थलें सांगितलेलीं आहेत. त्यावरून असें सिद्ध होतें कीं त्या वेळच्या आणि सांप्रतच्या संपात बिंदूंत तेवीस अंशाचें अंतर पडलें आहे. संपात बिंदू म्हणजे विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांचा ज्यांत परस्पर छेद होतो ते दोन बिंदू होत. यांस तीस अंश क्रमण्यास अजमासें दोन हजार वर्षें लागतात; आणि हे प्रतिवर्षास मागेंच सरकत असतात. त्यावरून गणित केल्यानें असें समजतें कीं, ह्या **लगध** ऋषींच्या ज्योतिषग्रंथाचा काळ ११८१ अक्राशे—एक्यांशी वर्षें ख्रिस्ती शकापूर्वीं होय. आणि म्हणूनच असा सिद्धांत ठरतो कीं, जर **वेदांगा**सच आजमित्तीस सुमारें तीन हजारावर वर्षें होऊन गेलीं आहेत, तर आमचे आदि **वेद** निर्माण झाल्याला १०,००० दहा हजारावर वर्षें झालीं असावीं, असें पूर्वीं दिलेल्या प्रमाणावरून विशेष खात्रीपूर्वक वाटतें.

**मार्टिन्**हौ म्हणून एक विख्यात **संस्कृत** पंडित होऊन गेला. त्याच्या मतें वेदाचा काल इ० स० पूर्वीं दोन

मार्टिनह्वॉचें वेदकालाविषयीं मत.

हजार[1] वर्षें होय. ह्या गृहस्थानें ऐतरेय ब्राह्मणावर एक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे. ह्याला सुमारें पंधरा वीस भाषा येत असून, त्यास इतिहासाचें ज्ञान फारच चांगलें होतें. हा हिंदूंच्या कर्ममार्गाचा इतका षोकी होता कीं, त्यानें आपल्या बंगल्यांत एक यज्ञही करविला होता.

असो. येणेंप्रमाणें वेद पौराणत्व नाक्षत्रिक प्रमाणांनीं निर्वेध सिद्ध झाल्यावरून, आतां २ बाह्य व ३ भूगोलशास्त्र विषयक प्रमाणांनीं, त्याची कितपत शाविती होते याविषयीं विचार करूं.

बाह्य व भूगोलविषयक प्रमाण.

ऋग्वेदांतिल अगदीं प्रथमच्या ऋचांवरून हिंदुलोक काबुलांतील कुभानदी, वायव्यप्रांत, आणि पंजाब, या प्रदेशांत पसरलेले अस-

---

१. हा वेदकालाचा उत्तरार्ध समजला पाहिजे.

वेदकालाचा पूर्वार्ध, इसवी सनापूर्वी, दहा हजार वर्षांपासून समजला पाहिजे.

"Thus the Rigveda, the most ancient work that exists in any language known at present, must have been composed between 6,000 and 4,000 B. C."

"The period from 10,000 to 6,000 B. C. is also not too much for the development of that primitive Aryan language which afterwards blossomed in the Rigveda hymns and branched off in several dialects such as Greek, Zend and Sanskrit."

त्याचें दिसतें. त्यानंतर क्रमाक्रमानें त्यांनीं **सरस्वति नदीच्या** पलीकडे जाऊन, थेट **गंगा** (ह्मणजे **भागीरथी**) नदीपर्यंतचा प्रदेश काबीज करून तो व्याप्त केल्याचें, त्या पुढील **वेद** ऋचांवरून उघड होतें. तदनंतर कालवशात **विंध्याद्री** ओलांडून हे लोक सरकत सरकत **सह्याद्री**नजीक येऊन ठेपले. येथील प्रांत अति विशाल आणि अरण्यमय असून त्यांत भील, किरात, वगैरे मूळच्या राहणाऱ्या रानटी लोकांची वस्ती होती. हे लोक फारच क्रूर व भयंकर असून, त्यांच्या एकंदर स्थितीचा विचार केला तर ते पशुतुल्यावस्थेंतच होते, असें ह्मटलें तरी चालेल. अशां प्रकारच्या सर्व लोकांस पराजित करून **दंडिकारण्यासारखीं** भयानक वनें, व ओसाड आणि निर्जन प्रदेश, त्यांनीं एकामागूनएक हस्तगत केले. पुढें **सह्याद्रि** व **पूर्वघाट** या पर्वतद्वयांची दक्षिण सरहद्द जो उच्च **नीलगिरी**, तो शनैः शैन परंतु दृढनिश्चयानें उत्क्रमून, आमचे अतिपुराण काळचे **हिंदुलोक** आपली **विजयध्वजपताका** फडकावीत फडकावीत, थेट **कन्याकुमारीका** टोंकापर्यंत येऊन पोहोंचले.

रामचंद्राचें साम्राज्य.

तदनंतर **हिमालयापासून** तो तहत् **सिंहलद्वीपापर्यंत**, अखिल **भरत खंडांत** व त्याच्याही पलीकडे आपलेंच **साम्राज्य** स्थापन करण्याच्या महत्वाकांक्षेनें, प्रचंड **हिंदी महासागर** व अति पवित्र

**सेतुबंध रामेश्वर** उल्लंघून, त्यांनीं आपला तळ सुप्रसिद्ध **रावण नगरींत** (लंकेंत) च दिला; आणि तेथील बलाढ्य **लंकाधिपतीस** पदच्युत करून, अखेर आपलेंच प्रभुत्व व एकछत्रीराज्य स्थापन केलें. अशा प्रकारचें अति साहसाचें व दीर्घ प्रयत्नाचें काम **हिंदुलोकांनीं** हातीं घेऊन शेवटास नेलें. ह्यांत त्यांची एकनिष्ठा व चित्तासक्ति, धैर्य व उद्यम सातत्य, पराक्रमशीलता आणि स्वावलंबन, हीं उत्तम रीतीनें व्यक्त होतात.

युधिष्ठिराचें साम्राज्य.

हें **हिंदुसाम्राज्य** बराच कालपर्यंत चालल्यावर, शेंकडों वर्षांनंतर, त्याच्या विभागाबद्दल दैवदुर्विपाकानें आपसांत मोठीच यादवी सुरू झाली. एक पक्षाला **धृतराष्ट्राचे दुर्योधनादि** शतपुत्र असून, प्रतिपक्षाकडे **युधिष्ठिरादि** पंचकडी होती. पहिल्या पक्षाला **कौरव** अशी संज्ञा असून दुसऱ्या पक्षांत **पांडव**, आणि त्यांचे अनुयायी होते. या पक्षद्वयांत शेवटीं मोठें तुमुल युद्ध होऊन, जयश्रीनें अखेर पंच **पांडवांच्या** गळ्यांतच माळ घातली. त्यामुळें सर्वांत वडील या नात्यानें **धर्मासच** राज्यपद प्राप्त झालें. त्यानंतर **ब्राह्मणी धर्म**

ब्राम्हणी धर्माचा सर्वत्र प्रसार.

सर्व **हिंदुस्थानभर** मोठ्या झपाट्यानें पसरला. आणि **हिंदूंच्या राजकीय** व **धर्म साम्राज्याचा** पूर्ण ठसा **हिमालयापासून** तों तहत् **सिंहलद्वीपापर्यंत** जिकडे तिकडे

चिरकाल राही असा उमटला. कल्पना करा कीं, येवढी मोठी घडामोड होण्याला हजारों वर्षें गेलीं असलीं पाहिजेत!!! प्रथमतः या देशांत आपली स्थिति चिरकाल राही अशाविषयीं हिंदूंचा प्रयत्न; तदनंतर अधिवासित देशाचा शनैः शनैः संप्रसार; त्यांच्या प्राथमिक अवस्थेंत त्यांच्या मनांतील नैसर्गिक उद्गार; त्यांची काव्यरचना, धर्मरचना, व सामाजिक रचना; त्यांचा बुद्धिप्रभाव व त्याचा समाजावर एकंदर परिणाम; त्यांच्या मनोविकासाचें क्रमाक्रमानें स्थित्यंतर; त्या मनोविकाराची नूतन म्हणजे बाल्यावस्था, तारुण्यदशा, आणि वृद्धावस्था म्हणजे ती पूर्ण स्थितीप्रत पोहोंचण्याचा काल; तदनंतर प्राप्त झालेली विकास वैचित्र्याची पूर्णावस्था; त्यांची पराक्रमशीलता व महत्त्वाकांक्षा, आणि ती सफल होण्याविषयीं त्यांचे अश्रांत श्रम व दीर्घोद्योग; ह्या सर्व गोष्टी मनांत आणिल्या म्हणजे, येवढा अफाट देश पादाक्रांत करून त्यांतील रानटी आणि बलवान् लोकांवर आपली एकछत्रीसत्ता बसविण्याला, तसेंच एका टोंकापासून तों तहत दुसऱ्या टोंकापर्यंत राजकीय व ब्राह्मण धर्माचें **अप्रतिहत साम्राज्य** स्थापन करण्याला, अनेक शतकें लोटलीं असावींत, यांत यत्किंचितही शंका नाहीं.

या वेळच्या स्थितींत, दुसरी एक महत्वाची आणि विचार करण्यासारखी गोष्ट मनांत आणिली पाहिजे. ती

वेदकालीन मनाची बाल्यावस्था.

प्रथम उद्दाम असून, ती अगदीं बाल्यावस्थेंतच होती असें म्हटलें तरी चालेल. त्यावेळीं, प्रथम त्यांच्या मनावर बाह्यसृष्टिचमत्कृतीचा संस्कार होऊन, पृथिवी, आप, तेज, वायु, आणि आकाश, या पंचतत्वांनीं त्यांच्या चित्तवृत्तीवर आपला भरपूर अम्मल बसविला. त्यामुळें त्या सर्व तत्वांस देवता कल्पून, आपलें सर्वस्वी पोषण आणि सर्वतोपरी सांभाळ करणारे, व यथाकालीं इच्छित मनोरथ पूर्ण करणारे, हेच लोकपाल आहेत असें समजून त्यांनीं त्यांचा मनोभावानें व अति प्रेमपूर्वक धांवा केला; आणि जी जी उणीव त्यांस भासूं लागली ती ती पुरी पाडण्याविषयीं त्यांनीं उचित काळीं त्यांची यथामति प्रार्थनाही केली. ह्या अवस्थेंत सर्व तत्वांच्या शक्तीचें त्यांस पूर्ण रीतीनें आकलन झालेलें नसल्यामुळें, जी जी पृथक्शक्ति भिन्न भिन्न काळीं भासमान झाली, ती ती सर्वथैव श्रेष्ठ आहे असें त्यांनीं त्या त्या वेळीं मानिलें. तदनंतर कालगतीनें अकरा भूदेवता, अकरा स्वर्देवता, व अकरा आकाशदेवता अशा त्यांनीं कल्पिल्या; परंतु तेवढ्यांनींही पूर्तता न होऊन त्यांची संख्या पुढें पुढें इतकी वाढत गेली कीं, ती तीन हजार तिनशें एकूणचाळीसपर्यंत येऊन पोहोंचली.

याप्रमाणें बराच कालपर्यंत अनेक देवताश्रेष्ठत्व

वेदकालीन मनाची युवावस्था, किंवा पूर्वार्ध.

प्रचारांत होतें. परंतु कालगतीनें ही मनाची बाल्यदशा जाऊन त्याला तरुणावस्था प्राप्त झाली. त्यामुळें दिवसानुदिवस बुद्धि जास्त प्रगल्भ होऊन मनाची विचारशक्ती जास्त वाढत चालली. अशा स्थितींत अनेक देवताप्रभुत्व विलयास गेलें, व एकंदर देवता समुदायाच्या तीन कोटी ठरविण्यांत आल्या; **१ भूदेवता, २ आकाशदेवता,** आणि **३ स्वर्देवता.** ह्या व्यवस्थेनें अनेक देवतांचें एकीकरण होऊन प्रत्येक देवतेचा सदरहू तीनपैकीं कोणत्या तरी एका कोटींत समावेश करण्यास उत्तम साधन मिळालें. या कारणानें प्रथमावस्थेंत उत्पन्न झालेल्या विचारांचा व कल्पनांचा बालिशपणा जाऊन, त्यांस गांभीर्य व तीव्रता पुष्कळ अंशीं प्राप्त झाली. ह्या दशेंतही बराच काळ लोटला असावा. तदनंतर सदरहू दोन्ही प्रकारच्या स्थितींत म्हणजे मनाच्या बाल्ययुवावस्थेंत, विचारशक्तीनें आणि स्थिर अभ्यासानें त्या मनास उत्तम प्रकारचें शिक्षण मिळालें. शिवाय त्या प्रत्येक अवस्थेंत झालेल्या स्थित्यंतराचाही चांगला अनुभव क्रमशः प्राप्त झाला.

वेदकालीन मनाची वृद्धावस्था, किंवा उत्तरार्ध.

त्यामुळें, हें पूर्वार्ध लोटून उत्तरार्धांत मनाचा शिरकाव होतांच, त्याची विचारसरणी शनैः शनैः विकास पावत गेली; आणि मनोभास्कराचा पूर्ण उदय होण्यास

उत्कृष्ट संधि सांपडली, व पुष्कळ अवकाशही मिळाला. त्यायोगानें सार कोणतें व असार कोणतें, ग्राह्य कोणतें व त्याज्य कोणतें, नित्य कोणतें व अनित्य कोणतें, इत्यादि गोष्टींचा व कार्याकारणभावाचा पूर्ण ठसा त्यांच्या मनावर बिंबत गेला. तेव्हां अर्थात्च अनेक देवतासमूह, किंवा पंचमहाभूतें, अथवा देवता वर्गत्रय, यांची स्वतंत्र शक्ति नसून त्या सर्वांचें **आदिकारण** निराळेंच आहे, व तेंच सर्वत्र भासमान होतें असें त्यांस वाटूं लागलें. हें **आदिकारण**च सर्व शक्तिमान् असून, भासमान होणारी यच्चावत् वस्तु त्याचेंच **विराट्स्वरूप** आहे, आणि हीं **पंचमहाभूतें** देखील त्याचेच केवळ गुलाम व बंदे नोकर आहेत. तेंच **आदिकारण** उत्पत्ति, स्थिति, व लय, या अवस्थात्रयांचें नियामक असून त्याच्या सत्तेशिवाय आणि आज्ञेखेरीज झाडाचें पानही हालत नाहीं, अशी आमच्या पूर्वजांची हळूं हळूं पूर्ण खात्री झाली, व त्याच **आदिकारणा**च्या विलक्षण शक्तिप्रभावावर त्यांची अचल श्रद्धा बसली. ह्या श्रद्धेचें तथ्यस्वरूप,

सर्व वस्तूंच्या अनादिसिद्ध अशा एक कारणाविषयीं आर्यांची अचल श्रद्धा.

**भीषास्माद्वातः पवते । भीषोदयति सूर्यः ।**
**भीषास्मादग्निश्चेन्द्रश्च । मृत्युर्धावतिपंचमइति ।**

ह्या उपनिषदांतील महावाक्यांत चांगलें प्रतिबिंबित होतें.

ह्याप्रमाणें, इतक्या पूर्णतेप्रत मन पावण्याला संवत्सराचीं किती शतकें सर्वभक्षी काळाच्या जबड्यांत

१ "And while the claims of the written Records of Indian literature to a high antiquity—its beginnings may perhaps be traced back even to the time when the Indo—Aryans still dwelt together with the Persa Aryans—are thus indisputably proved by external, geographical testimony, the internal evidence in the same direction which may be gathered from their contents, is no less conclusive. In the songs of the Rik, the robust spirit of the people gives expression to the feeling of its relation to nature, with a spontaneous freshness and simplicity; the powers of nature are worshipped as superior beings, and their kindly aid besought within their several spheres. Beginnings with this nature-worship which everywhere recognises only the individual, phenomena of nature, and those in the first instance as superhuman we trace in Indian literature the progress ot the Hindu people through almost all the phases of religious development through which the human mind generally has passed. * * * *

The number—already considerable—of these natural duties, these regents of the powers of nature, is further increased by the addition of abstractions, taken from ethical relations; and to these as to the other duties divine powers, personal existence, and activity are ascribed. Into this multitude of divine figures, the spirit of enquiry seeks at a later stage to

पुढें चालू.

गेलीं पाहिजेत, हें विशेष रीतीनें सांगण्याची जरुरी नाहीं. आयतें ज्ञानाचें भांडार प्राप्त झालें तरी देखील, तें ग्रहण करण्यास मनाची तयारी होऊन तें

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

introduce order, by classifying and co-ordinating them according to their principal bearings."

"The principle followed in this distribution is, like the conception of the dieties themselves, entirely borrowed from the contemplation of nature. We have the gods who act in the heavens, in the air, upon the earth; and of these the sun, the wind, and fire are recognised as the main representatives and rulers respectively. These three gradually obtain presidence over all the other gods, who are only looked upon as their creatures and servants. Strengthened by these classifications, speculation presses on and seeks to establish the relative position of these three dieties, and to arrive at unity for the supreme Being. This is accomplished either speculatively, by actually assuming such a supreme and purely absolute Being, viz. "Brahman" (neut), to whom these three in their turn stand in the relation of creatures, of servants only; or arbitrarily, according as one or other of the three is worshipped as the supreme god." * * * *

(The History of Indian literature by Pr. Weber. P. P. 3/6.)

पुढें चालू.

उन्नतावस्थेप्रत पोहोंचण्यास शतकेंच्या शतकें लोटतात. मग त्या वेदकालीन हिंदूची तर मूळपासूनच स्वपराक्रमार्जित सिद्धी, व स्वकष्टार्जित साधन असल्यानें, त्यांस अशी कुशाग्रबुद्धी, व ही मनाची उन्नतावस्था प्राप्त होण्याला हजारों वर्षें लागलीं असतील यांत नवलतें काय ??? तेव्हां आभ्यंतरीच्या प्रमाणानें देखील वेदपौराणत्व सिद्ध झाल्यावांचून राहत नाहीं, हें उघड आहे.

आतां, एकंदर सर्व प्रमाणांनीं वेदपौराणत्व व संस्कृत विद्येचें प्राचीनत्व इतकें दृढतर आणि निर्विवाद सिद्ध होतें कीं, प्रोफेसर वेबर सारख्या अति तीक्ष्ण गुणदोष-विवेचकानें देखील तें निष्प्रांजलपणें कबूल केलें आहे.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

१ "The reasons, however, by which we are fully justified in regarding the literature of India as the most ancient literature of which written records on an extensive scale have been handed down to us, are these :—

In the more ancient parts of the Rig-veda-samhita, we find the Indian race settled on the north western borders of India, in the Panjab, and even beyond the Panjab, on the Kubha * * in Kabul. The gradual spread of the race from these seats towards the east, beyond the Saraswati and over Hindustan as far as the river Ganges, can be traced

पुढें चालू.

आतां, अध्यात्मविद्येंत आमच्या हिंदुलोकांचे इतके गहन विचार होते कीं, ह्या जगताचें आदिकारण काय असावें अशाविषयीं त्यांचा तीव्र कोटिक्रम[१], कुशाग्र बुद्धिवाद, आणि अती

अध्यात्मविद्येंत हिंदूंचा पुरातन शोध.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

in the later portions of the Vedic writings almost step by step. The writings of the following period, that of the epic, consist of accounts of the internal conflits among the conquerors of the Hindustan themselves, as, for instance, the Maha Bharata ; or of the farther spread of Brahmanism towards the south, as, for instance, the Râmâyana. If we connect with this the first fairly accurate information about India which we have from a Greek source viz, from Megastenes, ( who as ambassador of Seleucus resided for some time at the Court of Chandragupta ), it becomes clear that at the time of this writer the Brahmanising of Hindustan was already completed, while at the time of the Periplus * * the very southermost point of the Dekkan had already become a seat of the worship of the wife of Siva. what a series of years of Centuries must necessarily have elapsed before this boundless tract of country, inhabited by wild and vigorous tribes, could have been brought over to Brahmanism ! !

१ Several hymns of a speculative purport in the last book of the Rig-samhita testify to a great depth

पुढें चालू.

सुक्ष्म विवेचनपद्धति, हीं पाहून कोणालाही आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. व ह्या **अध्यात्मविद्येचा** व्यासंग त्यांनीं इतक्या पुरातन काळीं केला होता कीं,

त्या वेळीं इतर राष्ट्रांची गाढ निद्रा, व

त्या वेळेस या भूतलावरील इतर सुधारलेलीं राष्ट्रें केवळ गाढ निद्रावस्थेंतच होतीं. **मिसरदेश** तर बाल्यावस्थेंतच असून त्याचे भव्य, विशाळ, विस्मयकारक, आणि गगनचुंबी मनोरे, अजून अस्तित्वांतही आले नव्हते. **यूरोपांतील** पत्तनशिरोमणि **आथेन्स**, व **रोम**, यांचा तर जन्म देखील झाला नव्हता. अशा वेळीं, आमची **दयितभूमिका**, ( प्राचीन **भरतखंड**, व अर्वाचीन **हिंदुस्थान** हें ), सर्व शास्त्राचें विश्रांतिस्थान,

हिंदुस्थानचें ऐश्वर्य, आणि मानसिक उन्नति.

निगमविद्येचें माहेर घर, आणि ऐहिक सुखाचें केवळ इंद्रभुवन, होऊन राहिली. जिकडे तिकडे उद्यमशील लोकांनीं केलेल्या प्रय-

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

and concentration of reflection upon the fundamental cause of things, necessarily implying a long period of philosophical research in a preceding age. This is borne out by the old renown of Indian wisdom, by the reports of the companions of Alexander as to the Indian gymnasophist's &c. "

( The History of Indian literature. By Professor Weber. P. 27. )

त्नाचें फल सहजींच दिसत होतें. शस्यसंग्रहाची उद्दाम श्री सर्वत्र भासत होती. निपुण शिल्पकारांनीं आपलें सर्व चातुर्य खर्चून तयार केलेलीं अप्रतीम वस्त्रें आणि सुंदर तंतुपट, आबालवृद्ध वापरीत होते. **सुतार** वर्गाचें अलौकिक चातुर्य सर्वत्र दिसत होतें. वस्तुनिर्माण कौशल्य चोहोंकडे भासमान होत होतें. गवंड्यांनीं देखील आपलें अनुपम्य सामर्थ्य यथावकाश दाखविण्यांत कसर केलेली नव्हती. **चक्रवर्ती, मांडलिक प्रभु**, व **आर्यवर्ग** हे आपल्या ऐश्वर्याप्रमाणें **इंद्रभुवना**सारख्या विशाल, भव्य, उज्ज्वल, आणि रमणीय मंदिरांत राहून नानाप्रकारचे विलास भोगीत होते. तसेंच, अशा पराक्रमशील चक्रवर्ती राजांचे व उदार पुरुषांचे पवाडे गाण्यास, आणि सुकीर्तीच्या दुंदुभीची गर्जना करण्यास, कविसमुदायांचीही रेलचेल होती. तत्ववेत्यांची देखील इकडे उणीव नव्हती. तथापि, ते उत्क्रांतीच्या पूर्णावस्थेंत असल्यामुळें सृष्टींतील सर्व वैभव व ऐश्वर्य नश्वर समजून, ते अरण्यांत चित्तैकाग्रता करीत, व एकांत वासांत राहत असत.

संस्कृत विद्येचा उपयोग.

बरें, ही **निगमविद्या**, हा **शास्त्रोदधि**, व हें **अनेककला वैचित्र्य**, अशीं केवळ कर्णपरंपराच नव्हतीं. तर तीं सर्व प्रत्यक्ष भासमान असून, उपलब्ध असलेल्या

सर्व ग्रंथसमूहाचें त्यांत उत्तम रीतीनें संरक्षण केलेलें आढळतें. यामुळें त्यांचा आज मित्तीसही इतिहासकारांस, भाषातत्वज्ञांस, आणि तत्ववेत्यांस मोठाच उपयोग होतो.

हिंदु लोकांविषयीं थार्न्टन इतिहासकाराचें मत.

हिंदुस्थानच्या लोकांविषयीं थॉर्न्टन् हा हिंदुस्थानचा इतिहास लिहित असतांना असें ह्मणतो कीं:—

"Ere yet the Pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization, housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and grandeur. A busy population had covered the land

---

१. * * * "At the same time the attention of the historian the philo-logist and the philosopher was roused to the fact that a complete literature had been preserved in India, which promised to open a new leaf in the ancient history of mankind," and deserved to become the object of serious study."

"No one who wishes to acquire a thorough knowledge of these or any other of the Indo-European languages, no one who desires to study the history of that branch of mankind to which we ourselves belong, and to discover in it the first germs of the language and mythology of our fore-fathers—can for the future dispense with some knowledge of the language and ancient literature of India."

(Muller's Sanskrit literature.)

with marks of its industry ; rich crops of the most coveted productions of Nature annually rewarded the toil of the husbandman ; skilful artizans converted the rude produce of the soil into fabrics of unrivalled delicacy and beauty, and architects and sculptors joined in contributing works, the solidity of which has not in some instances been overcome by the revolution of thousands of years. The princes and nobles of India, unlike the wandering chieftains of the neighbouring countries, already dwelt in splendid places,and clothed in the gorgeous products of its looms, and glittering with gold and gems, indulged a corresponding luxury in every act and habit of their lives. Poets were not wanting to celebrate the exploits of their ancestors, nor philosophers to tread the mazes of metaphysical inquiry and weave the net of ingenious speculation, with as much subtlety, and perhaps with not less success, than has attended the researches of subsequent inquiries."

(Thornton's History fo India.)

तात्पर्यार्थ.

ह्यावरून युरोपखंडांत अत्यंत पुरातन मानलेलीं जीं ग्रीक व रोमन राष्ट्रें त्यांहून, किंबहुना त्यांसही पूज्य होऊन गेलेलें असें जें मिसरदेशचें फार प्राचीन राष्ट्र, त्यापेक्षांही

आमचे हिंदुलोक व त्यांचे संस्कृत ग्रंथसमूह अतिपुरातन आहेत असें उघड होतें. आणि आतां दिवसानुदिवस, सर्व देशांतील संस्कृतज्ञांची अशी बालंबाल खात्री होत चालली आहे कीं, वेदांइतका पुराण ग्रंथ पृथिवीच्या पाठीवर दुसरीकडे कोठेंही नाहीं.

वेदांचा ऐतिहासिक दृष्टीनें अमूल्य उपयोग.

आतां वेदांचा कसा व किती उपयोग आहे याविषयीं थोडा विचार करूं. एकतर खुद्द आम्हांसच त्या वेदरूपी इतिहासाचा अमूल्य उपयोग आहे. आणि दुसरें असें कीं, जितक्या अंशानें आम्हांस त्या अतिप्राचीन इतिहासाचा उपयोग आहे, तितक्याच अंशानें अखिल जगासही त्याचा अवर्णनीय उपयोग आहे. कारण कीं, सर्व जगांत वेद हेच अति पुराण लेख असल्यामुळें, मानवी कुटुंबाच्या मूलस्थितींतील अथपासून इतिपर्यंतची समग्र माहिती उपलब्ध होण्यास दुसरें कोणतेंही साधन नाहीं, अथवा अन्य कोणताही मार्ग नाहीं. सर्वांचें आदिमूलच वेद असल्यामुळें, मनुष्यमात्राचे प्रथमावस्थेंतील मनोधर्म यावरूनच समजतात. त्यांचे आचारविचार यावरूनच कळतात. आणि त्यांचे परस्पर व्यवहार, व त्यांचें परिशीलन, यांचें समर्पक ज्ञान यावरूनच होतें. इतकेंच नाहीं तर, ते आज हजारों वर्षांमागें कसें बोलत चालत होते, व कसे वागत होते, याचें प्रत्यक्ष चित्रच

आपल्या डोळ्यापुढें उभें राहतें. ह्या सर्वमान्य वेदांच्या उपयुक्ततेविषयीं लिहित असतां, विद्वन्मणि प्रोफेसर मोक्षमूलर असें म्हणतात कीं:—

"The Veda has a two-fold interest: It belongs to the history of the world and to the history of India. In the history of the world the Veda fills a gap which no literary work in any other language could fill. It carries us back to times of which we have no records any where, and gives us the very words of a generation of men, of whom otherwise we could form but the vaguest estimate by means of conjectures and inferences. As long as man continues to take an interest in the history of his race, and as long as we collect in libraries and museums the relics of former ages, the first place in that row of books which contains the records of the Aryan branch of mankind, will belong for ever to the Rig-Veda."

(Ancient Sanskrit Literature.)

चारवेद.

याप्रमाणें अखिल जगाच्या इतिहासांत आदिकाव्य वेदच आहेत असें सिद्धवत ठरल्यामुळें, आतां त्या वेदांविषयीं थोडक्यांत विवरण करूं. एकंदर वेद चार आहेत. १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद, आणि ४ अथर्व वेद. या प्रत्येकाचे कर्ते १ पैल, २ वैशंपायन, ३ जैमिनि,

आणि ४ **सुमंतु**, असे यथानुक्रमानें असल्याचे पुराणांतरीं वर्णन आहे. प्रत्येक **वेदांत संहिता, ब्राह्मण, आरण्यकें,** आणि **सूत्रें**, अशीं असतात. **संहिता** ह्मणजे मूळ वेदमंत्र. **ब्राह्मण** ह्मणजे त्यांवर टीकारूप व्याख्यान. **आरण्यकें** ह्मणजे उपनिषदादि भाग. आणि **सूत्रें** ह्मणजे वर्णाश्रम धर्माचें विवेचन होय.

प्रत्येकवेदाची संहिता.

प्रत्येक **वेदाची संहिता** अगदीं निराळी असून तिचे पुनः पदें, क्रम, जटा, घन, रेखा, शिखा, असे अनेक प्रकार सुरू झालेले आढळतात. **संहिता** ह्मणजे मूळ संहित स्थितींत असलेला वेदमंत्रच असून, त्यांचे जे पदविभाग तीं पदें होत. क्रम ह्मणजे ऋचांचा अनुक्रम, व हा प्रत्येक संहितेचा निरनिराळा आहे.

वेदांचीं ब्राह्मणें.

**ब्राम्हणें** हा शब्द नपुंसकलिंगी आहे. हीं **ब्राम्हणें** प्रत्येक **वेदांची** पृथक् पृथक् आहेत. जसें **ऋग्वेदावर ऐतरेय** व **शांख्यायन**, किंवा **कौषीतकी ब्राह्मण. यजुर्वेदाच्या** दोन शाखा आहेत. त्यांपैकीं **कृष्ण यजुर्वेदावर तैतिरीय ब्राह्मण**, आणि **शुक्ल यजुर्वेदावर शतपथ ब्राह्मण. सामवेदावर ताण्ड्य, अद्भूत, छंदोग्य, प्रौढ, पंचविंश** अथवा **महाब्राह्मण**, आणि **अथर्व वेदावर गोपथ ब्राह्मण** यांत बहुतकरून यज्ञक्रियांविषयींचा उल्लेख असतो.

वेदांचीं आरण्यकें.

**आरण्यकांचें** पठण अरण्यांत करावें लागत असल्यामुळें, त्यांस **आरण्यकें** अशी संज्ञा आहे. हीं आरण्यकें ब्राह्मणाच्या परिशिष्टासारखींच असून त्यांत सर्व उपनिषदांचा समावेश होतो. व यांतच अध्यात्म ज्ञानाचें यथार्थ विवेचन केलेलें आहे.

वेदांचीं सूत्रें.

प्रत्येक **वेदांचीं सूत्रें** निरनिराळीं असून तीं भिन्न भिन्न ऋषींनीं केलेलीं आहेत. त्यांत **श्रौत सूत्रें** व **गृह्य सूत्रें** असे दोन प्रकार आहेत. **श्रौत सूत्रांत** यज्ञयागादि विधींचें सविस्तर विवेचन असून, **गृह्य सूत्रांत** वर्णाश्रम धर्म, आणि नित्यनैमित्तिककर्म, यांविषयींची साद्यन्त हकीकत आहे.

वेदांतील विषय.

सर्व **वेद** प्रायः छंदोबद्धच आहेत. मात्र **यजुर्वेदाचा** कांहीं भाग गद्यरूप आहे. प्रत्येक **वेदांतील** विषय-योजना निरनिराळी आहे. **ऋग्वेदांत** अग्नि, इंद्र, सूर्य, इत्यादि देवतांची स्तुति असून, **यजुर्वेदांत** यज्ञप्रकरण आहे. **सामवेदांत** **ऋग्वेदांतीलच** ऋचा असून, त्या फक्त गायनाच्या रीतीप्रमाणें ह्मणावयाच्या आहेत. **अथर्ववेदांत** गृह्य सूत्रांतील कथाभाग असून शिवाय भैषज्य, शापक्रिया, इंद्रजाल, मंत्रयोग, आणि शुभाशुभ लक्षणविचार, या विषयांवर विस्तारानें विवेचन केलेलें आहे.

सर्व **वेदांत** मुख्य व अति प्राचीन म्हटला ह्मणजे ऋग्वेदच होय. ऋग्वेदसंहितेंत दोन विभाग दृष्टीस पडतात. त्यांपैकीं पहिला विभाग अगदीं पुराण असून त्याचे दहा भाग केलेले आहेत. त्या प्रत्येकास **मंडल** असें ह्मणतात. त्यांत ८९ अनुवाक, १०१७ सूक्तें, आणि १०५८० ऋचा आहेत. प्रत्येक सूक्तांत सुमारें दहा ऋचा असतात. दुसरा विभाग त्यानंतरचा असून त्याचे एकंदर आठ भाग केलेले आहेत. त्यांस **अष्टकें** ह्मणतात. ह्यांचे आठ अध्याय केलेले असून त्या प्रत्यकाचे तेहेतीस वर्ग आहेत. एकंदर वर्ग २००६ दोन हजार सहा असून त्या प्रत्येक वर्गांत पांच ऋचा आहेत. हीं **मंडलें** व **अष्टकें** निरनिराळ्या ऋषींनीं रचलेलीं असल्याचें दिसतें.

ऋग्वेद संहिता, व मंडलें.

उदाहरणार्थ, पहिलें व दहावें **मंडल** भिन्न भिन्न गोत्रांतील ऋषींनीं केलेलें आहे. दुसरें **गृत्समदानें**, तिसरें **विश्वामित्रानें**, चवथें **वामदेवानें**, पांचवें **अत्रीनें**, सहावें **भारद्वाजानें**, सातवें **वशिष्ठानें**, आठवें **कण्वानें**, आणि नववें **अंगिरसानें**. सदरहू नांवांवरून त्या त्या नांवांचे **ऋषी** व त्यांचे **गोत्रज** समजण्याचे आहेत. **ऋग्वेदसंहितेंत** अग्नि, इंद्र, सूर्य, वगैरे देवतांचें स्तवन केलें आहे, तथापि त्यांतही अग्नि-देवतेला श्रेष्ठतर मानल्याचें दिसतें.

मंडलांचे प्रवर्तक.

अग्नि हा हविर्देवता असल्यामुळें, त्याचा स्तुतिपाठ ठिकठिकाणीं आढळतो. तो मनुष्यगण, आणि देवयोनी, यांमध्यें दूतरूपानें व मध्यस्थासारखा असून, तो आपल्या उज्ज्वलित ज्वालाग्रांनीं अति दूरस्थ देवांसही होमार्थ पाचारण करी, व अग्नीच्या तेजाला भिऊन सर्व देव-समूह त्याची आज्ञा मान्य करी, अशी तत्कालिन हिंदू लोकांची समज असे.

अग्निदेवता.

इंद्र हा पर्वेश्वर असल्या कारणानें कृष्णमेघजालाचें विदारण करून तो पृथिवीवर जलवृष्टि करतो; सबब त्याचें देखील आवाहन केलेलें आहे.

इंद्र देवता.

अरुण, उषस्, आणि सूर्य यांच्या तेजोराशीनें मनाला मोठा विस्मय वाटून, पूर्ण भक्तीनें व अत्यादरानें त्यांचाही धांवा केल्याचें व्यक्त होतें. याशिवाय मरुत्, रुद्रगण, आणि अनेक देवता-समूह यांचें सुद्धां वेळोवेळीं आवाहन करून, त्यांच्या ठायीं व्यक्तिनिर्देश केल्याचें आढळतें.

सूर्य व इतर देवता.

ऋग्वेदाचे दोन ब्राह्मण आहेत. ऐतरेय ब्राम्हण, आणि शांख्यायन किंवा कौषीतकी ब्राह्मण. ऐतरेय ब्राम्हणांत सोमयज्ञाविषयींच समग्र निरूपण असून, कौषीतकी ब्राम्हणांत फक्त त्याविषयींचेंच मुख्यत्वेंकरून विवेचन आहे. ऐतरेय ब्राम्हणांत एकंदर चाळीस अध्याय असून त्याच्या

ऋग्वेदाचे ब्राह्मण.

आठ पंचिका केल्या आहेत. कौषीतकी ब्राम्हणांत एकंदर तीस अध्याय आहेत. ऐतरेय ब्राम्हणाच्या दुसऱ्या अध्यायांत कांहीं कथानकें सांपडतात, त्यावरून त्यांत इतिहासोपन्यासाचीं मूलतत्वें दृष्टिगोचर होतात, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ऐतरेय ब्राम्हणावर सायनाचार्याची टीका असून, कौषीतकी ब्राम्हणावर माधवाचा पुत्र विनायक याची टीका आहे.

ऐतरेय ब्राह्मणाचीं आरण्यकें, व त्यांतील विषय.

ऐतरेय ब्राह्मणाचीं देखील आरण्यकें आहेत. ह्यांचा अभ्यास ऋषींनीं व त्यांच्या शिष्यवर्गांनीं अरण्यांतच केला पाहिजे असें असल्यामुळें, आरण्यक हें अन्वर्थनांव त्यांस दिलें आहे. यांत अध्यात्म विद्येसंबधींच समग्र विवेचन असून, निर्वाणपद प्राप्त होण्यासाठीं हिंदूंनीं अति गहन परायणता, उदार तप, आणि उत्कट ईश्वरभक्ति, यांचें मनःपूर्वक अवलंबन केलेलें असल्याचें दिसतें. व त्यासंबंधानें त्यांची अखिल भूतलावर[१] कीर्तीही आहे.

ऐतरेय आरण्यकाचे पांच भाग असून त्या प्रत्येकास

१ " This forest-life evidently only a later development in Brahmanical contemplation, and it is to it that we must chiefly ascribe the depth of speculation, the complete absorption in mystic devotion by which the Hindus are so eminently distinguished. " ( History of Indian literature By Professor Weber P. 48 )

ऐतरेय आरण्यकाचे पांच भाग.

**आरण्यक** अशी संज्ञा आहे. यांपैकीं दुसऱ्या आणि तिसऱ्या भागास **ऐतरेय उपनिषदें**ही ह्मणतात. **कौपीतकारण्यका**चे तीन भाग आहेत. त्यांपैकीं पहिल्या दोन भागांत यज्ञयागविधी सांगितला असून तिसऱ्या भागांत मात्र उपनिषत्कथासार आहे; व त्यास **कौषीतक्युपनिषद्** असें म्हणतात. हें उपनिषद् अत्युपयुक्त आणि विशेष महत्त्वाचें असून, त्याच्या पहिल्या अध्यायांत स्वर्गवासाचें सौख्य व तद्विषयक विवेचन आहे. दुसऱ्या अध्यायांत तत्कालीन कुटुंबप्रीति, प्रेम-बंधन, स्नेहातिशय, आणि तीक्ष्ण वात्सल्य, हीं उत्कृष्ठ रीतीनें व्यक्त होतात. तिसऱ्या आध्यायांत **ऐतिहासिक** काव्य-कथा, तिचा उपचय, आणि क्रमशः विकास, यांचें पूर्ण

त्यांतील ऐतिहासिक बीज, व भूगोल विद्येचें मूलतत्व.

दिग्दर्शन होतें. या उपनिषदांत **भूगोलशास्त्रा**च्या मूलतत्वांचें प्राचुर्य दिसून येतें. कारण, पहिल्या अध्यायांत **गंगानदी**चा उल्लेख असून, तदनंतर क्रमाक्रमानें उत्तर सरहद्दीवरील **हिमवंत** व दक्षिण सरहद्दीवरील **विंध्याद्रि**, यांचें वर्णन, आणि त्या पर्वतांनीं परिवेष्टित अशा प्रांतसमूहांतील व तन्निकट प्रदेशांतील जातिवर्गाच्या परिसंख्येचें विवेचन, त्यांत आढळून येतें.

**ऋग्वेदाचीं** सूत्रेंही आहेत, व त्यांचे दोन प्रकार

आहेत. श्रौत सूत्रें आणि गृह्य सूत्रें.

ऋग्वेदांचीं सूत्रें.

श्रौत सूत्रांत आश्वलायन सूत्रांचे बारा अध्याय असून त्याचा ऐतरेय ब्राम्हणाशीं संबंध आहे; व शांख्यायन सूत्राचे अठरा अध्याय असून शांख्यायन ब्राम्हणाशीं संबंध आहे. या श्रौत सूत्रांत यज्ञयागादि विधींचे संपूर्ण कथन, व वाजपेय, राजसूय, अश्वमेध, पुरुषमेध, सर्वमेध, इत्यादि यज्ञांचें सूक्ष्म विवेचन केलेलें आहे.

त्यांतील विषय.

गृह्य सूत्रांत, आश्वलायन गृह्य सूत्राचे चार अध्याय, व शांख्यायन गृह्य सूत्राचे सहा अध्याय आहेत. यांत वर्णाश्रम धर्म, परिणयविधि, नित्यनैमित्तिक कर्म, उत्तरकार्यविधि, आणि पितृतर्पण, यांचें सविस्तर कथन आहे. सदरहू दोन्ही गृह्य सूत्रांवर नारायणाची टीका असून आश्वलायन श्रौत सूत्रांवरही त्याचीच टीका आहे.

वेदानुक्रमणी.

याशिवाय अनुक्रमणी नामक ऋग्वेदाचे ग्रंथ आहेत. त्यांत छंद, त्यांच्या देवता, आणि त्यांचे प्रवर्तक, याविषयीं विवेचन आहे. तिचे दोन पोट विभाग आहेत. अनुवाकानुक्रमणी व सर्वानुक्रमणी. पहिली शौनकानें, आणि दुसरी कात्यायनानें केलेली असून त्या दोहोंवरही षड्गुरूची उत्तम टीका आहे. ऋग्वेदसंहितेचे विद्यमान असलेलें

प्रातिशाख्य सूत्र देखील याच शौनकानें केलें असून, तोच आश्वलायनाचा गुरु असल्याविषयीं आख्यायिका आहे. यांत छंदशास्त्राचें विवरण आहे. ह्यांखेरीज, १ शिक्षा, २ छंद, ३ व्याकरण, ४ निरुक्त, ५ ज्योतिष, आणि ६ कल्प अशीं वेदांगें असून, पहिलींत उच्चारशास्त्र, दुसऱ्यांत छंदशास्त्र, तिसऱ्यांत व्याकरणशास्त्र, चवथ्यांत शाब्दिक टीका व कठिण शब्दांचें विवरण, पांचव्यांत ज्योतिःशास्त्र, आणि सहाव्यांत आचार विधि, इत्यादि सर्वांचें यथावकाश विवेचन केलें आहे. शिक्षा, मंडूकानें आणि पाणिनीनें केली असून, छंद पिंगलानें, व ज्योतिष लगधाचार्यानें केलें आहे.

वेदांगें.

शिक्षा.

छंद व ज्योतिष शास्त्र.

ऋग्विधान ह्मणूनही एक ग्रंथ आहे. त्यांत गूढ मंत्रशक्तीचें व प्रत्येक ऋचोच्चारणाच्या सामर्थ्याचें वर्णन आहे.

ऋग्वेदाच्या आलोकनानें जगाचें कल्याण,

ऋग्वेदाच्या आलोकनानें मानवी जातीच्या आद्यस्थितीचें तथ्य व मूलस्वरूप दृग्गोचर होतें. आणि सुमारें नऊदहा हजार वर्षांमागें आमचे आर्य हिंदु कशा प्रकारें बोलत चालत होते; त्यांचे मनोव्यापार काय होते; त्यांची धर्मरचना कशी होती; ती पुढें कशी बदलत

गेली; त्यापासून त्यांच्या बुद्धीवर कोणता व्यापार घडला; प्रत्येक विषयासंबंधीं त्यांची किती शोधकविचार-शक्ती होती; त्यांच्या अश्रांत श्रमाचा एकंदर परिणाम आमच्या हिंदू समाजावर कसा घडून आला; त्यामुळें आज नऊ-दहा हजार वर्षांच्या उलथापालथींत आमचें हिंदुत्व कसें कायम राहिलें; आणि हा आमच्या धर्माचा इष्ट परिणाम आम्हांवर घडून आला नसता तर आमचें हिंदुत्व या मार्गें केव्हांच, कसें लयास गेलें असतें; याविपर्यीं तत्वदृष्ट्या विचार करण्याचें उत्तम साधन, व तत्संबंधीं क्रमशः वृत्तांत, या वेदांत आढळतो. किंबहुना हा वेद-दुर्ग हिंदुधर्मसंगोपनार्थच रचला गेला, असें ह्मणण्यास काडीमात्रही शंका नाहीं.

आणि हिंदुधर्माचें सरंक्षण.

यजुर्वेदाचे दोन भाग आहेत. कृष्ण यजुर्वेद आणि शुक्ल यजुर्वेद. यांची रचना कुरुपांचाल क्षेत्रांत झाली असल्याचें तदन्तर्गत प्रमाणांवरून दिसतें. कृष्ण-यजुर्वेदाला तैत्तिरीय अशीही संज्ञा आहे. याच्या संहितेंत सात अष्टकें आहेत. त्यांत चव्वेचाळिस ४४ प्रश्न असून, सहाशें एकावन ६५१ अनुवाक व दोन हजार एकशें अठ्याण्णव २१९८ कुंडिका आहेत. यांत बहुतेक यज्ञविधी संबं-

यजुर्वेदाचे दोन भाग, कृष्ण यजुर्वेद व शुक्ल यजुर्वेद.

कृष्ण यजुर्वेदाची संहिता.

त्याचे ब्राह्मण.

धींच विवेचन आहे. याचें **तैत्तिरीय ब्राह्मण** असून, काथकोपनिषद्, तैतिरीयोपनिषद्, नारायणीयोपनिषद् वारुणीउपनिषद्, व मैत्रायणोपनिषद्, अशीं **उपनिषदें**, तसेंच कथासूत्र, मनुसूत्र, मैत्रसूत्र, लौगाक्षीसूत्र व प्रतिशाख्यसूत्र, अशीं **श्रौतसूत्रें**, आणि कथक सूत्र, बौध्यायन सूत्र, भारद्वाज सूत्र, सत्याषाढ सूत्र, हिरण्यकेशी सूत्र, व प्रातिशाख्य सूत्र, अशीं **गृह्यसूत्रें** आहेत. **शुक्ल यजुर्वेदाला वाजसनेय** अशीही संज्ञा आहे. **वाजसनेय** हें **याज्ञवल्क्याचें** नांव असून तोच **शुक्ल यजुर्वेदाचा** प्रवर्तक असल्याविषयीं **बृहदरण्यकांत** सांगितलें आहे. वाजसनेयिसंहितेचे चाळीस अध्याय आहेत. त्यांत यज्ञव्यवस्था, यागविधि, त्यांचें कालनियमन, सौत्रामणी ( म्हणजे सोमपानातिरेकापासून झालेल्या पापाचें क्षालन करण्याचा विधि ), अश्वमेध, पुरुषमेध, पितृमेध, आणि प्रवर्ग्य ( म्हणजे शांतिक्रिया ), याविषयीं निरूपण आहे. सोळाव्या अध्यायांत रुद्र देवतेच्या आराधनेविषयीं सविस्तर विवेचन असून त्यांत निरनिराळ्या प्रकारचें चौरकर्म करणारे, तस्कर, मारक, निशाचर, कलह करणारे, खून करणारे, दरवडेखोर, आणि बंडखोर, यांचें वर्णन आहे.

त्यांचीं उपनिषदें, व

सूत्रें.

शुक्ल यजुर्वेद.

त्याची संहिता.

त्यावरून त्यावेळच्या अस्वस्थतेच्या स्थितींचें दिग्दर्शन होतें. यांतच भिन्न भिन्न मिश्रजातींची हकीकत दिली आहे, त्यावरून सूक्ष्म विचार करतां हिंदूंचें जातिवैचित्र्य, त्यांची सामाजिक व्यवस्था, आणि दंडनीति, हीं अगदीं पूर्णतेस आल्याचें भासमान होतें. तिसाव्या अध्यायांत कोणत्या प्रकारचे व जातीचे पुरुष यज्ञाकरितां बळी द्याव-याचे, त्याविषयीं सांगितलें आहे. **शुक्ल यजुर्वेदाचे शतपथब्राह्मण** असून, त्यांत १०४ अध्याय, ४४६ ब्राह्मणें, व ९८६६

त्याचे ब्राह्मण.

कंडिका आहेत. ह्यांत होमविधि, अग्निरहस्य, प्रायश्चित्त, अश्वमेध, पुरुषमेध, आणि सर्वमेध, यांविषयीं विवेचन आहे. शेंवटल्या सहा अध्यायांत उपनिषदादि भाग असून त्यांस **बृहदारण्यकें** ह्मणतात. बृहदारण्यकाचे तीन भाग आहेत. १ मधुकांड, २ याज्ञवल्क्यकांड, आणि ३ खिलकांड. शुक्ल यजुर्वेद ब्राह्मणांत इतिहास कथानकें जागोजाग

त्याचीं आरण्यकें, आणि..

आढळतात. या **वेदाचीं कात्यायनानें** केलेलीं **श्रौतसूत्रें** असून त्यांचे सव्वीस अध्याय आहेत, व त्यांत यज्ञविधि, आणि प्रायश्चित्त

सूत्रें.

संस्कार सांगितलेले आहेत. याचीं **कातीय गृह्यसूत्रें पारस्करानें** केलेलीं असून, याच ग्रंथकाराचें **स्मृतिशास्त्र**ही आहे.

**सामवेदसंहिते**च्या पहिल्या भागाचे सहा प्रपाठ

सामवेद संहिता.

असून, त्या प्रत्येकाचे दहा दशत्, आणि त्या प्रत्येकांत दहा ऋचा आहेत. पहिल्या बारा दशतांत **अग्नी**ची प्रार्थना आहे. त्या नंतरच्या छत्तीस दशतांत **इंद्रा**ची स्तुति आहे. व शेवटल्या अकरा दशतांत **सोमाचें** आवाहन आहे. दुसऱ्या भागाचे नऊच प्रपाठ आहेत, व त्यांत कमी जास्ती प्रमाणानें ऋचा आहेत. **सामवेदा**त **ग्रामगेयगान**, **अरण्यगान**, **ऊहगान**, आणि **ऊह्यगान** असे विभाग आहेत. या वेदांत एकंदर ऋचांची संख्या १८१० असून, पहिल्या भागांत ५८५, व दुसऱ्या भागांत १२२५, ऋचा आहेत. परंतु यांत **ऋक्संहितें**तील बऱ्याच ऋचा आल्या आहेत.

सामवेदाचे ब्राह्मण.

**सामवेदावर तांड्य, अद्भुत, छंदोग्य, प्रौढ, पंचविंश** अथवा **महाब्राह्मण**, अशीं **ब्राह्मणें** आहेत. **तांड्य ब्राह्मणांत** सोमयज्ञाच्या अनुष्ठानासंबंधीं वर्णन आहे. यांत **कौषीतकी ब्राह्मणां**चा जरा निंदा केलेली असून, त्यांस, **व्रात्य** ( धर्मभ्रष्ट ), आणि **यज्ञावकीर्ण** ( अनाधिकारी ) अशीं विशेषणें दिलेलीं आढळतात. **अद्भुत ब्राह्मणांत** अपशकुन व अरिष्ठ, यांचें विवेचन असून तन्निवारणार्थ प्रतिकारही सांगितलेले आहेत. **पंचविंश ब्राह्मणांत** प्रायश्चित्त व शापक्रिया यांचें वर्णन आहे. या-

त्यावरून तत्कालीन स्थितीचें दिग्दर्शन.

वरून एकंदरींत त्या वेळच्या स्थितीचें दिग्दर्शन होत असून, तत्कालीन लोकसमाज सुधारणेच्या कामांत बराच सरसावलेला असल्याचें दिसतें. **छंदोग्य**

सामवेदांचीं उपनिषदें.

**ब्राह्मणाच्या** दहा अध्यायांपैकीं पहिले दोन अध्याय गाहाळ झालेले असून, शेवटल्या आठ अध्यायास **छंदोग्योपनिषद्** अशी संज्ञा आहे. यांत **अध्यात्म**-ज्ञानासंबंधीं चमत्कारिक कथानकें व उपदेशपर धर्मानुशासनें आहेत. **केनोपनिषदाची** सामवेदाच्या ब्राह्मणांतच गणना असून, त्याचे दोन विभाग केलेले आहेत. पहिला भाग श्लोकबद्ध असून त्यांत **ब्रह्मनिरूपण** आहे. दुसऱ्या भागांत ब्रम्हश्रेष्ठत्व स्थापित करण्याच्या संबंधानें अनेक कथानकें आहेत. **सायण** हा सामवेदाचे आठ ब्राम्हण असल्याविषयीं **संविधानांत** लिहितो.

**सामवेदाचीं** तीन **श्रौतसूत्रें**, पांच **छंदसूत्रें**, आणि

सामवेदाचीं सूत्रें

एक **गृह्यसूत्र**, अशीं आहेत. श्रौतसूत्रांत यज्ञविधीचें विवेचन व सोमयाग प्रकरण आहे. **निदानसूत्राचे** दहा प्रपाठ असून त्यांत छंद, उक्थ, स्तोम, आणि गान, याविषयीं विवेचन आहे. **पुष्पसूत्र** **गाभिलानें** केलेलें असून, त्यांत निरनि-

राळ्या ऋचा सामांत कशा रीतीनें ह्मणतां येतील यासंबंधीं विस्तार आहे.

अथर्व वेदाची संहिता.

अथर्व वेदसंहितेचीं वीस कांडें, अडतीस प्रपाठक, सातशें साठ सूक्तें, आणि सुमारें सहा हजार ऋचा आहेत. याजवर सायणाची टीका आहे, व याचे गोपथ-

त्याचे ब्राह्मण व सूत्रें.

ब्राह्मण आहेत. त्यांचे अकरा प्रपाठक आहेत. पहिल्या पांच प्रपाठकांत उपनिषदें आणि कथानकें सांगितलीं असून, दुसऱ्या सहा प्रपाठकांत श्रौतकर्मविधी सांगितला आहे. याचीं कौशिक श्रौत सूत्रें आणि अथर्वण गृह्य सूत्रें आहेत. त्यांत भैषज्य, शापक्रिया, मंत्रक्रिया, विवाहविधि, पितृयज्ञ, व दुःशकुनप्रतिकार, इत्यादिकांचें वर्णन आहे. ह्या सूत्रांस कल्प म्हणून कांहीं भाग जोडलेले आहेत. त्यांस नक्षत्रकल्प, शांतिकल्प, वितानकल्प, संहिताकल्प, आणि अभिचारकल्प अशी संज्ञा आहे. विष्णुपुराणांत नक्षत्रकल्पाऐवजीं आंगिरसकल्पाचें क-

त्याचीं उपनिषदें, व त्यांतील विषय.

थन आहे. ह्या कल्पांत ज्योतिषप्रकरण, इंद्रजाल, शकुन, व मंत्र, इत्यादिकांचें सविस्तर विवेचन आहे. मंडूकोपनिषद् आणि प्रश्नोपनिषद् अशीं अथर्ववेदाचीं मुख्य उपनिषदें आहेत. त्यांपैकीं पहिलें पद्य असून

दुसरें गद्य आहे. **गर्भोपनिषद्** या नांवाचेंही एक उपनिषद् आहे. त्यांत गर्भधारण, त्याचे घटकावयव, त्याचें गुरुत्व, आणि शारीररचना याविषयीं विवेचन आहे. याशिवाय **आत्मवज्रसूची** व **त्रिपुरी** नामक वेदांतपर गद्यात्मक ग्रंथ **शंकरानें** केलेले आहेत. पहिल्यांत **ब्राम्हण, मोक्ष, जीव, परमेश्वर,** आणि **तत्वमसि,** यांविषयींची व्याख्या व विवेचन आहे. त्यांत **ब्राह्मण** शब्दाचें वर्णन करतांना, प्रथमदर्शनींच असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, **ब्राह्मण** ह्मणजे केवळ **जातीनें, वर्णानें,** अथवा **पांडित्यानें** होत नसून, जो खरोखर **ब्रह्मविद्** ( ब्रह्म जाणीत ) असेल तोच **ब्राह्मण** समजावयाचा आहे. **त्रिपुरींत आत्मा** आणि **जगत्** यांचा सापेक्ष संबंध कशा प्रकारचा आहे हें सांगितलें आहे.

ब्राह्मण शब्दाची व्युत्पत्ति.

**सर्वोपनिषत्सारोपनिषद्, आत्मनोपनिषद्, प्राणाग्निहोत्रोपनिषद्,** व **आर्षिकोपनिषद्** यांतही अध्यात्म विद्येचेंच विवेचन आहे. **तारकोपनिषद्, जाबालोपनिषद्, साकल्योपनिषद्, कथाश्रुति, आरुणिकोपनिषद्, परमहंसोपनिषद्, आश्रमोपनिषद्,** वगैरे नानाविध उपनिषद् ग्रंथ असून त्यांत योग, मोक्ष, ईश्वर सायुज्य, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, आणि परिव्राजिका यांचा आश्रमधर्म,

निर्वाण, व कैवल्य, यांविषयीं सविस्तर हकीकत, आणि तीं प्राप्त होण्याचीं साधनें, यथावकाश सांगितलेलीं आहेत.

सांप्रदायिक उपनिषदें व अनेक धर्मपंथ.

आतां फक्त **सांप्रदायिक उपनिषदां**विषयींचा मात्र विचार करावयाचा राहिला आहे. ह्या उपनिषदांत **आत्म्याच्या** ठिकाणीं **ब्रह्मा, विष्णु, महेश,** यांची त्रिपुटी किंवा ते पृथक् पृथक् अथवा ऐक्यभावानें कल्पून, त्यांची भक्ती आणि आराधना करण्याविषयीं सांगितलें आहे. **नारायणोपनिषदां**त **विष्णू**ची पूजा सांगितली आहे. **विष्णु** हें नांव **ऋग्वेदांत शतपथ ब्राम्हणां**त नजरेस पडतें. या उपनिषदांत " ॐ नमो नाराणाय " ह्या महामंत्राचा उपयोग सांगितला आहे. **महोपनिषदांत नारायण** हा **विष्णू**चा अवतार असल्याचें कथन केलें असून, त्यापासूनच **शूलपाणी** (शिव) आणि **ब्रह्मा** हे झाले आहेत, असें वर्णन आहे. **नृसिंहोपनिषदां**त **नृसिंहा**ची उपासना, व मंत्रविधि, अशीं सांगितलीं आहेत. **तैत्तिरीय आरण्यकां**त **नरसिंह** हें नांव प्रथमच दृष्टीस पडत असून त्याला **वज्रनख** व **तीक्ष्णदंष्ट्र**, अशीं विशेषणें लाविलेलीं आढळतात. **रामतापनीयोपनिषदां**त **राम**पूजा सांगितलेली असून **अथर्व शिरस्** नामक **उपनिषदांत गणपति, नारायण, रुद्र, सूर्य** आणि **देवी,** यांच्या उपासनेचें पृथक् पृथक्

विवेचन आहे. याप्रमाणें सदरीं लिहिलेलीं आणि दुसरीं, अशीं एकंदर, अथर्ववेदाचीं एकशें सत्तेचाळीस उपनिषदें असल्याचें कळतें.

ईश्वरप्रणीत वेद.

सदरीं निर्दिष्ट केलेले वेद ईश्वरप्रणीत आहेत व ते परमेश्वराच्या श्वसनापासून निर्माण झाले, असें हिंदु लोक मानतात. ह्या वेद चतुष्टयांस समुदाय रूपानें श्रुति असें म्हणतात; व

श्रुति, व

श्रुति ह्या शब्दाचा अर्थ " जें ऐकिलें तें " असा होतो. वेद शब्दाची व्युत्पत्ति विद् धातुपासून झाली असून त्याचा अर्थ " ज्ञान " असा आहे.

यस्यनिश्वसितंवेदायोवेदेभ्योऽखिलंजगत्।
निर्ममेतमहंवंदेविद्यातीर्थमहेश्वरम् ॥

ह्या वाक्यावर आम्हां हिंदूंचा पूर्ण भरंवसा आहे. ज्या भिन्न भिन्न ऋषींनीं वेद ऋचा रचल्या म्हणून आख्यायिका आहे, त्या ऋषींस " वेदस्रष्टारः " अशी संज्ञा नसून, त्यांस फक्त " वेदद्रष्टारः " असेंच नांव आहे. म्हणजे त्या ऋषींनीं वेद स्वतः केलेले किंवा रचलेले नसून, स्वयमेव निर्माण झालेल्या वेदांचा पाठ त्यांच्या कानांवरून गेल्यामुळें त्यांच्या श्रवणेंद्रियांस तो भासमान झाला; आणि ह्या कारणामुळेंच वेदचतुष्टयांस

स्मृति.

श्रुति असें नामधेय पडलें. श्रुति-पासून स्मृति भिन्न आहे, व त्यांत धर्माधर्म विचार, आणि व्यवहार नीति, यांचें साविस्तर विवेचन आहे. ह्या विवेचन पद्धतीची उत्तम स्मृती राहावी या हेतूनें त्यांची चांगली सूत्रग्रंथि बांधली असून, त्या सूत्रसमूहास, आणि तत्संबंधी ग्रंथावलीस, **स्मृति,** असें म्हणतात. यांत कल्पसूत्रें, स्मार्तसूत्रें, श्रौतसूत्रें, व गृह्यसूत्रें, इत्यादिकांचा समावेश होत असून, त्या सर्वांवि-षयीं या मागें योग्य स्थळीं सविस्तर विवेचन केलें आहे.

त्याची व्याख्या.

आतां श्रुति कशास ह्मणावी, व स्मृति कशास ह्मणावी, या विषयींची व्याख्या **मनुस्मृतींत** थोडक्यांत दिली आहे.

**श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रंतुवै स्मृतिः ।**
**ते सर्वार्थेष्वमी मांस्ये ताभ्यां धर्मोहि निर्वभौ ॥१०॥**

( मनुस्मृति, अध्याय दुसरा. )

ह्या व्याख्येवरून श्रुति म्हणजे वेद, आणि स्मृति ह्मणजे **मन्वादि ऋषींनीं** केलेलें धर्मशास्त्र होय. वेदांत **संहिता, ब्राम्हण, अरण्यकें, सूत्रें,** आणि **उपनिषदें,** यांचा समावेश होतो; व **स्मृतींत श्रौत** आणि **गृह्य** सूत्रें, व **धर्मशास्त्र,** यांचा अंतर्भाव होतो.

आतां वेदांच्या संबंधानें एक महत्वाच्या गोष्टीचा

वेदांवरील मूळ टीका ग्रंथ.

उल्लेख करणें राहिला आहे. सबब तो थोडक्यांत करून हें वेदकाण्ड पुरें करितों. वेदांवर टीकारूप असे प्रथमचे ग्रंथ म्हटले म्हणजे **निघंटु** आणि **निरुक्त** हे होत. ह्यांत वेदांतील कठिण शब्दांच्या अर्थाचें निरूपण केलें असून, ते वेदशब्दांचे कोशच म्हटलें तरी चालेल. हे दोन्ही ग्रंथ **यास्क** ऋषीनें केले आहेत. **अत्रेयीकांडानुक्रमांत** ह्याला **पैंगी** अशी संज्ञा असून, तो **वैशंपायनाचा** शिष्य व **तित्तिरीचा** गुरु असल्याविषयीं त्या ठिकाणीं सांगितलें आहे. **यास्काचें** नांव **शतपथ ब्राम्हणाच्या** शेवटीं दृष्टीस पडतें, व **पाणिनीनें** देखील **यास्क** नांवाचा उल्लेख केल्याचें आढळतें. त्यावरून **पाणिनीच्या**

त्यांचा काल.

अगोदर पुष्कळ वर्षें, म्हणजे इ. स. पूर्वी ७०० वर्षांच्याही बऱ्याच पलीकडील कालांत, वेदांतील कठिण शब्दांवर प्रथमची टीका किंवा कोश, **यास्क** ऋषींनीं केला, यांत संशय नाहीं.

आतां **निघंटु** नामक कोशावर **देवराजयज्वन्** याची

इतर टीकाकार, व त्यांचा काल.

टीका असून, तो इसवी सनाच्या १५व्या किंवा १६व्या शतकांत झाला असावा. यानें आपल्या प्रस्तावनेंत **निघंटूच्या** इतिवृत्ताविषयीं बरेंच विवेचन केलें आहे, त्यावरून **यास्क** ऋषी नंतर व ह्याच्या अगोदर

स्कंदस्वामींनीं वेदांवर एक संपूर्ण टीका केली असल्याचें दिसतें. यास्ककृत निरुक्तावर दुर्ग यानें टीका केली आहे, व तो इसवी सनाच्या तेराव्या शतकापूर्वी झाला असावा असें वाटतें.

सायणाचें भाष्य, व त्याचा काल.

खरोखर पाहतां, ऋक्संहितेवर उत्तम अशी टीका ह्मटली म्हणजे सायणाचार्याचीच होय. सायण आणि त्याचा भाऊ माधव यांनीं वेदांच्या बहुतेक सर्व शाखांवर, व उपयुक्त विषयांवर टीका केल्या आहेत. हे बंधुद्वय बुक्क नामक राजाच्या पदरीं विजयानगर येथें मंत्री होते. ह्यांच्या हातांत सर्वच राज्यकारभार असल्यामुळें, त्यांनीं आपल्या उच्च पदवीचा सुविनियोग करून वेदाभ्यासाला सर्व प्रकारें उत्तेजन देण्याचें मनांत आणिलें. सायणाची ऋक्संहितेवरील टीका इसवी शकाच्या चौदाव्या शतकांत झाली असून ती फारच महत्वाची व अत्युपयुक्त आहे. ह्या टीकेपासून वेदाची फार प्राचीन भाषा, त्यांतील गुढश्लेष, आणि कठिण वाक्यार्थ, हीं समजण्यास फारच चांगलें साधन झालें आहे. कांहीं यूरोपस्थ पण्डितब्रुव त्यांच्या नेहेमींच्या चालीप्रमाणें सायणाची अवहेलना करून त्यास मूर्ख व अप्रयोजक म्हणतात. परंतु "जानंतिते किमपि" हें भवभूतीचें वाक्य मनांत आणून, त्या गौरकायांच्या ह्या वाक्पांडि-

त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. तरच कांहीं फायदा झाला तर होईल. कारण त्यांच्या म्हणण्यांत कांहीं अर्थच नाहीं. **मोक्षमुलर** पण्डितासारखे जे खरे मर्मज्ञ आहेत त्यांस **सायणा**च्या टीकेची वास्तविक योग्यता कळत असून, ते त्यास **वेदार्थस्फोटना**चा **आधारस्तंभ**च मानतात. या टीकेचें खरें महत्व, व तत्संबंधीं लोकांचें अज्ञान आणि दुराग्रह, यांचें हुबेहुब चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें राहावें एतदर्थ, पण्डित **मोक्षमुलर** यांचाच अभिप्राय या खालीं[१] देतों.

सायणभाष्याची उपयुक्तता.

**मोक्षमूलर** यांनीं सुमारें पंचवीस तीस वर्षे अश्रांत परिश्रम घेऊन **ऋग्वेदा**चें इंग्रजी भाषांतर पुरें केलें, त्या-

---

१ "I do not wonder that others who have more recently entered on the study of the Vedas are inclined to speak disparagingly of the scholastic interpretations of Sàyana. They hardly know how much we all owe to his guidance in effecting our first entrance into this fortress of Vedic language and Vedic religion; and how much even they, without being aware of it, are indebted to that Indian Eustathius. * * * If we can now walk without Sàyana, we ought to bear in mind that five and twenty years ago we could not have made even our

पुढें चालू.

मुळें **वेदार्थ** काठिण्याचें खरें इंगित त्यांस सहजींच कळून येऊन, **सायण** भाष्याचा खरा उपयोग त्यास झाला. आणि त्यामुळेंच दुर्गम **वेददुर्गांत** प्रवेश होण्याला **सायण** भाष्याचें साहचर्य किती श्रेयस्कर झालें, हें त्यांस पूर्णपणें कळून आलें.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

first steps, we could never, at least, have gained a firm footing, without his leading strings. If therefore we can now see further than he could, let us not forget that we are standing on his shoulders."

( Rig-Veda—Samhita Vol. I. )

# भाग १४ वा.

## महाकाव्यें व गद्यपद्यादि भाषाशास्त्र.

### रामायण.

हिंदूंचीं महाकाव्यें व त्यांचें प्राचीनत्व.

वेदांनंतरचीं महत्वाचीं काव्यें म्हटलीं म्हणजे रामायण आणि महाभारत हीं होत. हीं दोन्हीं महाकाव्यें फारच प्राचीन काळचीं आहेत. व त्यांतही रामायण हें पुराणतर आहे. कारण महाभारतांत रामाच्या अद्भुत पराक्रमाचा आणि त्याच्या महत्शौर्याचा उल्लेख केल्याचें दिसत असून, तशा प्रकारचें निवेदन महाभारतांतील पांडवादि पराक्रमी पुरुषांचें, रामायणांत केल्याचें कोठेंही आढळून येत नाहीं.

रामायण.

रामायण हें महाकाव्य इतकें पुरातन आहे कीं, त्याचें संविधानक बहुतेक सर्व हिंदूंस व त्यांच्या लहान मुलांबाळांस देखील माहीत असून, तें हिंदुराष्ट्राच्या ह्त्पटिकेवर

जसें कांहीं आजन्मतःच खिळल्यासारिखें झालें आहे. उत्तरेकडील अत्युच्च **हिमालया**पासून तों तहत दक्षिणे-कडील **कन्याकुमारी** नामक भूशिरापर्यंत, तसेंच पश्चि-मेकडील **सिंधू** महानदीपासून तों थेट पूर्वेकडील विशाल अशा **ब्रम्हपुत्रा** नदीपर्यंत, **रामा**चा पराक्रम व एक पत्नीव्रत, **सीते**चें पातिव्रत्य व अनुपम लावण्य, **लक्ष्म-णा**ची एक निष्ठा व बंधुप्रीति, आणि **रावणा**चें प्राबल्य व दुष्टबुद्धि, हीं आबालवृद्धांस माहीत आहेत.

त्याचा काल निर्देश.

सदरीं लिलिल्याप्रमाणें **रामायणा**चा उल्लेख **महा-भारतां**त असून, **महाभारता**चा नामनिर्देश **आश्वलायन गृह्यसूत्रां**त केल्याचें आढळतें. आतां ह्या **सूत्रां**चा काळ म्हटला म्हणजे इसवी शकापूर्वी प्रायशः एक हजार वर्षांवर होय. तेव्हां उघ डच, **महाभारत** हें काव्य, इ. श. पूर्वी १००० वर्षांच्या पलीकडील कालांत रचलें गेलें, यांत तिलमात्र देखील शंका नाहीं. ह्या प्राचीन **महा** काव्यांत **रामायणा**चा उल्लेख आहे. आणि ज्या अर्थी अशा प्रकारचा उल्लेख आहे, त्याअर्थी **रामायण** हें काव्य लोकमान्य होऊन, त्याची सर्व प्रसिद्धि झाल्याला बरींच शतकें लोटल्यावर, त्यांतील कथाभाग प्रसंगानुसार **महाभारतां**त आला यांत बिलकुल शंका नाहीं.

त्याचा महाभारतां-तील उल्लेख.

अति विख्यात वैय्याकरणी जो **पाणिनि** तो इसवी शकापूर्वी[1] ७०० वर्षे झाला असून,

पाणिनींतील उल्लेख

त्यास देखील **रामायण** माहीत असल्याचें दिसतें. कारण त्याच्या *सूत्रांत **ऐक्ष्वाक**, **कौसल्या**, **कैकेयी**, वगैरे जीं त्या महाकाव्यांतील पात्रें, त्यांचा उल्लेख केलेला आहे. इक्ष्वाकूचा वंशज **ऐक्ष्वाक** ह्मणजे **राम** असून, ह्या शूर व पवित्र पुरुषाच्या चरित्राशीं **कौसल्या** आणि **कैकेयी** यांचा इतिहासदृष्ट्या किती संबंध आहे, हें ज्यास्त सांगावयास नको.

राजा दामोदरच्या वेळीं त्याची पवित्र कीर्ति.

**राजा दामोदर** याच्या वेळीं तर **रामायण** हें इतक्या पवित्रतेस आणि पूज्यतेस पात्र झालें होतें कीं, त्याच्या साद्यन्त श्रवणानें महापातकाचें देखील क्षालन होतें, अशी तत्कालीन लोकांची पूर्ण श्रद्धा असे. याविषयीं **कल्हणकृत राजतरंगिणींत** अशी एक गोष्ट सांगितली आहे कीं, कांहीं **ऋषींनीं राजा दामोदरा**जवळ अन्न-

---

* Was Rámàyana copied from Homer? P. 41

१ Panini, therefore, must have flourished in the beginning of the 7th century before the christian era if not earlier still; and against this conclusion I believe no argument has been or can be brought except a vague prejudice."

( Dr. Bhandarkar's H. of the Dekkan P. 8. )

दान मागितलें असतां त्यानें तें देण्याचें वर्जिल्यावरून, त्यांनीं त्यास शाप दिला. तदनंतर राजानें त्यास संतुष्ट करून उश्शाप मागितला. तेव्हां ते ऋषी सुप्रसन्न होत्साते असें बोलले कीं, " रामायणाचें समग्र पारायण तूं एक दिवसांत श्रवण करशील तर, तुझ्या शापाची शान्ति होईल. "

अशेषमेकेनैवान्हा श्रुत्वा रामायणं तव ।
शापस्य शान्तिर्भवती त्यूचिरेते प्रसादिताः ॥ *

ह्या सर्व गोष्टींवरून, दामोदर राजा राज्य करीत असतां, ह्मणजे इसवी सनापूर्वी १७९ वर्षे, या महाकाव्याची मान्यता, त्याची सर्वत्र महत्वी, आणि त्याचें प्राचीनत्व, इत्यादिसंबंधानें लोकांची किती पूज्यबुद्धि होती, ह्याचें चांगलें दिग्दर्शन होतें.

महाभाष्यांतील त्याचा उल्लेख.

अत्युग्र तप करून विश्वामित्र हा मागील त्रयीसह ऋषि झाला, म्हणून त्याची मोठी प्रशंसा रामायणांत केलेली आहे. त्याच गोष्टीचा उल्लेख पतंजलीच्या महाभाष्यांत केल्याचें आढळतें. त्यावरून पतंजलीच्या पूर्वी, म्हणजे इसवी शकापूर्वी १४३ वर्षे, या महाकाव्याची रचना झाल्याचें सिद्ध होतें.

---

* राजतरंगिणी. कलकत्ता आवृत्ति. १८३५ पान ६.

कालिदास कवीची त्याविषयीं आदरोक्ति.

कविवर्य **कालीदास** हा आपल्या प्रसिद्ध काव्यांत * **रामायण** हें पहिलें काव्य, आणि **वाल्मीकि** आदिकवि, असल्याविषयीं वर्णन करतो. आतां **कालिदासाचा** काल* अजून निश्चयात्मक ठरला नाहीं. तथापि, तो इ. श. पूर्वी ५६ वर्षें, अथवा इ. सनाच्या चौथ्या, किंवा सहाव्या शतकांत उदयास आला असावा, अशी कल्पना आहे. हा कवि केवढा विद्वान्, किती शोधक, कसला मर्मज्ञ, आणि किती बहुश्रुत होता, हें विशेष रीतीनें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ह्या कवीस **महाभारत** काव्य देखील चांगल्यां प्रकारें मांहीत होतें. कारण, त्यांतील कथानकांच्या आधारेंच ह्यानें **शाकुंतल** रचलें. तेव्हां असल्या व्युत्पन्न आणि विचक्षण कवीनें **रामायणास आदिकाव्य**, तसेंच **वाल्मीकीस कविज्येष्ठ**, म्हणून जी पदवी दिली, ती केवळ निरर्थक किंवा निराधार दिली, असें मानण्यास यत्किंचित् देखील कारण नाहीं.

* रघुवंश सर्ग १५. श्लोक ३३–४१.

* Vide 1 History of Indian Literature. By Pro. Weber.

2 Was Râmàyan Copied from Homer? By Justice Telang.

3 What can India teach us? By Pro. Max Muller.

ह्या व दुसऱ्या अनेक अन्तःप्रमाणांवरून व बाह्य पुराव्यावरून, **रामायणाचें** प्राचीनत्व अगदीं निर्विवाद सिद्ध होत आहे. व तत्संबंधीं उत्तम चर्चा आणि साद्यन्त उहापोह **नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग** यांच्या अत्युपयुक्त लेखांत[1], फार मार्मिकपणानें व विशेष शोधकबुद्धीनें केला आहे.

त्यासंबंधीं प्रोफेसर वेबरचें मत व त्याचें खंडन.

असें असून **प्रोफेसर वेबर** हे या महाकाव्याविषयीं असें लिहितात[2] कीं, तें ( १ ) इसवी शकाच्या आरंभीं किंवा त्या सुमारास झालें असावें. आणि ( २ ) त्यांतील कथानक **ग्रीक** कवि जो **होमर**, याच्या **ईलियड** नामक काव्यांतून घेतलें असावें.

सदरहू दोन्ही गोष्टी **प्रोफेसर** मजकूर केवळ गृहीतच धरीत असून, त्या योग्य रीतीनें स्थापित करण्यासाठीं, किंवा त्यांच्या यथार्थ प्रतिपादनार्थ, बलवत्तर पुरावा अथवा प्रमाणभूत साधन ह्मणून, कांहींच पुढें आणीत नाहींत. तेव्हां अशा स्थितींत त्यांचें ह्मणणें किती वजन-

---

१ "Was the Râmâyan Copied from Homer"? A reply to Professor Weber, by the Honorable K. T. Telang, in the paper read by him before the students Literary and Scientific Society, Bombay, on 2nd September 1872.

२ Vide Indian Antiquary. P. P. 121 . 252 .

दार व कितपत भरंवसेलायक होईल, याविषयीं योग्य विचार करण्याचें काम मी वाचकांवरच सोंपतों.

आतां, ह्या दोन्हीं गोष्टींचें यथार्थ खंडन करून त्याबद्दल भवतिनभवति करणें, ह्मणजे प्रस्तुत ग्रंथाचा बिलकूल विषयच नव्हे. तथापि, सांप्रत काव्याच्या संबंधानें जी शंका उद्भवली आहे तिचें थोडक्यांत निरसन करून, पुढील विषयाकडे वळूं.

होमरकाव्य, आणि त्यांतील प्राच्य सांप्रदायांचें अनुकरण, व त्यांतील प्राच्य विषयक गंध.

प्राच्य कवि **वाल्मीकि** हा पाश्चिमात्य कवि **होमर** होण्यापूर्वीं, कित्येक शतकें अगोदर उदयास आला असून, **रामायणां**तील कथानक पश्चिमेकडून पूर्वेकडे पर्यटन करीत आलें, असा बिलकुल संभव देखील नाहीं. उलट, आमचें हें प्राच्य कथानकच **भरतखंडां**तून पश्चिम दिशेकडे गेलें असून, **रामायणां**तील संविधानकाचेंच **होमर** कवीनें अनुकरण केलें असावें, अशाविषयीं चांगला आणि बलवत्तर पुरावा दिवसानुदिवस मिळत चालला आहे. कारण, **होमर** हा पूर्वेकडील देशांत पर्यटन करीत होता, अशाविषयीं मागील ग्रंथान्तरीं चांगलें प्रमाण मिळतें. तसेंच, त्याच्या काव्यांत प्राच्य गंध आढळून येत असून, पूर्वेकडील रीतिभातींचेंही अनुकरण त्यानें केलें असल्याचें त्यांत स्पष्टपणें दिसतें.

प्रथमतः **होमर** आणि **ईलियड** या नामद्वयाच्या संबंधानें शोधाअन्तीं दोन प्रश्न उत्पन्न होतात. पहिला हा कीं, **होमर** हा व्याक्तिविशेष होता कीं काय? आणि दुसरा असा कीं, तो होता अशी कल्पना केली तर, त्याच्या नांवावर विकत असलेलीं काव्यें **ईलियड** आणि **ऑडिसी** हीं समग्र त्यानेंच रचलीं किंवा नाहींत? पहिल्या प्रश्नाविषयीं तर विद्वानांत बराच मतभेद आहे, व त्यांपैकीं, कांहींची अशी समज आहे कीं, **होमर** ह्या नांवाचा कवि म्हणून व्यक्तिविशेष मुळींच नव्हता. तर तन्नामाश्रित अशीं अनेक ग्रंथकारांचीं काव्यें एकत्र होऊन त्या क्षुद्र कविसंघासच **होमर**[१] असें नांव पडलें. दुसऱ्या प्रश्नाविषयीं सर्व विद्वज्जनसमुहांचें बहुतकरून ऐकमत्यच दिसतें. म्हणजे सदहू दोन्हीं काव्यें अनेक पठक, व भिन्न भिन्न आख्यायक, यांच्या परिश्रमाचें फल असून तीं नानाविधकवनग्रथित आहेत. फक्त त्यांतील मूलविषय, किंवा काव्यसंविधानक, हें मात्र अबाधित राखण्याविषयीं चांगली खबरदारी ठेविलेली आढळते.

---

१ Vide the Illiad edited by the Rev W. Lucas collins, M. A; author of the " Ancient Classics for English Readers. (1888. P. P.1/2.)

२ " Such explanation of the repetitions and incongruities which are to be found in the Illiad

पुढें चालू.

हेक्टरनें पॅट्रोक्लसला ठार मारल्याची बातमी जेव्हां आकिलीजनें ऐकिली, तेव्हां तो क्रोधाग्नीनें फार संतप्त होऊन दुःख विव्हल होत्साता, आपल्या केशांचें विदारण करूं लागला, अशा प्रकारचा इलियड्[१] काव्यांतील थोडा कथाभाग आहे. आतां, ही चाल खरोखरी प्राच्यदेशांकडील असून, तिचें अनुकरण पाश्चिमात्य राष्ट्रांतील जो आदिकवि **होमर** यानें आपल्या काव्यांत केल्याचें उघड दिसतें.

भरतखंडाचा ग्रीस देश ऋणी.

असो. येवढ्यावरून वाचकांची सहज खात्री होईल कीं, आम्ही **भरतवासिजन ग्रीस** देशाचे बिलकुल ऋणी नसून, उलटा

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

seems at least as reasonable as the supposition that its twenty four books are the work of various hands, 'stitched together'—Such is one explanation of the term 'rhapsody'—in after times, and having a common origin only in this, that all sung of the wondrous tale of Troy."

( Rev. Lucas collins. Illiad. P. 5).

१ " His ( Achilles' ) grief is frantic —he tears his hair, and heaps dust upon his head, after a fashion which strongly suggests the Eastern character of the tale. "

( Ancient Classics for English readers. Illiad. By Rev. Lucas collins M. A. P. 116 )

तोच देश आमच्या **आर्यभूमिके**चा ऋणी आहे, यांत तिलमात्र देखील शंका नाहीं.

**महाभारता**पेक्षां **रामायण** प्राचीनतर आहे हें मागें दाखविण्यांत आलेलेंच आहे. त्याशिवाय आणखी एक गोष्ट ध्यनांत ठेविण्यासारखी आहे ती ही कीं, **रामायणांत दक्षिण हिंदुस्थानां**तील भूगोलविद्येसंबंधीं या **कविज्येष्ठा**ची माहिती पुष्कळच कोती दिसते. व अशा प्रकारचें त्या कवीचें तद्विषयक अज्ञान असणें देखील साहजीकच आहे. कारण, त्याकाळीं त्या प्रदेशाशीं बहुतकरून अगदींच कमी दळण-वळण असल्यानें, किंबहुना मुळींच नसल्यामुळें, तिकडील कांहींच माहिती नव्हती. तसेंच त्यावेळेस ह्या प्रदेशांतील लोकस्थिति देखील अगदीं रानटी होती.

दक्षिण हिंदुस्थानां-तील, या दोन्हीं महा-काव्याच्या वेळची स्थि-ति, व

अशा प्रकारची **दक्षिण हिंदुस्थान**ची जंगली स्थिति **महाभारताच्या** वेळेस दिसून येत नाहीं. ह्या समयीं त्या प्रदेशाबरोबर पुष्कळच व्यवहार वाढलेला असल्या-

१ "The magnificence of Menelous's palace, as described by the poet, ( Homer ), is a very remarkable feature in the tale. It reads far more like a scene from the 'Arabian Nights' than a lay of early Greece.

The poet drew an imaginary description from his own recollection of the gorgeous barbaric splendour of some City in the further East, which he had visited in his travels"

( Do. Do. Odyssey P. 33. )

मुळें, त्या प्रदेशाची माहिती देखील चांगलीच होती असें ह्मटलें तरी चालेल. तसेंच, त्या वेळेस त्या भागाच्या लोकस्थितींत देखील महदन्तर पडल्यासारखें दिसतें. आणि त्यावरून ते आचारसंपन्न व विचारशील होते असेंही वाटतें. ह्या गोष्टीवरून देखील **महाभारतापेक्षां रामायण** फारच जुनाट आहे अशी दृढतर कल्पना होण्यास चांगलें साधन मिळतें. आणि ज्यापेक्षां **महाभारत** युद्धालाच आज चार हजारांवर वर्षें होऊन गेलीं आहेत, त्यापेक्षां **रामायण** रचल्याला पांच हजारांहून जास्त वर्षें झालीं असावींत हें उघड दिसतें.

रामायणाचा काल.

असो. आतां **रामायणांतील** भाषापद्धति, विचारसरणी, आणि पदलालित्य, यांविषयीं थोडें दिग्दर्शन करूं.

यांतील भाषापद्धति सरळ असून सुबोध आहे. तरी प्रसंगानुसार ती उदात्त व ओजस्वी देखील आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या काव्यांतील विचारसरणी निर्मल आहे. तथापि, त्यांतील पदलालित्य मात्र म्हणण्यासारखें विशेष रमणीय नाहीं. ह्यांतील कल्पकत्व आणि अपूर्व रचनासामर्थ्य मनांत आणिलें ह्मणजे, त्या **आदिकवीची** कल्पनाशक्ति व विचारगौरव, नैसर्गिक प्रौढी व ओजस्विता, प्रसाद व वर्णनशैली, इत्यादि गुणां-

रामायणांतील भाषापद्धति, व तत्कालीन लोकनीति.

विषयीं चांगलें अनुमान करतां येतें. आणि तत्कालीन निर्मळ आचार, सरळ विचार, व शुद्ध नीति, वगैरेसंबंधीं उत्तम प्रकारचें दिग्दर्शन होतें.[१]

इतिहासदृष्ट्या **रामायणाचें** अवलोकन केल्यानें, तत्कालीन स्थिति वेदकालापेक्षां बरीच पुढें सरसावलेली होती, असें कळून येतें. तसेंच लोकांचे आचार व विचार, आणि समाजरचना, यांत देखील वेदकालतुलनेनें महदंतर दिसतें. नीतीचें शिक्षण अगदीं उच्च प्रतीचें होतें असें भासते. शिल्पकलेचें पाऊल बरेंच पुढें पडलें असून, बहुतेक सर्व प्रकारचे धंदे भरभराटींत होते. कारण, जवाहिरे, सोनार, सुतार, कासार, तांबट, लोहार, कोष्टी, विणकाम करणारे, हस्तिदंति काम करणारे, गायनाचीं वाद्यें करणारे, शस्त्रास्त्र बनविणारे, पुतळे घडविणारे, स्फटिकाचें काम करणारे, कांच करणारे, चितारी, गंधी, आचारी, इत्यादि नानाविध गुणीजनांचें प्रसंगानुसार वर्णन

---

१ "Milman and Schlegel vie with Wilson and Jones in their applause (of the Epics); and from one or other of those writers we learn the simplicity and originality of the composition; the sublimity, grace and pathos of particular passages: the natural dignity of the actors, the holy purity of the manners, and the inexhaustible fertility of imagination in the authors."

(Elphinstone's History of India P. 298/299)

ह्या महाकाव्यांत आढळतें. एकंदर राज्य, व त्यांत सामील केलेले अन्य प्रांत, आणि काबीज झालेले मुलूख, याचेंही योग्य संरक्षण होण्यासाठीं चांगला बंदोबस्त, व उत्तम फौज ठेविली असल्याचें दिसतें. आणि म्हणूनच काबीज केलेल्या प्रांतांत पूर्ण शांतता व सुरक्षितपणा होता, असें सहजींच अनुमान होतें.

आपली प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं, रामाला वनांत पाठविणें ज्या वेळीं प्राप्त झालें, त्या वेळीं त्याला वनवासाचें दुःख यत्किंचिद्देखील होऊं नये म्हणून, त्याच्याबरोबर भरपूर व सर्व प्रकारची सामग्री देण्याचें दशरथानें योजिलें. संरक्षणासाठीं[1] चतुरंगसेना, पोषणासाठीं[2] धान्यकोश, दानधर्मादि व्यवहारासाठीं भरपूर[3] खजिना, भूषणासाठीं रत्नखचित अलंकार आणि ते पुरविणारे जवाहिरे, गानवाद्यादिकांनीं मनोरंजन होण्यासाठीं वारांगना[4], कुस्त्या

[1] सूतरत्नसुसंपूर्णाचतुर्विधवलाचमूः ।
राघवस्यानुयात्रार्थेक्षिप्रंप्रतिविधीयताम् ॥ २ ॥

[2] धान्यकोशश्चयःकश्चिद्धनकोशश्चमामकः[3] ।
तौराममनुगच्छेतांवसंतंनिर्जनंवने ॥ ७ ॥

[5] रूपाजीवाश्चवादिन्योवणिजश्चमहाधनाः[4] ।
शोभयंतुकुमारस्यवाहिनीःसुप्रसारिताः ॥ ३ ॥

(वा. रा. अयोध्याकांड २. सर्ग ३६. पोथी पृष्ठ ६९।७०.)

पाहण्यासाठीं मल्ल[1], मृगयेसाठीं शिकारी, वाट दाखविण्यासाठीं वाटाडे, नानाप्रकारचीं आयुधें, गाड्या, व घोंडे, आणि मनुष्यें, असा सर्व थाट रामचंद्राबरोबर द्यावयाचा होता[2].

तसेंच, रामप्रव्रजनानंतर, भरताला रामदर्शनाची अत्युत्कट इच्छा झाली. तेव्हां, त्याच्या शोधार्थ तो आपली निवडक प्रजा घेऊन निघाला. त्या वेळीं भरताची स्वारी मोठ्या समारंभानें बाहेर पडली असून, तींत नामांकित शिल्पिवर्ग[3] आणि इतर बहुतेक धंद्याचे लोक होते. उत्तम वाटाडे, नानाप्रदेश जाणणारे चांगले भोम्ये,

१ येचैनमुपजीवंति रमतेयैश्चवीर्यतः ।
तेषांबहुविधंदत्वा तानप्यत्रनियोजय ॥ ४ ॥

२ आयुधानिच मुख्यानि नागराःशकटानिच ।
अनुगच्छंतुकाकुत्स्थं व्याधाश्चारण्यकोविदाः ॥ ५ ॥
( वा. रा. अयोध्याकांड २. सर्ग ३६ पोथी पृष्ठ ७० )

३ अथभूमिप्रदेशज्ञाः सूत्रकर्म विशारदाः ।
स्वकर्माभिरताः शूराः खनकायंत्रकास्तथा ॥ १ ॥
कर्मांतिकाः स्थपतयः पुरुषा यंत्रकोविदाः ।
तथावर्धकयश्चैव मार्गिणो वृक्षतक्षकाः ॥ २ ॥
सूपकाराःसुधाकारावंशचर्मकृतस्तथा ।
समर्थायेचद्रष्टारः पुरतश्च प्रतस्थिरे ॥ ३ ॥
ते स्ववारं समास्थाय वर्त्मकर्मणि कोविदाः ।
करणैर्विविधोपेतैः पुरस्तात्संप्रतस्थिरे ॥ ५ ॥
( वा. रा. अयोध्याकांड २. सर्ग ८० पोथी पृष्ठ १३६।१३७ )

वाटेंतील झाडें तोडून मार्ग साफ करणारे, तंतु वगैरे शिवणारे, शिबिरादि निर्माण करणारे, निर्जल देशांत पाणी काढणारे, विहिरी खणणारे, पाण्याचे यंत्र तयार करणारे, बांबू काम करणारे, चर्मकाम करणारे, सुतार, लोहार, कासार, तांबट, आणि नानाविध पाक निष्पत्ति व रस तयार करणारे, इत्यादि अखिल जनसमूह त्याच्याबरोबर होता. यावरून तत्कालीन लोकस्थितीचें व समाजरचनेचें उत्तम दिग्दर्शन होतें.

---

# महाभारत.

महाभारताचा काल.

**रामायणा**नंतर दुसरें प्रसिद्ध महाकाव्य ह्मटलें ह्मणजे **महाभारत** होय. **कौरव** आणि **पांडव** यांजमध्यें राज्यविभागाकरितां अतिप्रचंड यादवी माजून जें तुमल व घनघोर युद्ध झालें; त्याचेंच यथार्थ वर्णन **महाभारत** काव्यांत अप्रतीम आणि चमत्कारिक काव्यरचनेनें अलंकृत केलेलें दृष्टीस पडतें. हें **भारतयुद्ध** कधीं झालें अशाविषयीं एक कालसूचक शिलालेख **धारवाड** आणि **ह्मैसूर** परगण्यांत **इवळी** येथील देवालयांत सांपडला आहे. सदरहु पाषण लेखाचा काल शके ५०६, ह्मणजे इ. स. ५८४ असून, **भारतयुद्धा**चा काल तत्कालीन शकाअन्वयें

३७३० वर्षे असल्याचें, त्या शिलार्पित लेखावरून कळतें. त्यावरून शक कालाच्या सहाव्या शतकाच्या आरंभीं, **महाभारत** युद्धाला ४२३६[१] वर्षें, किंवा स्थूलमानानें ४००० चार हजारांवर वर्षें होऊन गेलीं होतीं, असें अनुमान होतें. सदरहु युद्धानंतर कांहीं कालानें **महाभारत** ग्रंथ तयार झाला असावा.

आतां, ज्या अर्थी **रामायणां**त **महाभारतां**तील कथानकांचा यत्किंचितही उल्लेख नाहीं, त्या अर्थी तें युद्ध होण्यापूर्वींच, ह्मणजे आज मित्तीस सुमारें पांच ५००० हजार वर्षांवर किंवा इ. स. पूर्वी ४००० वर्षांवर, महाकाव्य **रामायण** रचलें असावें, असें वाटतें..

ऐतरेय ब्राह्मण, व सूत्रांचा काल.

मागें सांगितल्याप्रमाणें **आश्वलायन** गृह्यसूत्रांत **महाभारता**चा उल्लेख असून, शिवाय **ऐतरेय ब्राह्मणां**त देखील त्यांतील कांहीं कथाभागांच्या मुख्य पात्रांचा निर्देश केल्याचें दिसतें. आतां, तिन्ही **वेदां**च्या **ब्राह्मणां**चा काल **श्रौत** व **गृह्यसूत्रां**च्या पूर्वींचा असून,

---

१. "It thus appears that in the latter part of the sixth century the war which forms the theme of the Mahâ Bhârata was considered to have taken place about four thousand years before."

(Journal B. B. R. A. S. Antiquity of Mâhâ Bhârata.)

सदरहू **सूत्रांचा** काल इ. स. पूर्वी १००० वर्षे होय. त्यावरून एकंदर अनुमान करितां असें दिसतें कीं, **महाभारत** हें महाकाव्य रचल्याला सुमारें तीन ३००० हजार वर्षें झालीं असावींत. आणि हें, लोकांची तद्विषयक पूज्य बुद्धि, अनुपम प्रेम, व त्यांच्या ह्रदयांत बिंबलेली दृढतर श्रद्धा, इत्यादि प्रमाणांवरून संभवनीयही वाटतें.

महाभारत.

१ याप्रमाणें **महाभारत** काव्याचा इतका पुराणकाल असून, तें इ. स. १९२१ सालानंतर झालें असावें, अशाविषयीं **कर्नल एलिस**[२] यांचें म्हणणें आहे.

रामायण.

२ तसेंच **रामायण** महाकाव्य हें त्यापेक्षां देखील फार जुनाट असून, तें इ. स. च्या प्रारंभीं किंवा त्या सुमारास झालें असावें असें **प्रोफेसर वेबर**[३] यांचें प्रतिपादन आहे.

वेद.

३ व ह्या दोहोंपेक्षांही **ऋग्वेद** हे अति पुराण, आणि विशेषतः अखिल जगाचे **आदिलेख** असून ते व हिंदूंचा इतर

---

१. What can India teach us? By Pro. Max-Muller.

(P. 207.)

२. Journal of the Bombay Branch of the Royal Asiatic Society.

No. XXVIII. Vol. X. 1871-72. P. P. 81-82.

३. Indian Antiquary.

ग्रंथसमूह, हे यच्चावत् ब्राह्मणांनीं पश्चात् लिहिलेले केवळ बनावट लेख आहेत, असा ड्युगल्ड[३] स्टुअर्ट याचा सिद्धांत आहे.

बरें. एवढ्यावरच असल्या प्रकारच्या विद्वानांची मजल येऊन ठेपली नाहीं. त्यांच्या तर्कशक्तीनें यापेक्षांही पुढें धाव घेतली.

४ आमचीं षड्दर्शनें, आमची अध्यात्मविद्या, आणि आमचा धर्म, यांत देखील ख्रिस्ती धर्माचीं मूलतत्त्वें दृग्गोचर होतात, असें लॉरिन्सर प्रभृति गृहस्थांचें मत आहे.

धर्म, आणि

५ तसेंच आमच्या शास्त्र व कलासमूहांत, आमच्या अंगचे गुण, किंवा स्वतःचें चातुर्य नसून, त्यांत नैसार्गिक प्रभावच जास्त दिसतो, असा भिल्ल[३] वगैरे यांचा तर्क आहे.

कला, ह्या सर्वांत कांहींना कांहीं तरी न्यून दाखविण्याविषयीं पाश्चात्यांचा प्रयत्न.

मिळून एतावता, आमचे वेद व आमचीं महाकाव्यें, आमचीं षड्दर्शनें व आमची अध्यात्मविद्या, आमचा

१. What can India teach us?
( By Pro. Max Muller. P. 28. )

२. History of Indian Literature. P. 238 Note 252 and *.

३. Mills British India. " It is difficult to say, how much of the wonderful in these excavations, may be the work of nature."

धर्म व आमचा शास्त्रकलाप, या सर्वांत कांहींना कांहीं तरी निष्कारण व्यंग दाखविण्याचा सदरहू पाश्चिमात्यांचा क्षुद्र प्रयत्न उघड दिसून येतो.

सदरहू मतांचें यथार्थ खंडन.

आतां, हें त्यांचें प्रतिपादन, किंवा सदरहू प्रकारचें मतप्रकाशन, योग्य व आधारसहीत असतें; अथवा त्याबद्दल सकारण असें बलवत्तर प्रमाण तें दाखवितें; तर त्या कामीं आमचें कांहींच ह्मणणें नव्हतें. परंतु तसा यत्किंचित्ही प्रकार नसून, वरील सर्व मतें केवळ निराधारच आहेत, असें नानाशास्त्रविशारदांनीं ठरविलें आहे.

१ महाभारत काव्य फार प्राचीन असल्याविषयीं डाक्तर रामकृष्ण गोपाल भांडारकर यांनीं कर्नल् एलीसच्या लेखाचें अत्युत्तम खंडन केलें आहे. २ रामायण हें महाकाव्य त्याहीपेक्षां पुराणतर असून, होमर काव्यांतील यत्किंचित्ही अनुकरण त्यांत नाहीं, अशाविषयीं फार मार्मिक व खरपूस टीका प्रोफेसर वेबरच्या लेखावर, नामदार काशीनाथ त्रिंबक तेलंग यांनीं केली आहे.

---

१. "Consideration of the date of the Mábábhárata" in connection with the correspondence from Col. Ellis. By R. G. Bhandarkar M. A.
(R. A. S. Journal Vol. X. P. P. 81/92.)

२. "Was Râmâyan copied from Homer"
(By the Hon. Mr. K. T. Telang.)

३ ऋग्वेद व हिंदूंचा असंख्य संस्कृत ग्रंथसमूह हे अगदींच बनावट नाहींत. इतकेंच नाहीं, तर, ते ह्या जगत्तलावरील अति प्राचीन विद्यालंकार असून, ते ब्राह्मणाच्या अचाट आणि अद्भुत बुद्ध्यैश्वर्याचे केवळ स्मारकच आहेत, अशाविषयीं अप्रतीम प्रतिपादन, व डयुगल्ड स्टुअर्ट याच्या कुत्सित आणि क्षुद्र तर्कांचें खरमरीत खंडन मोक्षमुलर यांच्या ग्रंथांतें दिसून येतें. ४ आमच्या हिंदुधर्मांत आणि अध्यात्म विद्येंत खिस्ती धर्माचीं मूलतत्वें आढळतात, असें म्हणणें म्हणजे केवळ बालीशपणा व अज्ञान होय. आणि तत्संबंधीं मनोवेधक चर्चा बकल्च्या इतिहासांत

---

१ "Dugald Stewart, rather than admit a relationship between Hindus and Scots, would rather believe that the whole Sanskrit language and the whole of Sanskrit literature—mind, a literature extending over three thousand years and larger than the ancient literature of either Greece or Rome—was a forgery of those wily priests, the Brahmans."

(What can India teach us? P. 28.)

२. 1 What can India teach us?
2 Ancient Sanskrit Literature.
3 Hibbert Lectures.

३ "That the system of morals propounded in the new Testaments contains no maxim which has not been previously enunciated, and that some of the most beautiful passages in the Apostolic

पुढें चालू.

चांगल्या प्रकारें केली आहे. किरस्तावांचा प्रभु प्रकट होण्यापूर्वी, या भूतलावर सदाचरणाचें बीज आणि नीतीचीं मूलतत्वें हीं कोणासच माहीत नव्हतीं असें म्हणणें, किंवा आकाशांतील बापानें ह्या पृथिवीवर उजेड पाडिल्यावरच तीं पूर्णपणें जागृदवस्थेंत आलीं असें प्रतिपादन करणें, ह्मणजे केवळ स्वधर्माची पोकळ फुशारकी, आणि दुराग्रहाची निष्कारण घमेंडी, यांचें पूर्ण द्योतक होय. किरिस्ताव[1] धर्माचीं मूलतत्वें आमच्या हिंदू धर्मात बिलकूल नाहींत. इतकेंच नाहीं तर, आमच्याच धर्माचीं मूलतत्वें एकत्र करून किरिस्तावानें[2] एक नवीनच धर्म स्थापन केल्याचें उघड दिसतें. कारण, बौद्ध धर्मानें सनातन अशा वेद धर्मांतील नीतितत्वें उचललीं असून, त्याच बौद्ध धर्माचें अगदीं हुबेहूब

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

writings are quotations from pagan authors, is well known to every scholar ; and so far from supplying, as some suppose, an objection against christianity, its a strong recommendations of it, as indicating the intimate relations between the doctrines of Christ and the moral sympathies of mankind in different ages. But to assert that christianity communicated to man moral truths previously unknown, argues, on the part of the asserter, either gross ignorance or else wilful fraud."

(Buckle's History.)

१ ख्रिस्ती धर्माचीं. २ ख्रिस्त तारकानें (The saviour christ.).

अनुकरण किरिस्ताव धर्मीत केलें असल्याचें चांगलें

१. Mr. Chundi Churn Sen writes in the *Mirror* of Calcutta:—A critical study of the life of John the Baptist will clearly show that he was a Buddha Bhikshu or a Buddha Rishi. And as Jesus of Nazareth received his religious instructions from John the Baptist, there can be no doubt that the religion, preached by Jesus, was in its essence the very same that had been preached by Gautama Buddha nearly 1,000 years before his birth. Any of the four gospels of the New Testament will clearly show that a kin to the teachings of Gautam Buddha the teachings of Jesus of Nazareth are replete with the strongest condemnation of the outward and ceremonial practices of religion by the Jews of his time. It is quite apparent that Christianity in its unsectarian form was evolved from, and the sequence of, *Buddhism.*

"Professor Max Muller endeavoured to show that Buddha himself is the original of Saint Josaphat" "while the Name of Josaphat is itself identified by philologers with that of Boddhisatwa, the complete appellation of Buddha,"

"The earlier form of Josaphat was Josaph in Greek and Youasaf or Youdasf in Arabic, an evident derivation from the Sanskrit Boddhisatwa, through the Persian form Boudasp (Weber.) The Name of the Magician Theudos is in like manner an accurate philolagical reproduction of Devadatta or Thevdat."

(Dr. Hunter's Indian Empire.)

P. 151, S. End.

दृग्गोचर होतें. बौद्ध धर्मानंतर सुमारें चारशें वर्षांनीं ख्रैस्ततारक उदयास आला असून, त्या धर्माच्या मूलतत्वांचा त्याजवर चांगला ठसा उमटला, व त्याचा परिणामही लौकरच निदर्शनास आला, हें जास्त सांगण्याची अवश्यकता नाहीं. व ह्याच मताचें अवलंबन निःपतक्षपाती आणि सरल मनाच्या पाश्चात्यांनीं केल्याचें दिसतें. ते उघडपणें असें प्रदिपादन करितात कीं, मूल बौद्ध धर्माची ख्रिस्ती धर्मरचना ही केवळ हुबेहुब छोटेखानी नक्कलच[१] होय.

भगवद्गीतेचें पौराणत्व.

पाश्चात्यांच्या दुराग्रहाचा आणखी एक मासला दाखवितों. भगवद्गीतेंत १ कर्म, २ भक्ति आणि ३ ज्ञान, ह्या योगत्रयांचें सम्मिलन असल्या कारणानें, ती वेदाप्रमाणेंच आह्मां हिंदू लोकांस परमपूज्य असून, ती त्याच कारणानें फार पुराणग्रंथांत मोडते. कारण, ती सुमारें तीन हजार वर्षांपलीकडीलही कालांतील असल्यामुळें,

---

१. "That Christianity was but an inferior copy of a greater original." "That there are startling coincidences between Buddhism and Christianity cannot be denied, and it must likewise be admitted that Buddhism existed at least 400 years before Christianity."

(What can India teach us? P. 279. By Pro. Max Muller.)

ती बौद्ध[1] धर्मापेक्षां देखील पुराणतर आहे. निदान ती इ. स. पूर्वी चवथ्या शतकाच्या अलीकडील तरी खचित नाहीं, असें विद्वान् आणि शाधक पंडितांचें[2] ह्मणणें आहे; व ते अनेक[3] प्रमाणांवरून सिद्धही होत आहे.

असें असून, डाक्तर लॉरिन्सर, लॉसन, वेबर, वगैरे मंडळी असें निःशंकपणें प्रतिपादन करिते कीं, ह्या गीतेंतील मूलतत्वें व नीतिविचार, हीं सर्व नव्या करारां-[4]तूनच घेतलीं आहेत.

आतां, जर गीता बौध धर्मापूर्वी,[5] ह्मणजे इ. स. पू. सुमारें पांचशे वर्षे अगोदर उदयास आली होती तर,

---

१. "But in the absence of any thing else, I think that they (materials) furnish quite sufficient ground for holding, at least as a sort of provisional hypothesis, that the Gita is older, and not later, than the rise of Buddism."

(Bhagwatgita. By the Hon'ble Mr. Telang.)

२. ... "Then upon the foregoing argument the Gita must have been composed at the latest somewhere about the fourth Century B. C." (Bhagwatgita by Telang.)

३ Vide the Introductory Essay on Bhagwatgita. (By the Hon'ble Mr. Telang.)

४ The New Testament of the Bible.

५ बुद्ध निर्वाण काल. इ. स. पूर्वी ५४४. वर्षे. (H. I. L.)

पाश्चात्यांच्या आ-क्षेपांचें वालिशत्व.

इ. स. नंतर जो नवा[1] करार आकाशांतल्या बापानें[2] प्रकट केला, त्यांतील धर्माचीं अथवा नीतीचीं तत्वें गीतेंत कोठून येणार? अर्थात्च नाहीं. आणि जर ही गोष्ट अशा प्रकारें इतकी दर्शनीच उघड आहे तर, ती उलट सुलट बनावट करून, जगापुढें कांहीं तरी भलतेंच मांडण्यांत काय हेतु असावा, याविषयीं मनांत साहजीकच विकल्प उत्पन्न होतो. परंतु, ह्या कोडाचा उलगडा डाक्तर लारिन्सर यांणीं आपण होऊनच कृपा करून केला आहे, त्याबद्दल आपण त्यांचे फार आभारी असलें पाहिजे. ते असें ह्मणतात[3] कीं, 'येन केन प्रकारेण भगवद्गीतेला अर्वाचीनत्व आणून, नव्या करारांतील मतांचेंच तिच्यांत प्रतिबिंब उठलें आहे, इतकेंच सिद्ध करून दाखविण्याचा आमचा हेतु आहे.' वाहवा !!

---

१ New Testament.

२ येशूख्रिस्तानें.

३ Dr. Lorinser says, "our aim here then must be to establish that the Bhagwadgita may be attributed to a period in which it is not impossible that its Composer may have been acquainted.. ...........with different books of the New Testament."

( Bhagwat Gita. By K. T. Talang. )

शाबासरे गडी !! धन्य तुमची !! घटित गोष्टीवरून किंवा वस्तुस्थितीअन्वयें, अमुक एक गोष्ट सिद्ध आहे, असें शोधक व निःपक्षपाती इतिहासज्ञ प्रतिपादन करितात. परंतु आमच्या ह्या राजश्रींचें सगळेंच उलट. हे गृहस्थ इच्छित गोष्ट आपल्या मनाप्रमाणें स्थापित करण्यासाठीं, घटित गोष्टींत किंवा वस्तुस्थितींत देखील फेरबदल करूं पाहतात. आहेकनी कांहीं कांहीं **पाश्चात्यांची** विलक्षण कोटी ??

त्यांचा दुराग्रह.

**गीतेंत बायबलांतील** नीतितत्वांचें अवलंबन केलें आहे, इतकें शाबीद करण्यासाठीं सदरहू गृहस्थांनीं जणूकाय **विडाच** उचलल्यासारिखें दिसतें. आपलें मत हवेंत्या प्रकारें, अथवा कोणत्याही सूक्त **असूक्त** रीतीनें सिद्ध करण्याची **डाक्तर लारिन्सर** यांची "अपूर्व" शैली पाहून, एका **फ्रेंच** तत्ववेत्त्याची आठवण येते. तो असें ह्मणतो कीं, 'घटित गोष्टी अथवा एकंदर वस्तुस्थिति जर माझ्या इच्छेनुरूप जुळत्या येणार नाहींत, तर त्या गोष्टींतच मी जरूर तो फेरफार करीन.'

असो. एकंदरींत विद्वान मंडळी खरी !!! बरें, ह्यांचेच

---

१ The French philosopher says:—"If the facts do not suit my theory, so much the worse for the facts."

त्या दुराग्रहाचें खंडन.

श्वेतबंधु डाक्तर स्ट्रॉसस[१] असें लिहितात कीं, 'नव्या करारांतें चवथें पुस्तक पारदेशिक भूमींतच उदयास आलें असून, येशूचें ज्या मूळ मंडळींत बसणें उठणें असे, त्या मंडळीला श्रुतही नव्हते अशा ज्ञानतत्वांचे संस्कार व प्राबल्य, त्यांत दिसून येतें. डीन मिल्मन्चाही[२] असाच अभिप्राय आहे. ते म्हणतात कीं, 'भरतखंडांत ज्या मतांचा प्रभव झाला त्या मतांचेंच विशेष प्राबल्य पाश्चिमात्य देशांत अनेक शतकें होऊन, त्यांचाच संस्कार ख्रिस्ती धर्मावर मुख्यत्वेंकरून झाला.' आणि हें ह्मणणेंही अगदीं सयुक्तिक दिसतें. कारण, ग्रीस देशांतील पिथॅगोरस हा हिंदुस्थानांत आला असून, त्यानें ब्राम्हणांपासूनच तत्वविद्याशास्त्र व कांहीं दर्शनें समजावून घेतलीं होतीं. तसेंच, ज्या वेळीं शिकंदराची स्वारी ह्या देशावर आली होती, त्या वेळीं देखील ग्रीक लोकांनीं

१ The fourth Gospel, he says, " bears every indication of having arisen upon a foreign soil; and under the influence of a philosophy of the time unknown to the original circle in which Jesus lived."

२ Dean Milman has said, that " it is by no means improbable that tenets which had their origin in India have for many centuries predominated in, or materially affected, the christianity of the whole Western World."

हिंदूंपासून अनेक विषयांचें ज्ञान संपादन करून घेतलें असून, त्यांत अध्यात्म विद्येविषयीं तर त्यांनीं आपली अत्युत्कट लालसा प्रदर्शित केली असल्याचें दिसतें. कारण, ते लोक आमच्या हिंदूंच्या अध्यात्मज्ञानाविषयीं फारच गौरवानें वर्णन करितात. आणि ह्यासंबंधानें ते आमचे पूर्ण ऋणी आहेत, असें त्यांच्याच लेखांवरून निर्विवाद सिद्ध होतें.

भक्ति व श्रद्धेचें पौराणत्व.

डाक्तर लारिन्सर प्रभृतींचें आणखी असेंही ह्मणणें आहे कीं, भक्ति व श्रद्धा हीं दोन्हीं, मूर्तिपूजकांत गीतेशिवाय अन्यत्र कोठेंही ग्रंथांतरीं आढळत नसून, तीं ख्रिस्ती धर्मांतूनच गीताकारानें उचलून घेतलीं आहेत. ह्या त्यांच्या ह्मणण्यास देखील बिलकुल आधार नाहीं, व त्यांच्या इतर प्रमेयांप्रमाणें, हें ह्मणणें देखील प्रमाण-

१ "They (the Greeks) had, however, a great impression of their (Brahmin's) wisdom."

(Elphinstone's History of India.)

२ "And Onesicritus, whose conversations with them (Hindus) on philosophy have been already mentioned, expressly says that they inquired whether the Greeks ever held similar discourses, and makes it manifest that they were entirely uninformed regarding the sciences and opinions of his countrymen" (the Greeks.)

(Elphistone's India P. P. 471/472.)

रहितच आहे. कारण, **श्रद्धा** हा शब्द **पतंजलीच्या महाभाष्यांत** आढळत असून, हा ऋषि इ० स० पूर्वी सुमारें दुसऱ्या शतकांत होऊन गेला. शिवाय **श्रद्धा** शब्द **मनुस्मृतींतही** आढळतो; व हा स्मृतिकार इ. स. पूर्वी सुमारें नऊ शतकें अगोदर होऊन गेला. याहीपेक्षां बलवत्तर आणि विशेष प्राचीन आधार ह्मटला म्हणजे **उपनिषदें** असून, त्यांत देखील **श्रद्धा** शब्दाचा उपयोग केल्याचें दिसून येतें. आतां, **उपनिषदांचा** काल इ. स. पूर्वी तीन चार हजार वर्षांवर असून, **छांन्दोग्योपनिषद्** हें तर अति पुराण उपनिषदांपैकीं आहे. सर्वांत प्राचीनतम आधार असा **वेदच** होय. ह्यापेक्षां जास्त पुराणतर ग्रंथच ह्या भूतलावर नाहीं. अशा जुनाट

---

१ "श्रद्धामेधं." "श्रद्धातपसि"
Comment on Panini II 2-34.

२ पतंजलीचा काल इ. स. पूर्वी १४३ वर्षं होय.

३ "वार्यपि श्रद्धयादत्तमक्षयायोपकल्पते ।।" म. स्मृ. अ. ३. २०२.
"यद्यद्ददातिविधिवत्सम्यक्श्रद्धासमन्वितः" म. स्मृ. अ. ३. २७५.
श्रद्दधानोऽनसूयश्च शतंवर्षाणिजीवति ।। १५८
श्रद्धाकृतेह्यक्षयेतेभवतःस्वागतैर्धनैः ।। म. स्मृ. अ. ४. २२६

४ "This would make the author of the code live about 900 years before Christ"
( Elphinstone's India. )

५ "यदेवविद्ययाकरोतिश्रद्धयाउपनिषदातदेववीर्यवत्तरंभवति"
।। छान्दोग्योपनिषद् ।।

भारतीय विद्यामृतदुर्गांत देखील श्रद्धा[1] शब्दाचा उपयोग वारंवार केल्याचें आढळतें. एतावता, श्रद्धान्तर्गत "भाव" हा आम्हां हिंदूंस नूतन किंवा पारदेशिक नाहीं. इतकेंच नाहीं तर, तो आमच्या आर्यपरंपरेंतच खिळला आहे, असें कोणाच्याही लक्ष्यांत आल्यावांचून खचित राहणार नाहीं.

भारतीयांचें पाश्चात्यांच्या शिरावरील ऋण,

मिळून एकंदरींत इतकें अगदीं निर्विवाद सिद्ध आहे कीं, हिंदुधर्मांत ख्रिस्तीधर्माचा यत्किंचित् देखील गंध नसून, ह्या नूतन व परपोषित अशा ख्रिस्तीधर्मावरच, आमच्या हिंदुधर्मांतील नीतितत्वांचे व अध्यात्मविद्येचे अनेक संस्कार, बहुत शतकेंपर्यंत एकसारखे घडून आले आहेत. आणि हा नवीन धर्म उदयास आणण्याकरितांच आर्य व बौद्धधर्मांचें येशूख्रिस्तानें[2] संमिलन केलें, व

---

१ ऋग्वेद. मंडल (२. १. १२. ५). (२. ३. २३. ६). (७. २. ३२. १४). (९. ७. ११३. २).

२ "On the contrary, the conclusion to which the facts and probabilities of the case seem to point as more probable is one which adherents of that theory have not condescended even to glance at, namely, that it is *Christianity which has borrowed from Hinduism,* and not *Hinduism which has borrowed from Christianity.*" ( Bhagwat Gsità. )

त्यांतील कांहीं कांहीं गोष्टी व नीतितत्वें मात्र स्वीकारिलीं, हें निर्विवाद आहे.

पाश्च त्यांच्या कुटिल वर्तनाचें फल.

परधर्माचें निष्कारण व निराधार उणें काढून, आपल्या धर्माची वृथैव थोरवी, सूक्त वा असूक्त साधनांनीं, जगापुढें ठेवण्याची ही कांहीं कांहीं **पाश्चात्यां**ची अलौकिकच चाल दिसून येते. ह्या कुटिल वर्तनामुळें त्यांचा इच्छित कार्यभाग तर मुळींच सिद्धीस जात नाहीं; पण उलट त्यांची प्रौढी आणि वजन हीं मात्र अगदीं जाया होतात. एके ठिकाणीं **युसेबियस्**[१] हा पर्यायानें असें कबूल करतो कीं, ' जेणेंकरून आपल्या धर्माचें वैभव वाढेल त्या सर्व गोष्टी आपण लिहिल्या असून, ज्या गोष्टींनीं आपल्या धर्मास कालिमा येईल त्या सर्व आपण गाळल्या आहेत. ' तेव्हां अशा प्रकारच्या इतिहासकारास किती योग्यता व काय किंमत आहे, हें जास्त सांगावयास नलगे. ह्या रीतीचें अन्यायमूलक आचरण कोणाला देखील आवडणार नाहीं. मग तें **गिबन्**सारख्या इतिहासकारास तर कोठून रुचणार ? एके ठिकाणीं तो असें लिहितो कीं:—

" The gravest of the ecclesiastical historians, Eusebius himself, indirectly confesses that he has

---

१ हा एक ख्रिस्तीधर्मावर लिहिणारा इतिहासकार होऊन गेला.

२ See Decline and fall, Vol. II 68 ( Roman Empire ) By Gibbon.

related whatever might redound to the glory, and that he has suppressed all that could tend to the disgrace, of his religion."

"Such an acknowledgement will naturally excite suspicion that a writer who has so openly violated one of the fundamental laws of history has not paid a very strict regard to the observance of the other."

पाश्चात्यांच्या विपक्षवृत्तीचा मसला.

कांहीं पाश्चात्यांची अशा प्रकारची मत्सरबुद्धि, व त्यांतही विशेषतः विद्वान आणि बहुश्रुत मंडळीचीही तीक्ष्ण असूया पाहून, अशी कोणाचीही सहजी कल्पना होते कीं ह्या लोकांनीं हिंदूंविषयीं विपक्षवृत्तीचें अवलंबन केल्या कारणानें, हिंदूंचा धर्म, त्यांच्या संस्था, त्यांचीं शास्त्रें, त्यांचे कलासमूह, आणि त्यांचे तत्वविचार,

---

१ "I should like to see a possibility by which we could explain the addition not of the Vàlakhilya hymns only. but of other much more modern sounding hymns, at a later time than the period of the Pràtishàkhya."

"I say again that I am not free from misgivings on the subject, and my critical conscience would be far better satisfied if we could ascribe the Pràtishàkya, and all it presupposes to a much later date."

Maxmuller. (Translation of the Rigveda. I Introduction.)

हीं यच्चावत् ते दूषितें[१] दृष्टीनेंच पाहतात. कारण, पाश्चात्यांचें तेवढें चांगलें, व त्यांजपासूनच इतर राष्ट्रांचें जीवनें[२], हा त्यांजला वृथाभिमान झाल्यामुळें, सत्यशोधा-अंतीं जेव्हा जेव्हां त्यांची ती पोकळ घमेंडी खोटी होऊं पाहते; व धर्म अथवा तत्वविचार, शास्त्र अथवा कला, आणि ग्रामसंस्था अथवा स्थानिक स्वराज्य, इत्यादि सर्वांचा उदय प्राची दिशेकडे भरतखंडांतच[३] प्रथम होऊन तिकडूनच सर्वत्र प्रकाश पडला, असें सप्रमाण माप जेव्हां त्यांच्या पदरांत पडतें; तेव्हां असूया व मत्सर, यांचे ते बंदे गुलाम होऊन, मनाची समता सोडतात. आणि हिंदूंचें मूळचें कांहींच नाहीं; त्याचें जें ह्मणून कांहीं

---

१ " *A contempt for all that is Asiatic* too often marks *our countrymen* in the East though at one period the *taunt* might have been *reversed*."

( Tod's History of Râjasthan P.117,118 )

२ " Except the blind forces of Nature, nothing moves in this world which is not Greek in its origin."

( Maine's village communities P. 238 )

३ " the Hindu writings abound in every branch of science. * * * * and that wherever we direct our attention to Hindu literature, the notion of infinity presents itself. "

( Essays and speeches of Mr, Dadabhai M.P, )

आहे तें सर्व अर्वाचीनें व अन्यद्वारें घेतलेलें; ते असत्यवादी व लबाड आहेत; असें ते भलभलत्याच साधनांनीं निराधार प्रतिपादन करितात. परंतु ' सत्यं जयते ' या न्यायानें, त्यांच्या प्रलापापासून आमचा कांहींच तोटा न होतां, ते मात्र जगाच्या उचित उपहास्यतेस पात्र होतात.

९ आतां हिंदूंच्या कलांत देखील हस्तपाटवापेक्षां-

---

१ "But Col. Ellis does not seem to consider them to be weighty, and in the view he has put forth he but represents, in a somewhat exaggerated form, the tendency of most European scholars and antiquarians to modernize every thing Hindu."

(Dr. Bhandarkar on the date of महाभारत)

"It appears to me that in these days, there has set in a powerful tendency in Europe to set down individual works and classes of works of our ancient Sanskrit Literature to as late a date as possible." * * * * *

"Yet I submit with all respect, but with very great confidence, that they (European scholars) betray a frame of mind which is the reverse of scientific."

(The Hon'ble Mr. Telang's भगवद्गीता.)

२. Mill's History of India. Crawford's Paper "on the European and Asiatic races."

मिल, नैसर्गिक प्राबल्यच जास्त दिसून येतें, असें जें मिल्लचें[1] ह्मणणें आहे, त्यावरही विलसननें[2] चर्चेरीत टीका केली असल्याचें दिसून येतें.

मूढ व अज्ञ जनांनीं अशा प्रकारच्या वृत्तीचें अवलंबन करावें, यांत तर कांहींच नवल नाहीं. परंतु सुशिक्षित आणि विद्वान ह्मणविणाऱ्या बड्या बड्या पंडितांनीं देखील असेंच वर्तावें; आणि आपलें तेंच खरें, असें केवळ दर्पानें प्रतिपादन करावें; किंवा ज्या त्या कामांत, "माझेंच घोडें आणि जाऊं द्या पुढें," या ह्मणी सारिखें आचरण ठेवावें; अथवा भारतीयांचा प्रचंड गुणोत्कर्ष सहन न झाल्याकारणानें, त्यांच्या उत्कट उत्साहशक्तीचें व विलक्षण बुद्धिवैभवाचें प्रोत्साहन करणें तर एकीकडेसच राहून

---

१. Mill's British India.

२. "This laborious description of the architecture of the Hindus affords some curious specimens of the inveteracy of the author's prejudices. In his zeal to undervalue the cavern-temples of the Hindus, he even insinuates that they are not artificial. "It is difficult to say, how much of the wonderful in these excavations, may be the work of Nature." He seemed inclined, with Bryant, to think that it was not impossible that the pyramids had dropped from the clouds, or sprung out of the soil."

(Mill's British India. Wilson's note.)

त्यांची उलट निंदा व्हावी, यासारिखें शोचनीय आणि कष्टतर तें आणखी दुसरें काय असावें !

अशा प्रकारचें प्रतिपादन कधीं कधीं निव्वळ दुराग्रहाचेंच असतें. आणि तसें असलें म्हणजे त्या लिहिण्यांत, किंवा प्रतिपादनांत सुद्धां, कांहींच मेळ राहत नाहीं.

मोक्षमुलर.

एके ठिकाणीं **मोक्षमुलरनीं** असा सिद्धांत ठोकून दिला आहे कीं, **पाणिनीला** लेखनकला माहीतच नव्हती.[१] परंतु, हेच पंडित दुसऱ्या एके स्थळीं असें लिहितात कीं, **पाणिनीला** लेखनकलेचें ज्ञान होतें.[२] आणि हा विसंवादी व परस्पर

---

१. "If writing had been known to Panini, some of his grammatical terms would surely point to the graphical appearance of words. I maintain that there is not a single word in Paninis' terminology which presupposes the existence of writing."

"But there are stranger arguments than these, to prove that, before the time of Panini, and before the first spreading of Buddhism in India, writing for literary purposes was absolutely unknown."

(Maxmuller.)

२. "This last word *lipikara* is an important word, for it is the only word in the Sutras of Panini which can be legitimately adduced to prove that

पुढें चालू.

विरोधी लेख, जेव्हां पंडित मजकुरांच्या पुढें ठेविला, तेव्हां त्यांजला ही आपली चूक[१] कबूल करणें भाग पडलें.

वेवर.

विषय प्रतिपादन करण्याची वेवर प्रभृतींची पद्धति कशा मासल्याची आहे, हें गोल्ड्स्टकर सारख्या विद्वान् गृहस्थांच्या लेखांवरून[२] चांगलेंच व्यक्त होण्यासारिखें आहे. ते बहुत-

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

Panini was acquainted with the art of writing. He teaches the formation of this word, iii, 2, 21,"

(Maxmuller.)

वैदिक ग्रंथांत, किंवा सूत्रांत, आर्यलेखनकलेचे द्योतक असे शब्द पुष्कळ दृष्टीस पडतात, हें वांचकांनीं विशेष लक्षांत ठेवावें.

१. "It is possible I may have overlooked some words in the Bràhmanas and Sutras, which would prove the existence of written books previous to Panini. If so, it is not from any wish to suppress them." (Maxmuller.)

२ "Thus it seems that Professor Weber would make up his mind to that effect if some one would comply with his desire, and confirm the result of Colebrooke's calculation. But we must ask, on what ground rests this desire, which, in other words, is nothing but a very off-hand slur aimed at Colebrook's scholarship or accuracy." * * *

"But Colebrooke was not only a distinguished Sanskritist, he was an excellent astronomer."

(Goldstucker on Pánini. PP. 75-76).

करून नेहमीं आपलेंच मत खरें आहे, असें समजतात. **कोलब्रूक** सारख्या शोधक पंडिताचें मत देखील त्यांजला संमत नसतें; आणि तें खोटें आहे असें सिद्ध करण्यासही ते तयार नसतात. एतावता, केवळ आपल्या मताप्रमाणेंच कोणतीही गोष्ट शाबीद ठरविण्यास ते तत्पर असतात.[१] आणि क्वचित् प्रसंगीं ह्यांचीं निराधार मतें खोडून काढण्यास कोणी तयार झाला तर, त्याला वेडा ठरवून, त्याच्यावर शिव्यांचा सूक्तअसूक्त भडिमार करण्यास देखील ते कधींही मागें पुढें पाहत नाहींत.[२]

रॉथ.

**प्रोफेसर रॉथ**चा वृथादर्प तर गगनांतच मावेनासा झाला. त्याचें असें म्हणणें आहे कीं, वेदार्थप्रकाशनार्थ आपल्यासारखे प-

१. "In short, with fantastical certainty he scruples about astronomical facts, and presents fantastical facts with astronomical certainty. I doubt whether this critical method will strengthen the faith of the general public in certain results of Sanskrit philology.'

( Goldstucker on Panini. P. 77 ).

२ हा प्रसंग खुद्द गोल्ड्स्टकर यांजवरच गुजरलेला असल्यामुळें, प्रत्यक्ष त्यांचाच अनुभव त्यांच्याच मुखानें सांगतों. ते ह्मणतात,

"Professor Weber, who is also in the service of Worterbuch, suddenly attacked me in this journal, nor, indeed, with any thing that deserves the name of argument, but with personal abuse of the coarsest kind."

पुढें चालू.

रिश्रम आजपर्यंत कोणींही केले नाहींत. सायणाचार्यांनीं नें वेदावर भाष्य केलें, किंवा, इतर टीकाकार व कोषकार, यांनीं वेदार्थ व्यक्त होण्याच्या हेतूनें जे जे प्रयत्न केले, ते सर्व आपल्या श्रमापुढें फिकेच होत. आतां या गर्वोक्तीची किती किंमत आहे, हें गोल्डस्टकरचा ग्रंथ अवलोकन

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

'And of myself he (Weber) says, that my 'orthodox faith in the authority of native exegetes and grammarians' is something perfectly bewildering; indeed, it presupposes the 'derangement of my mental faculties.'

(Goldstucker on Panini. PP. 261-263).

१. "We have, therefore, endeavoured to take the road which is prescribed by philology: to elicit the sense of the texts by putting together all the passages which are kindred either in regard to their words or their sense; a road which is slow and tedious, and which, indeed, has not been trodden before, either by the commentators or the translators. Our double lot has, therefore been that of exegetes as well as lexicographers."

(Professor Roth's commentory on Rigweda. & c.)

२. "A bolder statement I defy any scholar to have met with in any book." * * * Professor Roth passed some time at Paris, and some little time in London also, when collecting his valuable materials for his edition of Yáska's Nirukta.' * * * "Thus, when he began his 'exegetical' work, he was only

पुढें चालू.

केल्यानें वाचकांच्या लक्षांत पूर्णपणें येईल. परंतु वास्तविक

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

acquainted with the commentary of Sáyana as far as the first Ashtaka; and when he wrote these lines, he may perhaps have known its continuation up to a portion of the third Ashtaka—in other words, no more than a third of Sàyana's whole commentary on the Rigveda; and yet he ventures to speak of the whole commentary of Sàyana, and to say that he can do what Sáyana was unable to perform? But we almost forget that the words of Professor Roth are by no means restricted to the Rigveda commentary alone; it embraces the commentaries to all the Samhitàs." * * * And yet he has the courage to pass this sweeping condemnation on all these gigantic labours of the Hindu mind, while ignorant of all but the merest fraction of them?" * * "I will merely here state that I know of no work which has come before the public with such unmeasured pretensions of scholarship and critical ingenuity as this Worterbuch, and which has, at the same time, laid itself open to such serious reproaches of the profoundest grammatical ignorance." * * *

"Or to speak in plain prose, I shall prove to Professor Roth by means of those same authorities which I have so often impressed on the readers' mind, that his Dictionary has created many meanings without the *slightest regard* to the *grammatical properties* of the word, and, in consequence, that

पुढें चालू

रीतीनें विचार करतां, माधवसायण[१] हा ल्हान सहान विद्वान नव्हता. खरोखर, तें एक मोठें प्रचंड धेंड, व जाडीच प्रकरण होतें. तो सर्व शास्त्रांत पारंगत व निपुण होता; आणि पाणिनि, व कात्यायन, हे तर त्याच्या मुखोद्गतच होते. तो मोठा प्रौढ मीमांसाकार आणि प्रसिद्ध वैयाकरणी असे. चारही वेदांत तो निष्णात होता, आणि म्हणूनच त्यानें वेद, ब्राह्मण, व कल्प, यांजवर नामांकित भाष्य केलें. ही त्याची अमूल्य देशसेवा इतकी महत्वाची आहे कीं, त्याबद्दल आम्ही भारतीयांनीं चर्से

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू

his Vaidik exegesis in all these numerous and important instances has just that worth which a Veda revealed by Professor Roth has in comparison with the Veda of India."

(Goldstucker on Panini. P. P. 248,249-251-252.)

१. "Mádhava-Sáyana, one of the profoundest scholars of India, the exegete of all the three Vedas as he tells us himself,--of the most important Brahmanas and a Kalpa work, Mádhava,, the renowned Mimânsist--he, the great grammarian, who wrote the learned commentary on the Sanskrit radicals, who shows at every step that he has Pànini and Kàtyayana at his fingers' ends--Mádhava, who, on account of his gigantic learning and his deep sense of religion,lives in the legends of India as an incarnation of Siva".—

(Goldstucker on Panini. P. 250).

काय, पण अखिल जगानें, सदैव, आपली अत्यंत कृतज्ञताच दर्शविली पाहिजे. तथापि, प्रोफेसर रॉथला त्याचें इतकें महत्व कोठें वाटतें आहे? त्यानें विचाऱ्या सायणाचार्यास अगदीं मागें ठेवून, आपलेंच घोडें पुढें दकललें आहे; आणि त्या विद्वन्मुकुटमण्यास मूर्ख ठरवून, आपल्याच भोंवतीं टेंभा पाजळला आहे. त्यानें असें प्रतिपादन केलें आहे कीं, वेदाचा अर्थ युरोपस्थांस जितका चांगला आणि बरोबर समजतो, तितका सायणाचार्याला देखील समजला नाहीं.

१ "But the assurance with which he implies that Sàyana was not capable of mastering ten or twenty passages which are at the command of Professor Roth, presupposes, indeed, in his readers a degree of imbecile credulity which is, no doubt, a happy condition of mind for those who rejoice in it, and perhaps that best fitted for reading assertions like these, but which may not be quite so universal as he seems to assume." * * * —"In short, the great Mádhava, we are told, had not the proficiency of combining in his mind or otherwise those ten or twenty passages of his own Veda, which Professor Roth has the powerful advantage of bringing together by means of his little memoranda! "

(Goldstucker on Panini P. P. 249--250).

२. "We (says Roth) believe that a conscientious European exegete might understand much more correctly and thoroughly the sense of the Veda than Sàyana."

(Goldstucker on Panini. P. 254).

डाक्तर बोटलिंगचें पराक्रम देखील अशाच मासल्याचे आहेत. त्यानें आपल्या संस्कृत कोशांत, स्वतःच्या विद्वत्तेच्यां विशेष घमेंडींत, शब्दांचे स्वरूपच[१] बदलून टाकिलें आहे. परंतु, ह्या धृष्टपणाबद्दल गोल्ड्स्टकरनें[२] त्याचा चांगला खरपूस समाचार घेतला आहे.

बोटलिंग.

१ "We have banished completely from the verbal roots the vowels *ri. ri.* and *lri,* as well as the diphthongs at their end; for *ri.* at the end of nominal bases we have substituted *ar.*"

(Preface to the Worterbuch. P. VII. Roth).

२ "After such an expression of opinion, it will, of course, be my duty to show, at the earliest opportunity, that Dr. Boehtlingk is incapable of understanding even easy rules of Pánini, much less those of Kàtyāyana, and still less is he capable of making use of them in the understanding of classical texts. The errors in his department of the Dictionary are so numerous and of so peculiar a kind--yet on the whole so thorougly in accordance with the specimens I have adduced from his commentary on Panini, that it will fill every serious Sanskritist with dismay, when he calculates the mischievous influence which they must exercise on the study of Sansrit philology." * * *

(Goldstucker on Panini P. 254.)

'Happy Pátanjali ! blessed in thy ignorance ! Here we have potters who can fabricate—and not

पुढें चालू.

[library stamp]

असो. वृथाभिमानास पेटून हे दुराग्रही लोक जितकें जितकें म्हणून दुसऱ्याचें वृथा उणें काढण्यास इच्छितात, अथवा आपलेंच घोडें निरर्थक पुढें ढकलण्याविषयीं जितका म्हणून प्रयत्न करितात, तितके तितके ते सदैव फजित पावून, उलट त्यांच्याच तंगड्या त्यांच्या गळ्यांत येतात, आणि लोकांच्या उपहास्यतेस मात्र अचुक पात्र होतात, असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं.

एकंदरीनें पाहतां, कांहीं कांहीं पाश्चात्य केवळ अर्ध्या हळकुंडानेंच पिंवळे होऊन, आपल्या विचारसमतेची शून्यता अगदीं धडधडीत प्रकट करितात. त्याचीं अशा

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू

simply meanings of words, but the very words themselves, and words, too, which you have laboured so earnestly, so learnedly, so conscientiously, to save from the pottering of all future ' exegetes and lexicographers. ' Nay, we have, too, men who can repair to these potters, and call for, and admire, their linquistic wares!'

(Goldstucker on Panini. P. 258).

"And all this outrage, not only against the interests of science and truth, but against the commonest rules of decency, was committed in a series of planned attacks, because I had warned the Sanskrit Worterbuch of the danger of its career, and had not expressed any admiration for Dr. Boehtlingk's competence or scholarship."

(Goldstucker on Panini P. 265).

प्रकारचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. सबब, त्यांकडे आमच्या **भारतीयांनीं** विशेष लक्ष पोहोंचविलें पाहिजे. नाहीं तर त्यांच्या मनावर भलतेच संस्कार होण्याचा संभव आहे. कारण, कांहीं नामांकित अपवाद खेरीज करून बाकीच्या बहुतेक **पाश्चात्यांचा** असा कांहीं भलताच ग्रह होऊन गेला आहे कीं, आपलें तेवढें चांगलें आणि **आशियस्थांचें**, व त्यांतही विशेषतः **भारतीयांचें** तेवढें वाईट. तेव्हां, अशा प्रकारच्या मनाच्या दूषित अवस्थेंत, ते उघड रीतीनें पक्षपाताचे लेख लिहितात, यांत नवल नाहीं. यासाठीं, **भारतीयांनीं** अशा एकतर्फी आणि पक्षपाती लेखांवर भरंवसा न ठेवितां, सर्व प्रकारच्या ग्रंथांचें अवलोकन करावें. साधकबाधक कारणांचा पूर्ण विचार करावा. आपल्या मनाची पक्की खात्री करून घ्यावी. विषयाच्या स्वरूपाप्रमाणें दूरवर नजर पोहोंचवावी. व नंतर आपल्या मनाला कायमचें वळण द्यावें. नाहींपेक्षां, असल्या अनर्गल लेखांनीं आपल्या मनावर दुष्ट संस्कार होऊन, ह्या अतिपुराण **भारतीय** राष्ट्रावर विशेष शोचनीय परिणाम घडून आल्याशिवाय खचित राहणार नाहीं.

अपवाद.

तथापि, सुदैवेंकरून कांहीं **पाश्चात्य** फारच सरळ, अगदीं निराभिमानी, आणि सदैव निःपक्षपाती आढळतात. अशीं रत्नें

त्या त्या देशाचे खरोखर अमूल्य अलंकारच होत, यांत बिलकुल संशय नाहीं. गोल्ड्स्टकरसारख्या[१] सरळ आणि विद्वान पंडितास देखील, आम्हा भारतीयांच्या पौराणत्वाविषयीं, तसेंच त्यांचें पांडित्य, विद्वत्ता, शास्त्र, आणि कला, इत्यादिकांविषयीं बहुत अभिमान[२] वाटतो. व हिंदूंचें

---

१. "But whence was it that they ( European scholars ) were able to unfold to us the first secrets of ancient Hindu religion, of ancient Hindu philosophy and scientific researches? It was through the aid of the commentaries, in the first rank of which stands that of Pantanjali; in the second, the works of those master minds, the most prominent of whom are Sänkara and Mädhava Säyana. Without the vast information these commentators have disclosed to us,--with outtheir method of explaining the obscurest texts,--in one word without their scholarship, we should still stand at the outer-doors of Hindu antiquity."

(Goldstucker on Panini. P. P. 241-242.)

२. "Still a Provocation of this kind alone would have as little induced me to take up my pen now as it did heretofore; but when I see the public told authoritatively, yet without any proof, that Säyana teaches that understandering of the Veda which was current in India no longer than a few centuries ago;—when I see that the most distinguished and the most learned Hindu scholars and divines—the most valuable, and sometimes the only source of all our knowledge of ancient India

पुढें चालू.

भगीरथ प्रयत्न आणि त्यांचें बुद्धिप्रागल्भ्य, त्यांचें मतिवैभव आणि निरुपम वैदग्ध्य, इत्यादिकांविषयीं ते वारंवार स्तुति करितात.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

are scorned in theory, mutilated in print, and, as a consequence, set aside in the interpretation of Vaidik texts; —when I see that the most ancient readers of Hindu antiquity are interpreted to the Europeon public in such a manner as to cease to be that which they are; —when a clique of Sanskritists of this description vapours about giving us the sense of the Veda as it existed at the commencement of Hindu antiquity;—when I see that the very forms of the language are falsified, and that it is made a principle to slur the grammar of Pānini, and to ridicule those who lay stress on it;—when I see that one of the highest grammatical authorities of India is schooled for a "want of practice and skill", while this censure is passed without even an understanding of the work to which it refers ;— when I see that they who emphatically claim the epithet of "veracious" make statements which are the very reverse of truth;—and when I consider that this method of studying Sanskrit philology is pursued by those whose words apparently derive weight and influence from the professorial position they hold ;— and when, moreover, departing from rule and precedent, I see the journal of a distinguished Society—I fully hope through an

पुढें चालू.

अस्तु. कारणपरत्वें बरेंच विषयांतर झालें. परंतु तसें केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. सबब आतां प्रकृत विषयांकडे वळूं.

---

## व्याकरणशास्त्र.

पाणिनि.

सदरहू महाकाव्यानंतर भाषेच्या संबंधानें अति महत्वाचा ग्रंथकार म्हटला म्हणजे पाणिनि होय. याच्या अद्वितीय

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

oversight of its Editor, though a Professor of Sanskrit himself—permanently made the channel for propagating such statements as I have described and qualified, together with these scandalous personal attacks and calumnies,—then I hold that it would be a want of courage and a dereliction of duty If I did not make a stand against these *Saturnalia* of *Sanskrit Philology*". "On this ground I have raised my voice, however feeble and solitary for the moment, and have endeavoured to examine the competence of those who set themselves up as our masters and authorities. On this ground I have endeavoured to vindicate for Pánini the position he holds in Sanskrit literature, and the position he ought to hold amongst honest Sanskrit philologers."

( Goldstucker on Panini P. P. 267-268. )

बुद्धिमत्तेची जेवढी म्हणून तारीफ करावी तेवढी थोडीच. सर्व भाषांचा मूळ पाया व्याकरणच असल्यामुळें, त्यांतील एकंदर शब्दांचें शास्त्रीय विवेचन, त्यांची मूलोत्पत्ति; तत्संबंधीं संक्षिप्त विवरण, त्यांचें यथोचित नियमन, आणि भाषेचें यथार्थ संगोपन, इत्यादि सर्व गुणांनीं अलंकृत व परिपूर्ण असा ग्रंथ किती महत्वाचा व अवश्य आहे, हें प्रस्तुतच्या विद्याविलासविभूषित अशा **एकोणीसाव्या** शतकांत तरी, जास्त विस्तारानें सांगण्याची कांहीं अवश्यकता आहे, असें वाटत नाहीं.

तत्कृत अष्टाध्यायी

हा अमूल्य ग्रंथ म्हटला म्हणजे **अष्टाध्यायी** होय. ह्यांत **संस्कृत** भाषेची अत्यावश्य सेवा आमच्या जगद्विख्यात **पाणिनीनें** फारच आश्चर्यकारक रीतीनें व अतीव मार्मिकपणानें केली आहे. आणि म्हणूनच त्या पुराण व सर्वमान्य ऋषीविषयीं, खालीं लिहिल्याप्रमाणें यथार्थ वर्णन आहे.

**येनधौतागिरःपुंसां विमलैःशब्दवारिभिः ।**
**तमश्चाज्ञानजंभिन्नं तस्मैपाणिनयेनमः ॥**

तिचें खरें महत्व व उपयुक्तता.

जी **संस्कृत** भाषा प्रगल्भ, विस्तीर्ण, आणि परिपक्क; जिच्यांतील शब्दसंग्रह अपार; व ज्यांतील रूपांची साधनिकाही अतिविचित्र; अशा भाषेचें नियमन ज्यानें

अवघ्या ३९८३ सूत्रांत केलें; व तेंही लाघवचमत्कृतीनें विभूषित करून, ज्यानें **भारतीयांची** जगद्वंद्य भाषा शब्दरूपजलानें अगदीं शुद्ध केली; व ज्यानें अज्ञानजन्य मतिभ्रमाचें सर्वथैव निरसन केलें; त्या **पाणिनीनें** केवळ आपल्या बुध्द्यैश्वर्याच्या योगानें अखिल जगास सकौतुकाश्चर्य तोंडांत बोटें घालावयास लाविलें, याबद्दल जेवढें वर्णन करावें तेवढें थोडेंच.

पाणिनीचा काल.

**पाणिनीचा** काल इ. स. पूर्वी ७०० वर्षें[१] असून, त्याच्या अगोदर बरींच वर्षें प्रसिद्ध वैयाकरणी **शाकटायन** यानें **शब्दानुशासन** ह्मणून एक ग्रंथ केला होता. त्याजवरच **यक्षवर्मा** नामक जैनानें **चिंतामणिवृत्ति** या नांवाची टीका केलेली आहे. **पाणिनीनंतर** महत्वाचे वैयाकरणी म्हटले म्हणजे **कात्यायन** व **पतंजलि** हे होत. ह्यांपैकीं पहिल्यानें

अष्टाध्यायीचे भाष्यकार.

**अष्टाध्यायीस** परिशिष्टादाखल अनेक **वार्तिकें** रचिलीं असून, दुसऱ्यानें हीं **वार्तिकें** आणि **अष्टाध्यायीचीं सूत्रें**, यांची चांगली व नीट व्यवस्था लावून महा-

---

१. "Pānini, therefore, must have flourished in the beginning of the seventh century before the Christian-era, if not earlier still."

(Early History of the Dekkan)
By Dr. Bhandarkar. P. 8.

**भाष्य** नामक एक विस्तीर्ण ग्रंथ तयार केला. त्यानंतर **हरदत्त, चंद्र, भीमसेन**, वगैरे लहान मोठे वैयाकरणी झाले. परंतु ह्या सर्वांत अत्युत्तम टीकाकार ह्मणून, फार नांवाजलेले आणि विशेष प्रसिद्धीस आलेले असे **भट्टोजीदीक्षित** होत. यांचें राहणें श्रीक्षेत्र **काशी** येथें असून, त्यांच्या वंशजांस त्या क्षेत्रीं अग्रपूजेचा मान अजूनपर्यंत देखील चालत आहे.

भट्टोजिदीक्षितकृत कौमुदी.

हे **भट्टोजीदीक्षित** अगदीं अर्वाचीन असून, त्यांजला होऊन गेल्याला सुमारें दोन अडीचशें वर्षेंच झालीं असावीत. त्यांनीं **पाणिनी**च्या सर्व प्रसिद्ध **अष्टाध्यायी**वर **कौमुदी** या नांवाची सर्वमान्य **वृत्ति** केलेली आहे. ती इतकी अलीकडील असतांही, **सायणा**च्या **वेद**भाष्याप्रमाणें तिचें महात्म्य व पंडितमान्यता लागलींच स्थापित होऊन, **काशिकादि** वृत्तींपेक्षां देखील तिचें आजमित्तीस मोठें प्रामाण्य मानलें जातें.

पाणिनीच्या कालासंबंधीं उद्‌भवलेल्या शंकेचें निवारण.

आतां **पाणिनी**च्या कालाविषयीं प्रोफेसर **वेबर**नें जी उत्प्रेक्षा घेतली आहे त्याबद्दल थोडा विचार करूं. त्याचें ह्मणणें असें कीं, **पाणिनीनें** आपल्या **अष्टाध्यायी**च्या सूत्रांत **'यवनानी'** शब्दाच्या घटनेविषयीं नियम सांगितला असून, त्याच्या मतें **'यवन'** शब्द केवळ

ग्रीक वाचकच होय. ग्रीक लोकांचा हिंदुस्थानांत प्रवेश शिकंदर बादशहाच्या कारकीर्दीत झाला; आणि त्या राजपुत्रानें या भरतखंडावर स्वारी इ. स. पूर्वी ३२७साल्या वर्षी केली. तेव्हां अर्थातच प्रोफेसर मजकूर यांच्या समजुतीप्रमाणें पाणिनीचा काल सहरहू साला-नंतरचा असावा. आतां ही गोष्ट केवळ निराधार असूनही सदरहू प्रोफेसर ती अगदींच सिद्धवत्शी मानतात. परंतु, वास्तविक पाहतां तसा यत्किंचितही प्रकार नसून, शोधकबुद्धीनें विचार केला असतां असें दिसून येतें कीं, 'यवन' शब्द केवळ ग्रीकवाचक नसून तो भारतीयां शिवाय इतर लोकांचा संज्ञक होय. व त्या कामीं, प्रोफेसर लासेन् आणि प्रोफेसर मुलेर यांचें देखील तसेंच मत आहे.

पाणिनीच्या अष्टाध्यायीविषयीं इतर राष्ट्रांचे अभिप्राय.

अस्तु. आतां पाणिनीच्या अष्टाध्यायीरूपी सुंदर, विचित्र, आणि भव्य मंदिराविषयीं, पृथिवीवरील इतर राष्ट्रांचा काय अभिप्राय आहे त्याबद्दल थोडेंसें दिग्-

---

१. "Yavanâ is not the exclusive name of the Greeks or Ionians. Professor Lassen has proved that it had a much wider meaning, and that it was even used of Semitic Nations."

(Maxmuller's Anc. Sans. Lit. P. 501).

According to Goldstucker, Yavanáni alluded to by Panini was the Persian cuneiform alphabet.

(Goldstucker's Panini P. 17.)

दर्शन करून, पुढील विषया कडे वळूं. हा विषय किती महत्वाचा आहे हें त्याच्या स्वरूपावरूनच कळण्या सारखें आहे. कारण, संपूर्ण माहितीनें परिप्लुत असा व्याकरणावरील ग्रंथ **पाणिनीच्या अष्टाध्यायीशिवाय**, अखिल जगत्तलावर कोठेंही नाहीं. शब्दव्युत्पत्तीच्या संबंधानें साद्यन्त विवेचन तर ह्यांत अप्रतीम रीतीनें केलेलें दिसतें. धातुव्यवच्छेद फारच मार्मीकपणानें केल्याचें आढळून येतें. लघुविवेचन पद्धतीविषयीं तर त्या ऋषिवर्याचा हातखंडा. आणि भाषामूलतत्वाची विवेचनपद्धति, व तत्संबंधीं अथपासून इतिपर्यंत विस्तीर्ण ऊहापोह, यांत त्याची बरोबरी आजपर्यंत कोणी देखील केली नसल्यामुळें, हें अनुपम लावण्यरत्न, आपल्या अद्वितीय तेजानें विद्वज्जनसमूहास व पंडितवृन्दांस आल्हाद देऊन, तें पुराण व अक्षय्य प्रभेनें मंडित होत्सातें, जसेंच्या तसेंच निरंतर चमकत राहिलेलें आहे.

प्रसिद्ध इतिहासकार **एलफिन्स्टन्** हे तत्संबंधानें असें लिहितात कीं:—

"The language (Sankrit ) so highly commended seems always to have received the attention it deserved. Panini, the earliest extant writer on its grammar, is so ancient as to be mixed up with the fabulous ages. His works and those of his successors have established a system of grammar

he most complete that ever was employed in arranging the elements of human speech. ”

(History of India. P. 282.)

जर्मनी देशांत आजकाल संस्कृत भाषेचा अभ्यास विशेष जारीनें सुरू असून, तो तिकडील गुणज्ञ लोक फार परिश्रम घेऊन करितात. त्यामुळें त्यांस आमच्या गिर्वाण भाषेचें खरें स्वरूप, व यथार्थ तत्व, हीं कळून आलीं आहेत. प्रोफेसर वेबर हे एक तद्देशस्थच शोधक आणि विद्वान् पंडित असून, ते पाणिनीच्या व्याकरणाविषयीं असें लिहितात कीं:—

“And we at once pass into the magnificent edifice which bears the name of Pânini as its architect, and which ” justly commands the wonder and admiration of every one who enters. Pànini's grammer is distinguished above all similar works of other countries, partly by its thoroughly exhaustive investigation of the roots of the language and the formation of words; partly by its sharp precision of expression, which indicates with an enigmatical succintness whether forms come under the same or different rules. This is rendered possible by the employment of an algebraic terminology of arbitrary contrivance, the several parts of which stand to each other in the closest harmony, and which, by the very fact of its sufficing for all the

phenomena which the language presents, bespeaks at once the marvellous ingenuity of its inventor, and his profound penetration of the entire material of the language."

(History of Indian Literature. P. 216.)

आमच्या संस्कृत व्याकरणशास्त्राविषयीं प्रोफेसर मोक्ष-मुल्लर हे असें लिहितात कीं:—

'The achievements of the Brahmins in grammatical analysis, which date from six centuries before Christ, are still unsurpassed by any nation."

(D. N. Speeches and Essays. P. 5.)

ज्या कालीं शब्दव्युत्पत्ति आणि भाषातत्व, यासंबंधानें पृथ्वीवरील यच्यावत् राष्ट्रें केवल अज्ञानांधकारांत होतीं, अशा वेळीं, ह्मणजे सुमारें २२५० वर्षांपूर्वीं, आमचें भाषाशास्त्र अगदीं पूर्णत्वास जाऊन पोहोंचलें होतें; आणि आमची व्याकरणमीमांसा ही शास्त्रीय विवेचनाच्या अत्युच्च शिखराप्रत जाऊन ठेपली होती याविषयीं डाक्तर हंटर असें ह्मणतात कीं:—

"The science of Language, indeed, had been reduced in India to fundamental principles at a time when the grammarions of the West still treated it on the basis of accidental resemblances; and modern philology dates from the study of Sanskrit by European scholars. Panini was the architect of sanskrit grammar; but a long succession of grammarions must have laboured before

he reared his enduring frabric. The date of Panini has been assigned by his learned editor Bohtlink to about 350 .B .C. The grammar of Panini stands supreme among the granimars of the world, alike for its precision of statement, and for its thorough analysis of the roots of the language and of the formative principles of words. By employing on algebraic terminology it attains a sharp succintness unrivalled in brevity, but at times enigmatical. It arranges, in logical harmony, the whole phenomena which the Snskrit language presents, and stands forth as one of the most splendid achievements of human invention and industry."

(The Indian Empire. P. P. 100--101.)

---

# नाटकें व काव्यें.

कविरत्नविपाकाचें फल.

पाणिनीनंतर आमच्या सर्वमान्य गीर्वाण भाषेस अलंकृत करणारीं, आणि तिजला सर्व जगत्तलावर अत्युच्च स्थानापन्न होण्यास कारणीभूत होणारीं, अशीं केवळ आमचीं कविरत्नेंच होत. ह्यांनीं संस्कृत भाषा येवढ्या थोरवीस आणिली आहे कीं, तिचा भाग्योदय होऊन आजमित्तीस कमींत कमी हजार पांचशें वर्षें लोटलीं अस-

तांही, तिच्या ऐश्वर्याविषयीं विद्वज्जनांची जिज्ञासा, तिच्या सौन्दर्याविषयीं पंडितांचें कुतूहल, तिच्या माधुर्याविषयीं मधुव्रतांची लालसा, व तिच्या परिपक्वतेविषयीं गुणग्राहकांचें वात्सल्य, हीं बिलकुल कमी होत नाहींत. इतकेंच नाहीं तर, तीं उत्तरोत्तर वाढतच चाललीं आहेत. बरें, अशा विस्तीर्ण भाषेचा साठा देखील तिच्या ऐश्वर्यानुरूपच आहे. किंबहुना, या गीर्वाण भाषोदधींत, नानाप्रकारच्या व हरएकबाबतीच्या विषयावर असंख्य ग्रंथावलीं आहे, ती पाहिली ह्मणजे आमच्या पूर्वजांच्या बुद्धिवैभवाचें, व त्यांच्या उत्साहशक्तीचें, फारच आश्चर्य वाटतें. असा अचाट प्राचीन ग्रंथसमूह पृथिवीच्या पाठीवर ह्या भरतखंडाशिवाय अन्यत्र कोठें देखील दृष्टीस पडत नाहीं. पाश्चिमात्य देशांतील अति जुनाट आणि नष्टवैभव अशीं जीं राष्ट्रें ग्रीस आणि रोम, तीं सुद्धा आमच्या भरतखंडाच्या प्रखर तेजापुढें सविनय नमून, त्याच्या तीव्र बुध्यैश्वर्यानें विस्मित होत्सातीं, सकौतुकाश्चर्य माना डोलवितात.

संस्कृत ग्रंथावलीच्या अनंतत्वाविषयीं सरजोन्स् याचा अभिप्राय.

ह्या संबंधानें सरविल्यम् जोन्स् असें लिहितात कीं:—

'Wherever we direct our attention to Hindu literature, the notion of infinity presents itself; and surely the longest life would not suffice for a single perusal of works that rise and swell protabirant

like the Himálayas, above the bulkiest compositions of every land beyond the confines of India.'

कविश्रेणी.

**अस्तु.** ह्या कविमालिकेतील प्रत्येकाचें विवेचन करण्याविषयीं प्रस्तुत ग्रंथाची योजना नाहीं. सबब त्यांपैकीं जे कविपुंगव असून सर्वानुमतें अत्युत्कृष्ट व श्रेष्ठतर आहेत, त्यांजविषयींच दोन शब्द लिहिण्याचें मनांत आणिलें आहे.

कालिदास.

ह्या श्रेष्ठ **कविश्रेणींत** देखील, अत्युत्तम आणि अग्रेसर असा **कालिदासच** होय. त्याची अलोट कविताशक्ति; त्याचें काव्यरसानें थबथबलेलें असें मनोहर काव्य; सृष्टिवैभव वर्णन करण्याचें त्याचें अद्भुत सामर्थ्य; त्याचें मानुषीय स्वभावाचें मर्मभेदक ज्ञान; त्याचा तदन्तर्गत पूर्ण परिचय; त्याची अनुपम रसज्ञता; त्याचें हृदयद्रावक उपमाचातुर्य; त्याच्या विलक्षण कल्पनेची सौन्दर्यश्री; त्याचें अप्रतीम बुद्धिवैभव; आणि त्याची उदात्त विचारसरणी; इत्यादि गुणांनीं त्याचें श्रेष्ठत्व ह्या भूतळावर, सर्व राष्ट्रांतील विद्वज्जनांत, आपोआपच स्थापित झालें.

त्याचा काल.

**कालिदासाचा** काल निश्चयात्मक समजत नसल्यामुळें त्याची आजपर्यंत बरीच ओढाताण चालली आहे. विद्वज्जनसमूहांत देखील तत्संबंधीं मतभेद आहे. कोणी ह्मणतात

तो इसवी शकाच्या आठव्या शतकांत झाला असावा. कोणी ह्मणतात सहाव्या शतकांत. कोणी ह्मणतात तिसऱ्या शतकांत. आणि कोणी ह्मणतात पहिल्या शतकांत. परंतु हल्लीं अगदीं नूतन शोधावरून असें खात्रीपूर्वक कळून येतें कीं, तो प्रसिद्ध **विक्रमादित्य** राजाच्या कारकीर्दींत, ह्मणजे इसवी सनापूर्वीं ५६ वर्षें उदयास आला होता.

त्याचे ग्रंथ.

**कालिदासाचे** मुख्य ग्रंथ ह्मटले ह्मणजे, काव्यांत १ **ऋतुसंहार**, २ **कुमारसंभव**, ३ **रघुवंश**, ४ **मेघदूत**, आणि ५ **सेतुकाव्य**, हे असून, नाटकांत १ **शाकुंतल**, २ **विक्रमोर्वशी**, व ३ **मालविकाग्निमित्र**, हे होत. यांखेरीज १ प्रश्नोत्तरमाला, २ असज्जनवर्णन, ३ हास्यार्णवनाटक, ४ कर्पूरमंजरी, ५ श्यामलादंडक, ६ भोजचंपू, ७ रामायणचंपू ८ महापद्माष्टक, ९ गंगाष्टक, १० राक्षसकाव्य, ११ पुष्पबाणविलास, १२ श्रुतबोध, १३ शृंगारतिलक, आणि १४ शृंगारसाष्टक, हे ग्रंथ देखील त्यांनीच केलें असल्याविषयीं प्रसिद्धि असून, त्यांतील शेवटले तीन हल्लीं उपलब्ध व सर्वांस महशूर आहेत; आणि बाकी राहिल्यांपैकीं कांहीं उपलब्ध नाहींत, व कांहीं त्याच्या नांवावर मात्र विकले जातात अशी कल्पना आहे.

**ऋतुसंहारांत** षड्ऋतूंचें वर्णन असून, त्यांत भिन्नभिन्न

ऋतुसंहार.

ऋतूंत सृष्टीचीं निरनिराळीं रूपें कशीं दृष्टीस पडतात, आणि सृष्टिचमत्कृतीचें वैभव कसें भासमान होतें. याविषयीं वर्णन आहे. यांतील विशेष गुण ह्मटले ह्मणजे मधुर व कोमल पदरचना, आणि सार्द्र अर्थनिबंधन, हीं होत. **कुमार संभवांत** ठिकठिकाणीं विचित्र देखाव्यांचें मनोहर वर्णन केलें असून, त्यांत शृंगार आणि करुणारस यांचें हृदयद्रावक मिश्रण दृग्गोचर होतें. प्रस्तुत काव्यांत, "कुमार संभव" ह्मणजे "**कार्तिकेया**चा जन्म," याविषयींचा कथाभाग असून, त्याचे सात सर्ग आहेत. परंतु अलीकडे त्याचे आणखी दहा सर्ग असल्याविषयीं शोध लागला आहे. तथापि, ते **कालिदास**कृत नसून, ते त्याच्या एकाद्या शिष्यानेंच रचले असावें असें बहुमत आहे.

रघुवंश.

सर्व काव्यांत **रघुवंश** हें **कालिदासा**चें अत्युत्कृष्ठ काव्य होय. यांतील उत्तम भाषाप्रौढी, सुरेखवर्णन, उदात्त रचना, आल्हादकारक पदलालित्य, आणि भिन्न भिन्न रसांचा समयोचित आविर्भाव, इत्यादि गुणांनीं हें अलंकृत असल्या कारणानें, त्याचा यशोध्वज स्वयमेवच स्थापित होऊन, तें श्रेष्ठत्वास पावलें. यांत **दिलीपा**पासून तोंतहत **अग्निवर्णन** म्हणून जो **रघु** वंशांतील शेवटचा राजा झाला त्यापर्यंतच्या वंशावलीचें वर्णन आहे.

मेघदूत.

**मेघदूतां**त म्हणण्या सारिखें कांहीं

देखील संविधानक नसतांही, त्यांत **कालिदासानें** आपली अलोट कल्पनाशक्ति, अद्भुत बुद्धिवैभव, आणि अति तीव्र कवित्व दाखविल्याचें दिसतें. कारण, यांतील विषय म्हटला म्हणजे कायतो, एका शापाभिहत **यक्षानें रामगिरीपासून अलकापुरीपर्यंत** आपल्या विरहानें विव्हल झालेल्या कृशांगी स्त्रीस, मेघरूपी **दूताबरोबर** पाठविलेला निरोपच होय. याप्रमाणें या खंडकाव्याचा पाया इतका निर्जीव असूनही, त्यावर उभारलेली इमारत इतकी दृढतर, भव्य, टुमदार, आणि रमणीय भासते कीं, तिच्यांतील प्रत्येक देखावा डोळ्यापुढें मूर्तिमंत उभा राहतो, व तिच्यांतील प्रत्येक गोष्टीचें वर्णन अगदीं हुबेहूब असल्यामुळें, तें जणूकाय त्या त्या गोष्टीशीं आपला प्रत्यक्षच परिचय करून देत असल्याचें दिसतें. वर्षाकालीं मेघाचें दर्शन, तदानुषंगिक चित्ताची अतीव विव्हल वृत्ति, त्या समायाचे भिन्न भिन्न देखावे, पक्षांचें पर्यटन, सृष्टिचमत्कृतीचे मनावर झालेले संस्कार, मेघमार्गनिर्देश, तदनुसार नानाविध स्थलप्रकाशन, आणि त्या सर्वांचें सुरेख वर्णन, हीं यांत फारच मार्मिकपणानें साधलेलीं आहेत. **सेतुकाव्यां**तील पदलालित्य फारच चटकदार असून, त्यांतील शब्दरचना मधानें थबथबलेल्या फळाप्रमाणें अति मधुर आहे. याविषयीं प्रसिद्ध **बाण** कवि आपाल्या **हर्षचरितांत** असें लिहितो कीं:—

सेतुकाव्य.

कीर्तिः **प्रवरसेनस्य** प्रयाता कुमुदोज्ज्वला ।
सागरस्य परं पारम् कपिसेनेव **सेतुना** ॥
निर्गतासु न वा कस्य **कालिदासस्य** सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुरसार्द्रासु मंजरीष्विव जायते ॥

काव्यापेक्षां **कालिदासाची** नाटककार म्हणून फारच ख्याति आहे. त्याचें अत्युत्तम आणि जगद्विख्यात नाटक म्हटलें म्हणजे **शाकुंतल** होय. या नाटकाच्या योगानें त्याचे अलौकिक गुण **युरोपखंडांत** व इतर **पाश्चिमात्य** राष्ट्रांत तात्काळ पसरून, त्याची कीर्ती अमर झाली, आणि त्याविषयीं सर्वांचें कुतूहल सतत जागरूकच राहिलें. आमच्या **संस्कृत** शास्त्रभांडाराची व अपूर्व काव्योदधीची माहिती, **पाश्चिमात्यांस** थेट गेल्या अठराव्या शतकापर्यंत नव्हती, असें म्हटलें तरी चालेल. **संस्कृत** भाषेची विशेष अभिरुचि **पाश्चिमात्यांस** लागण्याला, मुख्यत्वेंकरून **सर विल्यम् जोन्स** हाच कारणीभूत झाला, असें म्हणण्यास कांहीं हरकत आहे असें वाटत नाहीं. हा प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ सुमारें शंभर वर्षांमागें **बंगाल्यांत** न्यायाधीश होता. त्यावेळीं त्याला आमच्या एका पंडिताकडून असें कळलें कीं, **संस्कृत** भाषेंत कांहीं अपूर्व नाटकें, सुरम्य काव्यें, आणि नानाविध शास्त्रकलाप आहेत. ही गोष्ट त्याला समजतांच त्यानें त्याभाषेचा अति परिश्रम घेऊन अभ्यास केला;

शाकुंतल.

पुढें कांहीं कालानें त्यांत त्याची चांगली प्रवीणता झाल्या-
वर, त्यानें **शाकुंतलाचें** इंग्रजींत भाषांतर करून इ० स०

त्याचें भाषांतर.

१७८९ सालीं तें **युरोपांत** प्रसिद्ध केलें. त्यामुळें, आमच्या ह्या **कवि-पुंगवाची** अजरामर कीर्ति प्रथमच देशांतरास जाऊन सर्व भूमंडलावर पसरली. इतकेंच नाहीं तर, त्यायोगानें **युरोपांतील** अनेक पंडितांचें मन अगदीं वेधलें जाऊन, त्यांनीं **संस्कृताचा** अभ्यास फार झपाट्यानें चालविला. त्यानंतर त्यांस या **संस्कृत** खाणीचें अत्युज्ज्वल तेज दृष्टीस पडून, त्यांतील अमूल्य रत्नें व कनक-मय अलंकार, हे यच्चावत् धुंडाळून काढून तीं सर्व स्वस्थानापन्न करण्यासाठीं, त्यांनीं आपलें तनमनधन खर्च केलें, व अजून देखील खर्च करीत आहेत; तेणें-करून त्यांच्या प्रयत्नाचें चीज होऊन, त्यांच्या परिश्रमा-चेंही साफल्य झालें. याप्रमाणें **संस्कृत** भाषेच्या अभ्या-सास विशेष प्रोत्साहन मिळाल्यामुळें, त्याचा आल्हाद-कारक परिणाम तेव्हांच उदयास येऊं लागला.

त्याविषयींची युरोप खंडांतील कीर्ति व पाश्चिमात्यांचा अभिप्राय.

असो. **शाकुंतलाचा** केवळ भाषांतररूपानें रसास्वाद घेऊन देखील **जर्मनींतील** प्रसिद्ध कवि **गेटी,** प्रख्यात तत्ववेत्ता **हंबोल्ड,** मर्मज्ञ व रसिक **गोएथ,** आणि सर्वांस महाशूर असा विद्वान् **श्लेजेल,** यांनीं

आनंदभरांत टाळ्या पिटल्या, व सकौतुकाश्चर्य माना डोलविल्या. मग अशा रसिकजनांनींही **कालिदास**चमत्कृति स्वयमेव **संस्कृतांत**च अवलोकन केली असती तर त्यांच्या आनंदास काय पारावार होता? आमच्या **कविवरासंबंधीं पाश्चात्यांचे** अभिप्राय लक्षांत ठेवण्यासारखे आहेत, सबब ते या खालीं थोडक्यांत देतों:—

"Kálidása the celebrated author of the Sàkuntala, is a masterly describer of the influence which Nature exercises upon the minds of lovers. Tenderness in the expression of feeling, and richness of creative fancy have assigned to him his lofty place among the poets of all nations."

(Alexander von Humboldt.)

"No composition of Kàlidasä displays more the richness of his poetical genius, the exuberance of his imagination, the warmth and play of his fancy, his profound knowledge of the human heart, his delicate appreciation of its most refined and tender emotions, his familiarity with the workings and counter-workings of its conflicting feelings,—in short, more entitles him to rank as the shakspeare of India."

(M. Williams.)

**शकुंतला** नाटकाविषयीं एक प्रसिद्धसुभाषित लोकांच्या तोंडीं आहे, त्यावरून तत्संबंधीं लोकप्रियता सहजीं ध्यानांत येण्यासारखी आहे.

काव्येषुनाटकंरम्यंतत्ररम्यंशकुंतला ।
तत्रापिचचतुर्थोंकस्तत्रश्लोकचतुष्टयम् ॥

पूर्वीच्या कांहीं विद्वज्जनांच्या मतें **कालिदासाचा** अत्युज्ज्वल गुण ह्मटला ह्मणजे उपमाचातुर्य; परंतु खराखर पाहतां त्याच्यांत अर्थगौरव आणि पदलालित्य, हीं देखील तितक्याच उत्कट प्रमाणांनीं दिसून येतात. कांहींचें असें मत आहे कीं, अर्थगौरव असें **भारवीचें**; पदलालित्य असें **दंडीचें**; उपमा अशी **कालिदासाची**; आणि सदरहू तिन्ही गुण **माघ** कवीच्या ठायीं होते.

कवीन्द्रांत कालिदासाची गणना.

असो. असें जरी आहे तरी **कालिदास** हा सर्व गुणांनीं श्रेष्ठ असल्यामुळें, त्याची **कवींद्रांत** गणना करणें केवळ अत्यवश्य आहे. इतकेंच नाहीं तर, एकंदर कविसमूहाची गणना करितांना, प्रथमतः जी करंगळी मोडावयाची ती त्याच्याच नांवानें, व तत्सन्मानार्थ, मोडली पाहिजे. कारण,

पुरा कवीनां गणना प्रसंगे
कनिष्टिकाऽधिष्टित **कालिदासः** ।
अद्यापितत्तुल्य कवेरभावात्
अनामिकासाऽर्थवती बभूव. ॥

---

१ उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दंडिनः पदलालित्यं माघे संतित्रयो गुणाः ॥

नवरत्नें

अतिप्रसिद्ध व महान् पराक्रमी राजाधिराज **विक्रमादित्य**, याच्या पदरीं जीं नवरत्नें होतीं त्यांपैकींच एक **कालिदास** होय. हीं नवरत्नें **धन्वंतरि, क्षपणक, अमरसिंह, शंकु, वेतालभट्ट, घटकर्पर, कालिदास, वराहमिहिर,** आणि **वररुचि,** अशीं असल्याविषयीं आख्यायिका आहे.

आतां, या नवरत्नांच्या कालाविषयीं जरीं बराच विवाद आहे तरी, त्या नांवाचे दुसरे पुरुषही अन्यकाळीं उदयास येण्याचा संभव असल्यामुळें, सदरहू रत्नें '**विक्रमादित्याच्या** दरबारीं चमकत होतीं, याविषयीं विशेष साशंक होण्यास कारण नाहीं. व याचीं अनेक उदाहरणेंही **संस्कृत** इतिहासांत मिळूं शकतील.

भवभूति, व त्याचे ग्रंथ.

**कालिदासानंतर** त्याच्याच तोडीचा, तथापि दुसऱ्या शेजेचा कवि, **भवभुति** होय. याचीं कायतीं तीनच नाटकें प्रसिद्ध आहेत. १ **मालतीमाधव**; २ **महावीरचरित**; व **उत्तररामचरित.** यांपैकीं, पाहिलें केवळ काल्पनिकच असून, दुसरीं दोन ऐतिहासिक आहेत.

मालतीमाधव.

**मालतीमाधवां**तील प्रधानरस श्रृंगारच होय. तथापि भयानक, अद्भुत, वीर, व करुण, या रसांचाही मनोहर विलास ह्या कविरत्नानें पांचव्या अंकांत प्रसंगविशेषीं फारच खुबीनें आवि-

प्कृत केला आहे. **कपाल कुंडलेनें मालतीस** नेल्यावर **माधव** अगदीं निराश होऊन, संध्याकाळच्या समयीं स्मशानांत फिरत असतां, पिशाचांच्या चेष्टा त्याच्या दृष्टीस पडल्यावरून, त्यांचें त्यानें वर्णन केलें आहे. त्यांत भयानक आणि बीभत्स रस इतके सुरेख उतरले आहेत कीं, ती अपूर्वयोजना अगदीं योग्यस्थळीं झाल्यासारिखें दिसतें. यांतील भाषा फारच प्रौढ असून विचारसरणी अगदीं उदात्त आहे.

महावीरचरित.

**महावीरचरितांत** वीररस मुख्य असून क्वचित् ठिकाणीं मात्र शृंगाराची झांक मारते.

उत्तररामचरित.

**उत्तररामचरित** हें **भवभूतीचें** तिसरें नाटक होय. यांत करुणारस प्रधान असून, हें नाटकच या कवीच्या विशेष कीर्तीस कारणीभूत झालें. करुणारसाशीं संभोगशृंगार, आणि विप्रलंभशृंगार, असे पहिल्या अंकांत मिसळले असून, पांचव्यांत व सहाव्याच्या आरंभीं वीररस, आणि सातव्यांत शेवटीं अद्भुत रस दृष्टिगोचर होतो.

त्याचे कविगुण.

"**कारुण्यंभवभूतिरेवतनुते**"—ही उक्ति अर्थशः खरी असून, करुणरस हा **भवभूती**ला अत्युत्कृष्टच साधला आहे. तसेंच मनुष्याच्या हृद्गताचें मार्मिक ज्ञान देखील या कवीस फारच उत्तम असल्यामुळें, मानवी स्वभावाचे नानातऱ्हेचे विकार

व अनेक तरंग, हे तो प्रेक्षकापुढें अगदीं हुबेहुब ठेवून देतो. बाह्य सृष्टिवर्णनांतही त्याचा हातखंडाच. सृष्टपदार्थांची चमत्कृति, विद्युल्लतेचा प्रभाव, वर्षाकाळाची शोभा, गिरिकंदरांचें वैभव, वनश्रीचें ऐश्वर्य, आणि नागरिक संपत्ति, इत्यादिकांचें वर्णन करण्यांत त्याची अनुपम शैली दिसून येते.

त्याचा काल व कुल.

**भवभूति** हा इसवी शकाच्या आठव्या शतकाच्या पूर्वार्धांत उदयास आला असावा असें अन्तःप्रमाणावरून कळून येतें. त्याच्या बापाचें नांव **नीलकंठ** असून, तो **दक्षिण** देशांत **पद्मपूर** नामक नगरीं, **उंबर** नांवाच्या तपोनिष्ट **ब्राह्मण** कुलांत जन्मला होता. ह्या आपल्या कवीच्या आईचें नांव **जातुकर्णी** असून, खुद्द त्यास **भट्टश्रीकंठ** असेंही पुढें ह्मणत.

इतर नाटकें, व

ह्याच्या खालोखालच्या तोडीचीं नाटकें ह्मटलीं ह्मणजे **शूद्रक**कृत १ **मृच्छकटिक** ( इ० श० पू. २१ वर्षे ); **राजशेखर**कृत २ **विद्धशालभंजिका** ( इ० स० चें दहावें शतक ); **भट्टनारायण**कृत ३ **वेणीसंहार** ( इ० स० १०७२ ); **धावक**कृत ४ **नागानंद** व ५ **रत्नावलि** ( इ० स० चें बारावें शतक ); **विशाखदत्त**कृत ६ **मुद्राराक्षस** ( इ० स० चें बारावें शतक ); आणि **कृष्णमिश्र**कृत ७ **प्रबोधचंद्रोदय** इ० स० चें बारावें शतक ); वगैरे होत.

**रघुवंश** आणि **कुमारसंभव** या महाकाव्याखेरीज खालीं लिहिलेलीं दुसरीं महाकाव्यें-हीं प्रसिद्ध आहेतः—

महाकाव्यें.

१ **भट्टीकाव्य** ( **भर्तृहरि**कृत. इ० स० चें सहावें किंवा सातवें शतक ); यांत **रामचंद्राचा** कथाभाग असून व्याकरणसंबंधीं विशेष विवेचन आहे. २ **माघकाव्य** ( शिशुपालवध **माघ**कृत; इ० स० चें १० वें शतक; या कवीचा आजा **सुप्रभदेव**, हा **श्रीधर्मनाभ** राजाच्या पदरीं प्रधान होता ). ३ **कीरातार्जुनीय**( **भारवि**कृत; इ० स० चें १० वें शतक ); ४ **नैषध** ( **श्रीहर्षकृत**; इ० स० १२ वें शतक ). ५ **राघवपांडवीय** ( **कविराजकृत**; इ० स० ११ वें शतक ); हें काव्य सर्वमान्य असून त्यांत शब्द योजना अशी कांहीं चमत्कारिक केली आहे कीं, तेच ते शब्द **रामायण** व **महाभारत** यांतील कथानकाकडे लागू पडतात. ६ **नलोदय** ( **कालिदास**कृत असल्याविषयीं आख्यायिका आहे; इ० स० ७८ ).

---

# गद्यग्रंथ.

वर सांगितलेल्या सर्व कविजनांचा भर केवळ **पद्य**रूप-काव्याकडेसच असल्यामुळें, **गद्य**रूपकाव्य किंवा गद्या-

गद्यग्रंथ.

त्मकग्रंथ त्यांजकडून मुळींच झाले नाहींत, हें जास्त सांगावयास नको. प्राय: आमच्या **संस्कृत** कवींचा कल्पनाओघ फक्त पद्यरचनेवरच होता, असें देखील ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

गद्यात्मक कवित्रय.

याप्रमाणें सर्वांनीं सतत अवलंबन केलेल्या प्रणालिकेंत, एकदम बदल करण्याचें अनुकरणीय व स्तुत्य साहस प्रथम **दंडी** कवीनेंच केलें असून, त्याचेंच अनुकरण त्याच्या पश्चात् **सुबंधु** व **बाण**, या कविद्वयांनीं केलें. त्यायोगानें अगोंच अलंकृत असलेल्या **संस्कृत** भाषेस अतीव रमणीयता प्राप्त झाली. इतकेंच नाहीं तर, या प्रसिद्ध कवित्रयांनीं गद्यग्रंथ रचून **उत्कृष्ट पदलालित्य**, **सुंदर श्लेषरचना**, आणि मनोवेधक व **उदात्त प्रागल्भ्य**, अशीं अनुक्रमें व्यक्त केलीं.

दंडी.

**दंडी** हा इसवी सनाच्या सहाव्या शतकांत उदयास आला असल्याविषयीं, हल्लीं उपलब्ध असलेल्या विद्वज्जनांच्या ग्रंथावलीवरून दिसून येतें. ह्याचा प्रसिद्ध ग्रंथ ह्मटला ह्मणजे गद्यरूप **दशकुमारचरित** होय. वास्तविक पाहतां हा ग्रंथ **कादंबरीच्या** तोडीचा नसून, त्यांत संविधानकचातुर्य देखील कांहींच दिसून येत नाहीं. यांत एक सबंध गोष्ट मुळींच नाहीं; तर, दशकुमारांचीं दहा निरनिराळीं चरित्रें वर्णन केलीं आहेत. तसेंच, यांत ह्मणण्यासारिखा सुरस

कथाभागही कोठें दृष्टीस पडत नाहीं. तथापि, त्याची उत्कृष्ठ गद्यरचना, ह्मणजे **दंडीचें** जगत्प्रसिद्ध असें जें **पद-लालित्य**, तेंच त्याच्या अजरामर कीर्तीस कारणीभूत झालें.

त्याचे ग्रंथ.

दंडीच्या **दशकुमार चरित्रां**त दुसरी एक विशेष महत्वाची गोष्ट आहे ती ही कीं, त्यांत तत्कालीन लोकस्थिति, त्या वेळचे आचारविचार, आणि नीतिविषयाचें प्रसंगानुसार अवलंबन, हीं जशींकांहीं अगदीं रेखलेलीं दृष्टीस पडतात. लबाडांस लबाडीनें जिंकणें; स्वार्थासाठीं नानाप्रकारचे जारणमारणादि प्रयोग करणें; दुसऱ्यांशीं कपट व कृत्रिम आचरणें; असदुपायांचा अंगिकार करणें; आणि द्यूत खेळून अथवा चौर्यादिकर्में करून निंद्य मार्गाला जाणें, किंवा लोकांच्या उपहास्यतेस पात्र होणें; इत्यादि गोष्टी त्या काळीं साधारण प्रचारांतल्या असाव्यांत, असें दंडीनें हुबेहूब काढिलेल्या चित्रावरून चांगलें दिसून येतें. या कवीविषयीं एके ठिकाणीं "**कविर्दंडी, कविर्दंडी, कविर्दंडी, न संशयः**" असें ह्मटलें आहे. ह्याचाच **काव्यादर्श** म्हणून दुसरा ग्रंथ आहे.

सुबंधु व त्याचा काल.

**सुबंधु** हा **बाणा**च्या कांहीं पूर्वीं, किंवा प्रायः तत्सम-कालीन असावा, अशी कल्पना आहे. त्यावरून पाहतां तो इसवी सन ६१०-६५०, अथवा सातव्या शतकाच्या अगदींच

आरंभीं उदयास येऊन गेला असावा, असें वाटतें. ह्याची प्रसिद्ध कृति ह्मटली ह्मणजे **वासवदत्ता** होय. हींत श्लेष-चमत्कृतीशिवाय दुसरें कांहींच विशेष वर्णन करण्यासारिखें नाहीं. तथापि, श्लेषरचनेंत ह्याचा हातखंडा असल्यामुळें, त्याविषयीं **बाण**कवि अति गौरवानें असें लिहितो कीं:—

कवीनामगलद्दर्पो नूनं **वासवदत्तया** ।
शक्त्येव **पांडुपुत्राणां** गतया **कर्ण**गोचरम् ॥

वाण व त्याचा काल.

**बाण** कवि हा वर सांगितल्याप्रमाणें सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला. याचें घर **शोण** नदीच्या पश्चिमेस **प्रीतिकूट** नामक नगरीं असून, त्याच्या बापाचें नांव **चित्रभानु** व आईचें नांव **राज्यदेवी** होतें.

त्याचे प्रसिद्ध ग्रंथ.

याच्या मुख्य कृति म्हटल्या म्हणजे १ **कादंबरी**, २ **हर्षचरित**, ३ **चंडिका शतक**, आणि ४ **पार्वती परिणय**. ह्या सर्वांत **कादंबरी** ही कृति सर्वमान्य व नामांकित होय. हिच्यांतील संविधानकचातुर्य इतकें कांहीं विलक्षण आणि मनोहर आहे कीं, एकंदर कथेचें बहुतेक पर्यवसान होईपर्यंत पुढें काय होणार तें वाचकांस बिलकुल कळून येत नाहीं. त्यामुळें तत्पारायणतृष्णा एकसारखी वाढत जाते, व तत्संबंधीं कुतूहल सतत जागृत राहतें.

**कादंबरी**ची भाषा प्रौढ असून चटकदार आहे; उदात्त

असून रमणीय आहे; आणि सरळ असून मधुर आहे. त्यांतील श्लेष खुबीदार असून सुरेख आहेत; व सुबोध असून मनोहर आहेत; त्यांतील ठिकठिकाणचे हुबेहुब देखावे, विचित्र शोभा, आणि रमणीय स्थलें, हीं इतक्या मार्मिकपणानें वर्णन केलीं आहेत कीं, त्यायोगानें संस्कृत भाषा ही जणूकाय त्याच्या घरीं पाणीच भरते आहे कीं काय असें भासून, त्याच्या अचाट कल्पनेचें व बुद्धिवैभवाचें फारच आश्चर्य वाटतें. बाणभट्टाचें प्रागल्भ्य, व त्याचें कवित्वसामर्थ्य, यांविषयीं खालीं लिहिलेली आर्या सुप्रसिद्ध आहे.

जाता शिखंडिनी प्राक्यथा शिखंडी तथावगच्छामि ।
प्रागल्भ्यमधिकमवाप्तुं वाणी बाणो बभूवेति ॥
( गोवर्धन. )

ह्याचा भावार्थ इतकाच आहे कीं, प्राचीन काळीं शिखंडिनी ही ज्याप्रमाणें शिखंडी झाली, त्या प्रमाणेंच वाणी म्हणजे सरस्वती ही आपल्या अंगीं पुरुषाचा धीटपणा व प्रागल्भ्य येण्याकरितां, बाण झाली. एकंदरींत बाणाच्या कृतींतलें प्रागल्भ्य व्यक्त करण्याचाच सदरहू कवीचा मुख्य हेतु होय.

कादंबरीचा पूर्वार्ध हा खुद्द बाणानेंच रचला होता.

---

१ ही कथा भारतांतील उद्योगपर्वाच्या शेवटीं सांगितली आहे.

२ बवयोः सावर्ण्यम् असल्यामुळें, गोवर्धनाचार्यांनीं हा खुबीदार श्लेष व्यक्त केला आहे.

कादंबरीचा पूर्वार्ध व उत्तरार्ध.

परंतु तिचा उत्तरार्ध या कविवराच्या हातूनच पुरा होण्याचा ईश्वरी संकेत नसल्यामुळें, त्याजवर मृत्यूनें आपली अकालिकच झडप घातली. तथापि, दुःखांत सुख इतकेंच मानावयाचें कीं, झालेली देशहानि भरून काढण्यासाठीं, **बाणाच्या पुत्रानें**च केवळ दीर्घोत्साहानें त्या कामास हातबोट लाविण्याचें मनांत आणून, राहिलेला उत्तरार्ध तडीस नेला; व ईशकृपेनें त्यांत त्याजला चांगलें यशही आलें, असें म्हणण्यास देखील कांहीं हरकत नाहीं. असें सांगतात कीं, बापाच्या वर्षश्राद्धापूर्वीं **कादंबरी**चा राहिलेला सर्व भाग पुरा करण्याविषयीं या सत्पुत्राचा पूर्ण संकल्प असून, तो त्यानें सिद्धीसही नेला.

बृहत्कथा व कथासरित्सागर.

याशिवाय दुसरे गद्यपद्य ग्रंथ म्हटले म्हणजे **बृहत्कथा** आणि **कथासरित्सागर** असे होत. यांपैकीं प्रथमची कृति **गुणाढ्यानें** इ० स० च्या सहाव्या शतकांत केली असून, दुसरी कृति **सोमदेवकृत** इ० स० च्या बाराव्या शतकांतली आहे.

गीतगोविंद व भामिनीविलास.

**जयदेवकृत गीतगोविंद, भर्तृहरिकृत शृंगारशतक,** आणि **जगन्नाथरायकृत भामिनीविलास,** हीं **संस्कृतां**तील प्रसिद्ध कामुक काव्यें होत. **जयदेव** हा

गौड देशाचा राजा जो **लक्ष्मणसेन** याच्या कारकीर्दींत इ० स० च्या बाराव्या ( ११११६ ) शतकांत उदयास आला. **भर्तृहरि** हा फारच विद्वान् राजा असून तो इ० स० ६५० त मरण पावला. सुप्रसिद्ध **नीतिशतक** आणि **वैराग्यशतक** यांचाही तोच कर्ता होय.

कल्पितकथा व उपाख्यानें

कल्पितकथा व उपाख्यानांपैकीं **सिंहासनद्वात्रिंशिका** (सिंहासनबत्तिशी), **वेतालपंचविंशति** ( वेताळपंचविशी ), **विक्रमांकचरित**, **शत्रुंजयमाहात्म्य**, **वीरचरित्र**, **विक्रमचरित्र**, आणि **भोजप्रबंध**, वगैरे सर्वश्रुत असे पुष्कळ ग्रंथ आहेत. **विक्रमांक** चरित हें **काश्मीर** येथील **बिल्हण** नामक कवीनें इ० स० १०८५ च्या सुमारास रचलें असून, यांत ऐतिहासिक माहिती खऱ्या प्रकारची आढळून येते. यांत **चालुक्य** नांवाच्या राजघराण्याचाही वृत्तांत आहे. **शत्रूंजय**माहात्म्य हें **वलभी** लिपींत **शिलादित्य** राजाच्या कारकीर्दींत **धनेश्वरानें** इ० स० च्या सहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत लिहिलें असून, **वीरचरित्र** हें **अनंतानें** रचिलें आहे.

कल्पितकथा[1] आणि अद्भुत गोष्टी, यांजला हिंदूंनीं

१. Allied to the fables are the Fairy Tales and Romances, in which the luxuriant fancy of the

पुढें चालू.

आपल्या विशाल कल्पनेच्या योगानें विलक्षण रमणीयता आणि चारुसौन्दर्य आणिलें आहे. इतकेंच नाहीं तर, पाश्चिमात्य आणि पौरस्त राष्ट्रांत ज्या ज्या कल्पितकथांचा अथवा सुरस कादंबऱ्यांचा फैलाव झालेला दृष्टीस पडतो, त्या सर्वांचें मूळ भरतखंडच असून, काल्पनिक सृष्टि

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू

Hindus has in the most wonderful degree put forth all its peculiar grace and charm. These too share with the fables the characteristic form of setting just referred to, and thereby, as well as by numerous points of detail, they are sufficiently marked out as the original source of most of the Arabian, Persian, and Western fairy tales and stories;"

(H. I. L. By Pro. weber P. P. 212-213.)

१. "Horace Wilson thinks it probable that in fiction much of the invention displayed on the revival of letters in Europe was referable to an Indian origin; that enough has been ascertained to determine the actual existance in Sanskrit or in vernacular translations from it of a very extensive literature of fiction, in which many of our European acquaintances are at once to be recognised; and that the Hindus occupy an early and prominent place in the history of fiction."

(Speeches and Writtings of Dádabhai, M. P.

किंवा विलासलावण्य, रमणीयश्री अथवा माधुर्यविशेष, इत्यादिकांचे अग्रेसर हिंदूच होत.

---

# कोष.

• आतां **संस्कृत** भाषेच्या संबंधानें विशेष महत्वाच्या अशा फक्त दोनच विषयांचा विचार करणें राहिला आहे. **१ भाषाकोष**, आणि **२ साहित्यशास्त्र.**

भाषाकोष व त्याचा कर्ता.

**भाषाकोषाची** बाल्यावस्था व त्याचें आदिस्वरूप प्रथमतः **निघंटूंत** दिसून येतें. यात फक्त पर्यायशब्दच दिले आहेत. तथापि, हा ग्रंथ केवळ **वेदार्थबोध** होण्यासाठींच केला असल्यामुळें, शास्त्रीय व सर्वव्यापक-अशा अन्य कोषाची खरी अवश्यकता होती. व ती उणीव **अमरसिंहानें** स्वनामव्यंजक असा **अमरकोष** रचून पुरी केली. हा कोष इतका सुरेख झाला आहे कीं, त्याच्या पूर्वी व तदनंतर अनेक कोषकार होऊन गेले तथापि, ह्याच्यापुढें कोणाचेंच तेज पडलें नाहीं. इतकेंच नाहीं तर, तो उदयास आल्यापासून आजमित्तीपर्यंत केवळ सतत प्रमाणभूतच होऊन राहिला आहे.

**अमरसिंह** हा विक्रमराजाच्या पदरीं जीं " नव-

अमरसिंहाचा काल.

रत्नें " होतीं त्यांपैकींच असल्या- विषयीं प्रसिद्धि असून, **विक्रम** हा इ० स० पूर्वी ५६ वर्षें होऊन गेला असल्याविषयीं सर्वानुमतें ठरलेलें आहे. तथापि त्याच्या कालाविषयीं अजूनही विवादच आहे. **हेमचंद्र** आणि **हलायुध** यांनीं

इतर कोषकार.

इ० स० च्या ११ व्या शतकाच्या उत्तरार्धांत, **अभिधानचिंतामणि** व **अभिधानरत्नमाला**, हे कोष परस्पर केले आहेत. प्रसिद्ध व्याकरणकार **व्याडि** आणि **वररुचि** यांचेही लिंगाविवेचनविषयक ग्रंथ आहेत. **संग्रह** नामक ग्रंथ **व्याडी**चाच असल्याविषयीं **नागेशाचें** ह्मणणें असून, त्याचे १,००,००० श्लोक आहेत.

---

# साहित्यशास्त्र.

छंदासंबंधीं महामूल्य अशीं उपकरणें **सूत्रांत** दिसून येत असून, **ऋग्वेदाच्या** शेवटल्या

छंदशास्त्र.

**ऋचांत** देखील कांहीं **छंदांचीं** पा- रिभाषिक नांवें आढळून येतात. **ब्राम्हणांत** सुद्धां तत्- संबंधीं विशेष ऊहापोह केला असून, **निदानसूत्रें** व **अनुक्रमणि** यांतही प्रत्येक **संहितेचा** कर्ता, तिचें **छंद**, आणि तिची **देवता**, यांविषयीं विवेचन आहे.

ऋक्संहितेचीं प्रातिशाख्य सूत्रें शौनकानेंच केलीं असल्याविषयीं आख्यायिका आहे. यांत सर्वच छंदोविषय आहे. याचीं तीन कांडें असून त्यां प्रत्येकाचीं सहा पटलें आहेत. याजवर उटकृत अत्युत्कृष्ट वृत्ति आहे. छंदशास्त्राविषयीं साद्यंत विचार पिंगलानें केला असून, पिंगल व महाभाष्यकार पतंजलि हे एकच असल्याविषयीं लोकमत आहे. ह्यांतील कांहीं छंदें इतकीं पुराणं आहेत कीं, तीं हल्लीं प्रचारांतही नाहींत. छंदशास्त्र प्रथमतः सूत्रकालात, ह्मणजे इसवी सनापूर्वीं सुमारें (१०००) एक हजार वर्षे, किंबहुना त्याच्यापूर्वीं देखील चांगलें प्रचारांत असावें, असें एकंदर प्रमाणांवरून दिसून येतें.

त्याचें पौराणत्व.

छंद शास्त्राचे शास्ते क्रौष्टुकि, तांडी, यास्क,

---

"On the other hand, there are metres taught in this work which but rarely occur in modern literature, and which must be looked upon as obsolute and out of fashion. Therefore, inspite of what has been said above, we must carry back the date of its composition to a period about simltaneous with the close of the Vedic sutra literature, or the commencement of the astronomical and algebraical literatures."

(H. I. L. P. 60 Note 55.)

त्याचें शास्त्रें, व त्यावरील प्रमाण ग्रंथ.

**सैतव**; **रात**, आणि **मांडव्य** असल्याविषयीं **पिंगलानें** सांगितलें आहे. या विषयावर **पिंगलानंतरचे** प्रमाणभूत ग्रंथ ह्मटले ह्मणजे **भारतकृत अलंकार शास्त्र**, व इसवी शकाच्या पंधराव्या शतकांत केलेलें **साहित्यदर्पण**, हे होत. **काव्यादर्श** ( दंडीकृत. ६ वें शतक ); **दशरूप** ( धनंजयकृत १० वें शतक ); **काव्यालंकारवृत्ति** ( वामन कृत. १२ वें शतक ); **काव्यप्रकाश** ( मम्मत कृत. १२ वें शतक ); **सरस्वतिकंठाभरण** ( भोजदेव कृत. ११ वें शतक ); **अलंकार शास्त्र** ( भट्ट उद्भट कृत. इ.स. ७७९–८१३ ); वगैरे नानाप्रकारचे याच विषयावर विस्तीर्ण ग्रंथ आहेत. **छंदशास्त्रांत** आणि **काव्यांत हिंदूंची** कल्पकता आणि बुद्धिचातुर्य विलक्षणच असून, त्यांनीं आपल्या कल्पनाशक्तीची योजना, व वैदग्ध्याचा सुविनियोग, विशेष मार्मिकपणानें केला आहे, असें **पाश्चिमात्यांस** देखील कबूल करावें लागतें.

---

1. "For the rest, in the field of rhetoric and poetics the Hindu mind, so fertile in nice distinction has had free scope, and has put forth all its power, not seldom in an extremely subtle and ingenious fashion"

(H. I. L. P. 232.)

दंडीच्या वेळीं भाषेच्या संबंधानें **गौड** आणि **वैदर्भ** अशा दोन **रीति** प्रसिद्धीस आल्या होत्या. तदनंतर कालांतरानें **पांचाळी, लाटी, आवंतिका,** व **मागधी** याही **रीति** प्रचारांत आल्या.

भाषारीति.

# शुद्धीपत्रक.

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| | | **प्रस्तावना.** | |
| २ | २ | मुलनिवासस्थान. | मूलनिवासस्थान. |
| | | **अनुक्रमणिका.** | |
| ४ | २० | भाग २४ वा. | भाग १४ वा. |
| ५ | १३ | दीक्षिताकृत्त. | दीक्षितकृत. |
| | | **मूळग्रंथ.** | |
| ४ | २० | Elphinstn's | Elphinston's |
| १५ | २१ | आपाआप. | आपोआप. |
| २१ | ३ | नैयमिकत्व. | व नैयमिकत्व. |
| ३२ | १२ | अशी, | अशी |
| ३७ | १३ | तिची | त्यांची |
| ४३ | १३ | ऋत्विजगर्व | ऋत्विजवर्ग. |
| ४६ | १७ | सामर्थ्य अथवा, | सामर्थ्य, अथवा |
| ४९ | ११ | ब्राह्मर्षि | ब्रह्मर्षि |
| ५९ | १९ | Tarra | Terra |
| ६० | ८ | पिढ्यापार्यंत. | पिढ्यापर्यंत. |
| ६७ | १६ | संतोष आणि राजा व प्रजा यांची नैसर्गिकच, | संतोष, आणि राजा व प्रजा, यांची नैसर्गिकच |
| ६८ | १२ | कलपरंपरा | कुलपरंपरा. |

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६९ | ४ | चांगलीं | चांगली |
| ,, | १५ | हिंदु स्यातंत्र्य | हिंदु स्वातंत्र्य |
| ,, | २१ | Dakhan | Dekhan |
| ७२ | ११ | आह्मास | आम्हांस |
| ८६ | १५ | Verual | Vernal |
| ,, | ,, | Coinceded | Coincided |
| ९२ | २० | Moons | Moon's |
| ९८ | १७ | पाश्चिमात्याचें | पाश्चिमात्यांचें |
| १०१ | १४ | असा विचार | असा अविचार |
| ,, | १५ | शोभतें | शोभते |
| १०४ | ३ | गहन जानाची | गहन ज्ञानाची |
| ,, | २२ | अकटापासून | अकटोपासून |
| १०८ | ९ | प्रकाच्या | प्रकारच्या |
| ११० | ११ | लागतें कारण, | लागतें. कारण, |
| ११४ | २३ | कालाचा सिद्धता | कालाची सिद्धता. |
| १२० | २२ | विद्याज्ञान देणें | विद्यादान देणें |
| १२१ | २ | खरोकर | खरोखर |
| १२५ | २ | संवत्सराची | संवत्सराचीं |
| १२९ | २२ | gymnasophist's | gymnasophists |
| १३२ | २१ | fo | of |
| १३५ | १ | असल्याचे | असल्याचें |
| १४१ | ७ | पुरुषमेध | पुरुषमेध |
| ,, | १० | सूत्राच | सूत्राचे |
| १४३ | ८ | हिदुत्व | हिंदुत्व |
| ,, | १९ | अष्टक | अष्टकें |
| १४६ | १७ | ब्राह्मणांचा | ब्राह्मणांची |

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १४८ | ११ | कौशिक | कौषिक |
| १५० | ११ | नाराणाय | नारायणाय |
| १५२ | १३ | श्रुतिस्तुं | श्रुतिस्तु. |
| १५२ | १९ | श्रौतं | श्रौतं |
| १५५ | १ | नाहीं. तरच | नाहीं तरच |
| १५७ | २ | गद्यपद्यांदि | गद्यपद्यादि. |
| १५८ | ९ | लिलिल्याप्रमाणें | लिहिल्याप्रमाणें |
| ,, | ११ | गुह्यसूत्रांत | गृह्यसूत्रांत |
| १६६ | १७ | Menelous's | Menelaus's |
| १७१ | १४ | झालें; | झालें, |
| १७९ | ७ | मूल | मूळ |
| १८० | ३ | शाधक | शोधक |
| १९२ | १६ | Stranger | Stronger |
| २०२ | १५ | with outthetr | without their |
| २०५ | ११ | ह्यांत | हींत |
| २०८ | १३ | Cunciform | Cuneiform |
| २१० | १ | hc | the |
| २१२ | ८ | on | an |
| २१३ | २२ | protabirant | protuberant |
| २१४ | २ | confincs | confines |
| २१६ | १४ | कालदासाचें | कालिदासाचें |
| २२२ | १७ | पाहिलें | पहिलें |
| २३५ | १६ | obsolute | obsolete |